ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे
मासिक !

# छात्र प्रबोधन

वर्ष ११ | अंक २ | सौर कार्तिक | शके १९३२
मूल्य ₹ ६०

## दीपावली विशेषांक





॥ चंदनाच्या तेलात हळदीच्या वाती..
उजळो तेजोमय कांती ॥
विको टरमरिक स्किन क्रीम म्हणजे हळद आणि चंदनाच्या तेलाचं सुयोग्य मिश्रण. गुणकारी हळदीमुळे तारुण्यपिटीका, मुरुम, पुटकुळया नाहीशा होतात आणि त्वचा मुलायम, निरोगी व सतेज राहते. यातील चंदनाचं तेल तुम्हाला देतं शितलतेसह पारंपारिक सुवास.
विको तर्फे दिवाळीच्या लावण्यमय शुभेच्छा !!
VICCO
turmeric
SKIN CREAM
विको® टरमरिक
स्किन क्रीम
सुंदर व निरोगी त्वचेकरिता
आयुर्वेदिक औषधी
Consumer care cell No: 0712 - 2420890

# संवाद

**नवक्षितिजावरच्या तेजस्वी प्रबोधकांनो,**

*दिवाळीच्या सुट्टीची रंगत वाढवणारा हा दिवाळी अंक, अनेकविध गोष्टींचा खजिना घेऊन तुमच्यासारख्या हजारो उत्साही मुला-मुलींना भेटायला येतोय. तुम्ही त्याच्या स्वागताला सज्ज आहात ना! तो तुम्हाला वेगवगळ्या क्षेत्रातील नवनवीन क्षितिजे तर दाखवेलच; पण त्यातले जे क्षितिज तुम्हाला खुणावेल त्या दिशेने पुढे कसं जायचं, याचं उत्तर शोधायलाही मदत करेल. मात्र त्यासाठी सगळा अंक स्वस्थपणे अन् चवीचवीने वाचायला हवा, बरं का!*


*तुम्ही कधी क्षितिज पाहिलंय का? शहरांमध्ये सिमेंट-कॉंक्रिटच्या जंगलात लांबवरचं क्षितिज पाहायला मिळणं तसं मुष्कीलच! त्यासाठी उंच टेकड्यांवर , गडकिल्ल्यावर, अथांग समुद्रकिनारी भटकायला जावं लागतं. तेथून दिसणारं लांबवरच्या क्षितिजाचं मोहक दृश्य आपल्याला भुरळ पाडतं. ती क्षितिजं आपल्याला खुणावत असतात, बोलावत असतात. क्षितिजापल्याडचं क्षितिज पाहायला!*

*आपल्यातल्या कर्तृत्वाला, धडपडीला ही क्षितिजं हाक मारत असतात. ही हाक ज्यांना ऐकू येते, ते ही क्षितिजे गाठायचा प्रयत्न करतात. त्यासाठी परिश्रम तर करावे लागतातच; पण त्यातही ते आनंद मिळवतात. नवनवीन गोष्टी शिकत, स्वत:च्या क्षमता ताणत जिद्दीने ते पुढची पुढची क्षितिजे ओलांडतात. मागे राहिलेल्यांसाठी, मग ते क्षितिजावरचे तारे होतात. तुमच्याच वयाच्या अशा काही उभरत्या ताऱ्यांचे अनुभव या अंकात तुम्ही वाचाल. रोजच्या पुस्तकी अभ्यासापलीकडे आपल्या आवडीच्या क्षेत्रात धडपडण्याची तुमची ऊर्मी त्यातून वाढीला लागेल अन् आपणही अशा एखाद्या क्षितिजावरचे तारे होऊ शकू, असा विश्वास तुमच्यामध्ये पेरेल.*

*मुखपृष्ठावरील चित्राचा तुम्हाला काय अर्थ जाणवला? त्यातील ५ पणत्यांमध्ये असलेल्या ज्योतींना मिळणारं इंधन कशाचं आहे? संगीत, चित्रपट, नृत्य, साहित्य अन् चित्रकला इ. कलांचं! आपल्या रोजच्या धावपळीत एक प्रकारचा उत्साह, टवटवी, आनंद निर्माण करण्याचं काम या कला करत असतात. लहानपणी या कलांचा आस्वाद घेता घेता, या क्षेत्रात स्वत:चा ठसा निर्माण करणाऱ्या ५ कलाकारांचे अनुभवही 'कलानंदाच्या वाटेवर' तुम्हाला अलगदपणे नेऊन सोडतील. येते नूतन वर्ष विविध कलांचा डोळस आस्वाद घेत घेत समृद्ध करणारे जावो, यासाठी शुभेच्छा!*

*असा कलेचा आनंद मिळवत असतानाच आपल्या आजूबाजूच्या घडामोडींकडे डोळसपणे कसं पाहायचं हे सांगणारा 'अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो' हा लेख तुमच्या अभ्यासाला, धडपडीला एक महत्त्वाची दिशा देईल. कशासाठी शिकायचं अन् काय शिकायचं, या प्रश्नांची उत्तरं शोधायला तुम्हाला मदत करेल.*

*विविध कथा-कविता अन् इतर रंजक गोष्टी वाचत असतानाच वरील तीनही विशेष लेख तुम्ही सर्वांनी नक्कीच वाचायला हव्यात, समजून घ्यायला हव्यात. हे सर्व लेख तुम्हाला अधिक 'मोठ्ठं' आणि अधिक 'तेजस्वी' व्हायला मदत करतील. त्या दिशेने तुमच्या प्रवासाला तुम्ही सुरुवात केलीत म्हणजे खऱ्या अर्थाने दीपोत्सव साजरा होईल.*



*असं स्वत: मोठ्ठं होऊन, अजून काही जणांना 'मोठ्ठं' होण्यासाठी मदत केलीत, साहाय्य केलंत, अनेकांच्या उपयोगी पडलात तर मग या दीपोत्सवाचा प्रकाश आणि आनंद शतपटींनी वाढलेला तुमच्याबरोबरच इतरांनाही जाणवेल. तुम्हा सर्वांना अशा दीपोत्सवासाठी भरभरून शुभेच्छा!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

# ज्ञान प्रबोधिनी

**स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था ! देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढविणारी गतिशील संघटना ! प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ !**

**कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये** | सर्जनशीलता | समग्रता | सहविचार | स्वावलंबन

नवीन जाणीवा, विचार, कल्पना, प्रतिमा यांचे नित्य नवीन धुमारे फुटणे आणि त्या प्रतिभेचे रूपांतर साहित्यकृती, कलाकृती, शास्त्रीय शोध, तत्त्वज्ञान-तंत्रज्ञान निर्मिती, प्रक्रिया व उपक्रम निर्मिती, आत्माविष्कार इ. मध्ये करता येणे

म्हणजे

## सर्जनशीलता

प्रतिभेची-कल्पकतेची-सर्जनशीलतेची क्षमता सर्व वयोगटांमध्ये निश्चितपणे विकसित करता येते, हे प्रबोधिनीच्या मानसशास्त्र संशोधिकेतील संशोधनामधून सिद्ध झाले आहे.

सर्जनशीलतेच्या विकासासाठी आवश्यक ते वातावरण, प्रशिक्षण व संधी उपलब्ध करून देणे हे प्रबोधिनीच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य !

## प्रबोधिनीच्या शालेय शिक्षण प्रक्रियेतील काही सर्जनशील आविष्कार

- वाचनकौशल्य, प्रतिभाविकसन, गटकार्य यांचा अभ्यासक्रम विकसित करून त्यांचा वेळापत्रकात समावेश.
- प्रतिभाशाली लेखन, नावीन्यपूर्ण प्रकल्प, सर्जनशील अभिव्यक्ती यासाठी प्रशिक्षण व मुक्त वाव.
- आठवीतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्याव्रत संस्काराची सर्जनशील मांडणी.
- स्थलांतरित गटांसाठी साखरशाळा/हंगामीशाळा यांची नवी शिक्षण प्रणाली विकसित.
- अभ्यासक्रम निवडीसाठी कालोचित अभिक्षमता मापन चाचण्यांची निर्मिती.
- आधुनिक काळासाठी पंचकोशाधारित 'गुरुकुल' शिक्षण पद्धतीची मांडणी.
- मासिकाद्वारा विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेच्या विकासाचे अनेक उपक्रम.
- सर्वांगीण बुद्धिविकासासाठी बालविकास शिबिरे.
- सार्वजनिक गणेशोत्सवासाठी बरची नृत्य.

## संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

| शिक्षण | संशोधन | ग्रामविकसन | आरोग्य | नेतृत्व विकसन | स्त्रीशक्ती प्रबोधन | राष्ट्रीय एकात्मता

**मुख्य कार्यालय :** ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030. ☎ ०२०-२४२०७००० **www.jnanaprabodhini.org**

# अंतरंग



## कृतिपर


१६. फुलपाखरू, छान किती दिसते ! – शुभा रुद्र
३९. झुक झुक चाले आगीन गाडी – मधुकर पालकर
४१. काचेचा दिवा – संपदा साळवी
६३. फोटोरोल जनरेटर – उल्हास टुमणे
६४. सुतळीचे शिंकाळे – माधुरी अरणकल्ले
१२२. उठावदार फ्रेम – चंद्रशेखर हडप
१५१. सीडींची लॅम्पशेड – शिवांगी मांडके
१५२. स्टीलची फुलदाणी – संपदा साळवी




## ज्ञान-विज्ञान


२०. डोळे उघडून शिका गड्यांनो... – श्रीरंग गोखले
९५. भारतातील शीत वाळवंट – अमृता जोगळेकर






## विशेष लेख


१३. कर्मयोगिनी भ. निवेदिता – डॉ. सुरुचि पांडे
१०३. गावा, मातीच्या संस्कारांनं घडवलं – मा. गृहमंत्री आर.आर. पाटील
१३५. अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो – विवेक कुलकर्णी


## लेखमाला


कलानंदाच्या वाटेवर (५३–६१)
५४. बोलगाण्यांतून मिळाली जीवनदृष्टी – दुर्गेश सोनार
५६. चित्रपट माध्यमाशी पहिली ओळख – विभावरी देशपांडे
५८. माझी प्रेरणा : चित्रकार एदगर देगा – देवदत्त पाडेकर
५९. अविस्मरणीय मैफली – शांभवी वझे
६०. गाण्यासाठी जन्म आपुला – संजीव अभ्यंकर





तारे नवक्षितिजावरचे – (८० ते ८७)
८१. सप्तसुरांच्या साथीने – प्रथमेश लघाटे
८३. संशोधनाचं क्षितिज खुणावतं आहे – हंसा पद्नाभन
८५. आणि पाण्याशी दोस्ती झाली... – मंथन चाळके
८६. अभ्यास आणि आसनं यांचा ‘योग’ होतो तेव्हा – प्राची शेंबेकर




## याशिवाय


१. संवाद
२७. मैत्री भाषेशी
७९. हसरी चित्रे
११९. ऐका माझा विनोद
१२५. कृतिपर प्रकाशचित्रे
१६२. स्पर्धा निवेदन




## कथा


५. फिरुनी नवी जन्मेन मी... – अनु. नीलिमा करमरकर
३४. डड्डू – रूपांतर – शंतनू पांडे
४७. रस्त्यावरच्या नाताळची गोष्ट – अनु. सुनंदा महाजन
६५. श्रीभद्र – सुधा रिसबुड
७५. तन्मयीची सुट्टी – अनु. मीना वांगीकर
११३. भूक – जयश्री काटीकर


## कविता


१२. बालमित्र – इंद्रजित भालेराव
४५. आपल्या हाती – प्रवीण दवणे
हल्ला – मुकुंदराज कुलकर्णी
७२. पाण्याची शाळा – अरुण म्हात्रे
७३. नभाहूनही मोठे माझे भान – आश्लेषा महाजन
११०. विठाबाई – दत्ता हलसगीकर
१११. समुद्र – रेणू पाचपोर




## ललित


१७. पहिली प्रसिद्धी – मल्हार अरणकल्ले
२५. वाचलेच पाहिजे असे काही... ‘आई समजून घेताना’ – शैलजा देशमुख
२९. गोदावरीचा गाव – डॉ. यशवंत पाठक
४२. प्रिय ऋचास – लीला दीक्षित
९१. पॅडल मार ! मी आहे... – अमृता सुभाष
१३९. प्राचार्य शिवाजीराव आणि मी – डॉ. यु. म. पठाण




# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक शके १९३२

इवली शल्ये रुपती, खुपती
मात करूदे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

दीपावली विशेषांक २०१०


चित्रकार
शिवाजी तुपे, दत्तात्रेय पाडेकर, अनंत कुलकर्णी, निलेश जाधव, मिलिंद मुळीक, पुंडलिक वझे, गिरीश सहस्रबुद्धे, सचिन जोशी, दीपक संकपाळ, अभय पुरंदरे, मुकुंद भालेराव, तेजस्वी भुरके, ऋजुता घाटे, साहिल उपळेकर, सौरभ उपळेकर

मुखपृष्ठ
गिरीश सहस्रबुद्धे
मांडणी/सजावट
रोहित कोकीळ
शीर्षक लेखन
बाबू उडुपी, प्रभाकर भोसले,
कुमार गोखले
मुद्रित शोधन
उदय हर्षे

अक्षर जुळणी
माधवी दाते
जाहिरात संकलन
वेदा भागवत,
शुभांगी सोलापूरकर
अंक वितरण
शिवराज पिंपुडे,
रवींद्र भोसले,
सुलभा कुलकर्णी

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया
संपादक मंडळ
महेन्द्र सेठिया, शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर, दत्ता श्री. टोळ
कार्यकारी संपादक
जयश्री काटीकर

वर्गणी–वार्षिक : ₹ १८०, द्वैवार्षिक : ₹ ३४०, त्रैवार्षिक : ₹ ५००, दशवार्षिक : ₹ १५००,
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० व घरपोच दिवाळी अंकासाठी ₹ ४० जादा.) या अंकाची किंमत : य ६०
नोंदणी क्र. (RNINO.) MAHMAR/2000/5636


संपर्क पत्ता – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411 030. दूरभाष क्र. : (०२०)२४२०७१७४/१७९
ई–मेल : jpchhatra@rediffmail.com संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

# फिरुनी नवा जन्मेन मी...

*डॅनिएला गार्सिया... चिले देशातलं एक चालतं-बोलतं आश्चर्य ! ऐन तारुण्यात डॅनिएला एका भीषण अपघातातून आश्चर्यकारकरित्या बचावली. अपघात म्हणजे शोकात्म घटना असे न मानता सुखान्त कथा आहे, या सकारात्मक दृष्टीने बघत, अपघातामुळे आलेल्या शारीरिक अपंगत्वावर तिने जिद्दीने मात केली.*

*तिने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे घेतलेली उभारी **I Chose to live** या आत्मकथनात्मक पुस्तकामुळे आपल्यापर्यंत पोचली. चिले देशातल्या सँटिॲगो शहरातल्या लहान मुलांच्या पुनर्वसन केंद्रात कुशल डॉक्टर म्हणून डॅनिएला आज सहजतेने वावरताना दिसते. तिचा हा प्रवास अक्षरश: अग्निदिव्यातून पार पडल्यासारखा होता. २००६ मध्ये चिले देशातील **'Woman of the Year'** हा सन्मान मिळवलेल्या डॅनिएलाच्या धैर्याची, चिकाटीची ही कथा...*




(डॅनिएलाच्या मूळ स्पॅनिश पुस्तकाचे मुखपृष्ठ)

**स्वैर अनु.-नीलिमा करमरकर**

डॅनिएला गार्सिया इ. स. २००२ पर्यंत संपन्न कुटुंबातील हुशार मुलगी म्हणून अगदी चिंताविरहित जीवन जगत होती. तिचे वडील लहान मुलांचे डॉक्टर आणि आई डेंटिस्ट आहे. तिला क्रिस्तिन हा जुळा भाऊ आणि लहान ३ भावंडं आहेत. गार्सिया कुटुंबातलं प्रेमळ वातावरण डॅनिएलाला आवडायचं. ती स्वत: बुद्धिमान, उत्साही, चैतन्यानं रसरसलेली अशी विद्यार्थिनी होती. तिला विविध खेळांचीही आवड होती.

बारावीला बायॉलॉजीमध्ये उत्तम गुण मिळवून चिले येथील ख्यातनाम मेडिकल कॉलेजमध्ये तिने प्रवेश घेतला. इ. स. २००२ च्या ऑक्टोबरमध्ये ती मेडिकलच्या चौथ्या वर्षाचा अभ्यास करत होती. गेली चार वर्षे रिकार्डो नावाचा तिचा मित्र होता, तो एम्.बी.ए. करत होता. रिकार्डो मैदानी खेळ खेळणारा देखणा तरुण होता. त्या दोघांना सुट्टीच्या दिवशी बाईकवरून दूरवर भटकंती करायला आवडायचं. वेगवेगळ्या खेळांचे सामने बघायला, प्रत्यक्ष खेळायला पण दोघंजण जायचे.

दक्षिण गोलार्धातला उन्हाळा सुरू होत होता. वार्षिक परीक्षा जवळ येत होत्या. 'इंटर मेडिकल कॉलेज स्पोर्टस्' त्या वेळेस सुरू होते. व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस, सॉकर, पोहणे वगैरे स्पर्धांत मेडिकलचे अंदाजे पंधराशे विद्यार्थी सहभागी झाले होते. सँटिॲगोच्या दक्षिणेला ६७० किलोमीटर अंतरावरील शहरात हे स्पोर्टस् होते. डॅनिएला जाण्याचं नक्की नव्हतं; कारण तिचा अभ्यास झाला नव्हता आणि या प्रवासात नऊ-दहा तास जाणार होते. शिवाय खर्चही भरपूर होता. तिची अनुत्सुकता बघून मैत्रिणींनी तिला भरीस पाडलं. त्यांना सॉकर टीममध्ये डॅनिएलासारखी कुशल खेळाडू हवी होती. शेवटी ती कशीबशी तयार झाली.

सेंट्रल रेल्वे स्टेशनवर पोचल्यावर तिची नाराजी

अजून उराशी धरली मी आस, मजला प्रकाश दिसणार ।
काळोख आहे मागे पुढे दाट, परी त्यातूनही मार्ग काढणार ।।

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटेक्ट्स, पुणे

अधिकच वाढली. विद्यार्थ्यांची खूप गर्दी झाल्याने नेहमीच्या रेल्वेला जुने डबे जोडले गेले होते. रंग उडालेले, कळकट, मोडक्या खिडक्यांचे ते डबे बघून उदास वाटत होतं. पण रेल्वेचा प्रवास सुरू झाल्यावर पोरांनी गिटार बाहेर काढली. सर्वांच्या नाच-गाण्याला बहर आला होता. रात्री १० वाजण्याच्या सुमारास तिचे दोन मित्र तिला म्हणाले, 'चल शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये जाऊन बघूया. इतर कॉलेजमधील ओळखीची मंडळी भेटतील.' रांकागुआ या औद्योगिक शहरावरून त्यावेळी गाडी जात होती. दोन डब्यांच्यामध्ये ते पोचले. एक मित्र तिच्या पुढे होता अन् एक पाठीमागे. डोक्यावरचे दिवे चालू नसल्याने अंधारच होता. दोन डब्यांना जोडणारा, कपलिंग्जवर तयार केलेला 'वॉक वे' तिथे टाकलेलाच नव्हता. पुढचा मित्र दिएगो लंबूटांग्या असल्याने एका ढांगेत इकडून तिकडे गेला. इतक्यात एका मोठ्या वळणावर गाडी पोचली आणि दोन डब्यातली फट गाडी वळताना अधिकच रुंदावली.

नेमके काय झाले आहे हे कळायच्या आतच एक पाऊल पुढे टाकलेल्या डॅनिएलाला आपण कुठेतरी खाली खाली जात आहोत इतकेच जाणवले. तिच्या दोघा मित्रांना काही कळेना. आत्ता डॅनिएला त्यांच्याबरोबर होती अन् दुसऱ्या क्षणाला ती दिसेनाशी झाली होती. इतक्यात त्या डब्यातले बाहेर डोकावून बघणारे कोणीतरी ओरडले, ''अरे, ती मुलगी पडली, पडली!''

डॅनिएलाला असं वाटलं की, आपण एकदा या बाजूला आणि एकदा त्या बाजूला हिसकले जात आहोत. आपण नेमके कुठे आहोत हे काही वेळ तिला कळेचना. मग लक्षात आलं की, आजूबाजूला मिट्ट काळोख आहे आणि आपण रेल्वेमार्गावर दोन रुळांच्यामध्ये पडलेले आहोत.

तिला काहीच वेदना होत नव्हत्या; पण तिच्या चेहऱ्यावर रक्ताचा ओघळ येऊन केस मागे चिकटले होते. तिने केस मागे सारण्यासाठी डावा हात चेहऱ्यावरून फिरवला; पण काहीच परिणाम झाला नाही. पुन्हा हात उचलला तर तोच अनुभव आला. मग डोकं वर उचलून तिनं हाताकडे बघितलं तर भीतीची एक लाट तिच्या शरीरातून गेली. कोपरापासून पुढचा तिचा हात आणि पंजा जागेवर नव्हता.

मग तिनं दुसऱ्या हाताकडे नजर वळवली. हाय राम! उजवा हात पण मनगटापासून तुटल्याने जागेवर नव्हता. दोन्ही हातातून जोरदार रक्तस्राव होत होता. तिने हलायचा प्रयत्न केला तेव्हा प्रथमच शरीरातून जोरदार वेदना जाणवली.

डॅनिएलाने त्यावेळी डोळ्याने काय बघितले हे तिला आठवायलासुद्धा आज त्रास होतो. तिचा डावा पाय पण तुटून पडला होता आणि गुडघ्याखालचा उजवा पाय नाहीसा झाला होता. तिच्या शरीराचे चार महत्त्वाचे अवयव गायब झालेले बघून भीतीचे सावट तिच्या मनावर आले. पण मेडिकलची विद्यार्थिनी असल्याने तातडीने काय करायचे हा विचार तिने केला. जोरदार रक्त वाहून गेल्याचे तिला कळतच होते.

तिला समजून चुकले की या मार्गावर दुसरी गाडी केव्हाही येऊ शकते. तिला तातडीने मदत मिळाली नाही तर तिचा मृत्यू अटळ आहे. आजूबाजूला निर्मनुष्य भाग होता. दूरवर शेतं दिसत होती. इतक्यात अंधारातून लुकलुकत हलत येणारा दिवा तिला दिसला. बहुधा गस्त घालणाऱ्या रखवालदाराचा असावा.

मोठ्या जिकिरीनं, प्रयत्नपूर्वक स्वत:ची पाठ उचलण्यात ती यशस्वी झाली आणि तिच्या शरीराचं मुटकुळं रेल्वे ट्रॅकच्या बाहेर पडलं. तिच्या दोन्ही बाजूंना रेल्वेमार्ग

अभिमानास्पद... ॥॥ डॉ. ग. नी. जोगळेकर पुरस्कार - डॉ. कृ. श्री. अर्जुनवाडकर
(शिक्षण क्षेत्रातील सेवेबद्दल)

**प्रायोजक - श्री. अजित भिडे (इव्हेंट मॅनेजर), पुणे**

होते. एक दक्षिणेकडे जाणारा अन् एक उत्तरेकडे जाणारा. आता मात्र तिला जरासुद्धा हलणं शक्य नव्हतं. ती कण्हत कण्हत 'हेल्प! हेल्प!' असं ओरडू लागली.

कडेच्या शेतातला शेतकरी त्याचवेळी सिगारेट ओढत जेवणानंतर शतपावली करण्यासाठी रेल्वेमार्गाच्या जवळून चालला होता. नुकतीच त्याने विद्यार्थ्यांनी भरलेली रेल्वे जाताना बघितली होती. त्यांचे गाणे बजावणे, त्याच्या कानावर पडले होते. काही मिनिटांतच त्याला डॅनिएलाचा 'वाचवा! वाचवा!' हा आवाज ऐकू आला आणि तो धावतच तिच्याजवळ पोचला.

तिला बघून तो म्हणाला, ''अजिबात हलू नकोस.'' धावतच जवळच्या पेट्रोल पंपावर जाऊन त्याने इमर्जन्सी ॲम्ब्युलन्स मागवली. चार मिनिटांतच डॉक्टरांच्या टीमसह ॲम्ब्युलन्स पेट्रोल पंपावर पोचली. सर्वजण साधनसामग्रीसह डॅनिएलाच्या जवळ पोचले.

डॅनिएला रक्ताच्या थारोळ्यात होती. तिच्याभोवती रानटी कुत्रे घुटमळत होते. त्यांना दूर हाकलले गेले. डॅनिएला अजून शुद्धीवर होती. कण्हत कण्हत ती स्वत:चं नाव पत्ता आणि आई-वडील, काका या सर्वांचे फोन नंबर सांगत होती. असा पेशंट आजवर या मंडळींनी बघितला नव्हता.

त्यांनी बँडेज बांधून रक्तप्रवाह थांबवण्याचा प्रयत्न केला, सलाइन लावले; मानेला पट्टा लावला आणि तिला बोर्डवर ठेवले. अकराव्या मिनिटाला तिला घेऊन ॲम्ब्युलन्स रांकागुआ हॉस्पिटलकडे निघाली. रस्ताभर डॅनिएला नातेवाईक, मित्रमंडळींची नावं आणि फोन नंबर घोकत होती. काही मिनिटांतच ते हॉस्पिटलमध्ये पोचले. दृष्टीस पडणाऱ्या प्रत्येकाला, 'मी बरी होणार आहे ना?' असं ती विचारत होती. इमर्जन्सी रूममध्ये नेल्यावर तिथल्या नर्सेसना तिने हाच प्रश्न विचारला. त्यांनी उत्तर देण्याचे टाळले, हे तिच्या लक्षात आले. तिला ऑपरेशन थिएटरमध्ये हलवले गेले. तिच्यासमोर प्रेमळ, दयाळू नजरेने बघणारे एक दाढीवाले डॉक्टर होते. त्यांना पण तिने हाच प्रश्न विचारला. ते म्हणाले, ''तू अगदी छान बरी होणार आहेस. माझी खात्री आहे.''

हे ऐकून डॅनिएलाला एकदम दिलासा वाटला. तिच्या मनात आलं, ''मला जे जे शक्य होतं ते मी केलं आहे. आता सारं परमेश्वराच्या आणि डॉक्टरांच्या



हातात आहे.'' तिला आता विश्रांती हवी होती. तिनं शांतपणे डोळे मिटले. तिला ॲनॅस्थेशिया देऊन डॉक्टरांनी तिच्या जखमा साफ करून शिवायला सुरुवात केली.

रात्री ११ वाजल्यानंतर रांकागुआ हॉस्पिटलमधून श्री. गार्सिया यांच्या घरी फोन आला. डॅनिएलाच्या जुळ्या भावाने तो उचलला. फोनवर सांगण्यात आले की 'अपघातात डॅनिएला जबर जखमी झाली आहे. तुम्ही ताबडतोब इकडे या.' एका शेजाऱ्याने या मंडळींना ताबडतोब आपल्या गाडीत घातले आणि एका तासाच्या अंतरावर असलेल्या रांकागुआ इथे आणून सोडले.

याचवेळी डॅनिएलाचा मित्र रिकार्डो याला गाडीतल्या एका मित्राचा फोन गेला होता. मित्र म्हणाला, ''डॅनिएला दिसेनाशी

जप पहाट आतली, जप आतले आकाश ।
बघ उजळेल दिशा, हवा वाटेल प्रवास।।

प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे

झाल्यावर गाडी थांबवण्यासाठी आम्ही साखळी ओढली होती. पण रेल्वे कर्मचाऱ्यांना गाडीतून कोणी पडले असेल हे खरेच वाटले नाही.''

डॅनिएलाचे हात आगगाडीच्या चाकाखाली आल्याने त्यावर काही करणे शक्य नव्हते. जखमा भरून येतील अशा प्रकारे त्या शिवण्यात तीन तासांच्या ऑपरेशननंतर डॉक्टरांना यश आले. दोन दिवस डॅनिएला औषधांच्या अमलाखाली होती. त्यानंतर तिला सॅंटिॲगो हॉस्पिटलच्या ICU मध्ये हलवण्यात आले. तिला जेव्हा जाग आली, तेव्हा डोळ्यांसमोर रिकार्डो दिसला. ती म्हणाली, ''मला बसतं करता येईल का?'' रिकार्डो ''हो'' म्हणाला; पण त्याच्या मनात धडधडत होतं.

डॅनिएला सहा आठवडे हॉस्पिटलमध्ये होती. आई-वडील, भाऊ, मित्रमंडळी, रिकार्डो कायम येत-जात होते. डॅनिएलाच्या जखमा भरून येत असताना, तिला असह्य वेदना व्हायच्या. काही वेळेस तिला असं वाटायचं की, आपले तुटलेले हात आणि पाय आगीत सापडले आहेत, तर काही वेळेस आपलं बोट इलेक्ट्रिक सॉकेटमध्ये गेल्यावर जसा शॉक बसतो, तसं वाटायचं. कधी कधी नखं उचकटली गेली तर कसा दाह होईल, तशा वेदना व्हायच्या. तिच्या आभासी वेदना कमी होण्यासाठी वेदनाशामक औषधांचा काहीही उपयोग होत नव्हता. शेवटी ध्यानधारणा आणि 'रेकी' याच्या साहाय्याने तिने शरीराच्या इतर अवयवांची ऊर्जा वाढवण्याचा प्रयत्न केला. मज्जातंतूंकडून येणाऱ्या प्रतिसादाशी सुसंवाद ठेवणं कधीतरी जमू लागलं; पण जेव्हा शरीर दमलेलं असायचं, तेव्हा वेदना पुन्हा उचल खायच्या.

या दरम्यान तिच्या वडिलांकडून उत्तम अवयवारोपण करणाऱ्या डॉक्टरांचा, पुनर्वसन करणाऱ्या संस्थेचा शोध सुरू होता.



अमेरिकेतील फिलाडेल्फियाच्या अल्बर्ट आईनस्टाईन युनिव्हर्सिटीचा विभाग त्यांना समाधानकारक वाटला. सहा आठवड्यांच्या उपचारासाठी डॅनिएला तिथे दाखल झाली. रोज सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत फिजिओथेरपिस्ट, ऑक्युपेशनल थेरपिस्ट, कृत्रिम अवयव केंद्रातील डॉक्टर्स यांच्याबरोबर तिची मेहनत सुरू असायची. कृत्रिम अवयवांच्या साहाय्यानं चालायचं कसं, कपडे कसे घालायचे, चमच्याने खायचं कसं वगैरे दैनंदिन व्यवहाराच्या गोष्टी तिला शिकवल्या जात होत्या.

या विभागाचे प्रमुख डॉ. अल्बर्टो यांच्याबरोबर डॅनिएलाची विशेष जवळीक निर्माण झाली. ते स्पॅनिश बोलायचे हे एक कारण होतंच; पण दुसरं म्हणजे प्रयोगशाळेत काम करताना झालेल्या स्फोटात त्यांनी स्वत:चा उजवा हात गमावला होता. त्या जागी बसवलेल्या हूकच्या साहाय्याने ते अगदी कुशलतेने काम करीत. ते बघून डॅनिएलाची आशा पालवली. तिने मनाशी निश्चय केला की एक दिवस मी पुन्हा

ऐका... ॥♪॥ राग बैरागी भैरव - 'ओंकार स्वरूपा सद्गुरु समर्था' (गायक - सुरेश वाडकर)

कै. दिनेश बळवंत बापट स्मरणार्थ, **प्रायोजक - श्री. बळवंत गंगाधर बापट, अंधेरी**

मेडिकल कॉलेजला जाईन. पहिल्याप्रमाणे सर्व काही करीन.


दोन दिवसांतच डॅनिएलासाठी दोन कृत्रिम पाय मागवले गेले. प्लास्टिक आणि धातूचा वापर केलेले ते कृत्रिम पाय म्हणजे डॅनिएलाच्या दृष्टीने जगातील सुंदर आणि सर्वोत्तम वस्तू होती. जेव्हा त्यापैकी एक पाय बसवला गेला आणि फिजिओथेरपिस्टच्या साहाय्याने डॅनिएला एका पायावर उभी



राहिली, तेव्हा तिला अतिशय आनंद झाला. तिच्या मदतनीसांच्या, नातेवाईकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. डॅनिएलाचा निर्धार, खिलाडू वृत्ती, शारीरिक शक्ती, चपळता या सर्व गोष्टींमुळे

वादळवारा आला तरी, प्रकाशाची वाट पाहावी ।
क्षण कसोटीचा आला तरी, उरातील जिद्द जपावी ।।

**प्रायोजक - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली**



पुढची प्रगती भरभर होत गेली.

कृत्रिम पायावर उभं राहाणं, चालणं, कृत्रिम हाताच्या साहाय्याने पेन धरणं, एखादी वस्तू उचलणं हे सगळंच आनंद देणारं होतं. पाठीवर बसवलेल्या केबल्सच्या साहाय्यानं हाताला लावलेल्या हूकची उघडमीट तिला जमू लागली. कोणतीही चल, अचल वस्तू हातात धरता येऊ लागली. इतकंच काय पण स्वत:चा मेक-अप करणं, विणकाम करणं, पँटवर चिकटलेला केस हूकच्या साहाय्याने उचलणं इथपर्यंत तिची प्रगती होत गेली.

आता हॉस्पिटलमधील डॉक्टरांना तिची चिंता वाटत नव्हती. तिचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक होता. डॉ. अल्बर्टो यांनी आजपर्यंत कृत्रिम अवयव रोपण केंद्रात अनेक रुग्ण बघितले; पण वास्तवाचा स्वीकार करणारी आणि पुढे सर्व काही चांगलंच होणार आहे, असा सकारात्मक विचार करणारी तिच्यासारखी तीच! डॉ. अल्बर्टो तिला म्हणाले,

“तुला हात नाहीत हे जाणवत राहील. आम्ही काही तुझ्या खऱ्या हातांची भरपाई करू शकणार नाही. आता तुझ्यापुढे दोन पर्याय आहेत - एक म्हणजे कोपऱ्यात बसून कुढत राहायचं किंवा आपल्याजवळ जे काही आहे त्याचा जास्तीतजास्त उपयोग करून आयुष्यातील सर्वोत्तम गोष्टी प्राप्त करण्याचं ध्येय समोर ठेवायचं.” डॅनिएलानं अर्थातच दुसरा पर्याय निवडला होता.

सहा आठवड्यांनी डॅनिएला तिच्या आई-बाबांबरोबर सँटिअ‍ॅगोला घरी गेली. विमानतळावर स्वागताला रिकार्डो आला होता. कृत्रिम पायांनी चालत येणारी डॅनिएला आणि तिच्या चेहऱ्यावरचं हास्य व आत्मविश्वास बघून तो आनंदला. सहा महिन्यांनी अजून काही मापं देणं व कृत्रिम अवयवांची डागडुजी करण्यासाठी तिने हॉस्पिटलला भेट दिली. तिला आता ‘मोटार’ चालवायची होती. इतकंच काय पण कृत्रिम पायांनी तोल सावरत जेव्हा ती बाईक चालवू लागली, तेव्हाचा आनंद अवर्णनीय होता. रिकार्डोबरोबरचे दिवस जणू पुन्हा बहरले.

अपघातानंतर साधारण वर्षभराने तिने पुन्हा मेडिकल कॉलेज जॉईन केले. तिला कोणत्याही प्रकारची सवलत किंवा दयेची अपेक्षा नव्हती. आता तिला डॉ. अल्बर्टोंप्रमाणे कृत्रिम अवयव केंद्रातील डॉक्टर व्हायचे होते. तिचा निश्चय आणि कष्ट यांच्या जोरावर तिने उत्तम गुण प्राप्त केले. ती चारही महत्त्वाचे अवयव (२ हात, २ पाय) नसलेली जगातील पहिली डॉक्टर ठरली.

या सर्व गोष्टींचा मिडियाला सुगावा होताच. तिला विविध माध्यमांच्या बातमीदारांनी भंडावून सोडले होते. तिचे घर, कॉलेज वगैरे ठिकाणी गाठून तिची माहिती मिळवायची त्यांना इच्छा होती; पण डॅनिएलाला अशा प्रकारे प्रकाशझोतात यायचे

पाहा... एव्हरेस्ट संग्रहालय, दार्जिलिंग
(एव्हरेस्ट मोहिमांबद्दल माहिती, फोटो, साधनसामग्री) ।
**प्रायोजक - श्री. अच्युत श्रीपाद दामले, सांगली**

नव्हते. तिने ठरवले की माझ्याबद्दल मीच लिहीन– मला हव्या त्या पद्धतीनं.

दिवसाच्या दुर्मिळ असलेल्या रिकाम्या वेळात ती अपघाताचे सर्व बारकावे व पुढील सर्व गोष्टी आठवून टाईप करू लागली. अखेर नेटाने तिने लिखाण पूर्ण केले. कोणी ते प्रकाशित करील अशी खात्री नव्हती. पण 'रँडम हाऊस' या प्रकाशनाने 'I Chose to Live' हे पुस्तक उचलून घेतले. अशाप्रकारे रिकार्डोला अर्पण केलेले तिचे पहिले पुस्तक तयार झाले. प्रथम आवृत्ती कल्पना नसताना हातोहात खपली. इ.स. २००८ पर्यंत पुस्तकाच्या १४ आवृत्त्या निघाल्या आणि डॅनिएलाचे नाव सर्वतोमुखी झाले.

डॅनिएलावर पत्रांचा, अभिनंदनाचा, भेटींचा वर्षाव झाला. तुझी कथा वाचून आम्हाला प्रेरणा मिळाल्याचे अनेकांनी तिला कळवले. वाचकांची पत्रं डॅनिएलाने ट्रंकेत जपून ठेवली आहेत. ही ट्रंक म्हणजे माझा 'आनंदाचा खजिना' आहे असं ती म्हणते. पुढे ती म्हणते, ''मी पुस्तक लिहिलं कारण माझ्या दृष्टीनं ती जणू काही एक उपचार पद्धती (थेरपी) होती. पण त्याचा इतरांनासुद्धा इतका उपयोग होईल, हे मला माहीत नव्हतं!!

डॅनिएलाला करता येत नाहीत अशा फारच थोड्या गोष्टी आता शिल्लक आहेत. उदा. स्वत:चे केस गोळा करून 'पोनीटेल' बांधणं तिला जमत नाही. पण प्रत्येक गोष्टीला तिने पर्याय शोधले आहेत. स्पेशल बटणांची सोय केलेली तिची SUV गाडी ती चालवते. तिला स्वयंपाक करायला, रिकार्डोबरोबर बाईकवरून भटकायला आवडतं.

आश्चर्य म्हणजे पेशंटला तपासताना, त्याच्या शरीरातली गाठ, सूज वगैरे तिला स्पर्शानं जाणवतं. तिच्या हूकला ते कळतं. ती म्हणते, ''मला हे सर्व जाणवतं. मला वाटतं, मानवी शरीरात एखाद्या गोष्टीचा अभाव असला तर त्याचा मेंदू ती भरपाई करण्यासाठी वेगळ्या पद्धतीनं कार्यरत होतो. माझ्या हाताच्या हूकच्या साहाय्यानं मला खरंच स्पर्शज्ञान होतं.''

इ. स. २००७ मध्ये रिकार्डोनं तिला लग्नाचा प्रस्ताव दिला. ''माझ्याशी लग्न करशील का?'' हे विचारण्यासाठी तो कैक महिने मनाची तयारी करत होता. रिकार्डो म्हणतो,

''जेव्हा डॅनिएलाला अपघात झाला, तेव्हा यापुढे काय होणार हे मला काहीच समजत नव्हतं. तिनं जे काही गमावलं आहे त्याबद्दल ती आयुष्यभर रडत राहणार का? पण असं काहीच घडलं नाही. ती पुन्हा पहिल्यासारखीच आनंदी, उत्साही, बडबडी राहिली. तिच्या जीवनाला कोणतीच मर्यादा किंवा खीळ पडली नाही. मला समजून चुकलं की उर्वरित आयुष्य मला डॅनिएलाबरोबरच आनंदात घालवायचं आहे.''

सप्टेंबर २००७ मध्ये ३०० लोकांच्या उपस्थितीत डॅनिएला आणि रिकार्डो यांचा विवाह झाला. डॅनिएलाचं ध्येय आदर्श पत्नी आणि त्यानंतर उत्तम माता होण्याचं आहेच; पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपला अनुभव आणि वैद्यकीय ज्ञान यांच्या साहाय्यानं कृत्रिम अवयव केंद्रातील रुग्णांचं पुनर्वसन करण्यात ती गुंतली आहे. डॉ. अल्बर्टो यांचा आदर्श सतत तिच्यासमोर आहे. त्यांचे शब्द तिला नेहमीच आठवतात, ''आयुष्यात तुम्ही काय कमावता हे महत्त्वाचं आहे; काय गमावता हे नव्हे.'' डॅनिएला याच मार्गावरून पुढे जात आहे.

(The Daniela Garcia Story - Anne Mullens)

**अनु. - नीलिमा करमरकर**
ब–शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता, पुणे 411004

*चित्रकार : मिलिंद मुळीक*

*हजार दिव्यांचा सोनवर्खी प्रकाश ।*
*सनईच्या स्वरांनी मंजुळले आकाश ।।*

**प्रायोजक - श्री. अमर परांजपे, सांगली**

# बालमित्र



किती दिसांनी भेटला
जुना दोस्त जिवलग
पाव शतकामागचे
नवे झाले जुने जग

त्याचा गाव डोंगरात
तलावांनी वेढलेला
झुळझुळत्या ओढ्यांनी
माझा जीव ओढलेला

ओढ्यातून वाहायचे
पाणी जसे खळ खळ
तसे धावायचो आम्ही
दोघं भाऊ जणू जुळं

गार डोंगराचा वारा
छाती भरून घ्यायचो
गोड मोहळाचा मध
ओंजळीतून प्यायचो

त्याच्या शेतातली साळ
होती किती सुगंधित
चालतांना शेजारून
वाटे किती आनंदित

भाजलेले हरभरे
मोह फुलं खिसाभर
पोट भरून खायचो
खेळायचो दिसभर

कधी जाणवता भूक
मित्र धरायचा शेळी
तिचा आचळ धरून
माझ्या तोंडामधी पिळी

मी तो शेळीच्या दुधाचा
उग्र घोट गिळताना
मारी तोंडावर धार
मित्र दूध पिळताना

थू थू करीतच त्याला
मारायला धावायचो
तळ्यामधी उतरून
मग तोंड धुवायचो

किती किती जागवल्या
आठवणी झोपलेल्या
किती उजळून आल्या
जुन्या स्मृती लोपलेल्या

किती उसळून आले
भाव–भावनांचे कढ
आसवांना थांबवणे
झाले किती अवघड

आयुष्याची वाटचाल
किती विपरीत झाली
मित्र आहे तिथे आहे
त्याच डोंगराच्याखाली

हिरव्याशा डोंगरात
आता वणवा पेटला
वणव्यात पोळलेला
मित्र व्याकूळ भेटला

माझा थाटला संसार
शहराच्या कुशीवर
इथे टेकलेला माथा
माझा मऊ उशीवर

मित्र आठवेल तेव्हा
आता टोचेल ही उशी
रात्र जागवित मग
मीही बदलीन कुशी

– **इंद्रजित भालेराव**
एकनाथनगर, परभणी 431 401

***चित्रकार : ऋजुता घाटे***

ऐका... राग भैरवी - अवघा रंग एक झाला
(गायिका - किशोरी आमोणकर)
कै. जयश्री हरी बर्वे स्मरणार्थ, **प्रायोजक - सौ. सुप्रिया बर्वे, ठाणे**

# कर्मयोगिनी भगिनी निवेदिता

- डॉ. सुरुचि पांडे



***जन्माने आयरिश असलेल्या मार्गारेट नोबल स्वामी विवेकानंदांच्या सहवासात आल्या. त्यांचे शिष्यत्व पत्करून 'भगिनी निवेदिता' झाल्या. ऐन तारुण्यात हिंदुस्थानात येऊन त्यांनी हिंदू संस्कृती आत्मसात केली आणि संन्यासव्रताची दीक्षा घेतली. समाजकारण, स्त्रीशिक्षण, देशस्वातंत्र्याचा लढा या विविध क्षेत्रांत त्या कर्मयोगिनी ठरल्या ! यंदाचं वर्ष हे भगिनी निवेदितांचं स्मृतिशताब्दी वर्ष! त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा हा प्रेरणादायी परिचय !***

''इंग्लंडमधील माझ्या कामाचे सर्वोत्तम पुष्प म्हणजे निवेदिता होय,'' हे शब्द आहेत स्वत: स्वामी विवेकानंदांचे ! गुरूकडून आणखी कुठलं बरं प्रशस्तिपत्र मिळायचं शिल्लक राहतं, हो ना? आपला देश सोडून दूरवरच्या भारताला कवेत घेण्यासाठी निवेदिता निघाल्या तेव्हा त्यांनी प्रतिज्ञा घेतली की, 'Thy people shall be my people' (तुमचे लोक हे माझे लोक होतील). उत्कट नि:स्वार्थता, सशक्त आणि सतेज बुद्धिमत्ता तसंच अचल, अटल अशी गुरूवरची श्रद्धा ही सारी भगिनी निवेदितांची वैशिष्ट्यं ! स्वामी विवेकानंदांनी त्यांना मार्गारेट नोबल या मूळच्या नावापासून 'निवेदिता' या नावात गुंफून टाकलं. निवेदिता म्हणजे समर्पिता ! आयर्लंडच्या या लेकीनं स्वत:ला भारताच्या सेवेत झोकून दिलं आणि आपलं नाव पुरेपूर सार्थ केलं.

पाश्चात्त्यांकडून कुठलीही मदत स्वीकारताना स्वामी विवेकानंद फार सावध असायचे. 'आश्रयदाते' या भूमिकेतून किंवा किंचितही हिणकस विचार मनात ठेवून केलेली कुठलीही मदत ते घेत नसत. स्वत:च्या देशाला 'गरीब बिचारा देश' असं कुणीही मानलेलं त्यांना पसंत नसे. प्रेम, करुणा आणि आदर या भावना मनात ठेवून कुणी साहाय्य देऊ केलं तरच ते स्वीकार करत असत. आपल्या भोवतालच्या माणसांमध्ये जे गुण असावेत असं त्यांना वाटत होतं त्या गुणांचा आविष्कार श्री. व सौ. सेव्हियर, भगिनी क्रिस्टीन, श्री. गुडविन, भगिनी निवेदिता अशा असंख्य विदेशी शिष्यांच्या व्यक्तिमत्त्वातून व्यक्त झालेला दिसतो. अशा सर्व विदेशी शिष्यांमध्ये अग्रणी प्रतिनिधी ठरल्या भगिनी निवेदिता ! त्या पूर्णपणे भारतीय समाजात मिसळून गेल्या. भारतासाठी आपली सेवा रुजू करताना त्यांनी समोरच्या माणसाला कधी अवनत, मिंधं वाटू दिलं नाही, हे त्यांचं मोठं गुणवैशिष्ट्य होतं.

आयर्लंडमधील डुंगॅनन् या गावात मार्गारेट नोबल यांचा जन्म २४ ऑक्टोबर १८६७ साली झाला. आईचं नाव होतं मेरी आणि वडिलांचं नाव होतं सॅम्युएल. मार्गारेटच्या आजी-आजोबांनी

**सूर्याकडे तोंड करून चाललो तर प्रकाशाची भेट होईल ।
समुद्राच्या काठावर उभे राहिलो तर विराटाचे दर्शन घडेल ।।**

**प्रायोजक - एक शुभेच्छुक, ठाणे (प.)**

आयर्लंडच्या मुक्तिसंग्रामात काम केलं होतं. इंग्रज सत्ताधीशांचा जुलूम आणि दडपशाही यांविरुद्ध एकोणिसाव्या शतकात या मुक्तिसंग्रामानं उग्र रूप धारण केलं होतं. सॅम्युएल कुटुंब १८७६ मध्ये डेव्हॉनशायरमधील टॉरिंगटन येथे राहायला आले. धर्मगुरू असलेल्या आपल्या वडिलांबरोबर लहान मार्गारेट त्यांच्या प्रवचनांना किंवा सेवाकार्यांना जात असे. दुर्दैवानं कष्टांचा ताण सहन न झाल्यानं मार्गारेटच्या वडिलांनी जेमतेम चौतिसाव्या वर्षी या जगाचा निरोप घेतला. आपल्या वडिलांचं धर्माचरण आणि आजोबांकडून स्वातंत्र्य आणि देशप्रेम यांचा वारसा मार्गारेटकडे चिरंतनपणे राहिला.

यथावकाश मार्गारेट शिक्षिकेचं काम करू लागली. विंबल्डनमध्ये तिनं एक शाळा सुरू केली आणि स्वत:च्या पद्धतीनं ती मुलांना शिकवू लागली. स्वत: मार्गारेटलाही साहित्य, संगीत, कला, भौतिकशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र अशा विविध विषयांमध्ये रुची होती; त्यामुळे एककल्ली, कंटाळवाण्या पद्धतीनं शिकवणं तिला स्वत:ला पसंत नसे. शिक्षिकेचं काम करता करता ती लेखन करत होती आणि लंडनमधील बौद्धिक क्षेत्रात तिचं नाव सुप्रतिष्ठित होऊ लागलं. मार्गारेटचं अंतरंग मात्र धर्मातील सत्य शोधण्यासाठी, अनुभवण्यासाठी तळमळत होतं. स्वामी विवेकानंदांशी त्यांची नोव्हेंबर १८९५ मध्ये पहिल्यांदा भेट झाली. लंडन शहरात वेदान्त तत्त्वज्ञानावर स्वामीजींचं व्याख्यान होतं. यानंतर मार्गारेटनं स्वामीजींची अनेक व्याख्यानं मनापासून ऐकली, त्यांना प्रश्न विचारले आणि मार्गारेटला मनोमनी जाणवलं, 'या भारतीय संन्यासी व्यक्तीकडूनच आपल्याला धर्माचं सत्य कळणार आहे.'

भारतासाठी आपलं जीवन अर्पण करायचा निश्चय मार्गारेटनं केला. स्वामी विवेकानंदांनी अतिशय प्रामाणिकपणे त्यांना भारतातील हवामानाची, अडथळ्यांची कल्पना दिली. त्या साऱ्यांवर पूर्ण विचार करून मार्गारेटनं आपली मातृभूमी, मित्रमंडळी, सगेसोयरे यांचा निरोप घेतला. २८ जानेवारी १८९८ रोजी त्या भारतात पोहोचल्या. स्वत: स्वामीजींनी त्यांना भारताचा इतिहास, भारतीय तत्त्वज्ञान, साहित्य, जनजीवन, सामाजिक प्रथा त्याचप्रमाणे प्राचीन व आधुनिक काळातील महान व्यक्तिमत्त्वं या साऱ्या-साऱ्याचा परिचय करून दिला. अध्यात्मिकतेचा संपन्न वारसा आणि त्याग-तपस्येच्या बळावर उभ्या असलेल्या चिरंतन भारताची प्रतिमा स्वामीजींनीच मार्गारेटच्या मनावर बिंबवली. अलगदपणे मार्गारेट आणि भारत एकमेकांमध्ये मिसळून जाऊ लागले. यानंतर थोड्याच दिवसांनी स्वामीजींनी मार्गारेटला ब्रह्मचर्य व्रताची दीक्षा दिली आणि तिला 'निवेदिता' हे नाव दिले.

यानंतरचं त्यांचं भारतातील कार्य तेजानं तळपून उठलं. भारतात पाऊल ठेवल्यानंतर लगेचच निवेदितांच्या साधनेस सुरुवात झाली. अध्यात्मसाधिका हे त्यांचं अंतर्मनाचं रूप होतंच; परंतु सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी काम करावं, अशी स्वामी विवेकानंदांची तसंच स्वत: निवेदितांचीही इच्छा होती. हिंदू धर्मसाधना करायला त्यांनी सुरुवात केली, त्यात आधी थोडे अडथळे निर्माण झाले. त्यांचं विदेशीपण, परधर्मीपण आड आलं. पण हळूहळू विरोधाची धार शमत गेली. श्री. रामकृष्णांची सहधर्मिणी असलेल्या शारदादेवींनी मात्र प्रथम भेटीतच या विदेशी मुलीला आपलं म्हटलं. हिंदू समाजाचे मानबिंदू कोणकोणते आहेत ते स्वामीजींनी स्वत:च निवेदितांना स्पष्ट करून सांगितलेले होते. १३ नोव्हेंबर १८९८ रोजी कालीपूजनाच्या मुहूर्तावर निवेदितांनी कोलकत्यात 'बालिका विद्यालया'ची स्थापना करून आपल्या कामास प्रारंभ केला. पहिल्या दिवशी फक्त तीन मुली शाळेत होत्या. हळूहळू ही संख्या वाढत तीसपर्यंत गेली. या विद्यालयात नव्यानं लग्न झालेल्या मुली आणि विधवा यांनाही प्रवेश होता. इथलं सारं शिक्षण राष्ट्रीय स्वाभिमानानं ओतप्रोत होतं. या मुलींना चित्रकला, भरतकला, नृत्यकला,

पाहा... मराठी चित्रपट - टिंग्या, विहीर, हरिश्चंद्राची फॅक्टरी



'दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा'.
**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, येरवडा, पुणे ६ ☎ २६६८४२०१**

नियमित अभ्यासाचे विषय यांबरोबर स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांच्याबद्दल प्रेम आणि अभिमान वाटावा असे शिक्षण दिले जात असे. आजही ही शाळा दिमाखात सुरू आहे.

४ जुलै १९०२ रोजी स्वामी विवेकानंदांनी देहत्याग केला. निवेदितांवर मोठं दु:ख कोसळलं; पण त्या डगमगल्या नाहीत. आपल्या गुरूनं आपल्यावर सोपवलेलं कार्य शेवटच्या श्वासापर्यंत करत राहायचं, या निश्चयानं त्या उठल्या. हिंदुराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी निवेदितांनी आपल्या कार्याची रूपरेखा आखली. त्यांच्याभोवती अनेक जहाल तसेच मवाळ देशभक्त जमा होऊ लागले. योगी अरविंद घोष, त्यांचेच भाऊ बारिंद्र, विवेकानंदांचे भाऊ भूपेंद्र, लोकमान्य टिळक, ना. गोखले, रवींद्रनाथ ठाकूर, जगदीशचंद्र बसू अशा असंख्य नामवंतांच्या त्या सतत संपर्कात असत. वृत्तपत्रांमध्ये इंग्रज सरकारवर टीका करणारे लेख त्यांनी लिहिले. आपल्या राजकीय कार्यातील सहभागाची झळ बसून रामकृष्ण मठास त्रास होऊ नये म्हणून औपचारिकरित्या आपले व मठाचे कार्यक्षेत्र वेगळे असल्याचे त्यांनी अमृतबझार पत्रिकेत जाहीरपणे स्पष्ट केले.

भगिनी निवेदितांनी अनेकविध विषयांवर लिखाण केले आहे. 'द कम्प्लीट वर्कस् ऑफ सिस्टर निवेदिता' या ग्रंथांचे पाच खंड बघितले असता, निवेदितांच्या अभ्यासाचा आवाका बघून आपण विस्मित होऊन जातो. स्वामी विवेकानंदांबद्दलचे 'द मास्टर ॲज आय सॉ हिम' हे पुस्तक; स्वामीजींबरोबर घडलेले भारतदर्शन; शारदादेवी, गोपालची आई यांबरोबरचा त्यांचा हृद्य संबंध, भारतीय चित्रकलेबद्दलचे चिकित्सात्मक आणि समीक्षक लिखाण; भारतीय पुराणकथा व मिथकं; तीर्थस्थळं, राष्ट्रवाद, शिक्षण, हिंदू जीवनपद्धती, भारतातील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समस्या, आपदा निवारण कार्य अशा असंख्य विषयांवर निवेदितांनी लिखाण केलेले आहे. त्या अंतर्बाह्य हिंदू बनून गेल्या होत्या, आणि म्हणूनच साऱ्या भारतीयांसाठी त्या भगिनी निवेदिता या नावानं लाडक्या ठरल्या.

ऑक्टोबर १९११ मध्ये दार्जिलिंगमध्ये अखेरचा श्वास घेईपर्यंत ही तपस्विनी दीपशिखा भारताच्या कल्याणाचा ध्यास घेत जगली. कविवर्य रवींद्रनाथ ठाकुरांनी भगिनी निवेदितांना 'लोकमाता' हे संबोधन दिले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे शब्द आहेत, ''विवेकानंद वाचून मी भारतावर प्रेम करायला शिकलो आणि निवेदितांच्या लिखाणातून मला विवेकानंदांचं आकलन झालं.''

'गीतांजली' मध्ये रवींद्रनाथांचे सुरेखसे शब्द आहेत,

*तव जीवनेर आलोते । जीवनप्रदीप ज्वालि ।।*
*हे पुजारी, आज निभृते । शाजाबो आमार थालि ।।*
*जेथा निखिलेर साधना । पूजालोक कोरे रचना ।।*
*शेथाय आमिओ धरिबो । ऍकटि ज्योतिर रेखा ।।*


(तुझ्या जीवनाच्या प्रकाशात मी जीवनाचा दीप उजळून घेतो. हे पुजारी, आज नीरवतेत माझी पूजेची थाळी मी सजवून घेईन. जिथे घडते अखिल विश्वाची साधना, पूजा बांधणारं सारं जग जिथं उपासना करतं, तिथे मीही ज्योतीची एक रेखा ओवाळीन.)

- डॉ. सुरुचि पांडे
सी/९, भोसले पार्क, सहकारनगर क्र. २, पुणे 411009
suruchipande@gmail.com

**भगिनी निवेदितांच्या स्मृतिशताब्दीचा काळ आहे, ऑक्टोबर २०१० ते ऑक्टोबर २०११. भगिनी निवेदितांच्या या ध्यासपर्वाच्या विविध मनोरम पैलूंचा परिचय आपण 'कर्मयोगिनी भगिनी निवेदिता' या लेखमालिकेद्वारे वर्षभर 'छात्र प्रबोधन'च्या मासिकातून करून घेणार आहोत. ही लेखमाला म्हणजे भगिनी निवेदितांना आपल्या साऱ्यांतर्फे एक विनम्र अर्घ्य आहे.**

सौख्याची नवप्रभा उजळली, दीपावली ही हासत आली ।
तिच्या स्वागता घरापुढे घालू लक्ष दिव्यांची रंगावली ।।
प्रायोजक - श्री. माधव दत्तात्रय वैद्य, दापोली

# फुलपाखरू, छान किती दिसते !





(आ.१)

ओरिगामी म्हणजे कागदाच्या वेगवेगळ्या प्रकारे घड्या घालून वेगवेगळ्या कलाकृती बनवणे. ही कला मूळची जपान देशातली. तिथल्या मुलांना कागदाच्या २५० प्रकारच्या कागदाच्या घड्या घालता येतात.


आज कागदाला विशिष्ट प्रकारच्या घड्या घालून एक चटकन् तयार होणारे फुलपाखरू करूया.

**साहित्य** – कुठल्याही प्रकारचा एक चौरसाकृती कागद, रंगवण्यासाठी स्केच पेन्स, जलरंग, टिकल्या इ.





**कृती** – १) प्रथम आकृती एक प्रमाणे चौरसाच्या कर्णातून कागदाला घड्या घालून, कागद पुन्हा उलगडा.

२) आता आकृतीत दाखविल्याप्रमाणे चौरसाच्या एकमेकांसमोरील बाजू आत दुमडा. म्हणजे A आणि D व C आणि B बिंदू एकत्र येतील. व तुमची आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे रचना तयार होईल. (त्रिकोण PQR)





३) या त्रिकोणाकृती घडीला २ पदर असतील पैकी वरच्या पदराची P व R टोके Q बिंदूशी जोडा.

४) आता दुमडलेल्या/घड्या घातलेला भाग पाठीमागे ठेवा. म्हणजे PQR हा सलग त्रिकोण दिसेल. (आ. ३)




५) आता हे Q टोक PR रेषेच्या थोडे बाहेर येईल अशा रीतीने दुमडा. (आ. ४)

६) Q बिंदू PR रेषेच्या खाली येण्यासाठी बरोबर मध्यभागी ही घडी येणार नाही हे लक्षात घ्या; त्यामुळे S व T हे बिंदूही थोडे आत दुमडले जातील. (आ. ४)




७) आता फक्त बाजू उलटा की झाले तुमचे फुलपाखरू तयार! (आ.५)

८) आकृतीत दाखवल्याप्रमाणे फुलपाखराचे चारही पंख तुम्हाला पाहिजे त्या रंगाने रंगवा. टिकल्या वगैरे लावून फुलपाखरू अधिक देखणे करा! पंखांचे आकारही बदलून बघा!

बाजारात अनेक प्रकारचे रंगीत कागद उपलब्ध आहेत. त्याचीही छान, आकर्षक, देखणी फुलपाखरे बनवा. फुलपाखराच्या पाठीमागच्या बाजूला साधे २ कागदाचे तुकडे चिकटवले तर त्या दोन कागदांतून पिन अडकवून त्याचं तुम्ही ब्रूचही करू शकता. केसांना त्याचा 'बो'ही करू शकता. शुभेच्छापत्रांवर, आरशावर, फ्रिजवर वगैरे ठिकाणीही तुम्ही फुलपाखरे चिकटवून सौंदर्याचा आविष्कार घडवू शकता !




– **शुभा रुद्र**, 'गोपिका', प्लॉट नं. ७, एल.आय.सी. कॉलनी,
पुणे–सातारा रस्ता, पुणे 411 009


*चित्रकार : सौरभ उपळेकर*

(रंगीत प्रकाशचित्र पान क्र. १२५ वर पाहा.)


पाहा... समुद्रिका मरीन संग्रहालय, अंदमान
(समुद्री वातावरण आणि जीवन, कोरल्स, शंख, शिंपले, दुर्मिळ माशांच्या जाती)
**प्रायोजक - श्री. हिंदूराव, डोंबिवली**

# पहिली प्रसिद्धी



मल्हार अरणकल्ले

प्राथमिक शाळेत आम्हाला शिकविणाऱ्या मनू गुरुजींचं नाव वर्तमानपत्रात छापून आल्याचा तो दिवस अजूनही डोळ्यांपुढं तेवढ्याच ताजेपणानं उभा आहे.

आमच्या शाळेशेजारी जुनी विहीर होती. ती वापरात नव्हती; पण तिच्यात पाणी असे. विहिरीभोवती संरक्षक कठडे नव्हते; त्यामुळं ती धोकादायक होती. सुटीत मुलं या विहिरीभोवती लपाछपी, चेंडू असं काहीही खेळत. गुरुजींनी 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरात विहिरीच्या या धोक्यासंबंधी लिहिलं होतं. या पत्रासोबत एक चित्रही होतं. पत्रात या परिस्थितीचं वर्णन, त्याखाली गुरुजींचं नाव गावाच्या उल्लेखासह! वर्तमानपत्रातलं गुरुजींचं छापील नाव आम्हांला खूपच भारावून टाकणारं ठरलं. आम्ही विद्यार्थी तेव्हा जेमतेम तिसरी-चौथीच्या वर्गात होतो. हे नेमकं काय आहे, असं काही छापून आल्यावर काय होतं, हे काहीही कळण्याचं आमचं वय नव्हतं; तरीही वर्तमानपत्रात गुरुजींचं नाव प्रसिद्ध होण्याचं गारूड आमच्या मनावर झालेलं होतंच.

गुरुजींनीच त्याचा खुलासा केला होता. वर्तमानपत्राकडं पोस्टानं पत्र पाठवून द्यायचं. त्यांना योग्य वाटलं, तर ते छापलं जातं. गुरुजींच्या या खुलाशानंतरही आमच्या डोक्यात काहीच प्रकाश पडलेला नव्हता.

मनातली छापील नावाची, छापील अक्षरांची उत्सुकता अशी ताणली गेली असतानाच, माध्यमिक शाळेतल्या आणखी एका सरांचं एक पत्र प्रसिद्ध झालं. या सरांच्या वडिलांचं किराणा मालाचं दुकान होतं; त्यामुळं तिथं जाणं होत असे. वडील मला म्हणाले, ''जा, त्या सरांना विचारून ये, त्यासाठी काय करायला हवं ते.''

भीती वाटत होती, तरीही शेठजींच्या परिचयाचं बोट धरून सरांकडं गेलो. ते तिसऱ्या मजल्यावर राहात होते. तिथं गेलो, तेव्हा ते काहीतरी वाचत होते. घाबरतच त्यांना विचारलं, ''मलाही वर्तमानपत्रात पत्र लिहायचं आहे. सांगाल काय करायचं ते?''

सर म्हणाले, ''कागद अडकवलेलं ते पॅड घे बघू.'' मी पॅड सरांपुढं ठेवलं. गुळगुळीत, पांढरेशुभ्र कागद. एवढे कोरे कागद मी प्रथमच पाहात होतो.

सरांनी त्यावर संपादकांना लिहायच्या पत्राचा मसुदा लिहिला - 'वाचकांच्या प्रश्नांची गाऱ्हाणी वेशीवर टांगणाऱ्या आपल्या वृत्तपत्रात

चैतन्याचा सूर्य ललाटी, किरणांचे ढेणे ।
एकासाठी दुसरा गातो, जगण्याचे गाणे ॥

प्रायोजक - श्री. उदय कर्वे, डोंबिवली

प्रसिद्धीसाठी सोबत पत्र पाठवीत आहे. त्याला कृपया प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती. कळावे. आपला कृपाभिलाषी–' पुढे रेघ. तिथं पत्रलेखकानं आपलं नाव आणि पत्ता लिहायचा, असं त्यांनी सांगितलं.

वर्तमानपत्र म्हणजे फक्त 'वाचकांचा पत्रव्यवहार' एवढीच समज असण्याचं ते वय होतं. सरांनी जे लिहिलं होतं, त्यातलं फार काही समजलं नव्हतं; पण आपलं नाव छापून येण्याची जादू आपल्याला गवसली आहे, याचा आभाळभर आनंद माझ्या मुठीत सामावला होता.

दुपारी एसटीनं वर्तमानपत्रं गावात यायची. शाळेतनं घराकडं परतताना पेठेत मोठी माणसं ती वाचत असल्याचं दृश्य रोजचंच होतं. तिथंच घोटाळत राहून मी त्यातलं 'वाचकांच्या पत्रव्यवहारा'चं पान मिळवायचो आणि तेवढंच नियमित वाचून काढायचो. काही वेळा नुसतंच डोळ्यांखालून घालायचो. बहुतेक पत्रं वाचकांना जाणवणाऱ्या समस्या, काही सूचना अशीच असत. गावात एसटीची शेड हवी, वीज हवी, एसटीच्या वेळा बदलाव्यात, टपाल बटवडा रोज वेळेत व्हावा, असे पत्रांचे विषय असत. त्यांचं अनुकरण करून मी वहीच्या आखीव कागदावर पत्र लिहिलं. पोस्टातनं पाकिट आणलं. वर वृत्तपत्राचा पत्ता लिहिला आणि पाकिट टपाल पेटीत टाकलं.

त्या रात्री नीट – शांत झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी गावात केव्हा पेपर येतोय आणि आपल्याला त्यातलं 'वाचकांच्या पत्रव्यवहारा'चं पान केव्हा पाहायला मिळतंय, असं होऊन गेलं होतं. वास्तविक, हे पत्र काही लगेच दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध होणार नव्हतंच; पण तेही लक्षात येत नव्हतं.

गावात तेव्हा एकच एसटी गाडी येई. त्याच गाडीतनं टपाल येई, म्हणून तिचं नाव 'टपाल गाडी.' ती दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास येत असे. शिक्षकमंडळी, काही शिकलेली मंडळी या गाडीची वाट रोजच पाहत; कारण याच गाडीतनं पेपरचे गठ्ठेही येत. नंतर त्यांचं वाटप होई. एका पेपरभोवती आठ-दहा माणसं डोकावताना दिसत. बऱ्याचदा पेपरची पानं वेगवेगळी करून, दोघं-दोघं, तिघं-तिघं डोकी खुपसून ती वाचत. त्यात एक पान सुटं-वेगळं करता येणारं असे. तेव्हा 'वाचकांचा पत्रव्यवहार' तिथं प्रसिद्ध होई. मोठ्या लोकांच्या या गर्दीत मी हे पान पाहायला मिळण्याच्या आशेनं बसलेला असे. त्यांतल्या काही पत्रांवर वाचक आपसांत चर्चा करीत. मतं मांडत. ते शब्द कानांवर येत असतानाच, आपलंही पत्र असंच छापून यावं, त्यावर लोकांनी बोलावं, असं खूप मनापासून वाटे.

कधी तरी टपाल गाडी दांडी मारत असे. 'अमूक ठिकाणी गाडीचे ब्रेक फेल झाले,' 'पावसामुळं रस्ता वाहून गेल्यानं गाडी पुण्याकडं माघारी गेली,' वगैरे चर्चा गावकरी करीत. हा दिवस बेचव होऊन जाई; कारण त्या दिवशी गावात ताजा पेपरच दिसत नसे. माझं पत्र छापून यावं, अशी रोज वाट पाहत होतो, त्या काळातही टपाल गाडीनं दोनदा बुट्टी मारली. ते दिवस पावसाळ्याचे होते; म्हणजे तर गाडीला निमित्तच पुरेसे होते. हे दोन्ही आघात माझ्या हळव्या मनाला जखमी करून गेले.

पेपरातलं ते पान पाहण्याची चिकाटी आणखी वाढत चालली होती.

शाळेतली दुपार म्हणजे गणितं आणि शेवटी लयबद्ध चालीत पाढे म्हणणं यासाठीच जणू राखून ठेवलेली असे. पाढे संपले, की सुटीची घंटाच ऐकायला मिळे; म्हणून गणितं सुरू झाली, म्हणजे मनात सुटीचं वारं भरारू लागे.

ती दुपार लख्ख स्मरणात आहे. मनू गुरुजी खुर्चीत बसून पेपर चाळत होते. आम्ही गणितं सोडविण्यात गुंतलो होतो. तेवढ्यात डोळ्यांसमोरचे उघडलेले पेपर बाजूला करीत



ऐका... राग भूप - जय जय महाराष्ट्र माझा
(गायक - शाहीर साबळे व इतर)
**प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे**

गुरुजी म्हणाले, 'अरे, आपल्या मल्हारचं पत्र छापून आलं.'

गुरुजींच्या वाक्याबरोबर माझं अस्तित्वच मी विसरून गेलो. आपण जे ऐकत आहोत, ते स्वप्न आहे की सत्य, याचा उलगडा न होण्याची विलक्षण अवस्था मी अनुभवत होतो.

नंतर गुरुजींनी पत्र वाचून दाखवलं. मी लिहिलं होतं, तेच जवळजवळ सगळं छापलेलं होतं. पत्राखाली माझं आणि गावाचं नाव. धीर करून पुढं जावं आणि गुरुजींकडून पेपर मागून घ्यावा, एवढं बळच मला नव्हतं. जी उत्सुकता घेऊन गेले सात-आठ दिवस मी वावरत होतो, ती पूर्ण झाल्याचा क्षण मी मात्र अत्यानंदानं साजरा करू शकत नव्हतो. कधी एकदा शाळा सुटते आणि घराकडं परतताना रस्त्यात पेपर वाचणाऱ्यांच्या गर्दीत आपण जातो, असं होऊन गेलं. वर्गात गणितं-पाढे हे सारं यांत्रिक पद्धतीनं पूर्ण केलं असावं बहुधा.

शाळा सुटली आणि मी धावतच रस्त्याकडं गेलो. पेपर घेऊन बसणाऱ्यांची जी दोन-तीन हमखास ठिकाणं होती, तिथं लोक दिसत नव्हते. मी मनातनं खूपच हिरमुसला झालो. गावात तेव्हा पेपरही मोजकेच येत. ते कुणाकडं येत असत, तेही माहिती नव्हतं. अखेर, तसाच घरी परत आलो. आईला - वडिलांना ते सांगितलं. वडील म्हणाले, ''गुरुजींकडून पेपर घेऊन ये. पाहून परत देऊ.''

गुरुजींची भीती वाटत असे. त्यांच्याकडं जाऊन असं काही बोलायला जीभ रेटली जाणं शक्य नव्हतं. तरीही, वडिलांच्या आग्रहाखातर गुरुजींच्या घरी गेलो. गुरुजी म्हणाले, ''पेपर शाळेचा असतो. तो तिथंच ठेवलेला असतो.''

मी आणखी निराश झालो.

थोड्या वेळानं आईनं काहीतरी सामान आणायला दुकानात पाठवलं. वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेले दोन-तीन पुडे तिला आणून दिले. आईनं सामान डब्यांत भरलं. ते कागद सरळ करून वडील वाचू लागले. त्यांना तो छंदच होता. कोणताही छापील कागद ते वाचत असत. त्यात काय वाचलं, ते सांगत असत. वाचताना ते एकदम म्हणाले, ''बाळ, तुझं छापील पत्र बघ हे!''

दुकानदारानं पुड्यांसाठी त्या दिवशीचाच पेपर वापरला होता आणि नेमकं माझं पत्र ज्या पानावर होतं, त्याचा तेवढाच भाग माझ्या सामानाच्या पुड्यांबरोबर आला होता.

तो कागद पुढं धरला आणि मी एका दमात सारं पत्र वाचून काढलं. एकदा, दोनदा आणि नंतर असंच कितीतरी वेळा!

मग आणखी एक पत्र पाठवलं. तेही असंच आठवडाभरात छापून आलं. मग लहान मुलांसाठी एक गोष्ट लिहिली. तीही प्रसिद्ध झाली आणि नंतर मानधनाची तीन रुपयांची मनीऑर्डर देखील आली.

छापील अक्षरांच्या विलक्षण ओढीपायी पुढं याच व्यवसायाशी नातं जोडलं गेलं. पाहता पाहता दीर्घ काळ निघून गेला. ज्या वृत्तपत्रात माझं पहिलंवहिलं पत्र प्रसिद्ध झालं होतं, तिथंच कामाची संधी मिळाली. इतर अनेकांची पत्रं, बातम्या, लेख छापण्याचं भाग्य लाभलं. संपादक म्हणून प्रेसलाईनमध्ये नाव प्रसिद्ध होण्याचंही भाळी लिहिलेलं होतं. तेव्हा तर रोजच नाव प्रसिद्ध होऊ लागलं.

पहिली प्रसिद्धी मला किती उत्तुंग ठिकाणी घेऊन आली नाही?

आजही, कुठं काही प्रसिद्ध होतं, ते अंक समोर येतात, तेव्हा पहिलं छापील नाव पाहण्यासाठीची उलघाल-उत्सुकता आठवते आणि फिरून तो थरार जागा होतो.

- **मल्हार अरणकल्ले**
१०/२, गुरुजन सोसायटी, कोथरूड, पुणे 411029
malhar.arankalle@esakal.com

*चित्रकार : निलेश जाधव*

दीपांनी दीपल्या दिशा, सण असे हा आज दिवाळी।
हर्षाने दुनिया प्रकाशित दिसे, आतुनि बाहेरूनि ।।

**प्रायोजक - श्री. किशोर पुरुषोत्तम पंडित, चेंबूर**



# डोळे उघडून शिका गड्यांनो...

◈ श्रीरंग गोखले

तीन महिने उलटून गेले की आम्हा मित्रांची चुळबूळ सुरू होते. कुठेतरी एखादी साहसी सहल व्हायलाच हवी. सर्वचजण साहसाची आवड असलेले, निसर्गप्रेमी, साध्यासुध्या सवयींचे असल्याने आमचे चांगले जमते. आमचा ग्रुप एकदम स्कॉलर नसला तरी अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाराही नाही. मुख्य म्हणजे उत्साही आहे.

यावेळची ट्रीप फारच वेगळी झाली. कामशेतला उतरून भीमाशंकरला रमतगमत जायचा बेत होता. निसर्ग पाहत जायचा तीन दिवसांचा प्लॅन झाला. परीक्षा जवळ असल्याने काही मेंबर्स गळाले; पण मी, चंद्रभान, शखेर आणि शेखरचा मित्र बाबू तिवारी असे जायचे ठरले.

पहिल्या दिवशी निघायला उशीर झाल्यामुळे परिचित गावीच मुक्काम ठेवला. भाजी-भाकरीचे जेवण घेऊन पारावर गप्पा मारत बसलो होतो. मे महिन्याचे सुटीचे दिवस असल्याने शाळेतली चार-आठ मुलेही गप्पा ऐकायला जमली होती. शाळा जवळच होती. यावेळच्या आमच्या ट्रीपचा उद्‌देश 'निसर्ग अनुभवणे' असा असल्याने कमीतकमी सामान बरोबर होते. वेळ कळण्यासाठी व अडचणीच्या वेळी उपयोग म्हणून एकच मोबाईल घेतला होता. रात्री साधारण आठचा सुमार असेल. एकदम गार वारे सुटले. दुरून वळवाचा पाऊस झाल्यासारखा वास आला. पाऊस येणार, असे म्हणत सर्वांनी काढता पाय घेतला. तेवढ्यात एक चौथीतला मुलगा म्हणाला, ''पाऊस कसा मोजतात त्याची मला माहिती पाहिजे.'' आम्ही त्याला समजावून देतो आहोत तो पावसाचे थेंब पडायला सुरुवात झाली! माझ्या डोक्यात एक कल्पना आली. मी मुलाला म्हणालो, ''जा घरून एक पाणी प्यायचे भांडे घेऊन ये.'' तो मुलगा ते घेऊन आला. तेवढ्यात जोरात पाऊस येऊ लागला. मुलांतही स्पर्धा असतेच त्याप्रमाणे दुसरा मुलगा एक थाळा घेऊन आला तर तिसरा एक वाटी. माझ्या वॉटरबॅगवर



शोधा... @ http://www.zoomin.com/
(पटकन फोटो अपलोड करा, मित्रांसोबत शेअर करा)
**प्रायोजक - श्री. दीपक दिगंबर थिटे, पुणे**

*आर्किमिडीजचा सिद्धान्त, पायथागोरसचे प्रमेय, त्रिकोण, वर्तुळ, त्रिकोणमिती... एक ना अनेक गोष्टी आपण विज्ञान-गणिताच्या अभ्यासात शिकतो; पण कशासाठी? काही साधनं उपलब्ध नसताना त्यांचं प्रत्यक्ष उपयोजन कसं करता येतं याचा अतिशय डोळस आणि रंजक अनुभव घ्यायचा तर ही 'एक वेगळी भटकंती' अनुभवायलाच हवी !*


एक ग्लास होता. तोही काढला आणि या चारही वस्तू मैदानात ठेवून आलो. पाऊस वाढला आणि जवळजवळ एक तास मुसळधार पाऊस पडत होता. पाऊस पूर्ण थांबल्यावर आमच्या चारही वस्तू आम्ही पाणी न सांडता चावडीत आणल्या व पट्टी बुडवून पाण्याची उंची पाहिली. माझा ग्लास सोडून वाटी, थाळा व भांडे यात सारखीच उंची आढळली. ती होती ७ मिलिमीटर. मुलांना समजावून दिले की आज आपल्या इथे ७ मिलिमीटर पाऊस झाला. वृत्तचितीचा आकार असलेल्या कुठल्याही पात्रात पाऊस मोजता येतो. थाळ्याचा व्यास मोठा असला तरी वाटीत पडलेल्या पाण्याची उंची व थाळ्यातल्या पाण्याची उंची एकच असते. माझा ग्लास खालून थोडा कोनाच्या आकाराचा असल्याने त्यात उंची जास्त दिसत होती.

रात्र बरीच झाली. हवेत गारवा आला. आमचा पावसाचा प्रयोग बाबू तिवारीला खूप आवडला. झोपताना हाच विषय निघाला. चंद्रभानचे म्हणणे होते आपण शाळा-कॉलेजात शिकतो त्याचा आपल्याला काही उपयोग होत नाही. बाबू ठामपणे म्हणत होता की उपयोग होतोच पण त्याचे म्हणणे त्याला नीट पटवून देता येत नव्हते. शेवटी बाबूने कूटप्रश्न टाकला. 'आपण क्रिकेटच्या मॅचसाठी पुण्याहून मुंबईला डेक्कन क्वीनने चाललो आहोत. गाडी फास्ट चालत असताना मी माझ्या हातातला लेदरचा बॉल बसल्याबसल्या ४-५ फूट सरळ वर टाकला तर तो परत माझ्या हातात येईल का?' बरीच वादावादी झाली आणि विचार करत असताना केव्हा झोप लागली कळलेच नाही.

दुसऱ्या दिवशी आगेकूच सुरू झाली. वाटेवर विरळ जंगल, आटलेला ओढा, चिंचेची झाडे असा प्रवास होत कच्च्या रस्त्याच्या एका टपरीवर आलो. चंद्रभानने चहा घेता घेता कालचाच मुद्दा उगाळायला सुरुवात केली. त्याच्या मताप्रमाणे प्रवेग, बॉइलचा नियम, आर्किमिडीजचा नियम हे त्याने नुसते पाठ केले होते. पुढे कधीही त्याला ते लागले नव्हते. भूमिती आणि त्रिकोणमिती तर डोक्यावरूनच जात असे. बाबू त्याला म्हणत होता की हे सर्व शिकताना परत परत पायाभूत गोष्टींकडे जायला हवे. सूत्रे पाठ करून फायदा नाही. रेषा, त्रिकोण व गोल यांचे मूलभूत सिद्धांत नीट पटवून घ्यायला हवेत. आमचे बोलणे एक प्रौढ गृहस्थ ऐकत होते. त्यांनी त्यांची ओळख जवळच्या गावातील शाळामास्तर म्हणून करून दिली. आमच्याशी बऱ्याच गप्पा झाल्या. गबाळे असले तरी गुरुजी हुषार होते. आम्ही निघाल्यावर आमचा पुढचा बेत त्यांना सांगितला. वायाळ गुरुजींनी जवळच असलेल्या त्यांच्या गावात मुक्कामाला येण्याचा आग्रह केला. त्यांच्या शाळेतील मुलांना आम्ही काही माहिती सांगावी, असा आग्रह धरला. आकाशदर्शन हा माझा आवडता छंद आहे. माझ्या डोक्यात आले, आपण नेहमी एकाच मार्गाने जातो. गुरुजी म्हणताहेत तर बाभूळगाव बघून, तेथे राहून, मग पुढचा मार्ग धरावा. रात्री गावकऱ्यांना व मुलांना ग्रहताऱ्यांची माहिती द्यावी. काल वळीव येऊन गेल्याने आज आकाश निरभ्र होते. आम्ही सर्वांनी विचार करून वायाळ गुरुजींबरोबर त्यांच्या गावी जायचा बेत केला. आमचा 'शालेय विषयांचे व्यवहार ज्ञान' यावरचा वाद गुरुजींनी ऐकला होताच. जाता जाता आम्हाला म्हणाले, "शाळेच्या पटांगणात एका बाजूला २५ फूटावर दोन खांब उभारले आहेत. आमच्याकडे एक शर्यतीचा खेळ आहे, त्यासाठी मला त्या २५ फुटांचे बरोबर ७ भाग करून पाहिजेत, तुम्हाला जमेल का? गावात टेप नाही आणि फूटपट्टी वापरायची नाही!" "बरं..

तम साराया दूर आजचा, सूर्य उद्याचा पाळू ।
आभाळाच्या इंद्रधनुशी खुशाल फुगडी खेळू ।।

प्रायोजक - श्री. नितीन पटवर्धन, पुणे




आम्ही पाहतो.'' आम्ही पुटपुटलो.

चार मैल म्हणता म्हणता दुपार झाली. गावकरी आम्हाला पाहून खूष झाले. मुलांचा घोळका आम्हाला घेरून नाना प्रश्न करू लागला. गुरुजींनी दोघांना चहाला पिटाळून आम्हाला दोन खांब दाखवले. ''यात काय आहे ! मी दाखवतो.'' असे म्हणत मी पावले टाकायला लागलो. तेहतीस पावले व थोडा भाग. त्याला ७ ने भागून मी किती पावले येतील याचे गणित सुरू केले. गुरुजी हसले. म्हणाले, ''अंदाजे नको. आम्हाला तंतोतंत पाहिजे!'' चहा आल्यामुळे हा प्रश्न न ताणता गुरुजींनी त्याचे उत्तर सांगितले. त्यांनी एका खांबाला अ-ब असे नाव दिले. एक मोठी दोरी घेऊन अ वर त्या दोरीचे टोक बांधून कुठल्याही एका अंदाजे कोनाने ती धरली. एका छोट्या लांबीच्या दोरीने या दोरीवर सात सारख्या खुणा केल्या. शेवटची खूण क. क आणि ब यावर एक दोरी ताणून धरली. आता अक या दोरीतल्या प्रत्येक बिंदूपासून बक या दोरीला समांतर रेषा काढल्यावर अब या रेषेचे बरोब्बर ७ भाग झाले! ''पण समांतर रेषा कशा काढणार?'' आता शेखर पुढे झाला आणि दोरीच्याच साहाय्याने बक रेषेला समांतर रेषा कशा काढता येतील हे त्याने दाखवून दिले. गुरुजींनी आम्हाला आणखी एक समस्या दाखविली. त्यांना एक चौरस ग्राऊंड करायचे होते आणि अंदाजे काटकोन केला की शेवटची बाजू कमी-जास्त व्हायची. आता मेंदू तल्लख झाल्याने परत शेखरने युक्ती सांगितली. पहिल्यांदा एक रेषा आखली. त्यावर एका टोकापासून आठ वितीवर एक खूण केली. दहा विती एका दोरीवर घेऊन त्या खुणेपासून जमिनीवर एक कंस काढला. पहिल्या टोकापासून सहा विती दोरीवर घेऊन दुसरा कंस काढला. यांचा शिरोबिंदू व पहिले टोक जोडणारी रेषा काटकोनात असायलाच पाहिजे. ''पायथागोरस ८-६-१०'' चंद्रभान ओरडला. गुरुजी हसले.

दुपारी शाळेची मुले मैदान दाखवायला निघाली. गावापासून मैलभर अंतरावर एक खरेच सुंदर मैदान होते. इथे काय काय खेळ होतात हे गुरुजींनी सांगितले. तेवढ्यात आठ-दहा मुलांत आरडाओरडा झाला व त्यांनी ठरवले की रेस लावायची. एक रेषा आखली व भाग घेणारी सहा मुले 'ऑन युवर मार्कस्'वर उभी राहिली. पण १-२-३ म्हटल्यावर एकाचवेळी निघायचे त्यांना जमेना. त्यातला अंकुश नावाचा मुलगा म्हणाला, 'आम्ही एकटे एकटे पळतो व तुम्ही सांगा कोण सर्वात फास्ट?' तेवढ्यात बाबू तिवारीला एक कल्पना सुचली. आमचा मोबाईल बंद झाल्याने वेळ मोजता येणे शक्य नव्हते; कुणाकडे घड्याळ नव्हते. बाबूने एक हातभर दोरीला छोटा दगड बांधला व त्याचा लंबक तयार केला. झाडाच्या एका आडव्या काटकोनाला हा लंबक लटकावला व प्रत्येक मुलगा पळायचा, त्यावेळी किती आंदोलने झाली हे मोजले. पहिला आलेला मुलगा ते अंतर ९ आंदोलनांत पळाला होता. बाबूने हेच तत्त्व नीट पुढे केले. गुरुजींना एक खिळा सापडला. तो फांदीला ठोकून त्यावर लंबक जास्त वेळ चालायला लागला. बाबूने आठ इंचाची वीत म्हणून दोरीचे अंतर अंदाजे ३९ इंच ठेवले. आता एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे जायला लागणारा वेळ किती सेकंद असा अचूक मोजता आला. सर्वात फास्ट मुलाला प्रथम पळायला लावून तो १३ सेकंदांत पोचतो हे पाहिले व सर्वांचाच पळण्याचा वेग काढून दिला. एक मिनी ऑलिंपिकच घडून आले.

तेथून गप्पा मारत परत येताना दुरून चावडी दिसली. मी सहज म्हणालो, चावडीपर्यंतचे अंतर इथून किती असेल कोण सांगू शकेल? मी पूर्वी हे स्काऊटमध्ये शिकलो असल्याने मला माहीत होते. आमच्याकडची पट्टी होती. ती तुटली होती, पण तुकडा शाबूत होता. चावडीसमोरचा ध्वजवंदनाचा



दिवे डोलतात उल्हासाने, दिवे फुलतातसुद्धा ।
सळसळत्या वाऱ्यावर दिवे झुलतातसुद्धा ।।

प्रायोजक - सौ. मेघना मकरंद गोखले, पुणे

खांब दिसत होता आणि तो १५ फूट उंचीचा आहे, याची गुरुजींना खात्री होती. मी डोळ्यांपासून अंदाजे १ फुटावर पट्टी धरली व एक डोळा मिटून खांब मोजला. तो माझ्या पट्टीवर १/२ इंच आला. मी १२ इंचावर पट्टी धरली होती. १/२ इंच म्हणजे जर १५ फूट तर १२ इंच म्हणजे किती या गुणोत्तराने ३६० फूट अंतर आले. चंद्रभानने येताना पावले मोजली ते जवळपास तेवढेच भरले.

रात्री मी आकाशदर्शनाचा कार्यक्रम ठरवला. नशिबाने आकाश निरभ्र होते. चावडीसमोर साडेसात-आठला बसलो असताना क्षितिजावर मोठे चंद्रबिंब दिसू लागले. पौर्णिमा जवळ आली होती. बाबू म्हणाला, ''आता गंमत पाहू. तुझ्या मगाचच्या पद्धतीप्रमाणे तू चंद्रबिंब मोज. आता लक्षात घे की चंद्रबिंब क्षितिजावर असताना मोठे दिसते. ते का?'' आम्ही वेगवेगळी कारणे सांगितली पण बाबूचे समाधान झाले नाही. गप्पा आणि आकाशदर्शनाचा कार्यक्रम झाला. झोपायला ११ वाजले तोवर चंद्र खूप वर आला होता आणि मोजले तर तो तेवढाच होता, जेवढा उगवताना मोजला होता. ''हे भासमान क्षितिजाकडे पाहताना इतर संदर्भ जसे की झाडे, घरे, डोंगर यांचे तुलनेमुळे होते. पटत नाही ना?''

बाभूळगावाला आलो तेव्हा बरं वाटलं. कारण गाव छान होतं. रात्री परत कालचाच विषय निघाला... 'अभ्यास आणि व्यवहार.' पण बाबूचे म्हणणे हळूहळू पटू लागले होते. झोपताना अर्थात चर्चा झालीच. यावेळी चंद्रभानने कोडे घातले. पृथ्वी पूर्ण गोल आहे, असे धरले आणि विषुववृत्ताभोवती एक दोर गुंडाळला व विषुववृत्तापासून ९ फुटांवर दुसरा एक दोर नेला तर दोन दोरांच्या लांबीत किती फरक पडेल? दोन दोरांत $2 \times \frac{22}{7}$ म्हणजे सुमारे सहा फूट एवढाच फरक पडेल! इतकेच नाही तर एखाद्या फुटबॉलवर दोर गुंडाळला व त्यापासून १ फुटावर दोर गुंडाळला; तरी दोन दोरांत सुमारे ६ फूट एवढाच फरक पडेल! शेखरलाही एक गंमत सांगायची सुरसुरी आली. त्याच्या छोट्या पुतण्याने त्याला निरुत्तर करणारे कोडे घातले होते. पुतण्या म्हणाला, ''काका देव काहीही करू शकतो ना? अगदी काहीही?'' मी म्हटले ''हो.'' तो म्हणाला, ''देव इतका मोठा, इतका मोठा दगड तयार करील का, की तो तुटणारच नाही?'' शेखर हो म्हणणार होता. पण थांबला. आम्हीही विचार करत झोपी गेलो.

सकाळी उठल्यावर वायाळ गुरुजींचे आभार मानून आमचा पुढला ट्रेक पूर्ण केला. वेगवेगळ्या विषयांवर गप्पा झाल्या. मी नुकताच एका रशियन पुस्तकात वाचलेला सल्ला सर्वांना दिला. सिनेमागृहात सिनेमा सर्वांत चांगला कुठल्या रांगेतून दिसतो? पडद्याच्या रुंदीच्या तिप्पट अंतरावर असलेल्या खुर्चीतून! बसून बघा!!

येताना सर्वांचे निरोप घेताना चहाच्या टपरीवर चहा घेताना कटिंगऐवजी फुल घेतला तरी समाधान होईना. कारण चहावाल्याने नवीन काचेच्या ग्लासमधून चहा दिला होता. त्याची उंची तीच होती. पण तळाचा व्यास एकदम लहान होता. म्हणजे त्यात पूर्वीच्या पेक्षा खूप कमी चहा बसत होता, पण दिसायला ग्लास उंच! आमची चर्चा झाली. चला, सूत्रे वापरून घनफळ काढूया. सूत्रे नीट आठवेनात. बाबू म्हणाला, ''घनफळाची वृत्तचिती, गोल, कोन याची वेगवेगळी सूत्रे का लक्षात ठेवायची? मी एकच सूत्र लक्षात ठेवतो.'' कुठल्याही वस्तूचे घनफळ म्हणजे

$$\frac{\text{तळाचे क्षेत्रफळ} + ४ \times \text{मध्यभागाचे क्षेत्रफळ} + \text{वरचे क्षेत्रफळ}}{६} \times \text{उंची}$$

आम्ही सर्वांनी बाबूला नमस्कार केला! सर्वांचेच मतपरिवर्तन झाले होते. निसर्गप्रेम म्हणजे झाडे-फुले-प्राणी-पक्षी एवढेच नाही तर निसर्गाने तयार केलेल्या मुलभूत नियमांची जाणीवसुद्धा, हे नवीन कळाले! या भटकंतीत नेहमीसारखा पायांना व्यायाम झालाच, आणि मेंदूलाही!

- **श्रीरंग गोखले**
कृष्णा, पत्रकारनगर, पुणे 411 016
skg2743@gmail.com

*चित्रकार : साहिल उपळेकर*

**प्रकाशाच्या उत्सवाने घर अन् घर उजळो।**
**नवभारताच्या प्रेरणेने, मनामना चैतन्य मिळो।।**

**प्रायोजक - डॉ. विवेक श्री. साठे, पुणे**

**Happy Diwali**

*No good thing can be done*
*without obstruction*
*It is only those who persevere*
*to the end that succeed*

WITH BEST COMPLIMENTS FROM

**AMG CORPORATION**



**रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव**

(केवळ नाट्यचळवळ नव्हे एक सर्वंकष सांस्कृतिक यात्रा) आयोजित

**पूज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती**
**राष्ट्रस्तरीय साहित्य अभिवाचन महोत्सव - २०११** (वर्ष नववे)
**दिनांक : २२ व २३ जानेवारी २०११**

*'एका वेगळ्या प्रकारचा, साहित्य आणि नाटक यांना जोडणारा*
*महाराष्ट्रातील एकमेव साहित्य अभिवाचन महोत्सव'*

गेल्या आठ वर्षांपासून या स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजनदरवर्षी जानेवारी महिन्याच्या चौथ्या शनिवारी व रविवारी केले जाते.

**महोत्सवाची वैशिष्ट्ये :** (१) आजवर डॉ. गिरीश ओक, अविष्कार, वीणा देव, रंजन दारव्हेकर, सुधीर मुंगी, लक्ष्मीकांत धोंड, अनिरूद्ध खुटवड, डॉ. अजय जोशी, धीरेश जोशी, अशोक शिंदे वगैरे मान्यवरांची उपस्थिती. (२) आजवर स्पर्धेमध्ये पुणे, नागपूर, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, जळगांव येथील मान्यवर संस्थांचा दर्जेदार सहभाग. (३) २ ते ५ कलाकारांचे ४५ ते ६० मिनिटांचे कथा, कविता, नाटक, आत्मवृत्त लेख, वैचारिक वगैरे कुठल्याही साहित्याचे नाट्यात्मक अनुभूती देणारे वाचन अपेक्षित. (४) प्रवासासाठी रेल्वे सवलतीची सोय उपलब्ध. (५) दिग्दर्शन, अभिनयाची वैयक्तिक तसेच सांघिक घवघवीत पारितोषिके.

**अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. मुकुंद करंबेळकर –९८२२२६३२७९**




अशी दीपावली यावी ।
अवघ्या सदनी प्रकाशगाणी व्हावी।।


संग्रही ठेवा - **'कथा इस्त्रो'ची** - छात्र प्रबोधन प्रकाशन , किंमत रु. ६०/-

शैलजा देशमुख

*...सातवीत मी पहिला आलो तेव्हा किती उड्या मारत घरी आलो होतो; पण घरी आक्का कुठे होती? ती तर रोजगाराला गेली होती. दिवस मावळतीला गेल्यावर डोक्यावर बाभळीच्या फांद्यांचा भारा घेऊन ती परतली. आल्या आल्या ओरडली, ''पाणी आणलंस का?''*

*''आणतो गं, पण आधी तुला आनंदाची बातमी सांगतो.''*

*''कसली बातमी? मरू दे, अजून चूल पेटायची आहे. मी एकटी किती रे मरणार?''*

*''अगं आक्का, मला खूपखूप मार्क मिळालेत. मी पहिला आलो.''*

*यावर आक्कानं एक दीर्घ श्वास घेतला, 'बरं झालं बाबा, जा आता चटकन पाणी आण आडाचं.''*

*मी उदास झालो. इतकं काय थंड स्वागत आपल्या यशाचं, का वागते ही आक्का अशी?*

*परत आल्यावर ती म्हणाली, ''का रे, आता पुढच्या शिक्षणाला लई खर्च येईल का, या चिंतेनं घेरलंय मला. खर्चाचं काय करू? पण तू काळजी करू नकोस; तू शीक. आणखी राबते मी.''*

*आपण पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती, हे मला समजायला लागलं. आपण उगीच गैरसमज करून घेतला हे कळून माझी मलाच लाज वाटली...*

हा प्रसंग आहे उत्तम कांबळे यांच्या 'आई समजून घेताना' या पुस्तकातील! हा विस्ताराने देण्याचं कारण म्हणजे 'मला कुणी समजून घेत नाही' असं आपल्याला सतत वाटत असतं. पण मोठ्यांचं काय? त्यांना कुणी समजून घ्यायचं? ४ वर्षांत ८ आवृत्त्या निघण्याचं विक्रमी भाग्य लाभलेल्या या पुस्तकात काय आहे नेमकं? आजवर आईचं गुणगान करणारं लेखन अनेक लेखकांनी केलं आहे. या पुस्तकाचं वेगळेपण कशात आहे? कुठलंही नातं केवळ भावनिक नसतं. परिस्थितीनुसार माणसांचं वागणं वेगवेगळं असतं. ज्या जातिव्यवस्थेत, आर्थिक परिस्थितीत तुम्ही जन्म घेता त्याची पार्श्वभूमी असते. वेगवेगळ्या वयात, वेगवेगळ्या परिस्थितीत मोठं होत जाणाऱ्या एका मुलाने केलेल्या 'आई समजून घेण्याच्या' प्रयत्नांचं शब्दरूप म्हणजे हे पुस्तक! आईचं वागणं लेखकाला कधी




लोकवाङ्मय गृह प्रकाशन
पृ. संख्या: १३२, किंमत ₹ १५०/

तर्कापलीकडचं वाटतं, कधी हास्यास्पद वाटतं, तिच्या अडाणीपणामुळे कधी स्वत:च्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारं वाटतं; पण त्याचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नातून लेखकाच्या आईचं, आक्काचं चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभं राहातं. एका डोळ्यात आसू तर एकात हसू, अशी अवस्था हे पुस्तक वाचताना होते.

मुलाला शिकवून मोठं करण्याचा आईचा निर्धार, त्यासाठीचा कणखरपणा, परिस्थितीशी झगडण्याची जिद्द, कष्टाची अमर्याद कामं करण्याची तयारी यांचं चित्रण पूर्वार्धात येतं. प्रसंगी पोरांचं पोट भरण्यासाठी शेतात लहानसहान चोरीही ती करते; पण मुलांनी ती करता कामा नये याचा आग्रह धरते. पहाटे चार वाजल्यापासून दळण–

कांडण, स्वयंपाक, रोजगाराचं काम या रोजच्या लढाईत तिचा दिवस संपायचा. सतत कष्ट करावे लागल्याने मुलांना मांडीवर झोपवून अंगाईगीत गाण्याची चैन तिला कधी परवडली नाही! पण 'एक तीळ वाटून खावा' हे तत्त्वज्ञान ती मुलांना सतत शिकवत राहिली. दारिद्र्याला तोंड देताना पोटातील भूक शमवण्यासाठी अन्नाऐवजी पाण्यानेच पोट भरावं, असा प्रसंग तिच्यावर अनेकदा येतो.

अशाप्रकारे सतत कष्ट करूनही दारिद्र्याने आक्काचा पिच्छा सोडला नाही. प्रसंगी ती नवऱ्यावर, मुलांवर चिडायची पण मायेचा झरा खोल अंत:करणात जिवंत होताच. हळूहळू शिक्षणाने लेखकाचे जीवन बदलले. कालांतराने उत्तम वक्ता, पत्रकार, कवी, लेखक, संपादक अशा शिड्या तो चढून गेला; पण आई होती तिथे तशीच राहिली. स्वत:चं घर-दार, सुशिक्षित बायको-मुलं, आर्थिक स्थैर्य, मानसन्मानाचं जीवन लेखकाला प्राप्त झालं. मग आईने आपल्याकडे राहावं, सुख-समाधान अनुभवावं; विश्रांती घ्यावी, खावं-प्यावं, शांत बसावं अशी त्याची प्रामाणिक इच्छा आहे; पण ती अशी सुखा-समाधानात राहूच शकत नाही. कारण इथल्या वैभवात राहाताना तिला गावाकडील गरीब मुलं-नातवंडं यांची आठवण पोखरत राहाते. मग कुणी मानाने लुगडं दिलं तर ते बिनदिक्कत घेऊन गावाकडच्या, सासरी गरिबीत नांदणाऱ्या मुलीसाठी हावरेपणाने जपून ठेवते. सतत दारिद्र्यात राहिल्याने तिला चांगला किमती चष्मा ही चैन वाटते. तो जपून वापरायचा म्हणून अधूनमधून ती तो वापरत नाही. तिचं अडाणीपणाचं वागणं लेखकाला कधी अडचणीचं, कमीपणा आणणारं वाटतं; पण त्यामागचं कारण जाणून घेण्याची लेखकाची धडपड म्हणजे हे आत्मकथन!

आक्काचं एक स्वतंत्र विश्व आहे; आपण ते सोडून पुढे आलो पण ती मनाने तिथेच आहे, ही जाणीव लेखकाला दु:खद वाटते. आपला मुलगा मोठा साहेब झाला तरी तो समाजाला; पण मला तो माझा मुलगाच आहे ही तिची प्रामाणिक भावना आहे.

तिच्या परीने ती मुला-नातवंडांवर प्रेम करते; नातवाला कोंबड्या दाखवायला पोल्ट्रीच्या दारात बसायला तिला लाज वाटत नाही. नातवाला शाळेत सोडायला जाऊन बाहेर बसून राहाते. बंद फ्लॅटमध्ये तिला गुदमरल्यासारखं वाटतं. अशा एक ना अनेक वरवर गमतीशीर वाटणाऱ्या पण कारुण्याची झालर असलेल्या प्रसंगांतून आपल्यालाही आक्का समजत जाते.

एकूण अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मुलांना वाढवणाऱ्या आईचं हे प्रातिनिधिक चित्र! परिस्थितीमुळे मुलं आणि आई-वडील यांच्यात निर्माण होणारी दरी, त्यामुळे निर्माण होणारा संघर्ष, समज-गैरसमज, राग-लोभ या पलीकडे असलेला प्रेमाचा धागा लेखकाला आई समजून घ्यायला प्रवृत्त करतो. त्यातून उभी राहाते एक कणखर, अडाणी, हट्टी सगळ्या मुलांवर सारखंच प्रेम करणारी आई!

आपल्यासारख्या मध्यमवर्गीयांना सर्वस्वी अनोळखी वाटेलसं हे माय-लेकरांचं अनोखं भावविश्व समाजातील वास्तवाचं भान देणारं तर आहेच; पण एका मुलाने प्रांजळपणे आईला समजून घेण्याचा केलेला प्रयत्न नात्यांकडे पाहाण्याची डोळस दृष्टी देणाराही आहे.

**शैलजा देशमुख**
सी-१०२, पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. २, पुणे 411 009
sgdeshmukh50@gmail.com


**८४ व्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल लेखक श्री. उत्तम कांबळे यांचे मन:पूर्वक अभिनंदन!**

आदरांजली... ज्ञानपीठ पुरस्कार विजेते - गो. वि. (विंदा) करंदीकर
(१४ मार्च २०१०)

**प्रायोजक - डॉ. सोहन श्रीश्रीमाळ, पुणे**

# मैत्री भाषेशी

✻ हॉटेलिंग करायला तुमच्यासारखेच राजूलाही आवडते. तो रस्त्यावरच्या हॉटेलात गेला. तिथले मेनूकार्ड वाचून त्याला जरा चुकल्या-चुकल्यासारखे झाले. बघा बरं तुम्हालाही असंच काही होतं का? (पुढील मेनूकार्डमधील अशुद्ध शब्द ओळखा.)



**मेनूकार्ड - सूरूचि उपाहारगृह**



वेळ - सकाळी ८.०० ते १२.३० दूपारी - ४.३० ते ८.००
दर गुरूवारी बंद राहिल.

| | | | |
|---|---|---|---|
| ईडली | -- . --₹ | कोथींबीर वडी | -- . --₹ |
| डोसा | -- . --₹ | पोहे | -- . --₹ |
| मेंदूवडा | -- . --₹ | उप्पीट | -- . --₹ |
| बटाटेवडा | -- . --₹ | शीरा | -- . --₹ |
| साबूदाणा खीचडी | -- . --₹ | | |

टिप - बाहेरच्या पाहूण्यांना लौकर जागा मोकळि करा. गप्पा मारत बसु नये.

✻ पुढे अक्षराला अक्षर जोडून तयार केलेले एक निरर्थक वाक्य आहे. पण खरे तर ते तितके निरर्थकही नाही. त्यात ५ प्रसिद्ध पुस्तकांची नावे लपलेली आहेत, ती शोधा.

*खासापूमृ शाविमी स्वाबोजईअ वक्याबं त्युं।*

---

✻ राजूला बागेत दिसलेल्या दृश्याचे हे वर्णन आहे. या वर्णनात राजूने किती विशेषणांचा वापर केला आहे, सांगा बरं !

**बंद फाटक ढकलून राजू बागेत आला. मळकट-मातकट रंगाच्या रस्त्याकडेला हिरवट-पोपटी झुडुपांची रचना बहार आणत होती. डाव्या हाताच्या जाड्याजुड्या वडाच्या पारंब्यांशी धडपडी मुलं खेळत होती. समोरच्या कारंज्यातून उडणाऱ्या शुभ्र पाण्याचे थेंब हिऱ्यांसारखे चमकत होते. उजव्या हाताच्या एका जुनाट बाकावर वृद्ध जोडपे बसले होते. लहान मुलांचा खेळ ते उत्साहाने बघत होते. संध्याकाळच्या या प्रसन्न वातावरणाने राजूही सुखावला.**

---

✻ खाली काही शब्द दिले आहेत. प्रत्येक शब्दातलं कुठलंही एक अक्षर बदलून त्याच जागी दुसरं अक्षर घालायचं. पण अट एकच - अक्षर बदलून तयार झालेले एका ओळीतील सर्व नवीन शब्द समानार्थी असले पाहिजेत.

१) बाई, आता, जनक, साय
२) चित्र, सर, मस्त, नौबती, साडी, मार
३) सुनील, हवन, पात, वाम, स्नायू, सतार
४) भाकर, कवी, भात, सत्र, आदिती, समिता

(उत्तरे अन्यत्र)

आकाशाचे प्रकाशवैभव अवतरले ।
दीपावलीने आनंदाचे सप्तसूर छेडले ।।

प्रायोजक - अंशुमन, पुणे ☎ २५४६०८९२

Danfoss
AEROFLEX

**Best Wishes for Happy Diwali !**

# JOSHI & COMPANY

**For Danfoss Genuine Components**

Shop No . 15 'B' wing, Orchid Complex, 1367, Sadashiv Peth,
Off. Bajirao Road, Pune - 411 030
Mobile No.: 985099 3594 Telefax : 24478034, 24473035
E-mail : joshiandcompany@eth.net2

शुभ दीपावली

वदनी कवल घेता नाम घ्या मातृभूचे
सहज स्मरण होते आपुल्या बांधवांचे ।
कृषिवल कृषिकर्मी राबती दिवस-रात्र
श्रमिक श्रम करोनी वस्तू या निर्मितात।
स्मरण करूनी त्यांचे अन्न सेवा खुशाल
उदरभरण आहे चित्त होण्या विशाल।।

रोज जेवताना म्हणूया हा मंत्र
सामाजिक बांधिलकीचे स्मरण ठेवूया नित्य
अन् उन्नत समाजाचे साकार करूया स्वप्न

## विद्यानंद शंकर देवधर

१७६४, ए-वॉर्ड, ब्रह्मेश्वर पार्क, साकोली, कोल्हापूर- ४१६ ०१२
दूरभाष : ०२३१-२६२५०५०



दिवे घेऊन येतात संदेश सुख समृद्धीचा ।
दिवे देऊन जातात आशीर्वाद धनधान्य वृद्धीचा ।।

संग्रही ठेवा - **'हरित संदेश'** - छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. १२/-

# गोदावरीचा गाव

डॉ. यशवंत पाठक



**मा**झ्या बालपणीचे नाशिक टुमदार होते. मधून गोदावरी स्वच्छ वाही. घरातून गोदावरी नेहमी प्रसन्न दिसे. प्रसिद्ध रामकुंडावर नेहमी यात्रिकांची गर्दी असे. याला लागूनच लक्ष्मणकुंड, धनुष्यकुंड, सीताकुंड अशी विविध कुंडे होती. लक्ष्मणकुंडातले पाणी पूजेसाठी लोक घरी नेत. निर्माल्याची वेगळी व्यवस्था होती. जवळ रमणीय गांधी तलाव होता. गांधी स्मारक ज्योत नेहमी आकाशाशी बोलायची. रामकुंडाला लागून गोदावरीचे मंदिर होते. समोर चतुसंप्रदाय अखाडा होता. या अखाड्यात बंगालमधील थोर संत चैतन्य महाप्रभू आले होते, असे सांगतात. प्रभू श्रीराम पंचवटीत काही दिवस सीता व लक्ष्मणासह राहिले, असे म्हणतात.

पंचवटीत खूप देवळे आणि मठ होते. त्यांची फार मोठी यादी होईल. पंचवटीत प्रसिद्ध असे काळाराम मंदिर आहे. याचे शिल्प देखणे आहे. दुसरे मंदिर कपालेश्वराचे. इथे महादेवासमोर नंदी नाही. कारण नंदीने महादेवाला शापातून मुक्त केले. गोदावरी-जवळच्या पटांगणात खेळायला खूप मुले येत. आबाधबी, खो-खो, हुतुतू, पळापळी, लपंडाव, मामाचं पत्र हरवलं हे खेळ असत.

पटांगणाला लागूनच भव्य मारुती होता. त्याच्यापाशी अहिल्याराम व्यायामशाळेचे पटांगण होते. तिथे मुले व्यायामाला येत. मलखांब करीत. कुस्त्या खेळत. पटांगणाशेजारी नारोशंकराची मोठ्ठी घंटा होती. या घंटेला पुराचे पाणी लागले की, सरकारवाड्याच्या पायऱ्या बुडत. सराफ बाजारात पाणी शिरे. कापडपेठ भिजे. बालाजीच्या कोटावर गोदावरीचा पूर पाहायला गाव लोटे. व्हिक्टोरिया पुलाच्या कमानीस पाणी भिडले, की नाशिकचे पहिलवान पुरात उड्या घेत. पाण्यातल्या भोवऱ्यांशी खेळत, लाटांना अलगद बाजूला करून पाणी कापत. पाण्याला वेग असे. पुरात लाकडे, वृक्ष, आणि काय काय वाहून जात असे !

पुरातली गोदावरी महाकाली दिसे. इतरवेळी गोदावरी प्रवाही, अवखळ वाही.

कधीकधी गोदाकाठी

**''गोदाकाठचा पक्ष्यांचा किलबिलाट मला भावतो, कपालेश्वराच्या कापुरारतीच्या प्रकाशात मी ताजातवाना होतो. काळ्या रामाला हात जोडून समर्थ रामदासांचे करुणाष्टक म्हणतो. एकच वाटते, नव्या ज्ञानात नवे नाशिक छान होऊ दे. नवे-जुने, जुने-नवे नाशिक गोदावरीचेच राहू दे म्हणजे झाले.'' गोदावरीकाठी वसलेल्या नाशिक शहराचे रूप आठवताना प्रा. यशवंत पाठक तिथल्या रम्य आठवणीत रमून जातायंत...**

आकाश उजळून जातं लखलखत्या किरणांनी ।
जीवन फुलून येतं स्वप्नांच्या पाकळ्यांनी ।।

**प्रायोजक - श्री. दिनेश वसंत कुलकर्णी, डोंबिवली**

खडकांवर बसून कोंडाजी चिवडा, मकाजी चिवडा खायला मजा यायची. उन्हाळ्यात काकडी, शेंगदाणे, गरम फुटाणे खात खात गोदाकाठी भटकंती करायला मला फार आवडे. रामसेतू पुलाच्या कमानीखालून जाताना वेगळेच वाटायचे.

गोदावरीच्या दुतर्फा वेगवेगळी झाडे होती. आता झाडे गेली. सिमेंटच्या इमारती आल्या. गोदेवरला तरणावांड वारा पडला. अन् नव्या घरात गोदेकाठी पंखे फिरायला लागले. माझ्या लहानपणी घरात क्वचित पंखा असे; कारण खिडकीचे दार उघडले की घरात वारे खेळायचे. स्वच्छ हवा मनाला तरतरी द्यायची. गोदावरीची आरती व्हायची.

गोदाकाठी वृक्षराजीत धर्मसंघ संस्कृत पाठशाळा होती. काही मोठ्या झाडांभोवती गोल ओटे बांधलेले होते. त्यावर आम्ही छोटी बस्करे घालायचो. गुरुजींनी दिलेली संथेची आवृत्ती करायचो. गुरुजी संस्कृत शिकवीत. प्रत्यक्ष संस्कृत बोलायला लावीत. छोटी छोटी संस्कृत वाक्ये आमच्याकडून करवून घेत. सुंदरशी आणि पटकन् गळ्यात बसणारी मधुर सुभाषिते सांगत. नि मग कधी वेदातल्या ऋचा सांगत. तर कधी महाकवी कालिदासाच्या 'रघुवंशा'तील श्लोकाचा अर्थ लावून दाखवीत. रघुराजाच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगत. शिव-पार्वतीच्या तपाच्या रम्य कथा ऐकवीत. विशेषत: ते हिमालयाचे जे वर्णन करीत, ते आजही कानात आणि मनात आहे. गंगेचे वर्णन करता करता गुरुजी गोदावरीचेही वर्णन करीत. गुरुजींच्या काळातली गोदावरी हवीहवीशी वाटे; त्यामुळे संस्कृत भाषा कधीही किचकट वाटली नाही. ती देववाणी आपली वाटली. पाठशाळा संपल्यावर गोदावरीला नमस्कार आणि






पाहा... अलाहाबाद संग्रहालय
(संस्कृत हस्तलिखिते, जगातील सर्वात मोठा टेराकोटाचा संग्रह)।
प्रायोजक - कु. दीपाली दिलीप गोडसे, डोंबिवली

पसायदान म्हणून मग आम्ही घरी जात असू.

आमच्या संस्कृत पाठशाळेत हरिणे, ससे, मोर होते. नाना पक्षी झाडांवर आमच्या बरोबर संस्कृत शिकत. मी त्यांना म्हणायचो;

"तुमचे पंख मला द्या. मी तुम्हाला संस्कृत सुभाषिते शिकवतो."

हरिणीच्या पाडसावर आम्हा साऱ्यांचा जीव होता. पाडसाचा



खोल मनाच्या गाभारी दिसावा प्रकाश ।
नित्य अनंताचा चाले गूढ हा प्रवास ।।

**प्रायोजक - श्री. अभय कुलकर्णी, डोंबिवली**

हळुवार स्पर्श आणि गोदावरीच्या स्वच्छ ओंजळीतल्या लख्ख तळहातावरच्या रेषा आजही तशाच आहेत. यामुळे अभ्यास जिगरी मित्र बनला. गृहपाठ न सांगता झाला.

रविवार कारंजावर पेठे विद्यालय होते. पूर्वीचा तो पेशवेवाडा. त्यात शाळा असे. वर्ग तीस मुलांचा. वर्ग स्वच्छ, मुबलक उजेड. पांडव लेण्याकडला वांड वारा आमच्या वर्गात येई. सर मनापासून शिकवीत. यशवंत व्यायामशाळेच्या पटांगणावर खेळायला नेत. श्रावणात ब्रह्मगिरीवर सहल काढीत. ब्रह्मगिरीवर गोदावरीचे उगमस्थान आहे. तिथे औदुंबराची वसती आहे. ते आम्हाला दाखवीत. शंकराने आपल्या जटेतून गोदावरी निर्माण केली, याची कथा आम्हा मुलांना ऐकवीत. गंगाद्वार, कुशावर्त तीर्थावर आम्हाला घेऊन जात. हिरवेगार त्र्यंबकेश्वर दाखवीत. पंचवटीतील वृक्षांची ओळख करून देत. तपोवनातील सात ऋषींच्या आश्रमाच्या जागा दाखवीत. वसिष्ठ, भारद्वाज, कपिल, याज्ञवल्क्य, विश्वामित्र, गौतम, अत्री यांच्या आश्रमांत श्रीरामांनी अभ्यास कसा केला ते आमच्या मनावर बिंबवीत. त्या जागा आश्रमासह जिवंत होत.

कधी रामशेजच्या डोंगरावर जायचा सरांना मूड येई. आम्हाला सरांबराबेर जायला फार आवडे; कारण ते आम्हाला त्या त्या स्थानांचा इतिहास सांगत. तो काळ आमच्यापुढे उभा करीत. वृक्षांना आपण भाऊ मानले पाहिजे, असे ते बजावीत. फुलपाखरांचे विविध प्रकार दाखवीत. आमच्या लहानपणी बहुतेक सारे मातीचे रस्ते होते. खाचखळगे होते. तरीही मातीला सुगंध होता. गोदावरीला सद्भान होते.

नाशिकमध्ये त्यावेळी एकमेव मोठा रोड होता, तो म्हणजे मेनरोड. म. गांधी रोडपाशी बस स्टँड होता. गोल्फ क्लबच्या टेकड्यांवर जायला भीती वाटे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज हातात बॅटरी घेऊन एकटे गोल्फ क्लबच्या टेकड्यांवर जात. एकदा सरांनी रस्त्यात कुसुमाग्रजांना नमस्कार केला. नि आम्हाला पाहून म्हणाले, ''तुमच्या पुस्तकात 'माझा हिंदुस्थान' ही कविता आहे ना? ती लिहिणारे हे कवी.'' आम्ही पोरे देवाला पाहावे तसे त्यांना पाहात राहिलो. सर मोठ्या आवाजात म्हणाले, ''नमस्कार करा !'' आम्ही हात जोडले. ज्याची कविता पुस्तकात, तो कवी साक्षात् आमच्यासमोर उभा !

याच पुस्तकात डॉ. अ. वा. वर्टींची 'कैदाशीण' ही कथा होती. त्यांनाही पाहिले. सोपानदेव चौधरींनी शाळेत काव्यगायन केले. प्रा. वि. बा. आंबेकरांनी टिळकांवर उत्कृष्ट व्याख्यान दिले. असे साहित्यिक नाशिक बघताना 'आपणही असेच व्हावे' असे मनापासून वाटे.

गोदावरीच्या काठाला पंचवटीच्या प्रांगणात मोठ्ठा भाजीबाजार भरे. वडिलांबरोबर किंवा आईबरोबर भाजी/फळे पालेभाज्या घ्यायला गंमत येई. हिरव्यागार भाज्या पाहूनच पोट भरे. त्या त्या ऋतूतली ती ती सारी फळे मिळत. भाजी-बाजारातून पैशाची देवाणघेवाण कशी करावी हे कळे.

माझ्या लहानपणी रामसेतू पुलाजवळच्या खंडोबाच्या मंदिरातली खंडोबाची जत्रा मोठी होती. जत्रेतली सुकी भेळ, गुडीशेव, रेवडी याची चव काही औरच असे. आम्ही भिरभिरे, बेटकी घ्यायचो. नि कुणाच्याही कानापाशी न्यायचो. जत्रेतला त्याचा आवाज, पाळण्यांचा आवाज, फुग्यांचा आवाज एकमेकांत मिसळायचा. जत्रेतला एक वेगळा आवाज तयार व्हायचा. खंडोबाच्या दर्शनासाठी भलीमोठी रांग असे. नारळांचा खच पडे. बेलभंडार उधळे.

नाशिकच्या उत्सवांत

पाहा... गोरखगड - उंची २१३७ फूट, जि. ठाणे
(खडी, बिकट चढाई, कातळ कडे, कातळ गुहा) कर्जत... मुरबाड, देहरी
**प्रायोजक - सौ. सारिका आशुतोष सोहनी, सांगली**

रामनवमीचा उत्सव फार मोठा होता. एकादशीला रामाचा रथ निघे. पुढे मारुती - गरुडाचा रथ असे. रथयात्रा भव्य असे. आसपासच्या गावातले लाखो लोक एकत्र येत. रामरथ गावातून रामकुंडावर येई. अनेक तरुण मुले आवडीने रथ ओढत. 'राजाधिराज रामचंद्र महाराज की जय' असा अधूनमधून गजर होई. रथाच्या दर्शनासाठी हीऽऽऽ झुंबड उडे. रामपंचायतनाच्या गळ्यातील हार घेण्यासाठी, बुक्का घेण्यासाठी जो तो धडपडे. रस्त्यात सडे, रांगोळ्या घातल्या जात. हजारो स्त्रिया रामाला औक्षण करीत. सीतेचे कुंकू घेण्यासाठी स्त्रियांची रथापाशी गर्दी होई. लोकांना बाजूला करताना पोलिसांच्या नाकी नऊ येत. रामाच्या दर्शनासाठी हे सर्व असे. आम्हाला साखरफुटाणे, पेढे, खोबरे या प्रसादात रस असे. रामकुंडावर रामाला समंत्रक स्नान घालीत. नवा पोषाख नेसवीत. नवे धनुष्य-बाण देत. आरती करीत. नि मग रथ राममंदिराच्या आवारात जाई. येईल त्याला प्रसाद मिळे. दुसऱ्या दिवशी सारे कसे शांत शांत वाटे.

१९५६ मध्ये मी पहिल्यांदा कुंभमेळा पाहिला. एकेक साधू पाहिला. नि मी गार झालो. आखाडे बघितले. ते सारे मिरवणुकीने तपोवनाहून निघायचे. नि रामकुंडात शाही स्नानाला यायचे. काहींच्या हातात चिमटे होते. काही महंत हत्तीच्या अंबारीत बसून यायचे. काही साधू चवऱ्या ढाळीत यायचे. 'जय हो सियाराम' असा गजर करायचे. काही साधूंच्या गळ्यात नाग, साप होते. एका साधूने वाघाचे बछडे आणले होते. पोलिसांनी त्या साधूला मिरवणुकीत मनाई केली, तेव्हा त्याने धिंगाणा घातला. पण पोलिसांनी त्याला अडवले. ढोल-ताशे वाजवीत साधू यायचे. नि स्नान करून जायचे. या कुंभमेळ्यात भारत दिसायचा. जगभरातले विदेशी लोकही गोदास्नानास यायचे.

गोदावरीच्या स्नानाच्या निमित्ताने जोडलेली एकात्मता आजही मोलाची वाटते.

नाशिक हे पूर्वी वाड्यांचे शहर होते. वाडे म्हणजे एक कुटुंब होते. सुख-दु:खाला न बोलावता सारे एकत्र येत. मंगल कार्ये एकत्र मिळून करीत. सारे एकमेकांना धरून राहात. मला पारितोषिक मिळाले की वाड्याला आनंद होई. शेजारी आजारी होता. त्याला तळलेले खायचे नव्हते, म्हणून आईने दिवाळीचे तळण केले नाही. शेजारच्या वाड्यातल्या काकूंना हे कळले; त्यांनी फराळाने गच्च भरलेले ताट आम्हाला पाठविले. हरितालिकेची, मंगळागौरीची जागरणे थाटात होत. कोजागरीला वाडा दुधात न्हाऊन निघे.

बघता बघता नाशिक रोडला नोटांचा कारखाना आला. पोस्टातल्या तिकिटांचा छापखाना आला. नि हळूहळू नाशकात दक्षिण व उत्तर भारत आला. बहुविध प्रांतातले नोकरदार ओझरच्या मिग विमानाच्या कारखान्याच्या निमित्ताने नाशकात आले. ओझर मिगची नवीन वसाहत निर्माण झाली. पूर्वीपासून आर्टिलरी सेंटर नाशिकजवळच्या देवळालीला होते. या साऱ्यांमुळे नाशिक संरक्षणाच्या नकाशावर आले. गांधीनगरला विमानतळ आले. मुंबई जवळ असल्याने नवीन औद्योगिक वसाहत स्थापन झाली. यात महिंद्र अँड महिंद्र, व्हीआयपी, गरवारे, किर्लोस्कर यांसारखे वेगळे प्रकल्प आले. पर्यटनाच्या दृष्टीने नाशिक छानच आहे. हे लक्षात घेऊन नवनवीन हॉटेल्स आली. जुन्या आग्रा रोडने कात टाकली. नवीन बॉम्बे नाक्याचा रस्ता बनला. सातपूरला औद्योगिक वसाहत आली. मुंबईच्या लोकांनी मोठ्या प्रमाणात बंगले, घरे घेतली. आय.टी. पार्कच्या पाटीने नाशिक नवे झाले.

**(पान क्र. १४३ पुढे चालू)**

**दिव्यांची ओळ दारात ठिपक्यांची रांगोळी ।**
**मने भरली काठोकाठ - जशी आनंदाची तळी ।।**

**प्रायोजक - श्री. अजित परांजपे, पुणे**

**भाषांतर आणि रूपांतर यातला नेमका फरक माहिती आहे का तुम्हाला? अगदी साध्या शब्दांत सांगायचं झालं तर त्या विशिष्ट भाषेच्या, समाजाच्या, प्रदेशाच्या संस्कृतीसकटच भाषांतर असतं. आणि रूपांतर म्हणजे मूळ कथेतलं कथाबीज आपल्या संस्कृतीनुरूप फुलवायचं. इथल्या प्रादेशिकतेचे संदर्भ त्याला जोडायचे. मूळ लेखक ब्लादिमिर बोगोमोलोव यांची 'इवान' ही जगप्रसिद्ध रशियन कादंबरी. यावर शंतनू पांडे यांनी भारतीयत्वाचा चढवलेला साज बघा बरं तुम्हाला कसा वाटतो?**



काश्मीरचे उरी सेक्टर म्हणजे पाकिस्तानव्याप्त काश्मीरचे अगदी प्रवेशद्वार! झेलम नदीच्या काठावर असलेल्या या सेक्टरमध्ये मराठा लाईट इन्फंट्रीच्या आमच्या अल्फा कंपनीचा मुक्काम पडून आज जवळपास दोन वर्षं झाली होती. आमचा कंपनी कमांडर बदलून गेल्यामुळे मी तात्पुरता कमांडिंग ऑफिसर झालो होतो. मी कमांडिंग ऑफिसर असल्यानं कामाचा भयंकर भार मला गेल्या तीन महिन्यांपासून उचलावा लागत होता.

त्या दिवशी काम संपवून रात्री जवळपास बारा वाजता मी झोपलो; पण लवकरच मला गदागदा हलवून माझ्या ऑर्डर्लीने उठवले. मी त्याच्यावर भयंकर चिडलो होतो.

''काय झालं? तीनला उठव सांगितलं होतं ना तुला?'' घड्याळाकडे बघत मी त्याच्यावर खेकसलो.

''सर, इथं एकाला पकडलं आहे. ज्युनिअर कमांडिंग ऑफिसरनं मला हुकूम दिला की त्याला तुमच्यासमोर हजर करावं.''

मी चडफडलो, ''आत आण त्याला.'' रॉकेलच्या दिव्याची वात मोठी करत मी हुकूम दिला. लगबग झाली. मी दाराकडे पाहात राहिलो. दारापाशी अकरा-बारा वर्षांचा एक हडकुळा मुलगा उभा असलेला मला दिसला. थंडीमुळे तो निळा पडला होता आणि थरथर कापत होता. त्याचा ओला सदरा आणि विजार त्याच्या अंगाला चिकटले होते. अनवाणी छोटे पाय घोट्यापर्यंत चिखलानं माखले होते. त्याचा तो अवतार पाहून मी शहारलो.

''भट्टीपाशी उभा राहा,'' मी आज्ञा केली.

आज्ञाधारकपणे तो आत आला.

''कोण आहेस तू?'' मी गरजलो.

अंगाचं चिपाड झालेला, गालफडं वर आलेला पोरगा, अविश्वासानं माझ्या ऑर्डर्लीकडे पाहून मला म्हणाला, ''याला बाहेर जाऊ देत.''



अभिमानास्पद... डॉ. संदीप वाघ स्मृती पुरस्कार - डॉ. एस. नटराजन
(नेत्रशल्यचिकित्सा या विषयातील उल्लेखनीय कार्याबद्दल)
**प्रायोजक - श्री. केदार सहसबुद्धे, सांगली**

स्वच्छ मराठीतले त्याचे वाक्य मला सावध करून गेले. भट्टीत कोळसे घालायला सांगून मी ऑर्डर्लीला बाहेर पाठवले. लगेच तो म्हणाला,

''गुलशन माझं नाव. ताबडतोब मुख्य ठाण्यावर एकावन्नला कळवा मी इथं आलो आहे.''

मला हसायला आलं. ''कळवा? मला ऑर्डर देतोस? कळवलं तर कोण येईल तुझ्या स्वागताला?'' मी त्याला खिजवलं.

''त्याच्याशी तुमचा संबंध नाही. तुम्ही आपलं काम करा.'' तो ताडकन बोलला. मी खवळलो.

''आणि नाही कळवलं तर?''

प्रदीर्घ विराम घेऊन शब्दांवर जोर देत तो म्हणाला, ''तर... तर... पस्तावाल.''

एक अस्सल सणसणीत सातारी शिवी माझ्या तोंडातून गेली. पण त्याचं ते ठामपणानं बोलणं, आमच्या ठाण्याचे सिक्युरिटी कोडस् माहीत असणं, यानं मी आधीच सावध झालो होतो.

राग गिळून मी त्याला विचारलं, ''हा एक्कावन्न कोण?'' पोरगा गप्प राहिला. मी रेटत राहिलो. ''कुठली कचेरी पाहिजे आहे तुला?''

''लष्करी टपाल, एकूणपन्नास पाचशे पन्नास...''

त्याने बिनचूकपणे आमच्या मुख्य ठाण्याच्या टपालाचा क्रमांक सांगितला होता. मामला गंभीर होता. आता मला फोन करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

मी मुख्य ठाण्याला फोन लावला; पण एवढ्याशा मुलाचं सांगणं काय मनावर घ्यायचं म्हणून पलीकडून दिरंगाई होते, असं लक्षात आल्यावर त्या मुलाने आवाज चढवून सांगितले, ''आत्ताच्या आत्ता त्यानं एक्कावन्नला कळवलं नाही तर... तर त्याला जाब द्यावा लागेल.''

मी आश्चर्यानं मुलाकडे पाहत राहिलो. फाटक्या अंगाचा, गालफडं बसलेला, केसांच्या झिंज्या झालेला बारा वर्षांचा मुलगा रात्रीचा झेलम नदी पोहत येतो काय, तेही उणे चाळीस



शंतनू पांडे

FDS
Happy Diwali
FDS Infotech (P) Limited
82/85/11, Neelambari, 13th Lane, Prabhat Road, Near Puneet Bunglow,
Erandwana, Pune - 411004 Tal. No. 91-20-25663148/49 Fax 25667365

डिग्री सेंटिग्रेडला आणि माझ्या ऑफिसरला धमक्या देतो काय? मी सर्द झालो होतो. शंभर लोकांच्या कंपनीचा मी कमांडिंग ऑफिसर होतो; पण तरीही हा मुलाहिजा बाळगत नव्हता. त्याची जिरवण्यासाठी मी सांगितले, ''तू म्हणालास म्हणून मुख्य ठाण्याला फोन लावला मी. त्यांनी तुला इथेच पहाऱ्यात ठेवायला सांगितलं आहे.''

मुलाचे ओठ मुडपले. डोळ्यांत अविश्वास भरला.

''शक्यच नाही.'' तो पुटपुटला. आणि फोनकडे धावला.

तो रिसिव्हर उचलणार इतक्यात, मी म्हणालो, ''कुणाला फोन करणार आहेस?''

''लेफ्टनंट कर्नल करंदीकर.''

लेफ्टनंट कर्नल करंदीकरांना मी चांगलाच ओळखत होतो.

''आणखी कोणाला ओळखतोस तू?'' मी पुढे विचारले.

''कॅप्टन खांडेकर.'' हेर खात्याचा ऑफिसर होता खांडेकर. खालचा ओठ दाबत मुलगा पुटपुटला. दबावाखाली माहिती सांगावी लागल्याची नामुष्की त्या स्वाभिमानी मुलाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. मुलाला आणखी त्रास न देण्याचे ठरवून मी विचार केला आणि फोन लावला.

''लेफ्टनंट कर्नलसाहेब, मी कंपनी ऑफिसर भोसले बोलतोय. माझ्यापाशी 'गुलशन' आला आहे. पलीकडच्या काठावरून – शत्रूच्या बाजूने पोहत आला आहे.'' मी सांगितले.

''काय सांगतोस? गुलशन आहे तिथं? शाब्बास ! लक्षपूर्वक ऐक. तुझ्या बंकरमधून सगळ्यांना बाहेर काढ. तो कुणाच्याही नजरेस पडता कामा नये आणि कुणीही त्याला त्रास द्यायचा नाही. त्याच्याबद्दल कोणत्याही चौकशा करायच्या नाहीत. समजलं?... त्याला माझ्याकडून 'हाय' सांग. खांडेकर त्याला भेटायला येतो आहे. मला वाटतं, तीन तासांनंतर तुझ्यापाशी पोहोचेल तो. तोपर्यंत पोराला नीट वागव. पोरगा प्रचंड संवेदनशील आहे. पहिल्यांदा त्याला कागद-पेन्सिल दे. तो जे काही लिहील ते पाकिटात घालून खात्रीच्या माणसाबरोबर पाकीट मुख्य कचेरीकडे पाठव. ते मला पोहोचवतील. त्याला आंघोळीला गरम पाणी दे. खाऊ घाल. आणि झोपू दे. त्याच्याशी बोलायच्या फंदात पडू नकोस. हा आमचा पोरगा आहे. समजलं?''

मी फोन ठेवला. पोराकडे मी कौतुकानं पाहायला लागलो. बारा वर्षांचा कोवळा मुलगा भारतीय लष्कराचा गुप्तहेर?

आईनं घरून निघताना करून दिलेले डिंकाचे दोन उरलेले लाडू मी मुलासमोर ठेवले. टेबलावर कागद, पेन्सिल, पाकिट आणि डिंक ठेवले. बाहेर जाऊन माझ्या ऑर्डर्लीला जवळच्या चौकीवर जायचा हुकूम दिला आणि परत येऊन दार बंद करून घेतलं. मुख्य कचेरीला फोन करून माझ्या आंघोळीसाठी दोन बादल्या पाणी गरम करायला सांगितलं. रात्री दोन वाजता माझा हा हुकूम ऐकून आश्चर्यकारक उद्‌गार काढत त्याने फोन ठेवला. आमच्या कंपनीचा सर्वात चटपटीत सैनिक मल्हारीला फोन करून पाकीट पोहोचवायला तयार राहायला सांगितलं.

लाडू संपवून भिजलेले कपडे काढून दोन पायांवर उकिडवा बसून एकाग्रतेने गुलशनचा काही उद्योग चालला होता. एका घाणेरड्या मळकट हातरुमालात कित्येक दिवस साठवलेल्या गहू, मका, सोयाबीन, सूर्यफूल यांच्या बिया, देवदाराची टोचरी फळं यांचा ढीग त्यानं आपल्या पायाशी गोळा केला होता. एकेक करून प्रत्येक बी वेगळी करून त्याची वर्गवारी करणं चाललं होतं. जवळपास तासभर त्याचं हेच चाललं. मग शांतपणे तो टेबलावर जाऊन बसला. कागदावर दोन स्तंभ करून त्याने लिहायला सुरुवात केली.



पाहा... किल्ले देवगिरी (दौलताबाद) जि. संभाजीनगर (औरंगाबाद)
(चोरवाटा, भुयारे, फसवे रस्ते व अभेद्य तटबंदीने युक्त असा भुईकोट किल्ला)

**प्रायोजक - श्री. अरुण फाटक, सांगली**

'...दोन, ....चार, ...पाच...' या आकड्यांचा अर्थ काय होता आणि त्याने काय लिहिले होते हे मला तेव्हा समजले नाही आणि नंतरही कधीच समजले नाही.

लिहिलेला कागद पाकिटात घालून त्यानं पाकीट व्यवस्थित चिकटवून बंद केलं. त्याच्या प्रत्येक कृतीत अतिशय सावधपणा होता-त्याच्या वयाला न शोभणारा. खरंतर उड्या मारण्याचं, बागडण्याचं त्याचं कोवळं वय. बरोबर पाच पटीनं प्रौढ वाटत होता तो. अकाली प्रौढ.

मल्हारी आला होता. दरवाजा अर्धवट उघडून मी त्याला मुलाचे पाकिट देऊन दार लावून घेतले. कोपऱ्यातल्या मोरीत बसून खोलीकडे पाठ करून मुलानं गरम पाण्याचा एक एक तांब्या अंगावर घ्यायला सुरुवात केली. त्याची प्रचंड कळकटलेली पाठ पाहून मला भडभडून आलं. इतक्या कमी वेळात एखाद्याबद्दल माया वाटण्याची लष्करात आल्यापासूनची ही माझी पहिलीच वेळ होती. दहशतवादाविरुद्धच्या युद्धानं मला आमूलाग्र बदलवून टाकलं होतं.

समोर ठेवलेल्या अन्नापैकी अगदी थोडं अन्न शांतपणे चघळून तो बिछान्यात शिरला. तेव्हा मी त्याला निरखला - आंघोळीनंतर त्याचे सोनसळी केस आणि त्याची टिपिकल काश्मिरी गुलाबी त्वचा खुलून आली होती. आता मी कॅप्टन खांडेकरांची वाट बघत बसलो.

***

कसाबसा तास-दीड तास झाला असेल. मी खडबडून जागा झालो. ग्रेनेड्सचे आवाज होते लांबून आलेले. माझ्याही आधी दचकून उठलेला सावध चेहऱ्याचा गुलशन मला विचारत होता, 'पाकीट पोहोचलं असेल का?' क्षणभर मला समजेना. मी यांत्रिकपणे फोन लावला. लेफ्टनंट कर्नलपर्यंत पाकीट पोहोचलं होतं. थोड्या वेळात कॅप्टनही पोहोचेल, असं त्यांनी सांगेपर्यंत एखाद्या तीरासारखा कॅप्टन खांडेकर बंकरमध्ये घुसला. आणि जोरात ओरडला, ''डड्डूऽऽऽ.'' पोरगा खुलला. त्याच्या अत्यंत जिव्हाळ्याची हाक असावी ती - काही खास मित्रांनीच मारलेली. पहिल्यांदा त्याच्या चेहऱ्यावर मी बालसुलभ हसू पाहिलं. खांडेकरला बघून तो बिछान्यातच उभा राहिला आणि धावत येणाऱ्या खांडेकरच्या अंगावर 'खंडू' म्हणत त्याने झेप घेतली. दोन जिवलग मित्रांची ती भेट मी डोळे भरून पाहात होतो.

तीस वर्षांचा गोरा गोरा कॅप्टन कडेवरच्या पोराला गदागदा हलवत म्हणाला, ''नदीच्या वरच्या अंगाला कांबळे होडी घेऊन तुझी वाट बघत होता. इथे का आलास?''

''वरती पाकिस्तानी होते. तुमची होडी शोधेपर्यंत फटक्यात त्यांनी माझा निकाल लावला असता. अख्ख्या किनाऱ्याला जोडून बंकर्स बांधून काढली आहेत. म्हणून पाण्यातून पोहत आलो, ओंडक्याला धरून. ओंडका एकसारखा उलटा-सुलटा फिरत होता. त्यात थंडीमुळे माझ्या पायात कळा यायला लागल्या. ओंडका धारेला लागला मग मी अंग टाकून पडून राहिलो. कसं काय माहीत इथे पोहोचलो.''

ऐकून माझ्या अंगावर काटा आला होता. खांडेकरही गप्प झाला. अतिशय गोड हसून दोन्ही कान धरत पोरगा म्हणाला, ''सॉरी, पुन्हा नाही असं करणार,'' दोघेही हसले.

टेबलावर बसून खांडेकरनं आनंदानं टिचक्या वाजवत जेवण्यासाठीच्या प्लेट्स घ्यायला सुरुवात केली. तसा पोरगा ओरडला, ''खंडू आता इथे पार्टी नाही. लेफ्टनंट कर्नलच्या बंकरमध्ये ताबडतोब जायचं. त्यांच्याशी मला महत्त्वाचं बोलायचं आहे.''

''कामाशिवाय स्वस्थ बसवत नाही याला. लेफ्टनंट कर्नलला भेटेल मगच शांत बसेल हा. मानसपुत्र आहे त्यांचा.''

**(पान १४४ वर पुढे चालू)**

**काळोखाच्या वाटेवर डोळ्यांनीच दिवा व्हावं ।**
**उजेडाचं गाव सारं नजरेनं पिऊन घ्यावं ।।**

**प्रायोजक - श्री. सौरभ सुहास फाटक, डोंबिवली**






पाहा... साल्हेर - उंची ५,१५० फूट, गुजरात व नाशिक सीमेवर
(उत्तर महाराष्ट्रातील सर्वात उंच) नाशिक...कळवण...साल्हेर

संग्रही ठेवा - **'शब्दांची रत्ने'**, छात्र प्रबोधनप्रकाशन, किंमत रु. ४०/-

# झुक झुक चाले आगीन गाडी


*झुक झुक झुक झुक अगीन गाडी।*
*धुरांच्या रेषा हवेत काढी।।*
*पळती झाडे पाहूया।*
*मामाच्या गावाला जाऊया।।*

अशी गाणी /कविता तुम्हाला माहीत असतील ना? तर मग या दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग करून आपण वाया जाणाऱ्या इलेक्ट्रिक ट्यूबच्या बाहेरील वेष्टनापासून छानपैकी छोटीशी आगगाडी करण्याचा प्रयत्न करूया.


**साहित्य :** आकाराने लांब इलेक्ट्रिक ट्यूबवरील वेष्टन (ट्यूबचे खोके), तांबडा वॉटर कलर किंवा तांबडा जाड कागद (कार्ड शीट), फेव्हिकॉल, कात्री, चाकांसाठी गोल चकत्या, कागदाच्या सुरनळ्या इ.

**कृती :** प्रथम ट्यूबच्या वेष्टनामधून १० सेंमी. लांबीचे चौकोन कापून घ्या. त्याच्या दोन्ही बाजूस १-१ सेंमी अंतर सोडून तो भाग आतील बाजूस दुमडा. दोन्ही बाजूंनी बंद असलेल्या आयतावर काळजीपूर्वक लाल कागद चिकटवा. की झाला आपला आयताकृती डबा तयार. (आ.१) आता डब्याच्या खालील बाजूला चाके चिटकवण्यासाठी ७ × २ × १ सेंमी. (लांबी × रुंदी × उंची) आकाराच्या आयताकृती डब्या तयार करा व त्याच्या बाजूस तीन किंवा चार चाके (गोल चकत्या) चिकटवा. (आ.२) चाकांचा पायटा प्रत्येक डब्याच्या मध्यभागी चिकटवा. डब्याच्या दोन्ही बाजूस दोन दारे, दोन-तीन खिडक्या काढा. व जमल्यास कटरने कापा. डब्याला 'एस वन', 'एस टू' असे क्रमांक द्या. 'रिझर्व' 'वातानुकूलित', 'महिलांसाठी' असेही काही खास डबे तयार करा. (आ.३)


**गाडीचे इंजिन** – गाडीचे इंजिन तयार करण्यासाठी याच आयताकृती खोक्याचा १२ सेंमी. लांबीचा आयत कापून घ्या व त्याचा पुढील भाग चौकोनी न ठेवता निमुळता करा व दोन्ही बाजूस




आ. १



आ. २




आ. ३



आ. ४



आ. ५

*Don't Lower your goals*
*to the Level of your abilities*
*Instead Raise your abilities*
*to the height of your goals !*

*Happy Diwali*

SM

# S. M. Electric Works

*An ISO 9001-2000 Certified Company*

***ELECTRICAL ENGINEERS, CONSULTANTS & GOVT. 'A' CLASS CONTRACTOR***

**Prop :** S.M. Saraf **Mob :** 9850843094

**Head Office : Plot No. 1, 'Aishwarya', Bhagya Chintamani Society, S. No. 81/5A/2, Paud Road, Kothrud, Pune - 411 038.**

**Email : smelectricworks@yahoo.com**




पाहा... किल्ले नळदुर्ग - जि. धाराशीव, सोलापूरजवळ
(पाणी महाल असणारा दगडी बंधारा सर्वात प्रेक्षणीय)

संग्रही ठेवा - '**आपला पाऊस**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ३०/-

पाच-सहा चाके बसवा. आपले इंजिन डिझेलवर आहे, असे समजा व हळूहळू सभोवतालचे बारकावे दाखवा.

**रूळ** – आगगाडी रुळावरून धावते. यासाठी समांतर अंतरावर स्ट्रॉ किंवा कॅलेंडरच्या वरती खाली असलेल्या पत्र्याच्या पातळ पट्ट्या किंवा पातळ कागदाच्या स्ट्रॉसारख्या नळ्या चिकटवा. स्लिपर्स म्हणून रुळांच्या मध्यभागी पातळ आईस्क्रिमचे चमचे किंवा पुठ्ठ्याच्या पट्ट्या आडव्या चिकटवा.

आगगाडी तयार झाल्यावर मागील बाजूस छोटेसे स्टेशन, पुढे-मागे सिग्नल, स्टेशनचे नाव, फलाटावरील घड्याळ, फलाटावरील जिने, दोन्ही बाजूस रेल्वे फाटक याची मांडणी करा. इंजिन व डबे एकमेकांस जोडण्यासाठी इलेक्ट्रिक सामानांच्या दुकानात आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे पीन्स मिळतात किंवा स्टेशनरीच्या दुकानात मिळणाऱ्या यू पीन्सचा खुबीने वापर करा. (आ.३)

टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू किंवा सुशोभित कलाकृती तयार करण्यासाठी निरीक्षण, प्रयत्न, कल्पनाशक्ती व सातत्य लागते आणि यामधूनच अभ्यासू वृत्ती वृद्धिंगत होते. मग चला तर आगगाडी करूया व या सुट्टीत आपण मामाच्याच गावाला जाऊया, पळती झाडे पाहूया.

**मधुकर पालकर**
पालकर चेंबर्स,
१०२१/२२ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे 411 030
**चित्रकार : सौरभ उपळेकर**

(रंगीत प्रकाशचित्र पान क्र. १२५ वर पाहा.)

# काचेचा दिवा



**साहित्य** - कोणत्याही आकाराची काचेची बाटली, सोनेरी टिकल्या, ग्लास कलर्स, एक छोटं निरांजन.

**कृती** - घरात नेहमीच कुठल्या ना कुठल्या आकाराची काचेची बाटली आपल्याला मिळतेच. साधारण मध्यम आकाराची बाटली धुऊन त्यावरचे लेबल काढून कोरडी-स्वच्छ करून तयार ठेवा. बाटलीला वरून हवा तो रंग द्या किंवा वेगवेगळे रंग वापरून ती रंगवून घ्या. बाटली टिकल्या किंवा इतर साहित्य वापरून सजवा. आता या तुमच्या सजवलेल्या बाटलीत हलकेच निरांजन सोडायचे आहे. त्यापूर्वी तुपात घोळवलेली वात त्यात ठेवायला विसरू नका. (निरांजनात तेल-तूप घेऊ नका. निरांजन बाटलीत ठेवताना ते तिरके झाल्यास तेल-तूप सांडण्याची शक्यता असते.) निरांजन अलगद बाटलीत ठेवल्यानंतर मेणबत्तीच्या साह्याने ते हलकेच पेटवा. घरातील अक्षरश: टाकाऊ वस्तूतून हा दिवा तयार होतो. एखाद्या टाईलवर ठेवूनही बघा दिवा कसा दिसतो ते!

**- संपदा साळवी**
बी/४०४, जयराज नगर, बोरिवली (प.), मुंबई - 400091 sampadasalvi@gmail.com

गीत गुणगुणती प्रकाशकिरणे, उजळीत पृथ्वी मातेला ।
सागरातल्या लाटांसंगे, जाऊ नभाच्या संगतीला ।।
**प्रायोजक - श्रीमती विमल विनायक खरे, डोंबिवली**



॥श्री॥

प्रिय ऋचास,

शुभ आशीर्वाद,

माझे पाय हल्ली फार दुखतात; त्यामुळे महात्मा सोसायटीहून गोखलेनगरला मी कशी येणार गं? रिक्षा तर कोपऱ्यापर्यंत चालत जाऊन करावी लागते. तू म्हणतेस माझ्याशी फोनवर बोल. तसं मी बोलतेच की; पण मला पत्र लिहायला आवडते. पत्रात शांतपणे जे बोलायचं ते सांगायला जमतं बघ. फोनवर बोलताना मी चार गोष्टी विसरते.

आता सकाळचे साडेसहा वाजलेत. माझा चहा झाला आणि तुला पत्र लिहायला बसले बघ. मी सकाळी पाच वाजताच उठले. सारं आटोपून हातात परडी घेऊन अंगणात गेले. जाईच्या वेलावर हजारो फुलं फुलली होती. जणू आकाशातल्या चांदण्याच जाईवर उतरल्यात असंच मला वाटलं. आकाशात शुक्राची चांदणी ठळक दिसत होती. किती छान दिसत होती! फुलांचा मंद गंध साऱ्या परिसराला परिमळून टाकत होता. श्वास घेण्यातला सुखद आनंद मी अनुभवीत होते. दारापुढील हिरवळीवर चालताना पायाला किती सुखद स्पर्श होतो. खरं म्हणजे अनवाणी जमिनीवर चालायचे. खडबडीत जमिनीवरून चालून तू काय म्हणतेस ते ॲक्युप्रेशर होते म्हणे. 'सकाळ' आला म्हणून तो घेऊन पुढच्या दारातल्या पायरीवर बसले. सकाळ वाचता वाचताच समोर पाहिले. लखख आकाशात डोंगराआडून सूर्यनारायण वर येत होता.

**एस. एम. एस., इ-मेल, मोबाईलशी दोस्ती झाल्यावर पत्रं लिहिणं विसरून गेलात ना? पण खरं तर पत्रं किती बोलकी असतात ! जपून ठेवली तर कधी आठवणींचा बकुळ-सुगंध देऊन जातात... ही आहेत एका आजीनं आपल्या नातीला लिहिलेली दोन पत्रं... सकाळी लवकर उठायचं, सुट्टीत नवीन काही शिकायचं, लेखन शुद्ध लिहायचं... या साध्या साध्या गोष्टी रसिकतेने कशा अनुभवायच्या हा कानमंत्र लीला आजींनी या पत्रांमधून तुमच्यापर्यंत पोहोचवला आहे...**



वाचा.... **'आई'** - संपादक - डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. प्रतिभा देशपांडे
(आईची वेगवेगळी रूपे समजून घेताना..)

**प्रायोजक - श्री. दत्तप्रसाद शेंबेकर, डोंबिवली**

# प्रिय ऋचास



लीला दीक्षित



सूर्याची ती सोनेरी किरणे 'पाचूच्या हिरव्या माहेरी हळद' होऊन हिरवळीवर लोळत होती. हळूहळू बागेत पक्षी येऊ लागले. भारद्वाज आला. तू कधी पाहिलास भारद्वाज? तो सूर्य उगवण्यापूर्वी येतो. म्हणून त्याला 'देवपक्षी' म्हणतात. आणखी एक पक्षी हल्ली येतो. तो झाडाच्या छोट्या फांदीवर फुलाजवळ बसला की फांदी वाकते. त्याचे नावच फुलचुरव्या. खरं सांगू ऋचा, या सकाळच्या लवकर उठण्यानं माझं मन इतकं प्रसन्न राहातं बघ दिवसभर. आज वयाच्या ऐंशीव्या वर्षातही मी किती उत्साही असते. सकाळचा प्रसन्न वारा, फुलांचा परिमळ, सूर्यांचे कोवळे ऊन, मातीचा स्पर्श, जणू पंचमहाभूते सकाळी मला मायेने कुशीत घेतात. माझ्या आई-वडिलांनी मला सकाळी लवकर उठायची लावलेली ही सवय किती मोलाची आहे, हे मला उतरत्या उन्हात जाणवते. वाचताना तू म्हणशील, हे उतरतं ऊन कुठलं? म्हणजे माझं प्रसन्न म्हातारपण गं!

तू रोज सायंकाळी टेकडीवर जातेस. छानच आहे. एखाद्या दिवशी सूर्य उगवण्याच्या अगोदर जाऊन बघ!

ऋषी काय म्हणतो? त्याचे पाढे पाठ झाले का? कॅलक्युलेटर आहे तर पाढे कशाला म्हणून फोनवर कुरकुरत होता. मी म्हटले, ते बाबा तुम्ही ठरवा. चि. शुभा, ऋषी, बाबा सर्वांना आशीर्वाद. पत्राचे उत्तर फोनने नको.

एवढेच.

तुझी आजी

SANTOOL
Solution Engineers
शुभ दीपावली !
२११/४, नवी पेठ, पुणे – ४११ ०३०.
दूरभाष क्र.: ०२०-२४३३६०६४

॥श्री॥

प्रिय ऋचास,

शुभ आशीर्वाद,

काल सायंकाळी थोडं फिरून आले आणि तुझ्या मामाने माझ्या हातात पत्र दिलं. आता पत्रं कोणाची येत नाहीत. फक्त आम्ही बालमैत्रिणी अजून पत्रानेच भेटतो बघ. पत्र परत वाचले की, परत भेट होते. आहे ना गंमत!

माझ्या लहानपणी ना ऋचा, आमच्या घराच्या दारातच मोठ्ठं बकुळीचं झाड होतं. त्याच्या सुगंधानं तर वेडंच व्हायला होतं. या बकुळीच्या छोट्या छोट्या, नाजुक फुलांचा हार करायचा, हा आम्हा मैत्रिणींचा छंदच होता. तो गळेसर केसात माळून मिरवून झाला की, १-२ दिवसांनी सुकायला लागायचा. मग तो हार, कागदाच्या पुरचुंडीत गुंडाळून किंवा एखाद्या छोट्याशा डबीत झाकून नीट ठेवायचा. या बकुळीच्या फुलांचा सुगंध ना ऋचा, कधीच कमी होत नाही/संपत नाही. परत कधी तो कागद उलगडल्यावर बकुळीचा तो सुगंध तसाच वेड लावून जायचा. या पत्रांचंही तसंच आहे गं. आमच्या 'बालमैत्रिणीं'च्या या पत्राची हीच तर गंमत आहे. बालपण पुन्हा सतेज होण्याची चेतना या पत्रातूनच मिळत असते. म्हणूनच आपण दुसऱ्यांना पत्र लिहिण्यात आणि त्यांची आलेली पत्रं जपून ठेवण्यातच तर खरी गंमत आहे. तू जेव्हा मोठी होशील ना ऋचा आणि ही पत्रं परत वाचशील, तेव्हा हा बकुळ-सुगंध तुलाही सुखावेल.

तू पत्र छान लिहिलंस. पण चुका किती? 'मंदिर', 'चिमणी' हे शब्द असेच हवेत. साध्या-साध्या शब्दांत चुका नकोत बाई. शुद्ध लिहिणे म्हणजे शब्दाच्या मूळ रूपाला भेटणे असते. शब्दांची शुद्धता महत्त्वाची तशी वाणीची शुद्धता हवी. त्यातून प्रयत्नाने विचारांची शुद्धता अवतरते. याचा अर्थ अशुद्ध बोलणाऱ्या व्यक्तींना हसायचं नाही हं. ती त्यांची बोलीभाषा असते. बोली लेखनात तशीच येते ती 'बोली' म्हणून उद्‌गार चिन्हांच्या मखरात. पण लिहायची भाषा शुद्धच ठेवायला हवी.

यंदा दिवाळीला काय बेत आहे? आई म्हणत होती, ऋषीचे स्कॉलरशिपचे वर्ग असल्याने यंदा गावाला जाणार नाही म्हणून. दिवाळीसाठी मी एक नव्या आकाशकंदिलाचे चित्र तयार केले आहे. तू आणि ऋषी सुट्टी लागली की, इथे मामाकडे या. आपण आकाशकंदील घरीच बनवूया. तुला गंमत सांगते ऋचा, लहानपणी आमच्या खांडवात आम्ही घरीच कंदील बनवायचो आणि आमचे कोकणातले साने गुरुजी त्याची स्पर्धाच घ्यायचे; त्यामुळे मला छान छान कंदील बनवता येतात! पण तुम्ही मुले पटकन् बाजारात जाऊन विकत कंदील आणता. घरी आकाशकंदील बनवणे, रांगोळी काढणे, हार-गजरे, वेण्या बनवणे या गोष्टी माझी आई मुद्दाम करायला लावायची. म्हणायची, 'अशा कलात्मक स्पर्शाने जीवन सुंदर होते.' तेव्हा कधीकधी राग यायचा. पण आता पटतं. आता सगळं रेडिमेड! फराळ रेडिमेड, पणत्या रेडिमेड, पक्वान्न रेडिमेड, आकाशदिवा रेडिमेड. मग आपण केव्हा हे 'मेड' म्हणजे शिकणार गं? नवीन नवीन शिकण्यात खूप आनंद असतो. तुला काय वाटतं? ऋषी, शुभा, बाबांना आशीर्वाद.

तुझी आजी

- लीला दीक्षित

ध्रुव, ४९/२ सहजानंद, पुणे 411 038

*चित्रकार : दत्तात्रय पाडेकर*



पाहा... तिबेट हाऊस, दिल्ली

(तिबेटचा इतिहास, संस्कृती, चलन यावर प्रकाश टाकणारा संग्रह)।

**प्रायोजक - श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे**

# आपल्या हाती

आपल्या हाती सावळी माती,
'तो' त्यातून चारा देतो;
आपल्या हाती नवीन कळी
'तो' आतुर वारा होतो!

आपल्या हाती इवले फूल,
'तो' व्याकूळ गंध होतो;
आपल्या हाती केवळ शब्द
'तो' ताल, छंद होतो!

आपल्या हाती पहाडपाषाण,
'तो' शुभ्र झरा होतो;
आपल्या हाती बीज पाहून
'तो' ओली धरा होतो!

आपल्या हाती क्षितिजस्वप्ने
'तो' गती..., वाट होतो;
आपल्या हाती गडद रात्र,
'तो' किरण..., पहाट होतो!

आपल्या हाती तहानओंजळ,
'तो' नितळ पाणी होतो;
आपल्या हाती कागद कोरा
'तो' निळी गाणी होतो !

आपल्या हाती... त्याचे हात,
'तो' ध्यास न्यारा होतो;
आपल्या हाती ठाम निश्चय
'तो' ध्रुवतारा होतो!

**प्रवीण दवणे**
ब/३०३, राजहंस, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम) 400 604

*चित्रकार – अभय पुरंदरे*

# हल्ला


भल्या सकाळी आज असावध
सूर्यावरती झाला हल्ला
काळ्या शामल मेघांचा तट
पूर्वेवर बेबंद पसरला॥


खोल तळाशी बिंबित झाला
एक विव्हळसा उजळ हुंदका
सर्व पहारे चुकवून आल्या
मधून कुठे किरणांच्या हाका॥

सुन्न नभातून सुसाट फिरली
नवीन साम्राज्याची द्वाही
क्षितिजावर ओघळले पडदे
मेघांचे किनखापी शाही॥

ढगातून ढुमढुमली भेरी
बिजलीचा होताच इशारा
झरू लागल्या गर्जत अविरत
चमचमत्या भयकारी धारा॥

**मुकुंदराज कुलकर्णी**
'श्रीराम', पाटील प्लॉट,
शिवाजीनगर, बार्शी 413 401








ज्ञान प्रबोधिनीची औपचारिक शिक्षणातील
सर्वांगीण प्रयोगाची केंद्रे
**पुणे, निगडी, सोलापूर, साळुंब्रे, हराळी**

# रस्त्यांवरच्या नाताळची गोष्ट

स्वैर अनु.
– सुनंदा महाजन


नाताळचा सण त्यांना गाडीत बसून साजरा करायला लागला तो केवळ बाबामुळे. बाबा कधीकधी इतका संतापायचा आणि रागाच्या भरात अशक्य गोष्टी करायचा. नंतर त्याला वाईट वाटायचं, कारण तसा खरं तर तो चांगला आणि शांतच होता.

यावेळी तो आजीवर चिडला होता. आजी म्हणजे आईची आई. आई आणि बाबा आजीला एकटं वाटू नये म्हणून तिच्या घरात राहायला गेले होते. म्हणजे कधी, तर आजोबा वारले त्यानंतर; बरीच वर्षे झाली होती या गोष्टीला. आता तर आई-बाबा असं म्हणायला लागले होते की, ‘‘आजी आमच्याकडे राहाते.’’

पण आजी अजूनही म्हणायची, ‘‘तुम्ही माझ्याकडे राहाता.’’ ती असं म्हणालेली बाबाला अजिबात खपत नसे. आई त्यावर नुसती हसायची अन् म्हणायची, ‘‘बोलू दे की तिला तसं. तू रागावू नकोस उगीच.’’

पण नेमकं नाताळच्या सणाच्या दिवशी सकाळी आजीने परत ही गोष्ट कशाला म्हणायला हवी होती बरं?








'रूप पालटू देशाचे' या ध्येयाच्या दिशेने शालेय व महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी नेतृत्व शिक्षणाचे उपक्रम योजणारी संघटना
युवक व युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी

**‘खट्याळ सासू नाठाळ सून’ हा वाक्प्रचार ऐकल्यावर सासू-सुनेची सारखी चाललेली ‘तू तू मैं मैं’ लगेच दिसायला लागते डोळ्यांसमोर, हो ना? पण आता हा वाक्प्रचार थोडा बदलून ‘खट्याळ सासू नाठाळ जावई’ असा केला तर? सासू-जावयांमधल्या ‘तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना’ ची ही गोष्ट वाचायला तुम्हाला नक्कीच आवडेल...**

बैठकीच्या खोलीत शिडीवर उभा राहून बाबा ख्रिसमस ट्रीची सजावट करत होता. झाडाच्या वरच्या टोकावर चंदेरी रंगाची टोपी त्याने बसवली. तेवढ्यात आजी आली आणि तिने विचारले, ‘‘हे काय, झाड असं दाराच्या मागे का उभं केलं?’’

बाबा म्हणाला, ‘‘मग कुठे उभं करायला हवं होतं?’’

आजी म्हणाली, ‘‘माझ्या वेळी खिडकीच्या डाव्या बाजूला उभं असायचं ते नेहमी.’’ शिडीच्या वरतून खाली बघत बाबा म्हणाला, ‘‘बरं, पण आता ते दाराच्या मागे उभं आहे.’’

आजी म्हणाली, ‘‘जोपर्यंत तुम्ही माझ्याकडे राहाता तोपर्यंत तुम्ही माझंच ऐकलं पाहिजे.’’ आणि मग त्यांचं भांडण सुरू झालं. ते काहीबाही बोलत, भांडत राहिले आणि मग स्वयंपाकघरातून जेव्हा आई आली, तेव्हा तिघेही एकाच वेळेला बोलत राहिले.

बाबा खूपच चिडला. त्याने ख्रिसमस ट्रीवरच्या सगळ्या शोभेच्या वस्तू काढून खोक्यात फेकल्या.

आई ओरडली, ‘‘हे काय करतोस तू?’’

‘‘चल, सगळ्या भेटवस्तू, मिठाई, गाद्या आणि दात घासायचे ब्रश बांधून घे. आपण दुसरीकडे नाताळ साजरा करू. दुसरीकडे कुठेही आपलं मनापासून स्वागत करतील आणि आपल्याला हवा तिथे आपला ख्रिसमस ट्री मांडता येईल.’’

त्याने ख्रिसमस ट्री उचलला. त्याच्यासकट तो वेगाने बाहेर पडला आणि गाडीच्या टपावर तो बांधूनही टाकला. निकेल त्याच्या मित्राबरोबर अंगणात खेळत होता. त्याने बाबाला विचारले, ‘‘काय करतोस तू?’’ ‘‘आपण गावाला चाललो. आणि प्रवासात वाटेवरच नाताळ साजरा करायला लागणार असल्याने आपल्याला बरोबर ख्रिसमस ट्री लागेलच.’’ असं जोराने बोलत बाबा परत घरात गेला.

निकेलचा मित्र म्हणाला, ‘‘भारी !’’ आणि त्याक्षणी निकेलला अशक्य गोष्टी करणाऱ्या आपल्या बाबाचा चांगलाच अभिमान वाटला.

आजी बाबाच्या मागे मागे धावत रडवेलेपणे म्हणत होती, ‘‘मला तसं म्हणायचं नव्हतं.’’ पण बाबाने तिला फक्त बाजूला सरकवलं.

एव्हाना बाबाने लोकरीची पांघरुणं गुंडाळून, दोरीने बांधून डिकीत टाकूनही दिली होती. मग आईने पण भेटवस्तू गोळा केल्या, आंघोळीसाठीचे कपडे आणि इतर कपडे बांधले. स्वयंपाकघरातून तिने केकसुद्धा बरोबर घेतले आणि आजीने थर्मासमध्ये गरम चहा आणून दिला. मग आईने माक्सेलला गरम कपडे घातले आणि गाडीच्या मागच्या सीटवर मुलांसाठी असलेल्या छोट्या खुर्चीत त्याला बसवले. निकेलने आजीला पापी दिली आणि प्रवास सुरूही झाला. बाबा अजूनही खूप रागात होता आणि गाडी जोरात चालवीत होता. त्याने गाडीचं चाक हलवलं की त्यांची डोकी डावी-उजवीकडे हलत होती. त्याने ब्रेक दाबला की सगळे पुढे येत होते. इतर गाड्यांनी त्यांना पुढे जायला दिलं नाही की तो जोरात हॉर्न वाजवीत होता.

निकेलला हे खूप आवडत होतं आणि माक्सेलही खुश होऊन खिदळत होता. पण आई म्हणाली, ‘‘प्लीज जरा जपून चालव, नाहीतर मी खाली उतरते.’’

मग बाबा थोडा शांत झाला.

सोनेरी चैतन्य दशदिशांना प्रकटले।
आनंदी आभाळ झुल्यावरी घेई झुले ।।

प्रायोजक - श्री. विजय निकम, पुणे

थोड्या वेळाने आईने विचारले, ''कुठे चाललो आपण?'' बाबा म्हणाला, ''माझी मावशी आहे लुईझे म्हणून तिच्याकडे. तू बघशीलच आता की तुझ्या आईकडे नाही पण तिच्याकडेच आपल्याला किती छान वाटेल ते.'' एकदम असंच उठून लुईझे मावशीकडे जायचा आईला खरं संकोच वाटत होता. काही झालं तरी हे चौघेजण होते, सणाचा दिवस होता आणि हे येताहेत, असं मावशीला माहीत नव्हतं. पण बाबापुढे काय बोलणार ती? एक तासाच्या प्रवासानंतर लुईझे मावशी राहात होती ते गाव आलं. घरासमोर गाडी उभी करत बाबा खाली उतरला आणि त्याने घंटा वाजवली. पण कोणीच दार उघडलं नाही.

शेजारच्या घराच्या खिडकीतून एका बाईंनी सांगितले, ''घरी कोणी नाहीत.'' आणि मग त्यांनी बाबाला सांगितले की, नाताळच्या दिवशी घरी एकटं वाटायला नको म्हणून लुईझे मावशी कशी गावाला गेली होती ते; आणि असंही म्हणाल्या की तिला जर पाहुणे येणार असं माहिती असतं तर ती नक्की घरी थांबली असती आणि तिला खूप आनंदही झाला असता.

बाबा म्हणाला, ''ठीक आहे, ठीक आहे. थँक्स आणि मेरी ख्रिसमस.'' त्याने पुन्हा गाडी सुरू केली.

आईने विचारलं, ''आता कुठे जायचं आपण?''

बाबाला आठवलं की याच गावात त्याचा एक जुना शाळासोबती राहात होता. त्याला वाटलं, असं न कळवता त्याच्याकडे गेलो तरी त्याला काही वाटायचं नाही, उलट बरंच वाटेल. आईला काही तशी खात्री देता येत नव्हती; पण ती काही बोलली नाही.

निकेल म्हणाला, ''छान, आपण आता मनमोकळ्या घरात जाऊ.''

माक्सेलही बरं वाटून हसला.

बाबाचा मित्र घरीच होता, पण तो काही फारसा मनमोकळा नव्हता. त्याला तर बाबा आठवतच नव्हता आणि त्याला स्मरणशक्तीला ताणच द्यायला लागला. पण जेव्हा त्याने निकेलला बघितले, तेव्हा त्याला बाबा आठवला कारण बाबा पूर्वी निकेलसारखाच दिसायचा. त्याने त्यांना घरात बोलावले आणि दुपारची वेळ झाली असल्यामुळे त्याच्या बायकोने प्रत्येकाला बशी भरून बटाट्याचे सूप आणले. शेजारच्या खोलीत जाऊन आईने माक्सेलने ओले केलेले कपडे बदलले आणि निकेलला तिथे मोरीत जाऊन येता आले. मग बाबाचा मित्र म्हणाला,

''चला, तुम्हाला नक्की अजून बराच प्रवास करायचा असेल. आम्ही काही तुम्हाला थांबवत नाही. आज सगळ्यांनाच बरंच काही करायचं मनात असतं. आम्हाला थोडा वेळ का होईना मुद्दाम भेटायला आलात, बरं वाटलं.''

बाबाला काही बोलायचं धाडस झालं नाही. मग काय सगळे परत गाडीत चढले आणि मार्गस्थ झाले.

तिथून फार दूर नाही पण थोड्या अंतरावर बाबाचा एक चुलतभाऊ राहात होता. बायको आणि तीन मुलं यांच्याबरोबर तो भल्या मोठ्या शेतावरच्या घरात राहात होता. पूर्वी ही मंडळी तिथं खूप वेळा जायची. परंतु बाबाचा भाऊ बाबासारखाच रागीट होता, शीघ्रकोपी; त्यामुळे एकदा त्या दोघांना एकाचवेळी राग येऊन मोठं भांडण झालं होतं.

आता आई म्हणाली, ''चल, तुझ्या भावाकडे जाऊ.''

बाबाला ते फारसं पटत नव्हतं; पण त्याच्या लक्षात आलं की, आईला खरं तर हे चांगलं सुचलं होतं. शेतावरच्या घरासमोर तो गाडीतच बसून राहिला आणि त्याने आईला आत पाठवले. निकेलला लगेच आईबरोबर घरात जायचे होते पण बाबाने त्याला घट्ट पकडून ठेवले.



१ ते ७ जुलै - राष्ट्रीय पाणलोट सप्ताह
(जवळच्या गावात जाऊन पाणलोट कार्यक्रमात भाग घ्या.)
**प्रायोजक - श्री. विश्वास हर्षे, पुणे**

आई घरातून परत बाहेर आली, गाडीत बसली आणि बाबाला म्हणाली, ''चल, चल, लगेच पुढे जाऊ.'' बाबाने विचारलं, ''तो अजून माझ्यावर रागावलेलाच आहे का?''

आई म्हणाली, ''तो नाही रागावलेला; पण तो आणि त्याची तिन्ही मुलं आजारी आहेत. गालगुंड झालं आहे त्यांना. निकेलला आणि माक्सेलला अूजन झालं नाही आहे, तर आता इथे नकोच.''

बाबा एकदम गप्प बसला. त्यानंतर बाबाला आईने प्रत्येक हॉटेलपुढे थांबवून आत खोली रिकामी आहे का बघायला सांगितले. पण तिथंही त्यांच्या नशिबी काहीही नव्हतं, एक तर हॉटेल्स सणामुळे बंद होती किंवा सगळ्या खोल्या भरलेल्या तरी होत्या.

निकेलला आणि माक्सेलला आता भूक लागली होती. आईने त्यांना बरोबरचा केक खायला दिला. एकदा बाबाने गाडी थांबवली आणि सगळ्यांनी खाली उतरून पाय मोकळे केले.

गाडीत बसून ते जेव्हा पुन्हा निघाले, निकेलने विचारले की नाताळच्या भेटी उघडायचा कार्यक्रम कधी करायचा; कारण आता त्याला त्याच्या भेटवस्तू हव्या होत्या.

आई म्हणाली, ''आपण तिथे पोचलो की.''

निकेलने विचारले, ''आपण कधी पोचणार तिथे?''

आईने बाबाला म्हटले, ''प्लीज आपण, आपण आता परत फिरूया का?''

आणि खरंच बाबाने गाडी उलटी वळवली. आता रस्त्यावर ते एकटेच गाडीने चालले होते. अंधार पडला होता. माक्सेल झोपी गेला. आईने आणि निकेलने ख्रिसमसची गाणी म्हटली. मग निकेलही झोपला. नंतर ते आणखी एकदा थांबले. आईने बाबाला गरम चहा दिला.

तो म्हणाला, ''हे बरं सुचलं तुला.''

आई म्हणाली, ''मला नाही, आजीला सुचलं हे.'' ते जेव्हा घरी येऊन पोचले तेव्हा कुठेही दिवा जळत नव्हता...

दुसऱ्या दिवशी सकाळी अजून सगळे झोपलेले असताना गाडीच्या टपावरून बाबाने ख्रिसमस ट्री उतरवला, बैठकीच्या खोलीत दारामागे त्याला उभं करून तो सजवायला लागला. अधिकाधिक सजावट करून झाल्यावर तो त्याने उचलला आणि खिडकीच्या डावीकडे ठेवला.

आई आली, तिने सगळ्या भेटवस्तू आणल्या. तिने माक्सेलला कडेवरून खोलीत आणले, निकेल तिच्या मागे उड्या मारत आला. बाबाने मेणबत्त्या पेटवल्या. निकेल म्हणाला, ''आत्ता कुठे आपण नाताळ साजरा करणार आहोत...''

बाबा म्हणाला, ''थांबा हं, क्षणभर.'' त्याने आत्तापर्यंत तिथे कुठे न आलेल्या आजीला बोलावून आणले. त्याने तिला जवळ घेत मिठी मारली. गालावर हलकेच मुका घेत ''मेरी ख्रिसमस'' म्हटले.

बाबा खरंतर बहुतेक वेळा शांतताप्रिय आणि उत्तम मनुष्य होताच. आजी म्हणाली, ''तुम्ही परत इथे आलात म्हणून मला केवढा आनंद झाला म्हणून सांगू ! तुमच्याकडे राहायला मला खरंच खूप आवडतं.'' त्यानंतर तिने पुस्ती जोडत म्हटले, ''पण काही म्हणा हं, हा ख्रिसमस ट्री असा दाराच्या मागे उभा करायच्या ऐवजी खिडकीच्या डावीकडेच उभा केलेला छान दिसतो की नाही?''

आई ओरडली, ''आजीऽ!'' पण बाबा हसत राहिला.

❖ ❖ ❖

**मूळ लेखिका :** मार्ग्रेट रेटिष
**स्वैर अनु. डॉ. सुनंदा महाजन**
३, ज्ञानेश्वरी अपार्टमेंटस्,
२, प्रभा हाऊसिंग सोसायटी,
कोथरूड, पुणे 411038

*चित्रकार – गिरीश सहस्रबुद्धे*

**अंधार जातो, उजेड येतो, चांदण्या मिटतात, सूर्य उगवतो ।
रात्रीचा मग दिवस होतो, क्षणक्षण बदलत जातो ।।**

**प्रायोजक - सौ. शैलजा देशपांडे, पुणे**

Life is short !
Give it upto a great cause.
Work hard
Be holy & pure
And the fire will come.

# Padmini Enterprises

**Dealers in Pathological Instruments, Chemicals & Reagents**

**Address :** Office No. 113, Swamipuram, Wing 'C',
2160 A, Sadashiv Peth,
Near Dandekar Bridge, Pune - 411 030.
**Phone No.:** 020-24327533 **Mobile No.:** 9822113598/9850652562

दीपावली हार्दिक शुभेच्छा !....



# PRABODHAN

**Avoid Electricity Board penal charges for low power factor by installing PRABODHAN make L.T. shunt capacitor.**

**PRABODHAN capacitors are available in three designs: MPP, MD, ALLPP- Impregnated with N-PCB oil.**

**PRABODHAN capacitors are tested and approved by CPRI, ERDA, Tariff advisory Committee and Electricity Boards - all over India.**

## Seva Engineering Works Pvt. Ltd.

**Post Box No. 822, Deccan Gymkhana, Pune - 411 004.**
**Tel : 020-24450363, 25531347 Telefax : 020 - 24455344**

रंग, प्रकाश, आनंदाची उधळण ।
दुर्गुणांना नष्ट करण्या आला हा सण ।।

संग्रही ठेवा -निवडक कविता संग्रह '**अक्षरबोली**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ३०/-

# कलानंदाच्या वाटेवर



एखादं अप्रतिम चित्र बघणं, सुरेखसं पुस्तक वाचणं, छानसं गाणं ऐकणं, चित्रपट पाहाणं यांसारखे कलानंदाचे क्षण सामान्य रसिकालाही विलक्षण आनंद देऊन जातात. मग कलानंदात साक्षात डुंबणाऱ्या कलावंतांचा आनंद तर त्या पलीकडचा असणार.

चांगला कलावंत हा चांगला आस्वादक असेल तर त्याची कलेची जाण अधिक प्रगल्भ होत जाते. त्यासाठी पूरक अशी कलेतील रुचीची बीजं सामान्यत: संवेदनशील कुमारवयातील संस्कारात, अनुभवात असतात.

कलास्वादाच्या अनुभूतीचे सुरुवातीच्या काळातील क्षण खूप प्रेरक, जीवन उजळून टाकणारे असतात. विविध कलाक्षेत्रात कलासाधना करणाऱ्या कलावंतांच्या जीवनात असा 'कलास्वादाच्या अनुभूतीचा' क्षण कोणत्या कलाकृतीने दिला याविषयी वाचूया या लेखमालेत, त्यांच्याच शब्दात!

पुस्तकांची श्रीमंती असणाऱ्या घरात लहानाचं मोठं होताना कविवर्य मंगेश पाडगावकरांची 'बोलगाणी' कवी दुर्गेश सोनार यांच्या मनात खोल रुजली. कवितेची लय, ताल, शब्दकळा, आशयसंपन्नता यांच्या दर्शनाने कविता कशी असावी याचा एक आदर्शच कलानंदाबरोबर त्यांच्या मनात नकळत रुजला.

अभिनेत्री विभावरी देशपांडे यांना कोवळ्या संस्कारक्षम वयात 'द साऊंड ऑफ म्युझिक' या चित्रपटाने एक प्रसन्न, आनंददायी अनुभव दिला; चित्रपटमाध्यमाकडे गंभीरपणे पाहण्याची दृष्टी दिली.

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये शिकत असताना चित्रकार देवदत्त पाडेकर यांच्या मनाला 'एदगर देगा'च्या चित्रांनी मोहिनी घातली. ड्रॉईंग, रंगसंगती, चित्रसंयोजन, रंगलेपन आणि उच्च कलात्मकता असलेल्या त्याच्या बॅलेवरील सौंदर्यप्रधान चित्रांनी त्यांना प्रेरणा दिली.

कथक नर्तिका शांभवी वझे यांना कुमार वयात पाहिलेले केवळ एक नव्हे तर असे अनेक नृत्य कार्यक्रम स्मरतात की ज्यांच्या संस्कारांचा ठसा त्यांच्या मनावर कायमचा कोरला गेला.

लहानपणच्या आठवणीत रमताना संजीव अभ्यंकर यांना स्वत:चीच एक रंगलेली मैफल आठवते. अनेक नामवंतांनी दिलेली दाद, 'आपण छानच गायलो' हा अंतर्मनाने दिलेला कौल, त्यामुळे लाभलेलं समाधान या भावनांना त्यांनी शब्दरूप दिलं आहे.

आपण कलाकार असू किंवा नसू, पण रसिकतेने छान ऐकणं, वाचणं, पाहाणं यातील आनंद तर नक्कीच अनुभवू शकतो; कारण आपल्या संवेदनांची कवाडं उघडी असली की मग कलानंदाची दालनं आपल्यासाठी आपोआप उघडतात. एका अनिर्वचनीय आनंदाचं निधान आपल्याला नक्कीच गवसतं!


आम्ही अंधाराचा सदा करू धिक्कार।
अन् स्वप्न कालचे करू आज साकार।।

प्रायोजक - श्री. सचिन जोगळेकर, चेंबूर

# 'बोलगाण्यां'तून मिळाली जीवनदृष्टी

दुर्गेश सोनार



**लयबद्ध रचनेचा कवी दुर्गेश सोनार**

- प्रकाशित कवितासंग्रह - अक्षरांती
- 'प्रतिभा संगम' या महाविद्यालयीन विद्यार्थी साहित्य चळवळीमध्ये सुरूवातीपासून सक्रीय
- पुणे, मुंबई आकाशवाणी केंद्रांवरून काव्यवाचनाचे कार्यक्रम
- अखिल भारतीय साहित्यसंमेलन, समरसता साहित्यसंमेलन इ. मध्ये निमंत्रित कवी म्हणून सहभाग
- पत्रकारितेच्या क्षेत्रात गेली ११ वर्षे कार्यरत

पुस्तकं आपल्याला खूप काही शिकवतात. पुस्तकं आपल्याशी खूप बोलतात, पुस्तकं आपल्याला एकांतात जगभराची सैर घडवून आणतात. पुस्तकंच आपल्याला छान छान वाचायला आणि लिहायला शिकवतात. लिहिण्यासाठी मनाची जी मशागत करावी लागते, ती मशागत पुस्तकंच करतात. या पुस्तकांनी मलाही भरभरून दिलं आहे.

मला आठवतं, जेव्हा मी पहिली कविता लिहिली तेव्हा मी होतो इयत्ता चौथीत... त्यावेळी माझ्या बाबांना त्याचं खूप अप्रूप वाटलं होतं. त्यांचा पहिल्यांदा विश्वासच बसला नव्हता. त्यांनी चक्क घरातली सगळी पुस्तकं, मासिकं, वर्तमानपत्रं चाळून काढली. त्यांना वाटलं की, मी कदाचित कुठून तरी वाङ्मयचौर्य केलं असावं. पण, जेव्हा त्यांना कुठेही ती कविता आढळली नाही तेव्हा त्यांचा विश्वास बसला आणि त्यांनी मला लेखनासाठी कायमच प्रोत्साहन दिलं. माझी आई आणि बाबा दोघांनाही वाचनाची खूप आवड... त्यांच्यामुळेच आम्हा मुलांनाही वाचण्याचं वेड लागलं. आमच्या घरात खूप सारी पुस्तकं होती; अजूनही आहेत. पंढरपुरातल्या आमच्या घरातली कपाटं तर कपडयांऐवजी पुस्तकांनीच भरून गेलेली... हाताला येईल ते पुस्तक घ्यायचं आणि वाचत बसायचं, असा तो बालपणीचा काळ होता. टिळक, सावरकरांपासून ते विवेकानंदांपर्यंत आणि कथा कादंबऱ्यांपासून ते कवितासंग्रहापर्यंत... अनेकविध विषयांवरची कितीतरी पुस्तकं घरात होती. कधी हाताला शंकर पाटलांचं 'बंधारा' लागायचं, तर कधी पुलंचं 'व्यक्ती आणि वल्ली', कधी मंगेश पाडगावकरांचं 'जिप्सी' हाती घ्यायचं तर कधी नारायण सुर्व्यांचं 'माझं विद्यापीठ'... कधी महानोरांच्या 'रानातल्या कविता' गुणगुणायच्या तर कधी विंदांची 'स्वेदगंगा'... जे मिळेल ते वाचणं आणि वाचत राहणं हाच आमचा एककलमी कार्यक्रम असायचा... अगदी चंपक, चांदोबा, ठकठक, किशोरसुद्धा चोथा होईपर्यंत वाचत राहायचं...

या सगळ्या पुस्तकांच्या खजिन्यातून माझ्यावर कायम प्रभाव टाकत राहिलं ते मंगेश पाडगावकरांचं लेखन... त्यांच्याच कवितांचे संस्कार माझ्यावर कळत नकळतपणे झाले आहेत. त्यांचे 'जिप्सी', 'धारानृत्य', 'छोरी', 'निंबोणीच्या झाडामागे', 'गझल', 'सलाम', 'बोलगाणी' हे सारे कवितासंग्रह माझ्या काव्यलेखनाचे दिशादर्शक ठरले. पाडगावकरांचं 'बोलगाणी' तर माझ्या मनावर खोल बिंबलं गेलं. १९९० मध्ये प्रकाशित झालेला हा कवितासंग्रह त्याच वर्षी माझ्या हातात पडला. साधेसुधे शब्द; पण त्याला असलेली अंगभूत लय, त्यामध्ये दडलेला ताल यामुळे बोलता बोलता त्याचं झालेलं गाणं... पाडगावकर बोलगाणीच्या सुरुवातीलाच लिहितात,



आदरांजली... ज्येष्ठ समाजवादी नेते,
साहित्यिक व स्वातंत्र्य सैनिक ग. प्र. प्रधान (२९ मे २०१०)
**प्रायोजक - सौ. सीमा परांजपे, पुणे**

*'समूहात बसून ही गाणी*
*ऐकावीशी वाटली तर*
*त्यात काय चूक आहे?*
*शब्दांचं नादरूप असं मिळून भोगणं ही*
*प्रत्येकाची अटळ अशी भूक आहे !'*

शब्दांचं कवितेतलं नादरूप भोगायची भूक मलाही तिथेच प्रकर्षानं जाणवत गेली. पुढे दोन-तीन वेळा पाडगावकरांना प्रत्यक्ष भेटण्याची, बोलण्याचीही संधी मिळाली. माझा 'अक्षरांती' हा पहिलावहिला कवितासंग्रह जेव्हा त्यांना दिला, त्यावेळी पाडगावकरांनी तो आवर्जून वाचला, त्यात शेवटचं पान कोरं होतं. त्यावर ते मिश्किलपणे मला म्हणाले, 'हे बघ, हे पान कोरं आहे, तुझ्या सर्वोत्तम कवितेची त्याला प्रतीक्षा असावी; त्यामुळे असंच चांगलं लिहीत जा...' त्यांचं एवढं एकच वाक्य अजूनही माझ्या मनात घर करून आहे. जेव्हा जेव्हा मी नवी कविता लिहितो, तेव्हा तेव्हा मला ते वाक्य आठवत राहातं, '...अजूनही सर्वोत्तम कवितेची प्रतीक्षा आहे...!'

पाडगावकर अगदी मनमोकळं लिहितात. त्यामुळेच त्यांचे शब्दही मोकळेपणाने कवितेत येतात आणि वाचकांच्या मनात घट्ट रुजतात.

*'मन मोकळं, अगदी मोकळं करायचं,*
*पाखरू होऊन पाखरांशी बोलायचं !'*

पाखरांशी असं मोकळेपणानं बोलता आलं की कविता आपसूकच सापडत जाते. पाखरांसारखंच कवितेलाही अर्थाचं, आशयाचं निळं निळं आभाळ गवसत जातं. मग इवले इवले शब्द आपल्या कवितांमधून चिवचिवू लागतात. मलाही हे सानुकले शब्द खुणावत गेले. शब्द जोपर्यंत ओठांवर रुंजी घालत नाहीत तोपर्यंत कविता, गाणं आपलं होत नाही, हा कानमंत्रही पाडगावकर बोलगाण्यातून देऊन जातात.

*'कोऱ्या कोऱ्या कागदावर*
*असलं जरी छापलं,*
*ओठांवर आल्याखेरीज*
*गाणं नसतं आपलं !'*

याच बोलगाण्यात पाडगावकर अत्यंत साध्या शब्दांतून कवितेची सार्थकता पटवून देतात. नुसतेच निरर्थक शब्द असतील तर अशा कवितेला काय अर्थ? नेमका हाच आशय मांडताना ते लिहितात,

*'शब्द शब्द रिते शब्द*
*त्यांचं काय करणार?*
*तळफुटक्या माठामध्ये*
*पाणी कसं भरणार?'*

माठाच्या बुडाला जर छिद्र असेल तर त्यात पाणी कसं भरता येईल? तसं, कवितेत नुसतेच रिकामे शब्द असतील, तर त्यांचा काय उपयोग? शब्दबंबाळ कवितेपेक्षा आशयसंपन्न कविता लिहिता आली पाहिजे, हे गमक मला पाडगावकरांच्या बोलगाण्यातूनच उमजलं.

पाडगावकरांनी कधीही पंडिती भाषा कवितेत वापरली नाही. पण, त्यांच्या कवितांतून त्यांचे पाण्डित्य ओतप्रोत भरलेलं जाणवत राहतं. अत्यंत सोप्या पद्धतीनं ते जगण्याचं मर्म समजावून सांगतात.

*'सांगा कसं जगायचं?*
*कण्हत कण्हत की गाणं म्हणत?*
*तुम्हीच ठरवा...'*

जगण्याकडे कोणत्या दृष्टीने तुम्ही पाहणार याचा उत्तम वस्तुपाठच पाडगावकरांनी बोलगाण्यातून घालून दिला आहे. अर्ध्या भरलेल्या पेल्याकडे पाहताना तुम्ही पेला अर्धा भरलेला आहे असं म्हणता की, पेला अर्धा सरलेला आहे असं म्हणून पाहता? यावरून तुमचा जगण्याचा दृष्टिकोन निश्चित होतो. आयुष्याकडे आपण नकारात्मक (निगेटिव्ह) नजरेनं न पाहता सकारात्मक (पॉझिटिव्ह) नजरेनं पाहिलं तर जगणं सुंदर होऊन जातं. पाडगावकरांची कविता आपल्याला हेच शिकविते. माझ्याही कवितेलाच नव्हे तर जगण्यालाही पाडगावकरांच्या अशाच कवितांनी सकारात्मक दृष्टी दिली आहे.

- **दुर्गेश सोनार**, सकाळ भवन, प्लॉट क्र. ४२ बी,
सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
durgesh.sonar@gmail.com

दिवे डोलतात, दिवे फुलतात ।
सळसळत्या वाऱ्यावर दिवे झुलतात ।।

**प्रायोजक - श्री. धनंजय भट, डोंबिवली**

# चित्रपट माध्यमाशी पहिली ओळख

विभावरी देशपांडे



चित्रपट-रंगभूमीवरील लक्षवेधी अभिनेत्री विभावरी देशपांडे
- पं. सत्यदेव दुबेंच्या नाट्यशिबिरांपासून नाट्य कारकिर्दीला सुरुवात
- ग्रिप्सच्या बालनाट्य चळवळीत सक्रीय सहभाग
- नटरंग, सातच्या आत घरात, हरिश्चंद्राची फॅक्टरी इ. चित्रपटांमधून भूमिका
- नाट्यलेखन, नाट्यदिग्दर्शन इ. क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी (नाटक-प्रोजेक्ट अदिती)

'When the dog bites,
when the bee stings,
when I'm feeling sad,
I simply remember my favourite things
and then I don't feel so bad.'

सहावीच्या दिवाळीच्या सुट्टीत माझ्या भावविश्वात ह्या ओळी आल्या आणि त्यावेळच्या छोट्या-मोठ्या दुःखांतून बाहेर पडण्याचा एक नवा मंत्रच जणू मिळाला. या सुट्टीत रिचर्ड रॉजर्स आणि ऑस्कर हॅमरस्टाईन यांचा 'द साऊंड ऑफ म्युझिक' हा सिनेमा मी पाहिला आणि त्यानं मला अक्षरशः झपाटून टाकलं.

१९३०-४० च्या दशकात ऑस्ट्रियाच्या साल्सबर्ग शहरात घडलेल्या एका सत्यघटनेवर आधारित हा चित्रपट. एका कॅथलिक चर्चमधल्या नन्सनी लहानाची मोठी केलेली मारिया ही अनाथ मुलगी. चर्चच्या कट्टर रूढी, परंपरा, चालीरीती, नियम या कशात ती कधी बसूच शकली नाही. मारिया एक चंचल, अवखळ पण मनस्वी आणि प्रगल्भ मुलगी. संगीत म्हणजे तिचा प्राण. चर्चमधल्या गंभीर प्रार्थनांना उपस्थित राहण्यापेक्षा आल्प्स पर्वतावरच्या हिरवाईत मुक्त कंठानी गात, धावत सुटणारी मारिया. 'हिचं आता काय करायचं?' हा प्रश्न सगळ्या नन्सना भेडसावत असताना मारियासाठी एका नोकरीचा प्रस्ताव येतो. एका निवृत्त कॅप्टनच्या सात मुलांना सांभाळण्याचा. सुरुवातीला चर्च सोडून जायला तयार नसलेली मारिया, एक आव्हान म्हणून ही नोकरी स्वीकारते आणि कॅप्टन फॉनट्रॅपच्या महालवजा घरात दाखल होते.

कॅप्टनच्या पत्नीच्या निधनानंतर मुलांसाठी आया शोधण्याचे त्यांचे सगळे प्रयत्न फसलेले असतात. ५ ते १६ या वयोगटातली सात मुलं सर्व आयांना त्यांच्या खोड्यांनी छळून हाकलून लावत असतात. मारियालाही हा प्रसाद मिळतोच. पण त्यांच्या या वर्तनामागचं नेमकं कारण ती शोधते. पत्नीच्या मृत्यूनंतर कॅप्टन तिच्याशी निगडित असलेल्या सगळ्या गोष्टींचा तिरस्कार करत असतो. प्रेम, हास्य, आनंद आणि मुख्य म्हणजे संगीत या सगळ्यांना कॅप्टनच्या आणि पर्यायाने त्याच्या मुलांच्या आयुष्यात स्थान नसतं. कॅप्टन एखाद्या फौजेप्रमाणे घर चालवत असतो. शिस्तीचा केवळ अतिरेक असतो. अकाली बालपण हरवलेल्या या मुलांना त्यांचा राग, निषेध व्यक्त करण्याचं कुठलंच साधन नसतं. मारिया केवळ मुलांचंच मन जिंकून घेत नाही तर ती त्या घरात संगीत परत आणते. मुलांच्या चेहऱ्यावर हास्य आणते. तिच्या या जादूपासून कॅप्टनही फार काळ दूर राहू शकत नाही. दोघं एकमेकांच्या प्रेमात पडून विवाहबद्ध होतात.

माझ्या शालेय जीवनात या चित्रपटाचं फार मोठं स्थान होतं. याची अनेक कारणं असावीत. ज्यूली अँड्र्यूस (मारिया), ख्रिस्तोफर प्लमर (कॅप्टन), त्यांची ती सात मुलं आणि लहान- मोठ्या भूमिका करणारे अनेक कलाकार. प्रत्येकानं अत्यंत सहजपणे प्रत्येक

पाहा... वेच्चर युटेन्सिल्स संग्रहालय, अहमदाबाद
(सुरेंद्र पटेल यांचे - ३६०० वेगवेगळ्या प्रकारची स्वयंपाकाची भांडी)
कै. अविनाश रघुनाथ फडके यांच्या स्मरणार्थ, **प्रायोजक - श्री. आशिश अ. फडके**

भूमिका जिवंत केली. एकाच वेळी प्रभावी आणि तरीही संयत अभिनय यामुळे या व्यक्तिरेखा पडद्यावर नसून खरोखर माझ्या आजूबाजूलाच आहेत, असं मला वाटायचं. खरंतर आजही वाटतं. अत्यंत साधेपणाने, एकमेकांत गुंफलेले प्रसंग, साधी-सोपी भाषा यामुळे इंग्रजी ही मातृभाषा नसून मला या चित्रपटाशी एक भावनिक बंध जाणवायचा. निरागसता, प्रेम, भीती, वात्सल्य, कर्तव्यभावना, आत्मविश्वास या सगळ्या भावना या चित्रपटात इतक्या सहजतेने उलगडल्या आहेत की, त्याच्याशी प्रेक्षक म्हणून एकरूप होताना भाषा, संस्कृती, ऐतिहासिक संदर्भ हे कुठलेच अडसर मला जाणवले नाहीत. त्यातल्या काही वाक्यांनी तर माझ्या मनात कायमचं घर केलं आहे. कॅप्टनच्या घरची नोकरी स्वीकारल्यावर पहिल्यांदा त्याच्या घरी जाताना मारिया म्हणते, 'Strength doesn't lie in numbers, strength doesn't lie in wealth, strength lies in nights of peaceful slumbers.'
(सामर्थ्य कुठल्या आकडेमोडीत नसतं, सामर्थ्य धनदौलतीत नसतं, सामर्थ्य रात्रीच्या शांत सुंदर झोपेत असतं.) किती साधेपणानं या ओळी केवढं मोठं सत्य सांगून जातात. तसंच कॅप्टनकडून भ्रमनिरास झालेली मारिया चर्चमध्ये परत येते. 'सगळं संपलं' अशा मन:स्थितीत असताना तिला तिची गुरू सांगते, 'When the lord closes the door, somewhere he opens a window.' (ईश्वर जेव्हा सगळी दारं बंद करतो. तेव्हा कुठेतरी तो एक खिडकी नक्की उघडतो.) निराशेच्या अनेक प्रसंगी या ओळी मला आजही नवी उमेद देतात.

या चित्रपटाचं सर्वोच्च सौंदर्यस्थळ आहे त्याचं संगीत. साधे-सोपे शब्द आणि सहज गुणगुणता येतील अशा अद्भुत चाली यामुळे वर्षानुवर्षं या गाण्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. 'Do-a-deer, A Female deer, किंवा 'I'm sixteen going on seventeen' ही गाणी तर अजरामर आहेत.

केवळ एक मनोरंजक प्रेमकथा दाखवून हा चित्रपट इथे थांबत नाही. या सत्यघटनेला दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहे. कॅप्टन फॉनट्रॅप हा अत्यंत देशाभिमानी ऑस्ट्रियन होता. ऑस्ट्रियाच्या सैन्यात तो देशाकडून लढला आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या हुकुमशाहीमुळे जर्मनीबरोबर ऑस्ट्रियाला हातमिळवणी करावी लागली. कॅप्टन स्वत:ला जर्मन सैन्याचा भाग मानण्यास तयार होत नाही. नाझी ऑफिसर्सकडून त्याच्यावर दबाव टाकण्यात येतो. अशा वेळी स्वत:ला कट्टर ऑस्ट्रियन मानणारा कॅप्टन मनावर दगड ठेवून कुटुंबासहित मायदेश सोडून निघून जातो आणि चित्रपट संपतो. कौटुंबिक वाटणाऱ्या चित्रपटाला एक कलाटणी मिळते आणि आपण भारावून जातो. या राजकीय घडामोडींचे संदर्भ अतिशय सहजपणे आधीच्या भागातही पेरलेले आहेत.

विद्यार्थिदशेत या संदर्भांनी माझ्या मनात खूप कुतूहल निर्माण झाले होते. मी आवर्जून तो इतिहास जाणून घेतला. चित्रपटाच्या माध्यमातून आपण वास्तवातल्या काही घटना, संदर्भ, त्याचे महत्त्व समजून घेऊ शकतो हे मला या चित्रपटामुळे समजले. या माध्यमाकडे केवळ गंमत किंवा मनोरंजन यापलीकडे जाऊन गंभीरपणे पाहणे आवश्यक आहे, हे मला या चित्रपटाच्या निमित्ताने जाणवले.

आज सिनेमाक्षेत्रात चांगलं काम करण्याचा प्रयत्न मी करते आहे. खूप चांगले चित्रपट मी आवर्जून पाहते. भारतीय, पाश्चात्य तसंच जागतिक सिनेमाशी माझी बऱ्यापैकी ओळख आहे. पण कोवळ्या, संस्कारक्षम वयात माझ्या आईनी दाखवलेल्या 'द साऊंड ऑफ म्युझिक' या चित्रपटाचा माझ्या जडणघडणीत फार मोलाचा वाटा आहे.

- **विभावरी देशपांडे,**
ए २०७, ऋतुरंग सहनिवास,
परांजपे शाळेजवळ,
कोथरूड, पुणे 411038
vibhawari.deshpande@gmail.com

*दीपमाला शोभल्या नीलांबरी तेजे अती ।*
*दीपमाला तेवल्या स्नेहांतुनी जगती किती ।।*

**प्रायोजक - सौ. शुभा कोतवाल, मुलुंड**

# माझी प्रेरणा : चित्रकार एदगर देगा

देवदत्त पाडेकर



आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तरुण चित्रकार
देवदत्त पाडेकर
- मुंबई, लंडन, फ्लॉरेन्स येथील नामवंत कला महाविद्यालयांतून शिक्षण
- आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, ऑल इंडिया फाईन आर्टस्, क्राफ्टस् सोसायटी इ. अनेक नामवंत संस्थांकडून पुरस्कार
- देश-विदेशात अनेकवेळा चित्रप्रदर्शने
- सुगमता, सहजता, उत्स्फूर्तता, मार्मिकता ही त्यांच्या चित्रांची ठळक वैशिष्ट्ये

अवश्य भेट द्या -www.devdattapadekar.com

लहानपणापासून घरात चित्रकलेचे वातावरण होते. वडील चित्रकार असल्यामुळे घरात (ब्रश, रंग, पेपर, स्केचपेन इ.) रंग साहित्य होते. तसेच चित्रकलेवरील दर्जेदार पुस्तकेही होती. माझ्यासाठीसुद्धा चांगली चित्रे असलेली पुस्तके आणली होती. असे असले तरी रिकामा कॅनव्हास घेऊन, वाटेल तसे रंग घेऊन फराटे मारणं किंवा पुस्तकातील चित्र पाहून जशीच्या तशी चित्रं काढण्यास मला परवानगी नव्हती.

मला माझे स्वतंत्र स्केचबुक आणि स्केचपेनचा सेट दिला जात असे. घरातल्या वस्तू पाहून म्हणजे टेबललॅम्प, फ्लॉवर पॉट वगैरे काढायला सांगत किंवा बाहेर फिरायला जाऊन आल्यावर बघितलेल्या गोष्टी काढायला सांगत. म्हणजे ट्रेन, बस वगैरे आणि ते काढायला मला आवडत असे. अशा तऱ्हेने चित्रकलेची गोडी निर्माण झाली.

शाळेत असताना चित्रकलेच्या बऱ्याच स्पर्धांमध्ये भाग घेतला व त्यात बक्षिसेही मिळाली; त्यामुळे प्रोत्साहन मिळाले व चित्रकलेची आवड आणखी वाढत गेली आणि पुढे चित्रकलेचे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा निर्माण झाली.

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतल्यानंतर खऱ्या अर्थाने चित्रकलेकडे गांभीर्याने बघण्याचा प्रयत्न सुरू झाला. या प्रयत्नाच्या प्रक्रियेत मी अनेक चित्रप्रदर्शने पाहात असे. तसेच चित्रकलेवरील विविध विषयांची पुस्तकेही पाहात असे. चित्रे पाहाता पाहाता माझी विचार प्रक्रियाही चालू असे. त्यातील कुठल्या चांगल्या गोष्टींमुळे चित्राचा दर्जा उंचावतो, तो दर्जा माझ्या चित्रात आणण्याचा प्रयत्न करत असे आणि तेच माझे ध्येय असे.

१९९९ मध्ये जे. जे. त मी जेव्हा 'ग्रॅज्युएट'चा विद्यार्थी होतो, तेव्हा मी कॉलेजच्या लायब्ररीत नेहमी जात असे. लायब्ररीत अनेक नामवंत परदेशी चित्रकारांची पुस्तके अभ्यासत असे. विशेष करून 'देगा' (एदगर देगा - १८३४ ते १९१७). मला त्याची बॅलेवरील सौंदर्यप्रधान चित्रे खूप आवडत असत; कारण त्या चित्रांमध्ये ड्रॉईंग, रंगसंगती, चित्रसंयोजन, रंगलेपन - या सर्व गोष्टी तर उत्तम होत्याच. पण त्यात अशी काही कलात्मकता होती की, त्यामुळे मला बॅलेबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि वाटलं, आपल्याला एकदा तरी या नृत्याचा आविष्कार पाहण्याची संधी मिळायला हवी.

आठ वर्षांनंतर २००७ मध्ये मी जेव्हा 'फ्लॉरेन्स ॲकॅडमी ऑफ आर्ट', इटली येथे शिकत होतो, तेव्हा मला माझ्या मित्राबरोबर 'फ्लॉरेन्स डान्स सेंटर' या संस्थेने आयोजित केलेल्या, चित्रप्रदर्शन व बॅले नृत्याच्या कार्यक्रमाला जाण्याची संधी मिळाली. मी चित्रप्रदर्शन पाहिले आणि 'बॅलेरिनां'नी सादर केलेले बॅले नृत्यही पाहिले. हे बॅले नृत्य सादरीकरण एवढे सुंदर होते की, मला त्या विषयावर चित्रे काढण्याची इच्छा निर्माण झाली. कार्यक्रमानंतर मी 'फ्लॉरेन्स



पाहा... बिर्ला संग्रहालय, भोपाळ
(मध्यप्रदेशची संस्कृती उलगडणारे भव्य संग्रहालय)
प्रायोजक - श्री. सुधीर रायकर, डोंबिवली

डान्स सेंटर'चे संचालक श्री. किथ फेरोने यांना भेटलो व तेथे नृत्यावरील चित्रे रेखाटण्यास परवानगी देण्याबद्दल विनंती केली. त्यांनी माझं काम पाहून लगेच होकारही दिला.

पुढे वेळोवेळी मी त्या 'रिहर्सल स्टुडिओ'त जाऊन बॅलेरिनांची 'रिहर्सल' करतानाचे बारकावे टिपत रेखांकने केली. तेथील नृत्यदिग्दर्शक व व्यावसायिक बॅलेरिनांकडून नृत्याच्या तांत्रिक बाबीही जाणून घेतल्या. हा माझा चित्रप्रवास तीन वर्षे चालू होता. त्यातून निर्माण झालेल्या चित्रांचे रूपांतर २०१० मध्ये फ्लॉरेन्स येथे चित्रप्रदर्शनात झाले.

मागे वळून पाहताना वाटतं- 'देगा'ची ती पुस्तकं पाहताना वाटलं नव्हतं की, आपल्याला अशी प्रत्यक्ष पाहून बॅलेची चित्रं करण्याची संधी मिळेल. पण त्यानंतर दहा वर्षांच्या कालखंडात वेगवेगळ्या वळणांवर कलेचा प्रवास चालू राहिला. त्यात अनपेक्षितपणे परदेशातही मला संधी मिळाली. तीन वर्षांच्या कालावधीत अनेक वेळा तेथे जाऊन प्रत्यक्ष काम करता आले आणि तांत्रिक माहितीसह बॅलेचा वेगळा अभ्यास झाला. खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. त्यातून माझी ही बॅलेची चित्रशृंखला तयार झाली. पुस्तक पाहताना मनात निर्माण झालेली बॅले नृत्य प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा, चित्ररूपात पूर्ण झाली याचा आनंद काही वेगळाच !

**- देवदत्त पाडेकर,**
एल्. टी. २३/२१ विजयनगर, मरोल, मुंबई 400059
ddpadekar@yahoo.co.in

# अविस्मरणीय मैफिली

शांभवी वझे



**नव्या पिढीतील कथ्थक नृत्यांगना**
**शांभवी वझे**

- गुरू मनीषा साठे (आई), तालगुरू-तालयोगी सुरेश तळवलकर, गायन गुरू - मंगला वैद्य
- युनेस्कोच्या इंटरनॅशनल डान्स कौन्सिलच्या सभासद
- गांधर्व महाविद्यालयाची अनेक पारितोषिके प्राप्त
- 'सिंगारमणी' ही भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती प्राप्त

अवश्य भेट द्या -www.shambhavivaze.com

**मी** माझ्या आईबरोबर अगदी लहान असल्यापासून नृत्याचे निरनिराळे कार्यक्रम बघायला जात असे. शिवाय घरात नाटकाचे व संगीताचे वातावरणही होते; त्यामुळे नाटकांना किंवा गाण्याच्या मैफलींना आई-बाबा किंवा आजी-आजोबांबरोबर गेल्याचेही मला आठवते. पहिली-दुसरीत असताना 'संगीत सौभद्र'चा प्रयोग टिळक स्मारक मंदिरात पाहिला होता, तो सारंगीवादक मधुकर गोळवलकर यांच्या शेजारी पिठात बसून. नंतर अनेक वर्षं कृष्ण म्हटले की माझ्या डोळ्यांपुढे सौभद्रात कृष्णाची भूमिका करणारे विश्वनाथ बागुल उभे राहात असत.

माझ्या स्मरणातील पहिला कार्यक्रम म्हणजे 'सवाई गंधर्व'मधील हेमा मालिनी यांचा भरत नाट्यमचा कार्यक्रम. त्यांची सौष्ठवपूर्ण, सुंदर, सालंकृत प्रतिमा आजही मला स्पष्ट आठवते. वाढत्या वयात नृत्याचे खूप कार्यक्रम बघण्याची संधी मला मिळाली. त्यातील ठळकपणे आठवणारे कलाकार म्हणजे पं. बिरजू महाराज, पं. केलूचरण महापात्र, सोनल मानसिंग, माझे परमगुरू नटराज पं. गोपीकृष्ण.

बिरजू महाराज यांच्या नृत्यातील लालित्याचा मोह पडत असे तर गोपीकृष्णांच्या नृत्यातील

संथ वाऱ्यासवे येई, गंध कुठून कसला ।
कुणी सांगितले त्याला, आहे सूर्य उगवला ।।

**प्रायोजक - कु. आसावरी टेंबे, डोंबिवली**

ताकदीचा आणि तांडवाचा. आपल्या विचारांवर आणि मनावर संपूर्ण ताबा मिळवणारे नृत्य सोनल मानसिंग यांचे होते. जणू एखादी शिल्पाकृतीच सजीव होऊन नृत्य करत आहे, असा भास केलूबाबूंचे नृत्य बघताना होत असे.

माझ्या मनावर सर्वात जास्त संस्कार झाला तो माझ्या आईच्या नृत्याचा. माझे कथकचे संपूर्ण शिक्षण माझ्या आईकडे म्हणजेच गुरू मनिषा साठे यांच्याकडे झाले. नकळत्या वयापासूनच आईचा रियाज – कार्यक्रम पाहणे, नृत्यावर घरी होत असलेल्या चर्चा ऐकणे यातून दर्जेदार कथकचे संस्कार माझ्यावर होत गेले.

पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर क्षितिज अजून विस्तारत गेले. कोणत्याही मोठ्या कलाकाराचा कार्यक्रम पाहिला म्हणजे यातून आपल्याला काय शिकता येईल, काय सुधारणा करता येईल, असे विचार सुरू होत असत. याच काळात पंडिता रोहिणी भाटे यांनी एका कार्यक्रमात फक्त अभिनयावर आधारित पारंपरिक रचना सादर केल्या होत्या. त्यातील मुग्ध नायिका, 'ऐसो राम' हे भजन आजही माझ्या मनाच्या पडद्यावर ताजे आहे.

साधारण ८ ते १० वर्षांपूर्वी मी पुण्यात पं. राजेंद्र गंगाणी यांचे कथक नृत्य पाहिले. मर्दानी नृत्य कसे असावे याचा जणू काही वस्तुपाठच त्यांच्या नृत्यातून बघायला मिळाला. वेग व लयकारी यांना मिळालेली घराणेदार तालमीची जोड यामुळे त्यांच्या नृत्यातून प्रचंड ऊर्जा उत्पन्न होते. त्यांचे नाव माझ्या आवडत्या कलाकारांच्या यादीत अगदी वरच्या क्रमांकावर आहे.

फार पूर्वीपासून 'सीख्या, देख्या, परख्या' असे कलाशिक्षणाचे मार्ग सांगितले आहेत. म्हणजे चांगल्या गुरूकडे तालीम घेऊन, संस्कार घेऊन कला शिकावी, तसेच चांगल्या कलाकारांची कला खूप बघावी; पण त्यानंतर 'परख्या' म्हणजे नीट पारखून घेऊन मगच तिचे ग्रहण करावे. याच कारणामुळे कलेच्या सुरुवातीची अनेक वर्षे गुरूच शिष्यासाठी काही करत असतो. छिन्नीचा एक एक नाजूक घाव घालत तो आपल्या शिष्याची मूर्ती घडवत असतो.

या लेखामुळे अनेक मोठमोठ्या कलाकारांच्या आठवणी निघाल्या याचा मला फार आनंद आहे.


**- शांभवी वझे**

८७०/२ ए, रसिक, भांडारकर रस्ता, पुणे 411004

shambhavi_vaze@yahoo.co.in



गाण्यासाठी जन्म आपुला

संजीव अभ्यंकर



आघाडीचे तरुण, शास्त्रीयसंगीत गायक

संजीव अभ्यंकर

- मेवाती घराणे; गुरू- डॉ. शोभा अभ्यंकर (आई), पं. गंगाधरबुवा पिंपळखरे, पं. जसराज
- ख्याल, भजन, ठुमरी, नाट्यसंगीत, अभंग या सर्व प्रकारातील गायन
- प्रसिडेंट्स ॲवॉर्ड, 'गॉडमदर' या हिंदी चित्रपटासाठी राष्ट्रीय पारितोषिक, जसराज पुरस्कार इ. अनेक पुरस्कार प्राप्त

अवश्य भेट द्या - www.sanjeevabhyankar.com


मैफल शब्दातीत असते... भावनेनं ओथंबलेली... तितकीच उत्कट... रसरसलेली... 'सुरांच्या शब्दांत' रंगलेल्या त्या गप्पा असतात. स्वरांशी साधलेला संवाद असतो. प्रतिभावंताच्या गळ्यातून उतरलेल्या/अवतरलेल्या या 'सुरेल' गप्पा ही केवळ अनुभवण्याचीच गोष्ट ! आणि म्हणूनच कुठलीही मैफल ही शब्दातीत असते !!

माझ्या मते कोणत्याही गाण्याचे दोन परिणाम असू शकतात. एक तर ते भावतं तरी किंवा भावत नाही तरी. पण आपण जर डोळे (आणि अर्थात




पाहा... सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक विजेता चित्रपट 'थ्री इडियट्स'

**प्रायोजक - श्रीमती माधुरी राजे, डोंबिवली**

कानही !) उघडे ठेवून, डोळसपणे एखाद्या कलाकृतीकडे पाहिलं तर त्यातलं सौंदर्य आपल्यालाही जाणवू लागतं; त्यामुळे 'गाणं' समजण्या-उमजण्यासाठी, ते 'भाव'ण्यासाठी आधी ते नीट लक्षपूर्वक ऐकलं पाहिजे. आपल्याकडे अगदी श्रेष्ठ दर्जाचं संगीत आहे. ते सतत ऐकत राहिलं पाहिजे. वर्तमानपत्र वाचणं आणि एखादं आवडतं पुस्तक वाचणं यातही फरक असतो, हो ना? वर्तमानपत्र आपण चाळतो, त्यातले काही मथळे वाचतो. पण पुस्तक मात्र आपण अथपासून इतिपर्यंत लक्षपूर्वक वाचतो, समरसून वाचतो. तेव्हाच त्यातून आपल्याला आनंद मिळत असतो. संगीताचंही तसंच आहे. ते सतत लक्षपूर्वक ऐकत राहिलं पाहिजे. दहा गाणी ऐकल्यावर एखादं गाणं तुम्हाला विशेष वाटेल, आवडेल, भावेल. गाणं/संगीत हे हळुवार आहे. कोमल आहे. शरीर-मनात ते अलगदपणे झिरपत जातं... त्याचा अनुभव घ्यायचा प्रयत्न करा...

आता माझ्या लक्षात राहिलेल्या, अविस्मरणीय मैफिलीविषयी... भूतकाळात डोकावल्यावर अशा अनेक मैफिली आठवतात... शब्दातीत, उत्कट... अंतर्बाह्य थरारून टाकणाऱ्या आणि अलवारपणे तनामनात झिरपत राहणाऱ्याही ! पण जसजसं खोल खोल भूतकाळात डोकावून पाहत मी लहान लहान, अगदी तुमच्याएवढा होत जातो; तेव्हाची माझीच मैफील माझ्या कायम लक्षात राहिली आहे !! आणि तीही मैफिलीनंतर माझ्या पाठीवर जी शाबासकीची थाप पडली त्यामुळेच ती कायम माझ्या स्मरणात राहिली, असं मला वाटतं.

मी गंमतीनं म्हणतोदेखील की, पं. वसंतराव देशपांडे, पं. भीमसेन जोशी, गंगूबाई हनगल, ज्योत्स्ना भोळे या मंडळींचं गाणं मी ऐकण्याच्या आधी त्यांनीच माझं गाणं ऐकलं !! गमतीचा भाग सोडून द्या. मला वाटतं, त्यावेळी मी असेन १२-१३ वर्षांचा. दरवेळेप्रमाणेच याही माझ्या कार्यक्रमाच्या वेळी मी अगदी मनापासून, झकास गायलो होतो. त्यावेळी संगीतातल्या या दिग्गज मंडळींचा मोठेपणा मला माहीत नव्हता. त्यांच्या मोठेपणाचा आवाका त्यावेळी माझ्या आकलनापलीकडचाही होता. पण या मैफिलीनंतरच्या कौतुकानं माझ्या आयुष्यालाच कलाटणी मिळाली.

'१२-१५ तास रियाजापेक्षा २-४ तास डोळस रियाज कर' हा मौलिक सल्ला पं. वसंतरावांनी मला दिला. 'ज्ञानेश्वरांच्या कुळातला' असा गौरवोद्गार पं. भीमसेन यांनी माझ्याबद्दल काढला. तर 'भविष्यात या मुलाचं नावच संगीतातल्या पदवीप्रमाणे होईल,' असा आशीर्वाद पु.लं.कडून मिळाला. 'या मुलाचा जन्म गाण्यासाठीच आहे,' अशी माझ्याबद्दलची खात्री माझ्या घरच्यांना संगीतातल्या या 'दादा' मंडळींकडून त्यावेळी मिळाली आणि त्यामुळेच शैक्षणिक पात्रता चांगली असूनही मी 'पूर्णवेळ गायक' झालो.


**संजीव अभ्यंकर**
'सुशील', ७५९/१३ डेक्कन जिमखाना, पुणे 411004
sanjeevabhyankar@gmail.com
**शब्दांकन : जयश्री काटीकर**





**आयुष्यातील वादळलाटा**

**संपादन : नीलिमा करमरकर**

**पृष्ठसंख्या : ११२ किंमत : रु.६०/- आवृत्ती : द्वितीय**

विभिन्न क्षेत्रांतील २१ कर्तृत्ववान व्यक्तींच्या आयुष्यातील कसोटीच्या प्रसंगांचे व त्याच्याशी दोन हात करताना त्यांनी घेतलेल्या अनुभवांचे आत्मकथन या पुस्तकात जरूर वाचा.



चेतलेल्या मशाली विझू देऊ नका ।
उरातला उत्साह थिजू देऊ नका ।।

**प्रायोजक - श्री. गोविंद पुरुषोत्तम ओक, डोंबिवली**

## ।। अमेय।। ... वांद्रे(पूर्व)चा अभिमान

मराठी माणसाची
शून्यातून उभी राहिलेली
तीन व्यवस्थापने !

**'अमेय'हॉटेल**–शुद्ध शाकाहारी (२६४०९९७८/२६४१९९३३) **'सदिच्छा'**–मालवणी मांसाहारी (२६४१९९३२/२६५१०१७५)

**'सिद्धिविनायक'** बेकरी व स्वीट – (२६४११०८५/२६५१०१७७) तसेच **'वातानुकूलीत हॉल'**

**याशिवाय वैशिष्ट्यपूर्ण व संग्राह्य प्रकाशने**

१. 'कष्टयज्ञ'....शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या उद्योगीनीची यशोगाथा (पृ.२४०, रु.१६०)
२. 'उजाडलं बघ !'......डिप्रेशन घालविणारे, जीवनाची बॅटरी री-चार्ज करणारे
भाग १ ते १० (संच)(मूल्य रु.५००)
३. 'तुझं माझं जीवन गाणं'.......सहजीवनाची उंची वाढविणारे (पृ.१५५, रु.९०)
४. 'मूल मागतं'.......वाढणारं मूल सांगतं वाढवू नका वाढू द्या. (पृ.५६, रु.२०)
५. 'मनी मानसी उद्योजक बनू या'.......उद्योजकाची मानसिकता (पृ.६५, रु. ५०)
६. 'व्यावसायिकाची बालगुटी'....... कविता (पृ.३८, रु. ३०)
७. 'मला हॉटेल काढायचंय'......(पृ. ५०, रु. ६०)
८. 'सुखी माणसाचा सदरा'.....(पृ.९०, रु. १००)

**पुस्तके मिळण्याचे ठिकाण**
अमेय प्रकाशन,
४७/२२६९, गांधीनगर,
बांद्रा पूर्व, मुंबई ५१.

कुणीही नसण्यापासून
कुणीतरी असण्यापर्यंतचा
प्रवास सुकर करणारे,
माईंडसेट उभारणारे
**'उजाडलं बघ !'**
नोकरदाराचा उद्योजक झालो
आणि नशीब बदलून गेलं
त्याची कथा...
**'सुखी माणसाचा सदरा'**
आत्मचरित्र - प्रचिती

वरील सर्व पुस्तकांचे लेखक व व्यवस्थापनांचे संस्थापक श्री. कमलाकर देशपांडे, बांद्रा (मोबाईल–९८२१०७६२८५)

**सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**

With Best Compliments...

V H GROUP

# Venky's (India) Limited


**Regd. & Corporate Office**
**Venkateshwara House,**
S.No. 114/A/2, Pune -Sinhagad Road, Pune - 411 030.
Tel. No. - 020- 24251530 to 24251541 Fax No. - 020-24251077




पसरा दहा दिशांना तृप्तीतला प्रकाश ।
या जीवनात कुणी राहू नका उदास ।।

संग्रही ठेवा - **'असे घटते सुंदर अक्षर'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. १५/-

# फोटोरोल जनरेटर



**साहित्य –** काळ्या फोटोरोलची डबी, दोन ताकदवान रेअर अर्थ चुंबक (आकार ८ मिमी. व्यास × १० मि.मी. लांब), सायकल स्पोकचा ८ मिमी. लांबीचा तुकडा, छोटी कप्पी (टेपरेकॉर्डरच्या मोटरवर बसणारी), जुन्या रिफिलचा ५ सेंमीचा तुकडा, ३० ते ३५ गेजची एनॅमल तांब्याची तार सुमारे १०० ग्रॅम (ही वजनावर मिळते), १.२ सेंमी × १.२ सेंमी × १.० सेंमी. आकाराचा रबराचा तुकडा (फोम रबर वा खोडरबरचा चालेल) फेविबॉण्ड किंवा फेविक्विकची ट्यूब.

**कृती –** प्रथम रिफीलचे ४ तुकडे करा. १.५ सेंमी. लांबीचे दोन व १.० सेंमी. लांबीचे दोन. स्पोकच्या एका टोकावर कप्पी बसवा. स्पोकवर १.५ सेंमी.चा एक, १.०० सेंमीचा एक असे दोन रिफिलचे तुकडे चढवा व ते कप्पीच्या बाजूस सरकवा. रबराच्या तुकड्यात स्पोक खुपसून तो तुकडा स्पोकच्या मध्यावर आणा. फेविबॉण्डचा उपयोग करून रबराच्या तुकड्याच्या दोन बाजूंवर दोन चुंबक चिकटवा. १ सेंमी.चा रिफिल तुकडा स्पोकवर चढवा.

आता ही सर्व जुळणी फोटोरोलमध्ये बसवायची आहे. त्यासाठी फोटोरोलच्या पृष्ठभागावर खालून २.५ सेंमीवर स्पोक जाईल एवढे भोक पाडा (फोटोरोलची उंची ५ सेंमी. आहे.) त्याच्याबरोबर विरुद्ध बाजूस दुसरे भोक पाडा. या दोन्ही भोकांतून स्पोक आरपार गेला पाहिजे. आता यातील एका भोकातून वरच्या तोंडाच्या कडेपर्यंत फोटोरोलच्या पृष्ठभागावर उभा काप घ्या. आता स्पोकचे टोक, काप घेतलेल्या भोकाच्या समोरील भोकातून, आतून बाहेर खुपसा व स्पोकची दांडी उभ्या कापातून खालील भोकापर्यंत दाबून बसवा. जुळणी फोटोरोलमध्ये बसली. आता उरलेला १.५ सेंमी.चा रिफीलचा तुकडा स्पोकवर चढवा.

आता एनॅमल तारेचे सुमारे ६०० वेढे फोटोरोलच्या बाहेरील पृष्ठभागावर असे द्यायचे आहेत की सर्व बाजूंनी आतले चुंबक त्याच्या मध्यावर येतील.

तारेच्या दोन्ही टोकांवरील थोडेसे एनॅमल खरवडून काढा व त्याला एलईडीचे दोन पाय सोल्डर करून घट्ट बसवा. तारेची टोके व एलईडी फोटो रोलवर तारेच्या तुकड्यांनी बांधून व्यवस्थित बसवा.


आता स्पोकवरील कप्पी हाताने जोरात फिरवा. एलईडी लागेल. कप्पी एकसारखी फिरवता येते. त्यासाठी सायकलचा स्पोक आणि चांगला घट्ट दोरा यापासून एक धनुष्य तयार करा. दोऱ्याचा एक वेढा कप्पीभोवती द्या व धनुष्य मागेपुढे हलवून कप्पीला मागेपुढे होणारी एकसारखी गती द्या.


**जनरेटर तत्त्व –** प्रत्येक चुंबकाला त्याचे स्वतःचे चुंबकीय क्षेत्र असते. या क्षेत्राच्या रेषा एखाद्या हलणाऱ्या धातूच्या तारेने किंवा त्या तारेच्या वेटोळ्याने छेदल्या गेल्या तर त्या तारेत किंवा वेटोळ्यात विद्युत प्रवाह निर्माण होतो. तार वा वेटोळे स्थिर ठेवले व चुंबक हलवले तरी हाच परिणाम दिसतो. चुंबकाचे ध्रुव कसे ठेवले आहेत व तार वा वेटोळे कोणत्या दिशेतून फिरत आहे, त्यावर विद्युत प्रवाह कोणत्या दिशेने राहील हे ठरते.

– **उल्हास ठुमणे**, १४७३, सदाशिव पेठ, पुणे 411 030

**प्रकाश भरू दे आसमंती, अंधाराचे नाव नको ।**
**सुखसमृद्धी दारी येवो, अज्ञानाला वाव नको ।।**

# सुतळीचे शिंकाळे





**साहित्य –** ३०० सेमी आकाराचे सुतळीचे १२ तुकडे. लाकडी मोठे मणी, लाकडी १ मोठी रिंग.

**कृती –** सुतळीची टोकं एकमेकांना जोडून सुतळीचा मध्य काढून घ्या. हा मध्य रिंगवर टाकून त्यामधून सुतळीची दोन्ही टोकं काढून घ्या. अशा तऱ्हेने १२ सुतळीचे तुकडे रिंगमध्ये गाठ घालून अडकवून घ्या. आता तुमच्या रिंगवरून सुतळीची २४ टोकं खाली येतील. तुमच्या लाकडी रिंगवरही आता सुतळ्यांचं आच्छादन तयार झालं असेल. प्रकाशचित्रात तांब्या ज्या रिंगवर ठेवलाय तिथपासून उलट दिशेने आता आपल्याला शिंकाळं विणायचं आहे.

सुतळ्यांना विशिष्ट प्रकारे गाठी घालणं एवढंच आपलं काम आहे. या गाठी कशा घालायच्या ते आता पाहूयात. गाठ मारण्यासाठी तुम्हाला सुतळीची ४ टोकं लागणार आहेत. २४ टोकांच्या अशा ६ माळा तुमच्या तयार होणार आहेत. सुतळीचे २ तुकडे व १ अलीकडची व १ पलीकडची सुतळी घ्या. (४ टोकं) डावीकडची सुतळी वरच्या बाजूने मधल्या २ टोकांवरून उजवीकडे जाऊ द्या. उजवीकडचे टोक डावीकडून आलेल्या टोकावरून मधल्या दोन टोकांच्या खालून उजवीकडच्या भागातून वर काढायची आहेत. सुतळीची चारी टोकं ओढून गाठ घट्ट करून घ्या. या गाठीचा थोडा सराव करून पाहा. म्हणजे मग काम अगदी सोपे होऊन जाईल. एकदा डावीकडून तर एकदा उजवीकडून गाठ घ्या. अशी गाठींची वीण करा. अशी ५–८ सेंमी. वीण झाली की मधल्या २ टोकांमध्ये लाकडी मणी ओवा व डावी–उजवीकडच्या सुतळीने तशीच वीण चालू ठेवा. मण्याची उंची संपली की परत आपली वीण तशीच चालू ठेवा.

आपल्याला पाहिजे तितके लांब सहाही पदर विणून घ्यावेत. (पाहिजे तसे त्यात लहान मोठ्या आकाराचे मणी ओवून घ्या.) पदराला थोडा पीळ दिल्यासही चांगले दिसते. विणून झाल्यानंतर सर्व पदर एकत्र करून घ्या. दुसऱ्या सुतळीने ते बांधून घ्या. दुसऱ्या सुतळीची अजून एक वेणी विणून तिच्या दोन्ही बाजू यात गुंडाळून घ्या.


आता परत मोठ्या रिंगवर काही सुतळ्या अडकवून त्या प्रकाशचित्राप्रमाणे बांधून घ्या. या रिंगवर तुम्ही कुंडी, आकर्षक कलाकुसर केलेलं भांड ठेवून ते कुठेही खोलीत लटकवू शकता.

– **माधुरी अरणकल्ले**, १७९, पंचतारानगर, आकुर्डी, पुणे 411035

(रंगीत प्रकाशचित्र पान क्र. १२५ वर पाहा.)

दिनविशेष... ३ जानेवारी - बालिका दिन
(सावित्रीबाई फुले जन्मदिन)

**प्रायोजक - कु. गायत्री खाडिलकर, सांगली**



# श्रीभद्र

सुधा रिसबुड

आकाशातील त्या अथांग, निर्वात पोकळीत, श्रीभद्र यान मोठ्या डौलाने मार्ग काढत होते. यानाचा पसारा मोठा विलक्षण होता!

श्रीभद्र यानाच्या पुढच्या भागात फ्लाईट डेकमध्ये, अत्याधुनिक संगणक होते, जे यानाची दिशा, गती कुशलतेने सांभाळत होते. या संगणकांच्या, प्रोग्रॅमिंगची भाषा, त्यांचे Coding आणि Decoding ची पद्धतही इतर संगणकांपेक्षा अतिशय निराळी होती, वेगळी होती. त्या भाषेचे नाव होते; BAM; (ब्रॉड ॲरे मॉडेल) खास करून संकटकाळी ते संगणक, BAM मुळे एकमेकांशी फार चटकन् संवाद करायचे. एकमेकांना Response द्यायचे.

श्रीभद्र यानाच्या फ्लाईट डेकच्या मागच्या बाजूला, एका छोट्या काचेच्या केबिनमध्ये, यानाची संपूर्ण इलेक्ट्रिकल इन्स्टुमेंटेशन प्रणाली बसवली होती. यानाच्या, इंधनाच्या टाकीतले सर्व सेन्सर्सचे इंडिकेटर आणि इतर सर्व नियंत्रण दर्शवणारे इंडिकेटर्सही तिथेच, एका स्क्रिनवर दिसत होते.

केबिनच्या वर एक छोटासा हूटर होता. श्रीभद्रमधील प्रवाशांना कुठलाही धोका असेल तर किंवा कुठलाही धोका निर्माण होण्याची शक्यता असेल, अगदी दहाच्या उणे ९ ($१०^{-९}$) इतकी कमी शक्यता असेल, तरी त्या हूटरमधून सायरन वाजायचा.

मग तो धोका, कुठल्याही प्रकारचा असो, अगदी अशनी, एखादी अंतराळातील उल्का, छोटासा ग्रह, अगदी इकडून तिकडे जाणारी सूक्ष्मविवरेसुद्धा. सूक्ष्मविवर (वॉर्महोल) जवळ आले तरी यानातील सेन्सर्स् कंप पावायचे आणि मग आवाजांच्या लहरी निर्माण व्हायच्या.

ही सूक्ष्मविवरे श्रीभद्र यान ज्या वितस्ता नावाच्या, दीर्घिकेत होते, तिथे आसपास अनेकदा आढळत असत. छोटी छोटी सूक्ष्म विवरे म्हणजे, दुसरे तिसरे काहीही नसून, स्थलकालाच्या विश्वातून, एका विश्वामधून दुसऱ्या विश्वात जाणारी टनेल्स किंवा बोगदे होते. हे निसर्गानेच बनवले होते. हे सगळे विश्व म्हणजे

दूर दिव्याचा प्रकाश दिसतो आहे मला।
त्या वळणावर पोचणार मी, उमेद आहे मला ।।

प्रायोजक - श्री. अनिलराव देशमुख, पुणे

**'एखाद्या राजाला/राजपुत्राला चिरतारुण्याचं वरदान मिळालं आणि त्याच्या जोरावर त्यानं त्याचं राज्य बळकट केलं', अशा आशयाच्या अनेक गोष्टी तुम्ही लहानपणी ऐकल्या/वाचल्या असतील. पण असं काही खरंच असतं का हो? आजच्या विज्ञानयुगात तर बुद्धीला हे न पटणारंच. माणूस जन्मणार, मोठा होणार, म्हातारा होणार, मरणार हे तर सृष्टिचक्रच आहे. पण आपल्या बुद्धीच्या उत्तुंग झेपेद्वारे शास्त्रज्ञांनी जे शोध लावले, त्यातला एक महत्त्वाचा शोध आहे अंतराळातील कृष्णविवरे आणि सूक्ष्मविवरे यांचा. वाचूया सूक्ष्मविवरांवर आधारित ही विज्ञान काल्पनिका...**

स्थल (space) आणि काल (Time) यांच्या उभ्या व आडव्या धाग्यांनी विणलेल्या वस्त्रासारखे होते. विणीचा एक धागा स्थलाचा, तर दुसरा कालाचा होता. जेव्हा जेव्हा याने या सूक्ष्मविवरात जायची, तेव्हा त्यांचा काळ मंदावायचा, त्यांची घड्याळे हळू चालायची. (आईनस्टाईनने १९०५ मध्ये हेच दाखवून दिले.)

यानातील लोकांना वाटायचे की, आपण सुखात चाललो आहोत. पण पलीकडे, पोहोचल्यावर विश्वाच्या दुसऱ्या भागातच ते दाखल होत. तिथले नियम, व्यवस्था, रचना सगळेच वेगळे असायचे. पुन्हा मग त्या प्रवाशांना, त्या वेगळ्या विश्वात टिकून राहाण्याकरता, मेकओव्हर चेंबरमध्ये जाऊन, त्या विश्वात राहाण्यासाठी लायक असा बदल घडवून आणावा लागायचा. हे फार किचकट काम होते. त्यासाठी, शक्यतोवर सूक्ष्मविवरांवर आदळणे, हे बहुतेक वेळा टाळणे योग्य मानले जायचे.

इतक्या सुंदर यानातील आतील व्यवस्थाही तितकीच सुंदर होती. सुबक होती. नेटकी होती. पांढऱ्या शुभ्र आच्छादनांनी यानातील बैठक सजवली होती. निळ्याशार रंगाच्या, यानाच्या भिंतीच्या पार्श्वभूमीवर, ती स्वच्छ धवल रंगाची बैठक फारच खुलून दिसत होती.

इतक्या सुसज्ज दालनात, आणि संपूर्ण यानामध्ये, रोबोटचा एक प्रचंड ताफाच सगळी कामे चटाचटा पार पाडत होता. कितीतरी प्रकारचे रोबोट त्या यानात होते. काही केवळ तांत्रिक गोष्टी बघायचे. काही रोबोट कॉकपिटमधील नियंत्रण कक्षात दक्ष राहायचे. त्यामुळे यानाची गती, दिशा, प्रवास या सगळ्यांकडे त्यांचे लक्ष असायचे. काही फक्त संख्याशास्त्राच्या आधारे, बाहेरून येणाऱ्या धोक्यांची शक्यता सांगायचे. काही रोबोट यानाच्या इंधन कक्षात काम करायचे. यानाचा इंधन कक्ष हे एक वेगळेच, गुंतागुंतीचे काम होते. तिथल्या सर्व क्रिया या यानाच्या इंधन निर्मितीकरिता चालायच्या. हो, यानाला लागणारे इंधन निर्माण करण्याची क्षमताही यानात होती ! यानाचा वेग प्रचंड होता. फार मोठ्या अंतराचा पल्ला यानाला गाठावा लागायचा. हा पल्ला गाठण्यासाठी आणि हा वेग कायम ठेवण्यासाठी, इंधनाच्या फार मोठ्या साठ्याची गरज भासायची; त्यामुळे श्रीभद्र यानाच्या मागच्या भागात एक आण्विक भट्टी अर्थात आकाराने अगदी लहान अशी होती.

काही रोबोट हे प्रवाशांच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवायचे. श्रीभद्र यानाच्या बाबतीत तर ही यंत्रणा अत्यंत चोख होती. श्रीभद्रमधील प्रवासीही असेच महत्त्वाचे, अति महत्त्वाचे होते.

हे तिघे युवक मान साम्राज्याच्या दिवंगत महाराजांचे नातू होते आणि सध्याच्या सम्राट मानांकांचे, ते पुतणे होते. ते तिघेही युवक अत्यंत तेजस्वी होते; देखणे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाहताक्षणी समोरच्या व्यक्तीवर पडायची.

दिनविशेष... ६ जानेवारी - पत्रकार दिन
(आचार्य बाळशास्त्री जांभेकर स्मृतीदिन)
छात्र प्रबोधनच्या चळवळीला हार्दिक शुभेच्छा! **प्रायोजक - डॉ. सौ. प्राची विश्वास साठे, पुणे**

त्यांच्यातील एकोपा, एकमेकांवरील विश्वास हा केवळ अनुपमेय होता.

या तीन सख्ख्या भावांमधील मोठा, मध्यमसेन हा स्वभावत:च विलक्षण शांत होता. अतिशय ज्ञानी होता. विवेकी होता. दीर्घिकांमधील लोकांबद्दल, वसाहतींबद्दल, वेगळ्या संस्कृतींबद्दल त्याला विलक्षण जाण होती. त्याचे वर्तन, त्याचे बोलणे हे अत्यंत नम्र, विनयशील असायचे. सत्याची कास कधीही न सोडणारा मध्यमसेन म्हणूनच भावांमध्ये आणि प्रजाजनातही आदरणीय होता.

झांझ आणि शार्दूल हे त्याचे धाकटे भाऊ कधीही त्याच्या शब्दाबाहेर नसायचे. झांझ तिघांमध्ये सगळ्यांत उंच होता. व्यायामाने कमावलेले शरीर. किंचित् उग्र चेहऱ्याचा आणि स्वभावानेही तसाच; तापट, थोडासा उतावळा, पण अत्यंत स्पष्टवक्ता झांझ. हा भाऊ मध्यमसेनाच्या शब्दाबाहेर मात्र कधीही नसायचा.

श्रीभद्रसारख्या अत्याधुनिक यानाचे नियंत्रण करणाऱ्या रोबोटचे कोडिंग, डिझाईन यामध्ये झांझ विलक्षण निपुण होता.

अत्यंत देखणा, गौर वर्णाचा शार्दूल, त्याच्या गोड बोलण्याने आणि लाघवी वागण्याने, समोरच्या व्यक्तीच्या मनावर छाप पाडायचा. पण त्याहूनही शार्दूलकडे एक विशेष गुण होता, अन् तो म्हणजे त्याचे आण्विक भट्टीचे ज्ञान. आण्विक भट्टी कधी थांबवायची, किती वेळात सुरू करायची, हे सारे कौशल्य त्याच्यापाशी होते.

हे तिघेही भाऊ श्रीभद्र यानातून पुळूमावि ग्रहाकडे चालले होते. पुळूमावि ग्रहावर त्यांच्या स्वागताकरिता भव्य सोहळा आयोजित केला होता. मध्यमसेनाला पुळूमावि ग्रहाचा क्षत्रप; अधिपती म्हणून सम्राट मानांकांनी नियुक्त केले होते. सम्राट मानांकांच्या, मान साम्राज्याचा अफाट पसारा वितस्ता या दीर्घिकेत पसरला होता.

मान साम्राज्याच्या नियमांनुसार सम्राटपद हे वंशपरंपरागत मिळत नसे. त्यासाठी वितस्ता दीर्घिकेतील अनेक ग्रहांमध्ये आपला प्रभाव सिद्ध करावा लागे.

अंगच्या गुणांच्या आधारावर मध्यमसेनाने वितस्ता दीर्घिकेतील सगळ्या ग्रहांवरील जनतेचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर ज्येष्ठ व्यक्तींनी घेतलेल्या खडतर परीक्षांमधूनही तो यशस्वी झाला होता. यामुळे साहजिकच सम्राट मानांकांच्या मुलाला, अविधेयाला वितस्ता दीर्घिकेचा भावी सम्राट होण्याचा मान मिळाला नव्हता. तो त्यांच्या पुतण्याला, मध्यमसेनालाच मिळाला होता.

अविधेयाने पुळूमावि ग्रहावरील सोहळ्यात सहभागी होण्यास वेळ नसल्याचे सांगून नकार दिला होता. तेही त्याच्या मित्राच्या, देवराजच्या सल्ल्यावरून! आणि देवराजच्याच सल्ल्यावरून, अविधेयाने श्रीभद्र हे अत्यंत आधुनिक यान, मध्यमसेनाला भेट म्हणून दिले. आणि म्हणूनच खास तंत्रज्ञांकडून बनवलेले श्रीभद्र हे यान, अत्यंत देखणे व वेगवान होते.

''मला राहून राहून आश्चर्य वाटते की, अविधेय इतका कसा बदलला?'' शार्दूलने आपल्या दोन्ही भावांसमोर, प्रश्नार्थक चेहरा करून, आपली शंका उपस्थित केली.

''त्याच्यापुढे दुसरा पर्यायच नव्हता.'' झांझच्या स्वरातील खोचकपणा मध्यमसेनाला जाणवला.

''झांझ,'' मध्यमसेन त्याला आपल्या शांत स्वरात समजावू लागला.

''अविधेय हा मनाने वाईट नाही. भोळा आहे; पण कायम देवराजच्या सान्निध्यात असल्याने, चांगले काय, वाईट काय, याचे परीक्षण, तो कधीच करत नाही.''


सुंदर आता झाली धरती, सुंदर नभ हे वरती।
वैराणावर उधळीत आला प्रकाश सुंदर मोती ।।

प्रायोजक - चि. सोहम फाळके, भाईंदर



“पण या स्वभावामुळे, आपल्याला तो नेहमीच त्रास देत आला आहे, त्याचं काय?” शार्दूलने झांझकडे बघत प्रश्न विचारून एक प्रकारे त्याच्या बोलण्याला दुजोराच दिला.

“मला वाटतं, आपण अविधेय असे का वागला यावर चर्चा करत बसण्यापेक्षा हे इतके सुंदर यान त्याने आपल्याला भेट दिले त्याबद्दल त्याला धन्यवाद देऊ; आणि आपल्या पुढच्या कामाला सुरुवात करू. बोलता बोलता मध्यमसेनाने हातातील कॉफीचा कप शेजारील रोबोटच्या हातातील ट्रेमध्ये ठेवला आणि पुळूमाविवरील सेमिनारकरता त्याने समोरील स्क्रीनवरील मजकूर वाचायला सुरुवात केली.

झांझ आणि शार्दूलने एकमेकांकडे बघून सुस्कारा टाकला. त्यांना खात्री होतीच की, मध्यमसेनाला आपले काहीच पटणार नाही आणि अविधेयाला आपण कधीच धडा शिकवू शकणार नाही.

ते दोघेही उठले आणि श्रीभद्र यानाच्या मागच्या बाजूस जाण्याकरता त्या बैठकीच्या केबिनमधून निमुळत्या कॅरिडॉरमध्ये शिरले. यानाच्या मागच्या बाजूस एका बाजूला आण्विक भट्टी (न्यूक्लिअर रिॲक्टर) होती. झांझ आणि शार्दूलनी रोबोटच्या साहाय्याने सगळ्या यंत्रणेची पाहणी करण्यास सुरुवात केली. तेवढ्यात स्पीकरमधून मध्यमसेनाचा आवाज आला. मध्यमसेनाने त्या दोघांनाही आपल्या केबिनमध्ये बोलावले होते. दोघांनाही जरा चमत्कारिक वाटले. आताच तर आपण मध्यमसेनाशी बोलून आलो... एवढ्यात परत कशासाठी बोलावले असेल? तातडीने दोघेही मध्यमसेनाच्या केबिनमध्ये शिरले.

...केबिनमध्ये मध्यमसेन त्याच्या समोरील टेबलावरच्या छोट्याशा स्क्रीनमध्ये डोके घालून बसला होता.



पाहा... झाँसी संग्रहालय - झाशी
(झाशीच्या राणीने वापरलेली शस्त्रास्त्रे, १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामातील कागदपत्रे)
कै. कमलाबाई रघुनाथ फडके यांच्या स्मरणार्थ, **प्रायोजक - श्री. आशिश अ. फडके**



निघण्याच्या वेळचे ते शूटिंग होते. निघताना ते तिघेही सेंद्रकांना भेटायला गेले होते. सेंद्रक हे नेहमीच त्या तिघांच्या हितचिंतकाची भूमिका बजावायचे. मान साम्राज्याच्या प्रशासन व्यवस्थेचे प्रमुख ही फार मोठी जबाबदारी सेंद्रकांकडे होती.

अनेक वेळा सम्राट मानांकांचे वागणे, अविधेयावरील सम्राटांचा आंधळा विश्वास, अविधेयाच्या मनातील मत्सर, यांपासून सेंद्रकाने त्या तिघांना नेहमीच वाचवले होते. मान साम्राज्याचा सम्राट होण्यासाठी केवळ

''बसाऽ''...झांझ आणि शार्दूलना पाहून मध्यमसेनाने तो स्क्रीन त्यांच्याकडे वळवला.

झांझ आणि शार्दूल स्क्रीनसमोर बसले. मान साम्राज्याच्या राजधानीपासून

प्रयत्नाची करिता शिकस्त सगळा अंधार लोपतो ।
रस्ता सर्व प्रकाशयुक्त बनुनी उत्साह संवर्धितो ।।

प्रायोजक - एक हितचिंतक, विलेपार्ले

मध्यमसेनच योग्य आहे, असेही त्यांना वाटायचे.

सेंद्रकाचे सर्व ग्रहांमध्ये, वितस्ता दीर्घिकेमध्ये हेरांचे जाळे होते. आंतरग्रहीय घटना, घडामोडी त्याला त्याच्या दूतांच्या खास भाषेतून त्यांच्या खास संगणकाच्या Coding-Decoding मधून, लगेच कळत.

मध्यमसेनाने एव्हाना व्हिडीओ चालू केला होता. ''श्रीभद्र यान खास तुमच्यासाठी बनवून घेतले आहे,'' सेंद्रक बोलत होते.

''फार आधुनिक स्पेस शटल आहे ते. फार सुंदर डिझाईन आहे. अविधेयाने मला सांगितले त्याबद्दल आणि... त्याची फ्युएल सिस्टिम?'' मध्यमसेनाने मध्येच विचारले होते. ते तिघेही पुन्हा व्हिडीओ बघण्यात एकाग्र झाले होते.

''हां! फ्युएल सिस्टिम, फायर ट्रँगलमधील एक मुख्य घटक.'' सेंद्रक बोलत होते. आणि मध्यमसेन जरा आश्चर्यानेच बघत होता. त्यांचे बोलणे ऐकत होता.

''हं, तसे श्रीभद्र यान हे फार सुरक्षित यान आहे. त्याची थर्मल प्रोटेक्शन सिस्टिम, फायर प्रोटेक्शन सिस्टिम फार चांगली आहे. त्याची हिटशील्ड्सही उत्कृष्ट आहेत. इंधनाची टाकी आणि प्रत्यक्ष पेटत्या इंधनाचा यानाशी काहीही संबंध येत नाही.''

''पुळूमाविवर गेल्यावर काय बोलायचे याबद्दल तुम्ही सांगणार होता ना?'' मध्यमसेनाने सेंद्रकांना मध्येच थांबवून विचारले होते.

''मध्यमसेन पुळूमावि येथील भाषणात तुम्हाला संपूर्ण मान साम्राज्याच्या एकंदरीत कारकिर्दीबद्दल बोलावे लागेल. तिथं आपण कशा प्रकारे आपल्या लोकांना संरक्षण दिलं आहे, आपलं राज्य कसं सुरक्षित आहे, कुठलाही नैसर्गिक उत्पात घडला, अगदी आग लागली तरी नागरिकांचे आपण कसे रक्षण करू शकतो,


**केयूबी क्वालिटी सर्व्हिसेस**

शुभदिपावली

नॉन डिस्ट्रक्टिव्ह टेस्टिंग सर्व्हिसेस,
ट्रेनिंग ॲण्ड सर्टिफिकेशन इन एन.डी.टी.
लेव्हल III सर्व्हिसेस, थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सर्व्हिसेस

५५/२१/४, यमुनानगर, निगडी, पुणे - ४११ ०४४.
फोन: ०२०-२७६६१४९१/ २७६६१४९२
वेबसाईट: www.kqsnat.com ई मेल: anay2000@vsnl.net

Happy Diwali

**Creative Carve Pvt. Ltd.**

70/3, 'S' Block, M.I.D.C.,
Bhosari, Pune - 411 026.

*Happy Diwali*

Envirotech Consolutions Inc.

**B. S. Joshi**

M-94/773, Swami Samarth Soc.,
Opp. Saubhagya Karyalaya,
Maharshinagar, Pune-37.
Phone : 020-24264685
Fax : 020-24264685
Mobile : 9422000890

- Environmental Consultants
- NH Approach Permissions
- High Explosives Clearances
- Solutions to Revenue Matters

वाचा... **'असा घडला सचिन'**, लेखक - अजित तेंडुलकर
- एका जगप्रसिद्ध खेळाडूची जडणघडण
**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

वेळ पडली तर एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावरही अगदी सूक्ष्म विवरातूनही आपण कसे जाऊ शकतो; हेही त्यांना समजवावे लागेल. कारण फायर ट्रॅंगलमध्ये फ्युएल हा एक महत्त्वाचा घटक असतो. उष्णता आणि ऑक्सिजन हेही महत्त्वाचे घटक असतात; पण फ्युएल?''

व्हिडीओ बघतानाच झांझ आणि शार्दूल एकमेकांकडे बघू लागले; आणि मध्यमसेनाने व्हिडीओ बंद केला. मध्यमसेन उठला आणि समोरच्या खिडकीतून बाहेरच्या निर्वात पोकळीच्या अंधाराकडे बघू लागला.

''फ्यूएल,'' सेंद्रक वारंवार फ्यूएल, फ्यूएल टॅंक असा का उल्लेख करत होते?''

हात पाठीमागे ठेवून मध्यमसेन आपल्याच विचारात बोलत होता.

''सेंद्रक आजवर विषय सोडून कधीही बोलला नाही; मग पुन्हा पुन्हा तो फ्यूएल या शब्दावर काय कारणास्तव येत होता?''

''मला वाटतं की, काहीतरी संदेश सेंद्रकाला द्यायचा आहे.'' एव्हाना गप्प असलेल्या झांझने आता तोंड उघडले.

''पण नक्की काय संदेश द्यायचा आहे? श्रीभद्रच्या फ्युएल सिस्टिममध्ये तर काहीच गडबड नाही. आम्ही चेक करून आलो आहोत.'' शार्दूल मध्यमसेनाला सांगू लागला. तेवढ्यात स्क्रीनवरचा बझर वाजला आणि तिघांनी एकदम स्क्रीनकडे पाहिले. स्क्रीनवर स्वत: सेंद्रक होता.

''मध्यमसेन, मान साम्राज्याचा एक उत्कृष्ट शास्त्रज्ञ आम्ही तुमच्याकडे पाठवीत आहोत. तो न्यूक्लिअर आणि रिॲक्शन फिजिक्समध्ये निष्णात आहे. तो श्रीभद्र यानाच्या सर्व तपासण्या करील. फ्यूएल टॅंकचीही !'' इतकं बोलून, सेंद्रकाचा चेहरा स्क्रीनवरून दिसेनासा झाला.

**(पान क्र. १२९ वर पुढे चालू)**


*Every Job is a Self-Portrait of the person who does it... Autograph your work with Excellence !*

**Happy Diwali**

**Bestways Transport (I) Pvt. Ltd.**

ADD

**With Best Compliments....**

**ADD EQUIPMENTS PVT. LTD.**

*Range Of Storage Systems.......*




**Plot. No. 15 Gat No. 125/26/27, Pirangut, Tal. Mulshi,**

*With Best Compliments From...*

**PRINT - O - TECH ENGINEERS**



**(ISO 9001 COMPANY)**

**Works and Office**

Survey No. 29, Mantri Park,
Shop No. 16,17, Near Natraj Gas Kothrud, Pune - 411 029.
Tel. : 25384374


ही प्रसन्न पहाट, सोनेरी किरणे, माझेच रूप आहे।
ईश्वराचा अंश माझ्यात, मी प्रकाशाचा दूत आहे ।।

**प्रायोजक - श्री. श्रीधर कुलकर्णी, डोंबिवली**



# पाण्याची शाळा

सरसर सरसर पाऊस येता
थेंबांची घंटा होते
झरझर टपटप धारांमधूनी
पाण्याची शाळा भरते...

खळाळ अवखळ झरे बालके
उनाड रस्तेही भरती
कौलारांची तांबूस पोरे
उशिरा शाळेला निघती.

अहा ! हलता फळा सरींचा
झाड उंच मास्तर बनते
वारा म्हणजे वरिष्ठ कोणी
झाडांनाही धडे देते.

अखंड टपटप हीच शिकवणी
झाडांना पटकन जमते
घरबसल्या गृहपाठ मिळे जो
पानांतून गिरवीत बसते.


सुंदर ओल्या कविता आठवत
तळेही शाळेला निघते
जाड नदीचे तुडुंब दप्तर
गळ्यात रानाच्या पडते.

कधी पांढरा फळा धुक्याचा
खडू उन्हाचा त्यावरती
थेंब अक्षरे थेंबच आकडे
दव उमटे गवतावरती

रिमझिम, रिपरिप, टपटप, धोधो
हेच पाठ्यपुस्तक त्यांचे
घों घों करीत येतो वारा
एका दमात ते वाचे...!

नाही परीक्षा, निकाल नाही
वर्षाने शाळा भरते
आषाढ-श्रावण दोन सत्र पण
वर्षभराची फी देते

युगे युगे ही अखंड शाळा
सृष्टी हासत चालवते
या शाळेवर जीवन अपुले
म्हणुनी मजला आवडते...!





*चित्रकार - तेजस्वी भुरके*

**अरुण म्हात्रे**
२, श्रीनाथ अपार्टमेंट, ३ चाफेकर बंधू मार्ग, मुलुंड (पूर्व) मुंबई 400 081

ऐका... राग भूप-देसकार - उठि उठि गोपाळा
(गायक-पं. कुमार गंधर्व आणि वाणी जयराम)

**प्रायोजक - श्री. विद्याधर सहसबुद्धे, अंधेरी**

# नभाहूनही मोठे माझे भान



मी घेतो आहे रोज नवी अनुभूती
ती देते मजला जगण्यासाठी स्फूर्ती
मी चुकतो केव्हा, धडपडतो, गांगरतो
घसरतो पाय अन् पुन्हा उभारी धरतो
नवनव्या क्षितिजांवरती माझी झेप
नवनव्या यशांचा गळ्यात माझ्या गोफ
अपयशाकडे मी बघतो इतके स्वच्छ–
अन् लंघून जातो एक पायरी उच्च
हे कोठून आले धैर्य? जिद्द ही कसली?
ते कुठले पुस्तक–भिडल्या ज्यातील ओळी?
की थोर चरित्रांमधून वेचून सार?
की शाळेमधले घडलेले संस्कार?
किती किती प्रश्न हे, 'शंकासूर' मी होतो
उत्तरे शोधतो, मार्ग मोकळा करतो
मी उत्सुकतेने धरतो नवख्या वाटा
अंगावर घेतो भरतीच्याही लाटा
माणूसपणाचा मजला वाटे गर्व
मी घडवू बघतो एक अनोखे पर्व
मातीत रोवूनी आनंदाचे रोप
मी अवकाशाचे न्याहाळतो अपरूप
मी पाहीन म्हणतो नवी–नवेली गावे
हे मानस माझे नव्या प्रदेशी धावे
पाण्यात मिसळते पाणी, एकच धार
वाऱ्यात धावतो वात–दिशांना चार
मी उजेडासवे जाईन म्हणतो दूर
या विश्वासंगे जुळेल माझा सूर
मी अणूएवढा जरी थोकडा, सान
तरी नभाहूनही मोठे माझे भान


**आश्लेषा महाजन**
'मंजिरी', २३० चित्रलेखा सहनिवास, सहकारनगर क्र. १, पुणे 411 009
ashleshamahajan@rediffmail.com



CE CHAVARE ENGINEERING PVT. LTD.
शुभ दीपावली
Plot No. D-32, M.I.D.C., Phase-II, Dombivli (E),
PIN: 421 204, Dist. Thane, Maharashtra, INDIA
Telefax: +91(251) 2870531, 2871737,2870532, 5690407, 5690408 Cell: 9820079509
e-mail :chavareengg@vsnl.com visit us at:: www.chavare.com



# Happy Diwali

*When God pushes you*

*to the edge of difficulty*

*Trust Him fully*

*because 2 things can happen*

*Either He will catch you when you fall*

*or He will teach you how to fly.*

**With Best Compliments from**

# GURUVAYUR LOGISTICS


अंधार जातो, उजेड येतो, चांदण्या मिटतात, सूर्य उगवतो।
रात्रीचा मग दिवस होतो, क्षणक्षण बदलत जातो ।।

संग्रही ठेवा -**'वाचलेच पाहिजे असे काही'** भाग १-२, छात्र प्रबोधन प्रकाशन, रु. २०/- प्रत्येकी

# तन्मयीची सुट्टी



मीना वांगीकर

या उन्हाळ्याच्या सुट्टीत धारवाडच्या आजोबांच्या घरी तन्मयी आली, तेव्हा घरात नेहमीचा सुट्टीचा उत्साह दिसला नाही. स्टेशनवर कुशीकाकी व मंजू आले होते. टांग्यातून उतरून घरात शिरल्यावर आजी-आजोबांनी प्रेमाने जवळ घेतले तरी काकाने मात्र, ''या सुट्टीत मजा करायची नाही... अभ्यास करायला हवा, अभ्यास. आपल्या मंजूची यंदा दहावी आहे. त्याच्या अभ्यासात व्यत्यय आणायचा नाही,'' असे गंभीर आवाजात फर्मावून टाकले. तन्मयीला रडायलाच आले. 'या वर्षी बारावी संपते आहे. पुढे अनेक कोर्सेसना प्रयत्न करायचा... कितीतरी एन्ट्रन्स परीक्षांना बसायचं. या वर्षी धारवाडला जाणे नकोच' असे मुंबईत आई-बाबांनी दरडावले असले तरी 'नाही. मी जाणारच... पुढे जमेल की नाही कोणास ठाऊक? रिझल्ट लागल्याबरोबर लगेच येईन', असा हट्ट करून, उपाशी राहून, गोंधळ घालून तन्मयी धारवाडला आली होती. वर्षातून एकदा धारवाडच्या संजीवनी हवेचा अनुभव तिला हवाच असायचा. मुंबई काय गाव आहे का? तिथले घर तरी काय? छे! मुंबई म्हणजे ती एक हजारो डब्यांची रेल्वे गाडी आहे. परंतु धारवाडचे घर प्रशस्त मोठे होते. प्रत्येकाला एक खोली. देवालाही एक खोली! हिरवेगार रस्ते. कोणतीही घाई गडबड नसलेला, शांतपणे उगवणारा दिवस व एकमेकांत गुंतणारे दिवस-रात्र... या सगळ्याचा कळस म्हणजे कुशीकाकीचे प्रेमळ सान्निध्य. या सुट्टीत तर धारवाडमध्ये सायकल शिकायचीच या कल्पनेने तन्मयी खूप उल्हसित झाली होती.

परंतु या वर्षी मात्र धारवाडला कसले तरी नवेच चिंतेचे धुके पसरल्यासारखे वाटत होते. परीक्षेच्या खोलीत प्रश्नपत्रिका वाटताना वाटत असते तशी चिंता अन् हुरहूर. मुंबईत तर या वेळी आई-बाबा, मैत्रिणी आजूबाजूचे सर्वजण असली चिंता वाढवण्याच्याच बोलण्यात गुंतलेले होते. करिअर...स्कोप...असे लांबलचक भाषण देऊन शेवटी 'काही का असेना... तूच ठरव' म्हणून तन्मयीच्याच गळ्यात घंटा बांधायचे. तरुण वयात तिला ही घंटा पेलायला काही जड वाटत नव्हती. पण घंटा बांधणाऱ्यांच्या निर्लिप्त काळजीचे तिला भय वाटायचे. 'काहीतरी महत्त्वाचे तू तुझ्या निष्काळजीपणाने गमावशील' अशा पक्क्या समजुतीमुळे वाटणारे ते भय. या भयावर मात करायला धारवाड सोडले तर दुसरे काही तिला सुचले नव्हते. पण धारवाडही आता त्याच भयाचे बी पेरल्यासारखे तिला वाटायला लागले. कुशीकाकीने मात्र नेहमीसारखी तिची देखभाल केली. सकाळी उठल्याबरोबर तन्मयी पळायला जाऊ लागली, पहाटेच्या हिरव्यागार ओल्या मातीच्या मैदानातील धुक्यातून... पक्ष्यांची किलबिल ऐकत ती उत्साहाने तरंगू लागली. परंतु दिवस वाढत गेल्यावर निकाल, मार्कशीट याने पोटात कालवाकालव होत असे. डिग्री, नोकरी, होमिओपॅथी इत्यादी शब्द सारखे ऐकू येऊन तिच्याभोवती फेर धरून तिला घाबरवायचे.

ती दुपारी झोपायचा प्रयत्न करायची. कुशीकाकीला स्वयंपाकात मदत करायची. आपण सायकल कधी शिकणार याची चिंता करायची...

एवढ्यातच मुंबईहून पत्रे येऊ लागली. हे वाच... ते वाच... या वर्तमानपत्रातील अमूक जाहिरात पाहा... काकांनीदेखील निमित्त मिळाले की, भाषण ठोकायला सुरुवात केली. तन्मयी

लक्ष दिव्यांच्या साक्षीने, संकल्प करू नवे।
जुन्या रूढींच्या विनाशाचे बळ आम्हाला हवे।।

प्रायोजक - औमा इंजिनिअर्स, सिंहगड रस्ता, पुणे-३० ☎ २४५३९२२१

एकदा तर त्यांच्या भाषणामध्येच उठून बाहेरच्या पहिल्या वहिल्या पावसात भिजायला निघून गेली. या घोर अपमानाचा राग काकांनी मंजूवर काढला. तन्मयीला सोडून एक क्षणही न राहाणारा मंजू, तिचा चुलतभाऊ यावेळी काकांच्या छडीला घाबरून तन्मयीला विसरून गेला. तन्मयीबरोबर गावभर भटकणारा मंजू यावेळी चिडचिड करत पुस्तकात डोके खुपसून कोपऱ्यात बसत होता. त्याच्या आईला, कुशीकाकीला मात्र त्याचे हे हाल पाहवत नव्हते. ती तन्मयीला 'त्याला घेऊन जा,' असे सांगून जरा इकडे तिकडे फिरायला पाठवू लागली. मागच्या वेळेला तन्मयी आली असताना 'पुढच्या वेळी तुला सायकल शिकवली नाही तर मी मंजू नाही,' असे छातीठोकपणे सांगणारा मंजू यावेळी सायकलीतला 'साय' म्हणायलाही थरथर कापत होता. बाबांची चप्पल, शर्ट, सायकल पाहिले तरी बाबांनाच पाहिल्यासारखा घाबरून पुस्तक हातात धरत होता.

कुशीकाकी मात्र तन्मयीचे लाड करायची. आपल्या पदराने फसाफसा तिचे ओले डोके पुसायची. 'तुला साडी नेसायला शिकवते' म्हणून ट्रंकेतून डांबर गोळ्यांच्या वासाने घमघमणाऱ्या साड्या काढून द्यायची. आजी 'कुसुमा, अति लाड करू नकोस' असे दरडावायची. कुशीकाकीबरोबर फिरायला गेल्यावर, घराच्या बाहेर पडल्यावर कुशीकाकी वेगळीच वाटायची... 'काकीचे देखील पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे. ती विद्यापीठात पहिली आली होती. लग्नाआधी कोणत्यातरी कॉलेजमध्ये शिकवत होती,' असे आई-बाबा आदराने बोलत असलेले तन्मयीला माहीत होते. तन्मयीच्या आईलाही कुशीकाकीबद्दल खूप प्रेम वाटायचे. मुंबईत नोकरी करते या एका दिमाखामुळे तितकी न शिकलेली आई इकडे आली की, कुशीकाकी पदराला हात पुसत फाटकापर्यंत धावत येई. आई उगाच मुंबईची प्रौढी मिरवत गप्पा ठोकत असली की कुशीकाकी तांदूळ निवडत किंवा ताटं पुसत 'हो का?' म्हणत ऐकायची. गल्लीतल्या पोरी अभ्यासाबद्दल काही शंका विचारायला स्वयंपाकघरात घुसल्या तर आजी त्यांना दरडावून बाहेर पाठवायची. गल्लीतल्या मोठ्या पोरींना सर्व प्रकारचे अर्ज कुशीकाकीच लिहून द्यायची. तन्मयीला कुशीकाकीच्या पदवीदान समारंभाचे फोटो पाहायचे होते. मागच्या वेळेला आली, तेव्हा विचारले होते म्हणून कुशीकाकीने यावेळी माहेराहून गुपचुप लहानपणाचे सर्व फोटो आणून ठेवले होते. 'कित्तूर चेन्नम्मा' बागेत तन्मयीने व काकीने ते फोटो पाहिले. काकी देखील पहिल्यांदाच पाहिल्यासारखे पाहात होती. दोन जाड वेण्या, जाड भुवई, लकलकणारे डोळे. पदवीदान समारंभातील फोटोत तर काळा गाऊन घालून कुमारी कुसुमा दोडवाड ही एखाद्या काळ्या पक्ष्यासारखी दिसत होती. हा फोटो कोणालाही दाखवायचा नाही अशी ताकीद देऊन तिने तो फोटो तन्मयीला दिला. तन्मयी 'काकी, आज या फोटोतील साडी नेस' असे म्हणाली तर काकी 'श्... कोणीतरी ऐकेल' म्हणून तोंडावर बोट ठेवायची... काकांनी 'तिच्या बापाचं पत्र आलं आहे... तिला बायॉलॉजी वाचायला सांग' असे दरडावले तर दरवाजा बंद करून तन्मयी व काकी पत्ते खेळायच्या... तन्मयीने 'काकी, तू का पीएच्.डी. केलं नाही? तू का पुन्हा कॉलेजमध्ये शिकवत नाही?' असे विचारले तर काकी काहीच उत्तर न देता खेळतच राहायची.

एका संध्याकाळी फिरायला गेलेल्या तन्मयी व मंजू यांना परत यायला रात्रीचे आठ वाजून गेले. काका बाहेरच्या व्हरांड्यातच बसले होते. कुशीकाकी आत पोळ्या करत होती. आजी जमिनीवर पाय लांब करून घड्याळाकडे पाहात होती. फाटक उघडून आत येताच काका मंजूला ओढून रपारप मारायला लागला. तन्मयी 'कुशीकाकी' म्हणत आत धावली. दोघी बाहेर



दिनविशेष... १२ जानेवारी - राष्ट्रीय युवक दिन (स्वामी विवेकानंद जयंती)

'पेन्शनबाबत मोफत सल्ला' पुरोहित ज्ञान प्रबोधिनी,
**प्रायोजक - श्री. शैलेंद्र केशव म्हसकर ☎ २४४५१३१९**

येईपर्यंत काकांचा मारण्याचा पहिला हप्ता संपला होता.

''तिला वडीलधाऱ्यांची कदर नाही. तुला काय धाड भरली? तिला काय... मुंबईतील तिचे आई-बाप काय हवं ते विकत घेतील... तू नापास झालास तर काय करशील? भीक मागशील का? उद्यापासून बाहेर पडलास तर याद राख.'' असं ओरडून 'हे सारं तुझ्यामुळेच घडलं' अशा नजरेनं काकाने तन्मयीकडे पाहिलं. कुशीकाकी मंजूला पोटाशी धरून आत घेऊन गेली. हुंदके देत असलेल्या तन्मयीचे ती जास्त सांत्वन करत होती. रात्री झोपायच्या आधी आईला, ''अव्वा, तन्मयीला सायकल शिकायची आहे म्हणे, कशी शिकवायची? युनिव्हर्सिटीत फिरायला गेलो होतो आज. वेळच कळला नाही... तिथे केवढे मोठे घड्याळ आहे...'' मंजू म्हणाला.

कुशीकाकी आपले युनिव्हर्सिटीतले दिवस आठवत झोपी गेली... तेव्हा निळी व लाल रंगाची फुले तेथे फुलत होती.

तन्मयीच्या स्वप्नात युनिव्हर्सिटीचा कळस आला. मोठमोठ्या फाईली धरलेले शहाणपणाचे ठेकेदार... घण् घण् घंटा वाजताच हातातून पेपर हिसकावून घेणारे... निकाल... निकाल म्हणत नोटीस बोर्डावर तुटून पडणारे... ती झटक्न उठून बसली. छातीत धडकी भरवणारी घबराट. हे नेहमीचेच. परीक्षा केंद्रातील भयावह शांतता. मैत्रिणीही चेहरा वळवून घाईघाईत नोट्स वाचत राहाणार... 'टेन मोर मिनिट्स... टाय् युवर सप्लिमेंट्स...' मुंबईत कितीतरी गाड्या, बस बदलून दूरवरच्या परीक्षा केंद्राला जाताना वाटेत मरीन लाईन्सजवळ दोन मिनिटं समुद्र दिसायचा. परीक्षा सोडून समुद्र पाहातच उभे राहावेसे तन्मयीला वाटायचे.

सकाळी कुशीकाकीने तन्मयीला डोक्यावर हात फिरवत उठवून चहा दिला. ''तनू, तुला सायकल शिकायची आहे ना... मी यांना सांगते... तेच शिकवतील,'' म्हणाली. तन्मयीला काकीच्या चेहऱ्यावर उमटलेली सकाळ हितावह व सुरक्षित वाटली. 'खरंच?' म्हणत तिने झपकन् उडी मारली. पोळ्या करायला काकीला मदत केली. ''इथली युनिव्हर्सिटी किती छान आहे. मुंबईतील शाळा-कॉलेज तर रस्त्यावरच्या



क्षितिजावर लक्ष दिवे झळकती नवे।
यापुढे नसो कोणाच्या नयनी आसवे ।।

प्रायोजक - डॉ. अभय लिमये, पुणे

वाण्याच्या दुकानासारखे असतात. इथं तसं नाही; एक गांभीर्य आहे,'' तन्मयी म्हणाली.

''सगळं सारखंच... आतले लोक तसेच असतात,'' काकी म्हणाली. आंघोळीला निघालेल्या काकाला टॉवेल देताना,

''बिचाऱ्या तन्मयीला सायकल शिकायचीय म्हणे... तुम्ही शिकवा ना.'' काकीने विनवणी केली. काकाने तिकडे दुर्लक्ष केलं.

तन्मयी खोलीत जाऊन पुस्तक वाचायचा प्रयत्न करू लागली. पण तिचे लक्ष लागेना. तेवढ्यात आतून कुशीकाकी आली. ''आमच्या वेळी माझ्याकडे पुस्तकंच नव्हती. मी लायब्ररीत जाऊन नोट्स काढत असे. गेल्या वर्षीपर्यंत त्या नोट्स मी ठेवून दिल्या होत्या. का कोणास ठाऊक... त्यांचे ओझे वाटून जाळून टाकल्या. काही मंजूच्या होड्यांना कामी आल्या,'' काकी म्हणाली. कुशीकाकीला बॉटनी विषय फार आवडायचा म्हणे. बाहेर बारीक पाऊस पडत होता. ''चल, आपण दोघी बाहेर जाऊया,'' असे काकी म्हणाली. तन्मयीला ओढून तिची वेणी घातली. छोट्या केसांची काकीकडून वेणी घालून घ्यायला तन्मयीला फार आवडे. मुंबईत वेणीला वेळ कुठे असतो म्हणून तिचे केस छोटे केले होते. नंतर काकीने पटापट भाजी केली. ''भात आल्यावर टाकते,'' असे आजीला सांगितले. पाचच मिनिटांत तयार होऊन तन्मयीबरोबर काकी बाहेर पडली.

'कित्तूर चेन्नम्मा बाग' ओलांडून डावीकडून त्या साधनकेरीकडे चालल्या. काकीने तेथे मोठमोठ्या भिंतींच्या पलीकडे असलेला मनोरुग्णांचा दवाखाना दाखवला. ''माझ्या आवडत्या शिक्षिका तिकडे होत्या, तेव्हा तिथं मी खूप वेळा जात होते. त्या स्वातंत्र्यसैनिक, समाज कार्यकर्त्या होत्या. एकट्या होत्या. त्यांचे घर ताब्यात घेण्यासाठी नातेवाईकांनी त्यांचा छळ करून त्यांचा मनाचा समतोल घालवून... याच दवाखान्यात त्या गेल्या...'' त्यांच्याबद्दल सांगता सांगता भावनावश होऊन काकी गप्प झाली. ''ते बेंद्रे यांचे घर'' असे काकीने दाखवले. ''बेंद्रे कोण?'' या तन्मयीच्या प्रश्नाला ''ते एक खूप मोठे कवी... मागे आमच्या कॉलेजला कितीतरी वेळा आले होते. छोटी असताना त्यांच्या घरी मीही गेले होते.'' असे काकीने आस्थेने सांगितले. स्वत:ला विसरवणाऱ्या त्या हिरव्या वातावरणात ''कॉलेजमध्ये असताना मीही कविता करत होते,'' असे काकीने कबूल केले... ''आता का करत नाहीस?'' असे तन्मयीने विचारताच काकी ''अरे, गॅसवर दूध ठेवले होते,'' म्हणत दचकली. दोघीही गडबडीत आकाशवाणीच्या बाजूच्या रस्त्याने भराभर चालू लागल्या. आकाशवाणीच्या या जुन्या रस्त्यावर नाव नसलेली कितीतरी झुडुपे होती. त्यांच्या अंगभर केशरी व पिवळी ठिपक्यासारखी फुले उमललेली होती. ''या फुला-पानांचा वास मला फार आवडतो,'' म्हणत काकी त्या फुलांचा वास घेत होती. पाऊस अगदी हळूवारपणे पडत होता. ''तू याच रस्त्यावर सायकल शीक. इथं काहीच रहदारी नाही.'' काकी उत्साहाने घरी जाताना म्हणाली. मंजूसाठी 'एस् एस् सी मॅगझीन' मागवावे की 'एस् एस् सी मित्र' मागवावा या चर्चेत आजी, आजोबा व काका गर्क होते. मंजूची आई 'पहिली आलेली असताना हे सगळं कशाला हवं?' या आजोबांच्या विवेकी बोलण्याचा आजी व काका चेष्टेच्या सुरात पुनरुच्चार करत होते. तन्मयी हातपाय धुऊन मंजूजवळ बसली. काकी स्वयंपाकघरात गेली.

नंतर तन्मयी बाहेरच्या व्हरांड्यात जाऊन मावळत असलेली संध्याकाळ पाहात बसली. मुंबईत कृत्रिम उजेडात तिन्हीसांज कधी जाणवत नाही. सगळीकडे झगमगते दिवे असतात.


**(पान क्र. १२० वर पुढे चालू)**



ऐका... राग कलावती - राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे
(गायक-पं. वसंतराव देशपांडे)
**प्रायोजक - देव मेडिकल्स, पुणे**

# हसरी चित्रे


१




२




३





व्यंगचित्रकार : **आशिष जोशी**, सी ३६/१२ शाश्वत सोसा., प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे 411033

अवश्य भेट द्या – www.usemylenses.blogspot.com


आपणच अंधार भेदून प्रकाशदीप शोधायचा ।
आणि आपल्या जन्माचा वसंतोत्सव करायचा ।।


**प्रायोजक - सौ. चित्रा अनिल ठाणेकर, डोंबिवली**

# तारे नवक्षितिजावरचे...

'मला मोठेपणी कोण व्हायचंय?' याबद्दल प्रत्येकाच्याच मनात काही स्वप्नं असतात, हो ना!? कुणाला खूप खूप अभ्यास करून शास्त्रज्ञ/संशोधक व्हायचं असतं; तर कुणाला खूप खूप खेळून आपल्या भारत देशाचं नाव ऑलिंपिक स्पर्धांमध्ये उंचवायचं असतं. मला माहीत आहे, तुमच्याही मनात 'मला कोण व्हायचंय' याविषयी काही ना काही आंदोलनं सुरू असणारच! पण स्वप्नांना कष्टांची, भान ठेवून केलेल्या नियोजनाची जोड असली तरच ती सत्यात उतरतात.

संध्याकाळच्या वेळी तुम्ही कधी आकाश निरीक्षण केलंय? दूरच्या क्षितिजावर सुरुवातीला अंधुकसे/अस्पष्ट दिसणारे तारे अल्पावधीत आपल्या पूर्ण तेजाने चमकताना दिसतात. 'मला कोण व्हायचंय' या नव क्षितिजावर आत्ता आत्ताच उमलू लागलेल्या ताऱ्यांशी, तुमच्या दोस्त मंडळींशी ओळख करून घेऊयात 'तारे नव क्षितिजावरचे' या लेखमालेतून...

डोळ्यांत स्वप्न, हृदयात जिद्द अन् पंखात उडण्याचं बळ असेल तर समुद्रावर आरूढ होता येतं, आकाशीच्या ताऱ्याला स्पर्श करता येतो, सुरांच्या हिंदोळ्यांवर दिमाखात झुलता येतं, योगसाधनेनं तनामनाचा तोल साधता येतो. याचा प्रत्यय आपल्या दोस्तांच्या या मनोगतातून तुम्हाला नक्की येईल.

या सर्व धडपडणाऱ्या मुलांनी जे यश मिळवलंय ते मिळवण्यासाठी त्यांना खेळ, आवडीचं खाणं-पिणं यांसारख्या साध्या आनंदांना मुकावं लागतं याची खंत नाही; कारण त्याबदल्यात जे काही मिळालं त्याचं मोल त्यांना उमजलंय.

सगळ्यांच्या मनात आपल्या गुरूंविषयी नितांत आदर आहे. आई-वडिलांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीविषयी कृतज्ञता आहे. मिळालेल्या यशाने हुरळून न जाता आपापल्या क्षेत्रात पुढे जाण्याची जिद्द मनात आहे. नेमकं ध्येय समोर ठेवून त्या दिशेने त्यांची नेमकी वाटचाल सुरू आहे.

या लेखमालेत संगीताची उपासना श्रद्धेने करणारा प्रथमेश लघाटे; योगासनांच्या अभ्यासाने तनामनाचा तोल साधत अनेक विक्रम करणारी प्राची शेंबेकर; सुरुवातीला पाण्याशी फारशी दोस्ती नसलेला पण एकदा भीती कमी झाल्यावर मनस्वीपणे पोहण्याचे विक्रम करणारा मंथन चाळके आणि गणित-विज्ञानाच्या अभ्यासात, संशोधनात रमणारी हंसा पद्मनाभन या चार दोस्तांशी आपण ओळख करून घेणार आहोत.

एक लक्षात ठेवा; तुमच्या आतही एक फुलणारं फूल नक्कीच असणार. आजपर्यंत जमलं नसेल पण कधीतरी त्याला फुलायला अवकाश देणं आपल्याच हातात असतं. डोळ्यांसमोर ध्येय असेल त्यादिशेने जाण्याची जिद्द असेल, उमेद असेल तर -

*पुढेच पाऊल वेधित जाईल क्षितिज तारांगणे। जे जे हाती येईल ते ते त्याला होईल उणे।।* याची प्रचीती तुम्हालाही येईल.

वरकरणी सामान्य वाटणाऱ्या गोष्टी तशा नसतात;
त्यामधील आशय मोठे परिवर्तन घडवू शकतो

**प्रायोजक - श्री. नागेश साने, पुणे**

# सप्तसुरांच्या साथीने...

प्रथमेश लघाटे

खरं तर मला खरोखरच आठवत नाही मी कधीपासून गाणं म्हणायला लागलो ते! कारण माझ्या अगदी नकळत्या वयापासून मी गाणं ऐकतो आहे. माझे काका गजानन ऊर्फ बाबा लघाटे हे उत्तम व सुपरिचित भजनी कलाकार आहेत. अगदी एक-दीड वर्षाचा असल्यापासून त्यांचं गाणं गुणगुणणं ऐकतच मी झोपत असे. तसेच आमच्या घराच्या ओटीवर एक दत्तस्थान आहे. त्या ठिकाणी १९२८-२९ पासून अगदी आजपर्यंत अव्याहतपणे दर गुरुवारची भजन सेवा सुरू आहे. जन्मापासून माझ्या कानावर संगीत पडू लागलं. असं संगीतमय वातावरण असलेल्या घरात जन्म मिळाल्याबद्दल मी परमेश्वराचा अत्यंत ऋणी आहे.

तीन वर्षांचा असल्यापासून मी थोडाफार तबल्याबरोबर खेळू लागलो. ऐकलेल्या गाण्यांना मला ठेका धरता येत असे. तबल्यापर्यंत हात पुरत नव्हते म्हणून माझ्या काकांनी मला एक छोटी ढोलकी आणली होती! त्याचवेळी माझ्या कानावर काकांची भजनेसुद्धा येत होती. काका पं. भीमसेन जोशींची अभंगवाणी छान गातात. त्यातीलच 'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा' व 'माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या तीरी' हे अभंग माझे तेव्हाच तोंडपाठ झाले होते. भजन, गावामध्ये होणारे उत्सव या निमित्ताने मी कधीतरी मोडकं-तोडकं गात असे; पण त्या एवढ्याशा वयातील माझ्या धिटाईचंच सर्वजण कौतुक करीत; त्यामुळे माझी गाण्याची आवड वाढत गेली.

मी साडेपाच वर्षांचा असताना एका तालुकास्तरीय गाण्याच्या स्पर्धेत मला प्रथम क्रमांक मिळाला. या स्पर्धेवेळी मी गाण्याचं शिक्षण घेत नव्हतो. पण नंतर मला गुरू म्हणून लाभलेले सतीश कुंटे सर त्यावेळी या स्पर्धेचे परीक्षक होते.

या स्पर्धेनंतर मी अधिक गाणी तयार करावीत असं माझ्या घरच्यांना वाटू लागलं (मला तितकंसं गांभीर्य वयामुळे नव्हतं). मग काका मला गाणी शिकवू लागले. माझा मोठा चुलत भाऊ परागदादा माझ्याकडून सराव करून घ्यायचा. गाणी बसवायचा आणि स्पर्धांनाही घेऊन जायचा! आणखी दोन-तीन स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यावर मात्र शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाची कमतरता जाणवू लागली.



आमचं आरवली गाव छोटं खेडं असल्याने गावात संगीत क्लास नव्हते; पण गाणं शिकणं मात्र गरजेचं होतं. आणि ती सोय गावापासून २८ किलोमीटर दूर चिपळूण येथे होती. वयाच्या आठव्या वर्षापासून मी माझे गुरुजी श्री. सतीश कुंटे यांच्याकडे मार्गदर्शन घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी व रविवारी मी चिपळूणला जात असे; असे म्हणण्यापेक्षा माझे बाबा, आई, काका आणि दादा वेळात वेळ काढून मला घेऊन जात असत! आपली कामं बाजूला ठेवून! आणि म्हणूनच मी थोडंफार गाणं शिकू शकलो.

दर शनिवारी व रविवारी क्लास असल्याने मला फारसं खेळायला मिळालं नाही, फिरायला मिळालं नाही याचं दुःख तर होतंच; पण ज्यावेळी मी असा विचार करतो की, अरे मला मिळालेल्या सगळ्या गोष्टी अगदी गाणं, स्पर्धा, बक्षीस, कौतुक, मोठ्या कलाकारांशी संपर्क आणि यश बाकी सगळ्याच मुलांच्या नशीबात असतं असं नाही. ते मला मिळालं आणि त्यासाठी मी थोडा त्याग केला तर काय बिघडलं? आणि लगेचच माझं दुःख कमी होतं! अजूनही मी वेळ मिळेल तेव्हा खेळतो, मित्रांबरोबर फिरायला जातो, मित्रही गप्पा मारायला घरी येतात!

तिमिरपट घनदाट सारा, दूर सरलेला असे।
पूर्व क्षितिजावर लख्ख, बिंब सोन्याचे दिसे।।

प्रायोजक - श्री. अमोल दत्तात्रय दांडेकर, सांगली

या माझ्या मित्रांमुळेच मी माझं थोडंफार यश उपभोगू शकतो, कारण मी जरी सर्वांसाठी सेलिब्रेटी असलो तरी माझ्या गावातल्या, शाळेतल्या मित्रांसाठी मात्र मी सामान्य प्रथमेशच आहे! आणि म्हणूनच मी खेळ, हिंडणं, मित्र miss करत नाही तर enjoy करतो.

आजपर्यंत अनेक स्पर्धांमध्ये मला यश मिळालं. २००६ मध्ये मी सातवीला असताना प्रशांत दामले फॅन फौंडेशनच्या आंतरशालेय राज्यस्तरीय भावगीत स्पर्धेत भाग घेतला. राज्यभरातून १८०० मुलांमधून अंतिम ३२ स्पर्धकांमध्ये मी रत्नागिरी केंद्राचे प्रतिनिधित्व केले. आणि त्या वर्षीचा विजेता म्हणून निवडलो गेलो; त्यामुळेच मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते बक्षीस मिळाले. मी व माझे कुटुंबीय या सगळ्याचा आनंद घेत होतो. हे माझं पहिलं मोठ्ठं यश होतं!

टी.व्ही.वर स्वत:ला पाहाणं हे प्रत्येकाचं स्वप्न असतं; तसं ते माझंही होतं. आणि म्हणूनच मी 'सा रे ग म'च्या निवड चाचणीला कोल्हापूर केंद्रावर जाण्याचे ठरवले. त्यासाठी माझ्या गुरूंची पूर्वपरवानगी घेतली. ४०-५० विविध गाणी तयार करून मी निवड चाचणीला गेलो. स्पर्धा कोणतीही असली तरी तयारी करणं, मेहनत करणं याला पर्याय नसतो. कोणत्याही स्पर्धेला जाताना मला नंबर मिळालाच पाहिजे, असा विचार मी कधीच केला नाही; कारण माझ्या पालकांनीही माझ्याकडून अशा अपेक्षा ठेवल्या नाहीत. स्पर्धेला जाताना मला ते नेहमी प्रोत्साहन देत आणि जिंकण्यापेक्षा चांगलं सादरीकरण होणं किती महत्त्वाचं आहे, हे समजावून सांगत. म्हणूनच 'लिटिल चॅम्प'सारख्या मोठ्या स्पर्धेचं दडपण कधीच जाणवलं नाही.

आरवलीसारख्या छोट्या खेड्यातून मुंबईत जाऊन स्पर्धेत भाग घेणं खरंच कठीण होतं. पण झी मराठीने आमचं जेवणखाण, प्रकृती, कपडे, सराव या सर्वांची खूप काळजी घेतली. आमच्यापैकी कुणाचे तरी पालक आमच्याबरोबर असायचे. त्याचमुळे आम्ही स्पर्धा दडपणाशिवाय करू शकलो.

टी.व्ही.वर जरी आम्ही फक्त सोमवार-मंगळवार दिसत असू तरी पूर्ण आठवडाभर आमची तयारी चाले. गुरुवारी आणि शुक्रवारी चित्रीकरणाचा दिवस असे. त्याच्या आदल्या दोन दिवशी म्युझिशियन दादांबरोबर सराव होत असे व शूटिंगच्या वेळी रिटेक न होता स्पर्धा आणि गाणी होत असत.

कार्यक्रमाचे दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, सर्व टेक्निशियन्स, कॅमेरामन, स्पॉटबॉईज, आमचे कोऑर्डिनेटर दादा-ताई, या सर्वांमुळे स्पर्धा अशी जाणवलीच नाही. आमची नवी फॅमिलीच तयार झाली. माझ्या आयुष्यात या प्रत्येक व्यक्तीला अतिशय महत्त्वाचं स्थान आहे. स्पर्धा संपून दोन वर्षं होत आली तरी आजही मी या सर्वांशी संपर्कात असतो.

२००३ पासून श्री. सतीश कुंटे यांच्याकडे मी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतो आहे. आज मी जो काही थोडाफार गातो ते त्यांच्यामुळेच. त्यांनीच मला रियाज कसा करावा, गाणी कशी तयार करावी, हे शिकवलं. रियाजाचं महत्त्व मला सांगितलं. त्यांनी सांगितलेल्या पद्धतीनेच मी रोज तास-दीड तास रियाज करतो.

'सा रे ग म लिटिल चॅम्प' स्पर्धेनंतर आजही आमचे कार्यक्रम होत असतात; पण मला मात्र पूर्ण वेळ शास्त्रीय गायक व्हायचं आहे. त्यासाठी लागेल तेवढी मेहनत करण्याची माझी तयारी आहे. आमच्या गावात या गोष्टी मिळत नाहीत; त्यामुळे पुण्यासारख्या संगीताचं माहेरघर असलेल्या शहरात गाण्याच्या शिक्षणासाठी मी आलो आहे आणि ज्येष्ठ गायक विकास कशाळकर यांच्याकडे मी गाण्याचं शिक्षण घ्यायला सुरुवात केली आहे. त्यांच्याकडे भरपूर मेहनत, रियाज करून जास्तीतजास्त ज्ञान मिळवायचा प्रयत्न मी करतो आहे. आणि अशीच जास्त तयारी करून सवाई गंधर्व महोत्सवासारख्या नावाजलेल्या शास्त्रीय संगीत महोत्सवामध्ये सादरीकरण करण्याची माझी इच्छा आहे.

**- प्रथमेश लघाटे**

मु. पो. आरवली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी 415 608

शोधा... @ http:// www.kavitakosh.org
(सुप्रसिद्ध हिंदी कवींच्या कविता)
**प्रायोजक - श्री. चंद्रशेखर एकनाथ बेडेकर, सांगली**

# संशोधनाचं क्षितिज खुणावतं आहे...

हंसा पद्मनाभन



'अंतराळातील लघुग्रहाला पुण्यातील विद्यार्थिनीचे नाव' ही बातमी १२ जुलैला वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली आणि माझ्यावर अभिनंदनाचा अक्षरश: वर्षाव सुरू झाला. ज्या गोष्टीसाठी माझा हा बहुमान करण्यात आला; ती ISEF स्पर्धा (International Science & Engineering Fair) होऊनही आज ४ वर्षे उलटून गेली आहेत. त्यावेळी इंडियाना पोलीस, अमेरिका इथे झालेल्या या स्पर्धेत 'Physics of a prototype for Static Magnetic Leviation' या विषयावर मी प्रकल्प सादर केला होता. यात मला द्वितीय क्रमांकाचं पारितोषिक मिळालं होतं. वर्तमानपत्रातली बातमी वाचणाऱ्या कुणाचाही असा समज होणं अगदी स्वाभाविक आहे की नुकतंच मला कुठल्या तरी स्पर्धेत बक्षीस वगैरे मिळालं असेल आणि खरं सांगू का? माझं नाव या लघुग्रहाला दिलं गेलं याचा आनंद मला निश्चितच आहे; पण याहीपेक्षा माझ्यासाठी ती स्पर्धा, त्यासाठी मी सादर केलेला प्रकल्प, प्रकल्प सादरीकरणासाठी केलेली जमवाजमव, मुलभूत विज्ञान जाणून घ्यायचा त्या काळात मी केलेला प्रयत्न, केलेला अभ्यास, कसोशीनं मिळविलेलं ज्ञान, प्रकल्पाची केलेली उलट-सुलट मांडणी, एकेक करत स्पर्धेतल्या पार करत गेलेल्या फेऱ्या आणि खूप काही... हा सगळा अनुभवच फार रोमांचकारी ठरला!

माझे बाबा डॉ. थनू पद्मनाभन, 'आयुका'तले ज्येष्ठ संशोधक. माझं बालपण TIFR, IUCAA इथल्या अभ्यासपूर्ण/संशोधनात्मक वातावरणात गेलं. या सगळ्या वातावरणाचा माझ्या अभ्यासावर, आकलनक्षमतेवर, अभ्यासपद्धतींवर निश्चितच सकारात्मक परिणाम झाला. माझ्या आजवरच्या वाटचालीत बाबांचं मोलाचं मार्गदर्शन मला नेहमीच मिळालं आहे.

सध्या मी पुणे विद्यापीठात भौतिकशास्त्र विषयात M.Sc. करते आहे. Physics हा आता माझ्या जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. पण शाळेत असताना मला इंग्रजी साहित्य, नृत्य, गायन हे सगळं करायला आवडायचं. साधारण आठवी-नववीत असतानाच भास्कराचार्य प्रतिष्ठानच्या 'Advanced Mathematics Course' ला जायला मी सुरुवात केली होती. गणिताची विशेष गोडी माझ्यात त्यामुळे निर्माण झाली. गणितातली समीकरणं समजून घेणं, त्याची मनातल्या मनात तार्किक मांडणी करणं, ती उकलण्यासाठी वेगवेगळी सूत्रं वापरून बघणं, वेगवेगळ्या क्लृप्त्या योजणं, कागदावर त्याची सुबक मांडणी करणं मला कमालीचं आव्हानात्मक वाटायचं. एखादा अवघड Problem सुटला की होणारा आनंद अवर्णनीय असायचा. मग अजून अवघड प्रश्न सोडवण्याकडे कल वाढायचा. मला वाटतं, त्यावेळी मला गणितातलं सौंदर्य कळू लागलं होतं/उलगडू लागलं होतं. गणित हाच माझ्या आवडीचा, आग्रहाचा विषय बनला. गणित आणि भौतिकशास्त्र हातात हात घालून चालणारेच विषय आहेत, हो ना? कदाचित त्यामुळेच बहुधा गणिताबरोबरच भौतिकशास्त्रही माझ्या आवडत्या विषयांत येऊन बसलं.

२००५ च्या मेमध्ये अरविंद गुप्तांच्या मुक्तांगण विज्ञान शोधिकेच्या (MVS) काही शिबिरांना मी जात

घनदाट प्रकाशाचे रान असे गच्च झुले ।
डोईवर डुलणारी चांदण्यांची लक्ष फुले ।।

प्रायोजक - कु. वल्लरी बडे, मुलुंड




होते. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त खूप काही या शिबिरांत शिकायला मिळालं. विशेष म्हणजे आपण जे विज्ञान शिकतो आहोत, त्याचं Implementation व्यवहारात कसं होत असतं/कसं होऊ शकतं हे समजत-उमजत गेलं. संशोधन (रिसर्च) म्हणजे काय, तो कशासाठी, कसा करायचा असतो याचेही प्राथमिक धडे मला या शिबिरांतून मिळाले.

MVS मार्फत विज्ञानाच्या प्रचार-प्रसाराचे अनेकविध उपक्रम सुरू असतात. वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित खेळणी कमीतकमी किमतीत बनविण्याचे अनेक प्रयोग तिथे केले जातात. Penultimate toy हे खेळणंही खोलून त्याच्या बेसला जुनी सीडी वापरून अगदी अल्प दरात बनवण्यात यश आलं.

माझ्याही मनात खेळण्याविषयी कुतूहल निर्माण झालं. गुरुत्वाकर्षणाचा नियम बघता Penultimate toy मधलं हे पेन आडवं अधांतरी राहूच कसं शकतं? ते तर खाली पडायला पाहिजे. मग Physics चं असं कुठलं तत्त्व आहे जे पेनाला स्थिर ठेवतं, याचा शोध घ्यायचा मी ठरवलं.

सुरुवातीला मला वाटलं होतं की, Physics मधल्या १-२ तत्त्वांवरून हे खेळणं कसं चालतं हे सांगितलं की माझं काम झालं. पण जसजसं मी जास्त अभ्यास करू लागले, खेळण्याच्या 'पोटात' शिरू लागले तसंतसं हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं होऊ लागलं. गृहीतक (हायपोथिसिस) मांडणे, वेगवेगळ्या प्रयोग पद्धती वापरणे, भरमसाट निरीक्षणे नोंदवणे, परत परत प्रयोग करणे, एखादी प्रयोग पद्धती विकसित करणे ही प्रक्रिया सुरूच होती. पण जेव्हा एखादा विषय केवळ अभ्यास म्हणून न राहता तो खरोखरच आवडीचा बनतो; तेव्हा त्यातली नवनवीन आव्हानं तुम्हांला नेहमीच साद घालतात/खुणावतात. आणि जेव्हा सकारात्मक पद्धतीने तुम्ही आव्हानांना सामोरं जाता तेव्हा तुमच्यातल्या वैचारिक, बौद्धिक क्षमता वृद्धिंगत होतात. तो विषय मग आनंदाचा/मौजेचा होतो.

सुरुवातीला बंगलोरमध्ये (२००५) झालेल्या Science Fair मध्ये १५० Projects सादर झाले होते. पैकी ६ Projects ची निवड इंडियाना पोलीस मध्ये होणाऱ्या International Science Fair साठी झाली. तिथे आमचे २-३ interview घेण्यात आले. तुम्ही सादर केलेल्या Project बद्दल तुम्ही मुळातून किती अभ्यास केला आहे, त्या विषयाची पायाभूत जाण तुम्हाला कशी आहे; हे या interviews मधून तपासलं गेलं. मे २००६ मध्ये झालेल्या या स्पर्धेत मला दुसरं बक्षीस मिळालं. आम्हाला सगळ्यांना खूप आनंद झाला. मनापासून, प्रामाणिकपणे तुम्ही प्रयत्न केलेत, काळजीपूर्वक अभ्यास केलात; झपाटल्यासारखे कामात गढून गेलात तर तुम्हाला यश निश्चित मिळतेच मिळते, हो ना?

Massachuetts Institute & Technology (MIT) च्या Lincoln Laboratory ला आतापर्यंत २००,००० अब्ज लघुग्रहांचा शोध लावण्यात यश मिळाले आहे. ISEF स्पर्धेतल्या पहिल्या दोन क्रमांकांच्या स्पर्धकांचे नावही या लघुग्रहांना दिले जाते. काही ज्येष्ठ/श्रेष्ठ मान्यवर व्यक्तींचीही नावं या लघुग्रहांना देण्याचा प्रघात आहे. मराठीतले श्रेष्ठ कवी कुसुमाग्रजांचंही नाव यांपैकी एका ताऱ्याला देण्यात आलं आहे.

माझ्या नावानेही आकाशातला एक लघुग्रह ओळखला जाणार आहे; ही भावना शब्दांत व्यक्त करता येण्यासारखी नाहीच मुळी, हो ना?

**- हंसा पद्मनाभन**
८, आकाशगंगा कॉलनी, आयुका,
पुणे विद्यापीठ आवार, गणेशखिंड, पुणे 411 007
hamsa.padmanabhan@gmail.com
**शब्दांकन : जयश्री काटीकर**



दिनविशेष... ३० जानेवारी - हुतात्मा दिन (म. गांधी स्मृतीदिन)

ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व उपक्रमांना हार्दिक शुभेच्छा!
**प्रायोजक - श्री. मिलिंद विश्वास साठे, पुणे**

# ...आणि पाण्याशी दोस्ती झाली...

मंथन चाळके

माझी पाण्याशी दोस्ती अजिबातच नव्हती. लहानपणी तर मला पाणी आवडतच नसे. माझ्या बाबांनी प्रथम मला पोहायला नेले, तेव्हा फार भीती वाटायची. मग रडत, दंगा करत कसंतरी मी पोहायला शिकलो. पुढे माझ्या बाबांना कळले की, इचलकरंजीत गंगाराम बरगे हे Sports Batch घेतात. माझ्या वडिलांनी मला त्या बॅचमध्ये घातले. मग तर मला पाणी नकोच झाले. त्यापासून दूर राहाण्यासाठी स्विमिंगची वेळ झाली, की मी घरातून पळून जायचो. माझे बाबा मग मला शोधून आणून तेथे न्यायचे. तरीसुद्धा टँकच्या पडक्या भिंतीवरून चढून मी पलीकडच्या गल्लीत जाऊन लपायचो; पण माझ्या बाबांनी जिद्द सोडली नाही. मला ते टँकवर घेऊनच जायचे. हळूहळू पाण्याची भीती कमी होत गेली. आणि चक्क मला पोहताही येऊ लागलं. पाण्याशी हळूहळू दोस्ती होऊ लागली. पोहण्याचे चारही प्रकार मी शिकलो आहे. त्यामध्ये बॅकस्ट्रोक व फ्रिस्टाईल या प्रकारांत मला गती आहे, असे सरांचे म्हणणे होते. 'याला आपण स्पर्धेमध्ये उतरवूया', सर म्हणाले.

माझी पहिली स्पर्धा बेळगाव येथे पार पडली. तेथे मी यापैकी फ्रीस्टाईलमध्ये द्वितीय, तर बॅकस्ट्रोकमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. मला खूप छान वाटत होतं. सगळ्यांनी माझं कौतुकही केलं, शाबासकी दिली. माझी पोहण्यातली गोडी अजून थोडी वाढली. त्यापुढे मी अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला. त्यात कधी यश आलं तर कधी अपयश. जसजशी मला बक्षिसं मिळत गेली, तसतसा माझा आत्मविश्वासही वाढला आहे. मी सकाळी १.३० तास व संध्याकाळी २.०० ते २.३० तास असा पोहण्याचा सराव करतो. सध्यापण मी गंगाराम बरगे सरांकडेच सराव करतो आहे. स्विमिंगमधून अभ्यासालाही वेळ देतो. मी रोज सकाळी दोन तास अभ्यास करतो. सध्या मी आठवीमध्ये शिकत आहे.



वर्गात सर्वात जास्त दंगा करणारा पण तेवढाच अभ्यास करणारा मुलगा अशी माझी ओळख आहे.

आमच्या टँकवर सरांनी ८ राऊंड मारायला सांगितले, तर चारच मारणार आणि ८ राऊंड सांगितले तर १० मारणार अशीही मुलं आहेत. आम्ही टँकवर भरपूर दंगाही करतो आणि जिद्दीने, चिकाटीने, इर्षेने पोहतोही. आमचा टँकवरचा ग्रुप फार छान जमला आहे. आम्ही सर्वांनी एकमेकांना कळत-नकळत घडविले, असे मला वाटते. आमचे सर हे आमचे मित्रच आहेत.

या सर्वांमुळेच आणि माझ्या आई-वडिलांमुळे आज मी राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचू शकलो.

काहीतरी कमविण्यासाठी काहीतरी गमवावं लागतं, म्हणतात ते खरं आहे. कारण मी खेळ, बाहेरील गाड्यांवरचं खाणं-पिणं, मित्रांबरोबर हिंडणं फार miss करतो आहे.

मी जेव्हा वांद्रे-वरळी सागरी सेतूपासून स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकापर्यंत पोहत होतो, तेव्हा मला माझ्या स्वच्छ टँकची फार आठवण येत होती. कारण ते समुद्राचे पाणी इतके अस्वच्छ होते की बाकीच्यांना त्या पाण्याचा वासही सहन होणार नाही, अशा पाण्यात मी अर्धा तास पोहत होतो. मला लहानपणापासून समुद्रात पोहायची फार हौस होती. मी चौथीत असताना माझ्या बाबांनी समुद्रात पोहायची सर्व तयारी करून घेतली. परंतु वय कमी असल्याने मी तेव्हा त्या स्पर्धेत भाग घेऊ शकलो नाही. तेच बरं होतं का, असंही मला यावेळी वाटायला लागलं. पण मी जेव्हा किनाऱ्यावर पोहोचलो आणि मला कळले की, माझा दुसरा नंबर

स्वप्ने पेरून कणाकणांत, फुलवू या जगी ध्येयाचे मळे ।
स्वप्नाला आणून सत्यात; दूर करू अंधाराचे जाळे ।।

प्रायोजक - कु. अमिता सतीश सहसबुद्धे, सांगली

आला, तेव्हा मला घाण/अस्वच्छ पाण्यात पोहल्याचे काही वाटले नाही. उलट या पाण्यातही आपण पोहू शकतो, असा विश्वास मिळाला.

मला आता राष्ट्रीय पातळीवर चमकून पुढे कॉमनवेल्थ आणि त्याहीपुढे जाऊन ऑलिंपिकमध्ये भारताला पदके मिळवून द्यायची आहेत.

- **मंथन चाळके**, द्वारा नेहा चाळके, किरण गॅस एजन्सीमागे, लंगोटे मळा, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

# अभ्यास आणि आसनं यांचा 'योग' होतो तेव्हा...

प्राची शेंबेकर



सातवीची परीक्षा संपली आणि दरवर्षीप्रमाणे सुट्टीत काय करायचं हा प्रश्न होता. शरीराला चांगला व्यायाम मिळावा या उद्देशाने सौ. पेंढारकर यांच्याकडे सूर्यनमस्कार शिकायला सुरुवात केली. 'तुझं शरीर लवचिक आहे. तू मेहनत घेतलीस तर योगासनं छान करशील', असं सांगून त्यांनी प्रोत्साहन दिलं. एका स्पर्धेच्या वेळी पेंढारकर मॅडमनी आदल्या दिवशी माझ्याकडून चांगला सराव करून घेतला. त्यामुळे या स्पर्धेत मला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या स्पर्धेनंतर माझा आत्मविश्वास वाढला हे नक्की.

नंतर योगासनाचे वेगवेगळे प्रकार शिकण्यासाठी मी सौ. प्रविणा अभ्यंकर यांच्याकडे जाण्यास सुरुवात केली. त्याचवेळी माझ्या पाहण्यात 'दीपयोगा' हा नेहमीच्या योगासनांपेक्षा थोडा वेगळा किंवा तुलनेनं कमी लोकांना माहिती असलेला प्रकार आला. यामध्ये कपाळावर काचेच्या ग्लासमध्ये जळती मेणबत्ती ठेवून आसनं करायची असतात, शिवाय तोलही ढळू द्यायचा नाही; हे मला चॅलेंजिंग वाटलं. आपणही हा प्रकार शिकावा, अशी मला इच्छा झाली. त्यामुळे अजून कठीण आसनं आणि दीपयोगा शिकण्यासाठी प्रवीण बांदकर यांच्याकडे २००९ मध्ये जाण्यास मी सुरुवात केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी रोज तीन तास योगाचा सराव करते.

माझे वडील खेळाडू (खेळ कॅरम) आहेत; त्यामुळे आमच्या घरामध्ये खेळाचे वातावरण आहे. माझी आई घरी क्लासेस घेते; त्यामुळे अभ्यासामध्ये हवी तेव्हा आणि हवी तितकी मदत मिळते. त्यामुळे घरात अभ्यास आणि खेळ अशा दोन्ही गोष्टींचा समन्वय साधला जातो.

मी आता दहावीत आहे. मला संपूर्ण दिवसामध्ये योगा, शाळा हे सगळं करून स्वत:च्या अभ्यासाला एक ते दीड तास मिळतो. त्या वेळेत मी स्वत:च्या नोट्स काढते; त्यामुळे प्रश्न-उत्तरं हाताखालून जातात. मी लिहिलेली प्रश्नोत्तरं जेव्हा परत वाचते, तेव्हा आणखी चांगल्या प्रकारे लक्षात राहातं. मला असं वाटतं, प्रश्न-उत्तरं पाठ करण्यापेक्षा ती समजून घेणं महत्त्वाचं असतं; तोच माझाही प्रयत्न असतो.

योगा आणि अभ्यास एकमेकांकरता मला पूरक वाटतात. योगाचा फायदा मला अभ्यासातही होतो. योगामुळे मन एकाग्र होते.

एकाग्रता हा योगामधला सगळ्यात महत्त्वाचा भाग आहे. रोजच्या तीन तास सरावापैकी एक तास त्यासाठी राखून ठेवलेला असतो. अर्धा तास त्राटक आणि अर्धा तास ध्यान, प्राणायाम हे चुकवून चालत नाही.

योगाच्या प्रॅक्टिसमध्ये जसे सातत्य हवे तसेच सातत्य अभ्यासामध्येही असले पाहिजे. आणि या

ऐका... राग बैरागी भैरव - ओंकार स्वरूपा सद्गुरु समर्था
(गायक - सुरेश वाडकर)
प्रायोजक - श्री. कुशल दिलीप पटवर्धन, सांगली

दोन्हीमध्ये सातत्य आणि समन्वय साधण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असतो; त्यामुळे परीक्षेच्या आदल्या दिवशी स्पर्धेला जायची वेळ आली तरी माझा अभ्यास तयार असतो. त्यामुळे मनावर ताण येत नाही.

दहावीनंतर बी. ए. किंवा बी.कॉम. करताना मला योगामध्येही पार्ट टाईम डिग्री घेण्याची इच्छा आहे. योगाचा जितका अभ्यास करता येईल तितका करायचा आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये मी अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर स्पर्धांमध्ये मला यशही मिळालं आहे; पण आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेमध्ये खेळायला मिळावं आणि तिथे यशस्वी व्हावं अशी जिद्द मी बाळगून आहे. या सगळ्या गोष्टी करण्यासाठी मला मित्र-मैत्रिणींचं आणि आई-वडिलांचं नुसतं प्रोत्साहनच नाही, तर हवी तेव्हा, हवी ती मदत मिळते.

जेव्हा आई-बाबा माझी एखादी स्पर्धा बघायला येतात, तेव्हा माझ्यावर खूप दडपण येतं. हे दडपण म्हणजे भीती नसते. कारण 'तू मेहनत कर. निकाल काहीही लागला तरी फरक पडत नाही,' असंच त्यांचं सांगणं असतं; पण आता हे दडपण काढून टाकण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

'काहीतरी कमवण्यासाठी काहीतरी गमवावं लागतं', या म्हणीप्रमाणे संध्याकाळी मैत्रिणींबरोबर फिरायला जाणं, टीव्ही पाहाणं किंवा मस्ती करणं या गोष्टी क्वचितच करायला मिळतात. पण त्यावेळी मी माझ्या आवडीची गोष्ट म्हणजे योगाची प्रॅक्टिस करत असते; त्यामुळे मलाही फारसं वाईट वाटत नाही. स्पर्धात्मक योगा शिकत असताना मी ऱ्हिदमिक योगा आणि दीप योगा हे प्रकारही शिकले. या प्रकारांचं सादरीकरण मराठी आणि सोनी टीव्हीवर झालं. त्या निमित्ताने सुधा चंद्रन, सुप्रिया पिळगावकर, अन्नू मलिक, फराह खान अशा दिग्गजांकडून कौतुकाची थाप मला मिळाली आहे. शाळेत हा कार्यक्रम सादर केल्यावर शिक्षकांना इतका आवडला की त्यांनी त्याची शिफारस पोलिसांच्या रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी केली. संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये आमचा पहिला क्रमांक आला, तेव्हा कमिशनर अरुण ढेरे यांच्या हस्ते पारितोषिक मिळालं. तबला आणि बासरीच्या जुगलबंदीवर आसनं करण्याची कल्पना सगळ्यांनाच मनापासून आवडली.

योगा शिकण्यापूर्वी मी एकदम शांत, लाजरी आणि कोणातही न मिसळणारी अशी होते; पण योगाच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्पर्धांना जायला लागले. तिथे जाऊन, वेगवेगळे कार्यक्रम करून आणि विविध क्षेत्रांतल्या लोकांना भेटून आत्मविश्वास वाढला. पूर्वी मला कोणी प्रश्न विचारला तर उत्तरासाठी मी आई-बाबांकडे बघायचे, पण आता मात्र मी धीटपणे उत्तरं देऊ शकते. माझे निर्णय स्वत: घेऊ शकते.

एकदा माझी आंतरशालेय योगा स्पर्धा होती. स्पर्धेच्या टेन्शनमध्ये आणि घाईगडबडीमध्ये स्पर्धेला लागणारी सगळी कागदपत्रं घरीच विसरले. ती कागदपत्रं दाखवल्याशिवाय स्पर्धेमध्ये प्रवेश मिळणार नव्हता. स्पर्धेच्या ठिकाणी गेल्यावर माझी चूक माझ्या लक्षात आली. तेव्हा नुकतीच योगा शिकायला सुरुवात केली होती; त्यामुळे या गोष्टींची सवय नव्हती. शेवटी संयोजकांशी जाऊन बोलले आणि त्यांना काही करता येईल का अशी विचारणा केली. ओरिजिनल नसलं तरी चालेल पण झेरॉक्स तरी दाखवायलाच लागेल, फॅक्सही चालेल, असं त्यांनी सांगितलं. मग त्या भागामध्ये फॅक्सचं दुकान शोधलं आणि कागदपत्रं आईला फॅक्स करायला सांगितली. स्पर्धेमध्ये भाग घेता आला आणि पहिल्या क्रमांकाचं पारितोषिकही मिळालं. तेव्हाचा आनंद शब्दांमध्ये व्यक्त करणं केवळ अशक्य आहे.

**- प्राची शेंबेकर**
११, मनीषा सोसा., टिळकनगर शाळेशेजारी,
डोंबिवली (पू.) 421201
prachu.shembekar03@gmail.com

लखलखते तारांगण, आज या भुईवरी ।
दैन्य दूर जाहले, सुख आले घरोघरी ।।

**प्रायोजक - श्रीमती तारा मोरेश्वर फाटक, सांगली**

***There is no Royal road to Success
But after Success Every road becomes Royal
for those Who Believe in Struggle
to make their Own road***

*With Best compliments from...*

**VINAYAK POLYMER INDUSTRIES**

# 2, Vighnahar Chambers, Opp. Telephone Exchange,
Karve Road, Erandawane, Pune - 411 004

**Mobile** : 9822192885
**Phone** : 020-25459218, 32922958, 25389179, 30220916
**Telefax** : 020-25459218
**E-mail** : vinaykpolymerrindustries@yahoo.com
sandeshbasarur@yahoo.com

**For Your Requirements of :**

- ETHYL SWASTOL (ETHYL CARBITOL)
- ETHYL SWASSOLVE (ETHYL CELLOSOLVE)
- METHYL SWASTOL (METHYL CARBITL)
- METHYL SWASSOLVE (METHYL CELLOSOLVE)
- BUTYL SWASTOL (BUTYL CARBITOL)
- BUTYL SWASSOLVE (BUTYL CELLOSOLVE)
- ETHYL SWASSOLVE ACETATE (ETHYL CELLOSOLVE ACETATE)
- HEAVY DUTY BRAKE FLUID DOT - 3 & DOT - 4.
- M.E.G. (MONO ETHYLENE GLYCOL)
- 2 METHOXY ETHANOL

*Happy Diwali*

**CONTACT AT**


**M/s. Swastik Oil Products Mfg. Co. Navsari.**

**Office :** B/69, Navyug Niwas, 167, Dr. Bhadkamkar Marg, Mumbai - 400 007 **Works :** Plot No. 251, Village Unn , Khadsupa Boarding, P.O. Taluka-Navsari, Gujarat - 396433,
**Mumbai Office :** 2413 1351, **Fax No. :-** 91-22-2413 8512, **Navsari Office :** 026 37 -259 625,
**Fax No. :-** 91-2637-225013, **Tel. No. :-** 2413 0398, 2416 3589, **Works :** 026 37-225 613,
**Email :** aunp@swastikoil.com, **website :** www.swastikoil.com.



तो प्रवास सुंदर होता, आधार गतीला धरती।
तेजोमय नक्षत्रांचे, आश्वासन माथ्यावरती।।

संग्रही ठेवा - '**आयुष्यातील वादळलाटा**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-


N.T.S. M.T.S.
N.M.M.S.
...सारख्या स्पर्धा परीक्षांचा सराव करताना,
माझे उत्तर बरोबर असेल....तर
ते कां बरोबर आहे ?
आणि चूक असेल....तर
ते कां चूक आहे ?
याचा पडताळा मी स्वत: घेतो !
बुद्धिमापन कसोटी
प्राविण्य व प्रज्ञाशोध परीक्षा
आर्थिक दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती
प्रा.वा.ना.दांडेकर
W.N.DANDEKAR
WND
आजच आपल्या पालकांशी, शिक्षकांशी, मित्र-मैत्रिणींशी चर्चा करा.
...visit us www.dandekar-ets.com
या संकेतस्थळाला भेट द्या आणि ई-लर्निंगचा लाभ घ्या !


Wide Range of Capacitors
to Suit Every Need
SUBODHAN
CAPACITORS
POWERFUL SOLUTION FOR EVERY SITUATION
QUALITY POWER...
... THROUGH SUBODHAN
Quality data collection using state-of-the-art equipment
Analysis by experienced experts
Optimum and assured solutions for best power quality
MPP MODULAR Capacitors
Best choice for Panel Builders
OIL FILLED Capacitors
APP, MD & MPP
Get Subodhan Expertise
&
Empower Yourself !
H.T. Capacitor
APFC Panels
सुबोधन
SUBODHAN CAPACITOR
SUBODHAN ENGINEERS (PUNE) PVT. LTD.
(An ISO 9001:2000 Certified Company )
27, Marble House, 473, Sadashiv Peth, Pune - 411030 Ph. : 24484229
Telfax : (020) 24476187 E-mail: seplpune@eth.net www.subodhancapacitor.com

**‘आज बाबा नाहीत. ते असताना त्यांच्या सगळ्या गोष्टी गृहीत धरल्या मी, असं आता वाटतं. त्यांच्या जाण्यामुळे त्यांच्या माझ्यातलं सगळं ‘गृहीत’ आता ‘अमूल्य’ होऊन गेलं आहे... वडिलांशी असलेलं आपलं सुंदर नातं ‘अमृता सुभाष’नं इथे शब्दबद्ध केलं आहे...**

# पडलं मार! मी आहे...

अमृता सुभाष

“चक्! नीट नाही आली. डावीकडची वेणी वरून सुरू होते आणि ही जरा खालून!”

मी तोंड मुरडत आरशापासून पुन्हा बाबांच्या पुढ्यात आले. “परत घाला उजवीकडची वेणी आणि घट्ट घाला नं; सैल पडली की नाही आवडत मला!” मी कुरकुरले. “बरं.” बाबा आज्ञाधारकपणे पुटपुटले आणि पुन्हा एकदा पूर्ण एकाग्रतेने माझे केस विंचरायला लागले. बाबा जेव्हा पूर्ण एकाग्रतेने कुठलीही गोष्ट करायचे तेव्हा त्यांचे ओठ थोडे पुढं येऊन त्यांच्या धारदार नाकाच्या दिशेनं सरकायचे. अशावेळी ते अगदी लहान मुलासारखे, खरं तर रुसलेल्या लहान मुलासारखे दिसायचे.

त्यांनी मन लावून लावून पुन्हा ती उजवीकडची वेणी घातली आणि मी पुन्हा आरशासमोर धावले. खरं तर मला नव्हतीच आवडली वेणी; पण शाळेला उशीर होत होता





प्लॅस्टिकचा वापर
पर्यावरणास घातक आहे ?
मुळीच नाही!
NICHROME
The Plus Factor in Packaging




Jeevanprash
सर्व केमिस्ट्सकडे उपलब्ध
यात आहे प्रीबायोटिक एफओएस
वजन नियमनासाठी, मधुमेह, उच्चरक्तदाब आणि ताण असलेल्यांसाठी अत्यंत उपयुक्त
जीवनप्राश
भारतातील पहिले
प्रि-बायोटिक हेल्थ सप्लिमेंट
सर्व वयाच्या व्यक्तींसाठी
आणि सर्व प्रकारच्या ऋतूंमध्ये
अल्केम लॅबोरेटरीज लिमिटेड,
सेनापती बापट मार्ग,
लोअर परेल (पश्चिम),
मुंबई - ४०००१३

म्हणून मी समझोत्यानं बाबांपुढे आले. 'रिबिन मी बांधते,' म्हणून त्यांच्या हातातल्या रिबिनी हिसकावून आरशासमोर चालती झाले.

माझी शाळा अकरा पन्नासला असायची आणि बाबांचं ऑफिस दहा वाजताचं. त्या दिवशी माझ्या वेणीमुळं किती उशीर झाला असेल बाबांना. पण हे कळण्याचं ते वय नव्हतं. उलट दुसऱ्या दिवशी मुंबईहून कुठल्याशा नाटकाचा प्रयोग करून थकून आलेल्या आईला मी फर्मावलं,

''ए आई, बाबांना नीट वेणी घालायला शिकव गं. वेण्या कंपल्सरी आहेत शाळेत!''

'बाबांनी वेणी नीट घातली नाही,' एवढंच कळण्याचं ते वय होतं. आपले बाबा पुरुष असून, आपली वेणी घालत आहेत याचं अप्रुप मला तेव्हा वाटलं नाही. कारण माझे बाबा मी अगदी लहान असल्यापासून बायकांची समजली जाणारी कितीतरी कामं अगदी आई घरात असताना पण करायचे; अगदी सहज. तेव्हा नाही जाणवलं पण थोडी मोठी झाले, इतर घरांमध्ये जायला-यायला लागले तेव्हा जाणवलं हे बाबांचं वेगळेपण.

आपली आई नाटकात काम करते म्हणून इतर आयांपेक्षा वेगळी आहेच; पण आपले बाबाही वेगळेच आहेत. ऑफिसमध्ये अत्यंत कार्यक्षम असणाऱ्या, उच्च पदावर काम करणाऱ्या बाबांना आईच्या कामाचं कौतुक होतं; त्यामुळे तर आईच्या गैरहजेरीत ते आमची 'आई' व्हायचे.

बाबांना स्वच्छतेची खूप आवड. सकाळी दहा ते संध्याकाळी सातपर्यंत सरकारी नोकरी करून घरी आल्यावर स्वच्छ हात-पाय धुवून बाबा घर झाडायला घ्यायचे. बाई सकाळी येऊन जायची; त्यानंतर दिवसभराची धूळ स्वच्छ करायची बाबांची मोहीम! आईची कुठल्या नाटकाची तालीम चालू असेल किंवा ती प्रयोगासाठी मुंबईला गेली असेल तर मी, माझा भाऊ यांचं आवरणं, तसंच घरातल्या कपड्यांच्या घड्या घालण्यापासून सगळी कामं बाबा ऑफिसातून येऊन आणि ऑफिसला जायच्या आधी करायचे.

एकदा माझ्या छोट्या भावाला अचानक ताप भरला. आईचा रात्री मुंबईला प्रयोग ठरलेला. तिचं पाऊल घरातून निघेना. ती सारखी रडतच होती. ती जयच्या-माझ्या भावाच्या कपाळावर हात ठेवायची, ''मी येते हं पिल्लू.'' म्हणायची, दाराशी जायची, परत रडत जयपाशी यायची. अशी तिची तगमग चालली होती. बाबा जयच्या कपाळावर पट्ट्या ठेवत होते. ते आईला म्हणाले, ''मी आहे. तू जा.'' शांत समजूतदार आवाज. खरं तर छोटाच आवाज. बाबा खूप लहान आवाजात बोलायचे. खूप बोलायचे नाहीत; पण जे बोलतील ते नेमकं. त्यांच्या 'तू जा' मध्ये कोणताच अभिनिवेश नव्हता, कसलाच!

इतक्या सगळ्या धकाधकीतून बाबा माझा अभ्यासपण घ्यायचे. गणित त्यांचा आवडता विषय. मी कुठलंतरी अडलेलं गणित घेऊन त्यांच्या पुढ्यात गेले की, बाबा ते गणित सोडून त्या धड्याच्या सुरुवातीच्या पानाशी जायचे. मला पटकन् उत्तर हवं असायचं ''बाबा, हे गणित सांगा ना!'' असं मी कुरकुरले की ते शांतपणे म्हणायचे,

''तेच गणित सांगतो आहे. पण आधीचं कळलं नाही तर नंतरचं कसं येईल? चल हे वाच.'' मला वाटायचं, 'का वेळ घालवत आहेत हे एवढा?'

परवा हारुकी मुराकामी या जपानी लेखकाच्या एका पुस्तकात एका वाक्यापाशी थांबलेच 'Taking time is the best shortcut.' आणि एकदम वाटलं, बाबा माझा वेळ घालवत आहेत, असं वाटायचं

क्षण हा आनंदाचा जगावा मनोभावे ।
भोवती लाख दिवे उजळीत जावे ।।

प्रायोजक - श्री. श्रीकांत संभूस, पुणे

मला, पण खरंच कुठल्याही गोष्टीच्या मुळाशी जाण्यासाठी गोष्टीपाशी थांबायला नको का? 'त्या गोष्टीपाशी थांबणं हाच ती गोष्ट समजून घेण्याचा सर्वात वेगवान मार्ग आहे.' हेच बाबा त्या एका गणितातून सांगत होते.

आज बाबा नाहीत. ते असताना त्यांच्या सगळ्या गोष्टी गृहीत धरल्या मी, असं आता वाटतं. त्यांच्या जाण्यामुळे त्यांच्या माझ्यातलं सगळं 'गृहीत' आता 'अमूल्य' होऊन गेलं आहे. त्यांचं माझं एकत्र जगलेलं, एका मुली आणि बापाचं सामान्य आयुष्य, त्या सामान्य आयुष्यात मला ते असताना सामान्य वाटलेले असे काही क्षण... मग ती त्यांनी घातलेली वेडीवाकडी वेणी असेल किंवा धावत पळत खेळायला जाताना पटकन् लावून दिलेलं फ्रॉकचं बटण असेल... किंवा कुठल्याशा मोठ्या बहिणीच्या अट्टहासाने घातलेल्या कुडत्याच्या लांबच लांब बाह्यांचं कोपरापर्यंत नीटसं घड्या पाडत नेणं असेल... हे सगळं ते असताना किती रोजचं, साधं, छोटं वाटलं होतं. आता तेच सगळं लहान किती 'मोठं', 'महत्त्वाचं' आणि 'असामान्य' होऊन गेलं आहे.

मी सातवीत असताना बाबा ऑफिसमधून आले की संध्याकाळी मला सायकल शिकवायचे. त्या आमच्या सायकल शिकवणीच्या पहिल्या दिवशी बाबांनी धरलेल्या सायकलवर मी धडपडत चढले. आणि पहिलं पॅडल मारताच ओरडले, ''बाबा, सोडू नका!'' बाबा त्यांच्या लहान पण ठाम आवाजात म्हणाले, ''पॅडल मार, मी आहे.'' आम्ही आमच्या कॉलनीच्या कच्च्या रस्त्यावर निघालो. तो रस्ता संपेल तेव्हा सायकल वळवावी लागेल या विचारांनी धडकी भरली मला. ''बाबा, आता वळवू कशी सायकल? मी पडणार!'' मी किंचाळले.

''नाही पडत, मी आहे.'' बाबा सायकलच्या सीटला धरून माझ्या मागे धावत धावत म्हणाले. मी कसंबसं हँडल वळवलं आणि खरंच नाही पडले! दुसऱ्या दिवशी भीती थोडी कमी झाली; पण 'बाबा सोडू नका' हे पालुपद चालूच होतं. मी असं म्हणाले की, बाबांचा 'नाही पडत, मी आहे' आवाज कानावर यायचा आणि माझ्या मागे धावत असलेले बाबा मला दिसत नसले तरी ते आहेत या विश्वासानं मी बिनधास्त होऊन जायचे.

असं चार-पाच दिवस चाललं. पाचव्या दिवशी 'बाबा धरा हं' असं म्हटलं आणि सायकल चालवत राहिले. चार-पाच पॅडलनंतर पुन्हा सवयीनं 'बाबा धरा' म्हणाले आणि लक्कन् जाणवलं, बाबांचं 'नाही पडत' ऐकू येत नाही आणि त्यांच्या पळणाऱ्या पावलांचा आवाज पण नाही मागे! धसकून मागे पाहिलं तर बाबांनी कधीच सोडलेलं होतं मला. किती दूर राहिले होते ते! हसतहसत दूर उभे असलेले बाबा! म्हणजे माझी मीच इतक्या दूरवर आले होते. एक क्षण खूप आनंद झाला! मला सायकल यायला लागली होती; बाबांशिवाय -


आज पुन्हा त्या क्षणापाशी मी उभी आहे. बाबा गेले त्या दिवशी पुन्हा एकदा माझी सायकल सोडून देऊन दूरवर आनंदानं, अभिमानानं हसत उभे असलेले बाबा दिसले. त्यांनी खूप काही दिलं मला. शब्दांमधलं आणि शब्दांपलिकडचं. आता त्यांच्याशिवाय पुढे जाताना मनात त्यांनीच दिलेलं बळ आहे आणि ते दिसत नसले तरी मागून येणारा आवाज आहे, 'पॅडल मार! मी आहे.'

**अमृता सुभाष**
६२/२७५१, विपुल सहकारी गृहरचना,
गांधीनगर, वांद्रे (पू.) मुंबई

***चित्रकार - सचिन जोशी***
(रंगीत मातीपासून कमी उठावदार प्रतिमा तयार करून ती या चाररंगी चित्रासाठी वापरली आहे.)



पाहा... भैरवगड - उंची ३००४ फूट, जि. सातारा
(समर्थ रामदासांच्या रामघळीसाठी प्रसिद्ध) कोयनानगर... हेळवाक
कै. श्री. रामचंद्र जनार्दन काळे यांच्या स्मरणार्थ, **प्रायोजक - सौ. सुलभा आशिष फडके**



# भारतातील शीत वाळवंट


अमृता जोगळेकर

काश्मीर-भारताचं नंदनवन ! हातचं काहीही राखून न ठेवता निसर्गानं या प्रदेशाला भरभरून सौंदर्य बहाल केलं आहे. हिमालयातील हिमाच्छादित शिखरं, स्वच्छ निळ्या आकाशाच्या रंगात भिजलेली सरोवरं, श्योक, गिलगिट, सिंधू, झेलम, चिनाबसारख्या खळाळत वाहाणाऱ्या नद्या आणि देवदार, पाईन यांसारख्या वृक्षांची हिरवी महिरप... सर्वच अप्रतिम !

...पण तुम्हाला माहीत आहे? श्रीनगरहून जेमतेम ५०० किलोमीटर पूर्वेला आहे शुष्क वाळवंटी प्रदेश... लडाख ! तसं हे नाव तुम्हाला अपरिचित नाही. 'थ्री इडियट्स' या चित्रपटात तुम्ही हे नाव नुसतं ऐकलं नाही तर इथली शाळाही पाहिली आहे. आठवलं? आता वाळवंट म्हटलं की निर्जन, ओसाड, पाण्यासाठी आसुसलेला वालुकामय प्रदेश डोळ्यांसमोर येणारच. वाळूच्या चंद्रकोरीच्या आकाराच्या टेकड्या, वाळूची वादळं, मरुद्यानं, सगळं आठवलं ना? पण या वाळवंटी प्रदेशाचं वैशिष्टच असं की हे हिमालयाच्या उत्तुंग पर्वतरांगांत, अतिशय उंचावर आहे. त्यामुळे इथे आपल्याला हिमाच्छादित शिखरंही दिसतात. हा प्रदेश अतिशय उंचावर असल्यानं इथे हिमवृष्टी होते, म्हणून याला 'शीत वाळवंट' म्हणतात. उष्ण वाळवंटी प्रदेशापेक्षाही इथलं जीवन खडतर आहे. हिमालय आणि काराकोरम पर्वतरांगांमध्ये वसल्यामुळे या भागाचा जगाशी फारसा संबंधच येत नाही. याशिवाय लडाख आणि झांस्कर या डोंगररांगांनी हा प्रदेश व्यापला आहे. इतक्या उंचीवर हवेतलं ऑक्सिजनचं प्रमाणही कमी असतं. कल्पना करून पाहा मनाशी... कसा असेल हा प्रदेश?... कशी असतील इथली माणसं?

अतिशय दुर्गम प्रदेश असल्यानं बाह्य जगाशी

अशी दीपावली यावी,
दीप उजळता अवघ्या सदनी प्रकाशगाणी गावी.
प्रायोजक - श्री. वैभव गणेश बर्वे, ज्ञानदा पब्लिकेशन, पुणे



(नकाशा प्रमाणानुसार नाही)

फारसा संबंध नाही. त्यातच हिमवृष्टीमुळे हिवाळ्यात सर्व रस्ते बंद होतात. झांस्कर डोंगररांगांत प्रचंड बर्फ पडतो; त्यामुळे लडाखचा इतर भागांशी असलेला संबंध तुटतो. साधारणपणे जूनमध्ये बर्फ वितळलं की रस्ते मोकळे होतात आणि मग या प्रदेशाला जाग येते. अनेक पर्यटकांची वर्दळ सुरू होते. भारतीय पर्यटकांपेक्षाही परदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर दिसतात. लडाख-लेह (राजधानी) ला जाण्यासाठी श्रीनगर ते लेह हा मार्ग सोयीचा आहे. १९७०च्या मध्यापर्यंत सुरक्षिततेच्या दृष्टीनं इथे येण्यास परवानगी नव्हती. सोनमर्ग ते कारगिल हा रस्ता भारत-पाकिस्तान सीमेच्या प्रत्यक्ष ताबारेषेला (L.O.C.) समांतर अगदी जवळून जातो. हिमाचल प्रदेशामधील मनाली-रोहतांग-ला कडून उत्तरेला, लेहला जोडणारा रस्ता १९८७ मध्ये नागरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. श्रीनगर अथवा मनाली-दोन्ही मार्गांवरून किमान दोन दिवसांच्या प्रवासानंतरच आपण लेहला पोहोचतो. मनाली-लेह मार्गावर अद्याप पुरेशा निवासस्थानांची सोय नसल्यामुळे हा प्रवास जास्त कठीण आहे. या प्रवासात कोणत्याही मार्गानं गेलो तरी आपल्याला अनेक खिंडी ओलांडाव्या लागतात. लडाखी भाषेत 'ला' म्हणजे खिंड आणि 'दाख' म्हणजे खिंडींचा प्रदेश... नावातच सर्व काही आहे, होय ना?

...अगदी बरोबर! तुमच्या मनात आलंच असेल की एवढं करण्यापेक्षा सरळ विमानानं जावं की लेहला... पण एक विसरून चालणार नाही की, 'लेह' आहे समुद्रसपाटीपासून सुमारे ४००० मीटर (१२,०००फूट) उंचीवर. मुंबईहून येणाऱ्या व्यक्तीनं एकदमच एवढ्या उंचीवरचं ठिकाण गाठलं तर ऑक्सिजनच्या कमतरतेमुळं आणि कमालीच्या कोरड्या हवेमुळे काय हाल होतील? श्रीनगर अथवा मनालीहून जाताना आपण टप्प्या-टप्प्याने उंची गाठतो; त्यामुळे त्या वातावरणाशी जुळवून घेण्यास आपल्याला पुरेसा वेळ मिळतो. साधारणपणे मळमळणं, उलट्या, कमालीचं डोकं दुखणं, चक्कर येणं, अग्निमांद्य, झोप न येणं आणि श्वास घेण्यास त्रास ही altitude sickness ची लक्षणं दिसतात. इतर आजारांची म्हणजे दमा, मधुमेह, रक्तदाब इ.ची लक्षणं आपल्याला आधीपासून माहीत असतात. पण altitude sickness ची लक्षणं ही तिथे (त्या उंचीवर) गेल्याशिवाय दिसून येत नाहीत. त्यामुळे हा त्रास कोणाला होऊ शकेल, हे सांगता येत नाही... आणि त्यावर उपाय एकच असतो की शक्य तेवढं लवकर त्या व्यक्तीला कमी उंचीच्या प्रदेशात घेऊन जाणं. आमच्या बरोबर आलेला एक मुलगा प्यांगाँग लेकहून येताना बेशुद्ध झाला. तातडीनं त्याला लेहला इस्पितळात दाखल करून ऑक्सिजन दिला आणि जरा बरं वाटल्यावर मुंबईला परत पाठवून देण्यात आलं... दुसरा इलाजच नसतो अशा वेळी...

हे वाचल्यावर घाबरून जाऊ नका. जरी दुर्गम, ओसाड प्रदेश असला तरी अतिशय सुंदर आहे 'लादाख'. मुंबई-पुण्याहून दिल्लीमार्गे विमानानं अथवा रेल्वेनं श्रीनगरला जाता येतं. श्रीनगरहून सोनमर्गमार्गे कारगिलला पोहोचतो. हा राष्ट्रीय महामार्ग आहे. रस्ते अतिशय सुरेख आहेत. सर्व मोक्याच्या ठिकाणी तपासणी नाकी आहेत. लष्करी वाहनांची या मार्गानं मोठ्या प्रमाणात ये-जा असते.



वाचा... निर्मितीचं आकाश- लेखिका- रेणू दांडेकर- अभिनव प्रकल्पांचा खजिना

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
**प्रायोजक - युनायटेड इलेक्ट्रिकल्स, श्री. विक्रम चाफेकर, पुणे, ☏ २४४५७६९८**

रस्त्यांची देखभाल आणि डागडुजी सतत सुरू असते. कारगिलपर्यंत बाजूच्या पहाडांमध्ये लष्कराचा खडा पहारा असतो. सोनमर्गहून दक्षिणेकडे एक रस्ता अमरनाथकडे जातो. सोनमर्गनंतर झोजी-ला ही खिंड (उंची- ३,५२९ मीटर) पार करून जावं लागतं. इथं एका वेगळ्याच पद्धतीनं एकेरी मार्गांचा अवलंब केला जातो. ठरावीक वेळात विशिष्ट दिशेने वाहने सोडण्यात येतात. त्यामुळे इथं खिंड पार करायची तर बरोबर वेळ गाठावी लागते. लष्कराच्या मालवाहू गाड्यांचा ताफा जात असेल तर आपल्याला थांबावंच लागतं.

वाटेवरचं पुढचं मुख्य ठिकाण म्हणजे द्रास. इथे मोठं लष्करी ठाणंही आहे. द्रास हे जगातलं सर्वात थंड हवामान असलेलं दुसऱ्या क्रमांकाचं ठिकाण आहे. हिवाळ्यात इथलं किमान तापमान - ४०°से. पर्यंत खाली जातं. सोनमर्गजवळ पाहिलेले उंच वृक्ष आता दिसेनासे होतात. एकूणच उंच, मोठ्या वृक्षांचं प्रमाण कमीच झालेलं दिसतं. इथली घरं मातीची, उन्हात भाजलेल्या विटांची असतात. सिमेंटच्या घरात राहाणाऱ्या आपल्यासारख्या लोकांना 'मातीची घरं' माहिती असण्याची शक्यता कमीच. इथे पावसाचं प्रमाण अगदी कमी, त्यामुळे मातीची घरं टिकू शकतात. मातीची घरं उन्हाळ्यात आत थंड असतात तर हिवाळ्यात आत ऊबदार असतात. हा एक फार मोठा गुणधर्म मातीच्या घरात असतो. दिवसभर भाजून काढणारं ऊन आणि गरम वारे, तर सूर्यास्तानंतर तापमान एकदम कमी होऊन थंडी पडते, गार बोचरे वारे वाहू लागतात. असं वाळवंटी प्रदेशात अनुभवास येणारं विषम हवामान इथंही आहे. त्या दृष्टीनं मातीची घरं आणि त्याला अगदी उंच ठेवलेल्या खिडक्या किती योग्य आहेत. 'एकाच वेळी Sun-strok आणि Frost-bite होईल' असं लडाखच्या हवामानाचं वर्णन केलं जातं. स्त्रिया, पुरुष, मुलं यांच्या अंगावर अगदी पायापर्यंत गरम कपडे दिसतात. डोक्याला लोकरी टोपी, गरम कापडाचा रुमाल किंवा स्कार्फ बांधलेला असतो.




**बर्फातली वाट**

श्रीनगर-लेह मार्गावर कारगिल हे सर्वसाधारणपणे मध्यावर असलेलं एक टुमदार गाव आहे. रात्रीच्या मुक्कामाच्या दृष्टीनं हॉटेल्स् इ. सोयी इथे आहेत. इथं बराच मोठा लष्करी तळ असून, लष्कराचा एक लहानसा विमानतळही आहे. तुमच्या मनात आलं असेल; 'इथं सगळीकडं एवढी लष्कराची का बरं ठाणी आहेत'? सांगते- काही वर्षांपूर्वी इथं पाकिस्तानशी आपलं मोठ्ठं युद्ध झालं होतं. श्रीनगर-लेह मार्गावरील द्रास आणि कारगिल ही दोन्ही ठाणी पाकिस्तानला आपल्या ताब्यात हवी होती; ज्यामुळे श्रीनगर-लेह मार्गाने लेहला नेणारा सर्व रसद पुरवठा बंद झाला असता. सप्टेंबर/ऑक्टोबर ते मे/जून या काळासाठी लागणारा अन्नधान्य, औषधे, डिझेल, पेट्रोल इ. सर्व रसद पुरवठा या मार्गाने लेहकडे जातो. तो पाकिस्तानला तोडता आला असता व लेह एकाकी पडला असता आणि लडाख चीनने जिंकून घेतला असता. या सर्व दृष्टीने द्रास आणि कारगिलचं लष्करी महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा भाग अत्यंत संवेदनशील झाला आहे, तो यामुळेच. पाकिस्तानचे सर्व मनसुबे आपल्या लष्कराने धुळीस मिळवले. त्या युद्धात शहीद झालेल्या जवानांसाठी एक सुंदर स्मारक प्रत्यक्ष युद्धभूमीवरच बांधण्यात आलं आहे. इथं पाठीमागे एक डोंगर आहे. तो चढून गेलं की पलीकडेच पाकिस्तानची लष्करी छावणी दिसते. कारगिलमधून 'सिंधू'ची उपनदी 'सुरू' वाहाते. तिचं खोरं हिरवंगार आहे. आमच्या ड्रायव्हरनं गाडी थांबवून नदीपलीकडचा

उजळल्या ज्योती दिवाळीच्या राती।
तेजाची अन् स्नेहाची जन्मांतरीची नाती ।।

**प्रायोजक - श्री. आनंद व्ही. कुलकर्णी, पुणे**




दिवाळीचे दिवे नुसता प्रकाश देत नाहीत ।
आजच्या जगण्याला एक नवे आकाश देतात।।

संग्रही ठेवा - **'जिद्दीची लोभस रूपं'** - छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

एक रस्ता दाखवला; थेट पाकिस्तानात जाणारा...!!! इथून वाहाणाऱ्या सर्वच नद्या पाकिस्तानात का जातात? आपण त्यांचं पाणी का नाही बंद करू शकत? ... अशी भावना आमच्या एका सहप्रवाशानं व्यक्त केली होती... लष्करी ठाणी असलेल्या भागात वृक्षलागवड, जोपासना केलेली दिसते. तसंच जलव्यवस्थापनही केलेलं पाहायला मिळतं.

कारगिल सोडल्यावर जसजसा लेहकडे प्रवास सुरू होतो, तसे उंचच उंच पहाड दिसू लागतात. झाडं जवळजवळ नाहीतच. अत्यंत उजाड आणि रुक्ष असा हा प्रदेश आहे. वाटेत दुतर्फा, पहाडांवर जंगली गुलाब मात्र मोठ्या प्रमाणावर दिसतात. हिम, हिमनद्या आणि वाऱ्यामुळे या भागात प्रचंड झीजकार्य होत असतं. त्यामुळे इथल्या पहाडात विविध आणि विचित्र आकार कोरून काढल्याप्रमाणे दिसतात. हिमनद्यांनी आणून टाकलेला गाळ, राडारोडा मोठ्या प्रमाणात दिसतो. पर्वत शिखरांवरचं बर्फ दिवसभर उन्हानं वितळून पाण्याचे प्रवाह वाहतात. या पाण्यावरच इथलं मानवी जीवन सर्वस्वी अवलंबून असतं. पुढे पुढे बर्फाचंही प्रमाण कमी होत गेल्यानं त्यापासून मिळणाऱ्या पाण्याचं प्रमाणही कमी होतं. या भागात काही ठिकाणी 'लोंबत्या दऱ्या' हे वैशिष्ट्यपूर्ण भूरूप आढळतं.

'मुल्बेक गोंपा'पासून बौद्ध धर्मीयांचा लडाख सुरू होतो, असं म्हणता येईल. मुल्बेक गोंपा (मठ) व तिथलं कोरीव शिल्प सुरेख आहे. त्यानंतर 'नामिक-ला' ही खिंड ओलांडली की प्रदेश खूपच उजाड झालेला दिसतो. जिथे बर्फ वितळून पाणी मिळतं तिथे लोकवस्ती आढळते. याला आपण इथली मरुद्यानं म्हणून शकतो. मुख्य प्रवाहापासून छोटे नाले काढून त्या पाण्यावर थोडी शेती केली जाते. जमीन सुपीक आहे. योग्य वेळी योग्य प्रमाणात पाणी मिळालं तर चांगली शेती होते. सर्वच गाव त्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे पाणी वापराचं या लोकांनी उत्कृष्ट तंत्र विकसित केलं आहे. पाण्याचं दुर्भिक्ष्य असलं तरी सामंजस्यानं पाणीवाटप होतं.



**हेमिस गोंपा, लडाख**

इथलं पीक बार्ली. शेतीचा कालखंड जून ते ऑक्टोबर एवढाच असतो. त्या अवधीत वर्षभर पुरेल एवढं धान्य पिकवून साठवून ठेवलं जातं. हिवाळ्यात बरेचजण स्थलांतर करून कुरणांच्या प्रदेशात जातात व शेळी, मेषपालन करतात.

'फातू-ला' खिंड ओलांडली की 'लामायुरू गोंपा' दिसते. हे ठिकाण बौद्ध धर्मगुरूंच्या शिक्षणाचं मोठं केंद्र आहे. इथून पुढे गेल्यावर एक अद्‌भुत प्रदेश दिसतो. प्रवासाचा शीण विसरून, उन्हाची पर्वा न करता पर्यटकांच्या गाड्या इथं थांबतातच. इथे मोठमोठे रंगीबेरंगी खडकांचे पट्टे पर्वतात दिसतात. पर्वतांचे हिरवे, जांभळे, पिवळे धमक, राखाडी असे रंग पाहिल्यावर फार आश्चर्य वाटते. हिमालयाच्या निर्मितीच्या वेळी टेथिस समुद्राच्या तळाशी असलेले स्तरित खडक वर उचलले गेले. स्तरित खडकात असे रंगांचे पट्टे आढळतात. झांस्कर डोंगररांगांमध्ये अशा प्रकारचे तर लडाख डोंगररांगामध्ये अग्निजन्य खडक आढळतात. दोन भूपट्ट्यांमध्ये अग्निजन्य खडक निर्माण झाले. लामायुनंतरचा प्रवास सिंधू नदीच्या खोऱ्यातून सुरू होतो.

इतक्या पर्वतरांगांमधून खिंडींमागून खिंडी पार करत आल्यावर लेहच्या अलीकडे अचानक एका अफाट मोठ्या पठारावरून प्रवास सुरू होतो... आणि लेह जवळ आल्याचं जाणवतं. याच्या अक्षवृत्तात फारसा फरक नसला तरी हवामानात खूपच फरक आहे. लेह श्रीनगरपेक्षा उंचावर आहे, हवामान विषम

रंगाचा उधळुनिया पंखा, सांज कुणी ही केली ।
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली ।।

प्रायोजक - वैद्य धनंजय कुलकर्णी, पुणे



चंद्रकोरीच्या आकाराच्या वाळूच्या टेकड्या, हुंदर

आणि कोरडं आहे.

'लेह' एकूणच परदेशी प्रवाशांसाठी जणू सजलं आहे, असं वाटतं. रस्ते अतिशय गजबजलेले असतात. लडाखी पद्धतीचे कपडे, टोप्या, लोकरी कपडे, दागिने, कलाकुसरीच्या वस्तू आणि खाद्यपदार्थ यांनी दुकानं भरलेली असतात. फूटपाथवर भाजीबाजार असतो. इथे ज्या भाज्या उगवतात, त्याच! त्यामध्ये फारशी विविधता नाही. लडाखमध्ये जरदाळूचे मोठमोठे बगीचे आहेत. फूटपाथवर जरदाळू, सुगंधी वनस्पती हेही विकले जाते. लेहमध्ये सुसज्ज, चांगली हॉटेल्स् आहेत. हॉस्पिटल्स् आहेत. इथे मोटार सायकली भाड्यानं मिळतात. अनेक युवक व युवतीही bike-safari वर जातात.


लेहच्या आग्नेयेकडे 'प्यॉंगॉंग त्सो' नावाचे एक विशाल सरोवर आहे. हे सरोवर ४२४६ मीटर उंचीवर असून सुमारे १२५ किलोमीटर लांब पूर्वपश्चिम पसरलेले आहे. त्याचा ३०% भाग भारतात तर ७०% भाग चीनमध्ये (तिबेट) आहे. गोड्या पाण्याचा पुरवठा नाही आणि दिवसाच्या तापमानामुळे बाष्पीभवन जास्त – त्यामुळे अर्थातच हे सरोवर खाऱ्या पाण्याचं आहे. अतिशय स्वच्छ पाणी, ज्यामध्ये निळ्या, जांभळ्या, हिरव्या आणि मोरपंखी रंगांच्या छटा दिसतात; पण खाऱ्या पाण्यामुळे वनस्पती दिसत नाहीत. बाजूनं वाळू, वनस्पती नसलेल्या पर्वतरांगा; पण तरीही हे सरोवर वेड लावतं. तुम्ही हे सरोवर 'श्री इडियट्स'मध्ये पाहिलं आहे, पाहा आठवून! याठिकाणी जाण्यासाठी 'चँग-ला' खिंड ओलांडून जावे लागते. ही खिंड उतरताना 'याक'चे कळप चरताना दिसले.

पण तरीही खरंखुरं वाळवंट पाहायचं असेल तर लेहच्या उत्तरेला नुब्रा खोऱ्यात दिस्कितला जावं. इथे जाण्यासाठी 'खार्दुंग-ला'ही जगातल्या दुसऱ्या क्रमांकाची उंच खिंड ओलांडावी लागते. (उंची – ५,६०२ मीटर) ही खिंड ओलांडून लडाख डोंगररांगांमधल्या श्योक नदीच्या खोऱ्यात आपण उतरतो. नुब्रा ही श्योकची उपनदी आहे आणि श्योक पुढे सिंधूला जाऊन मिळते. दिस्कितमध्ये राहाण्याची सोय आहे. इथून आणखी उत्तरेकडे 'हुंदर' हे सीमावर्ती भागातलं ठिकाण आहे. इथे चंद्रकोरीसारख्या आकाराच्या वाळूच्या टेकड्याच टेकड्या दिसतात. 'वाळवंट' या शब्दाची खरी ओळख इथे होते. मोठं, विस्तीर्ण वाळवंट आहे, पण सभोवती मात्र उंचच उंच पर्वतरांगा. इथे दोन मदारी असलेले 'बॅक्ट्रियन उंट' दिसतात. हे उंट केसाळ आहेत. उन्हाळ्यात केस गळून पडतात आणि त्यापासून सतरंज्या, गालिचे व कपडेही बनविले जातात. फार पूर्वीच्या काळी चीनमधून लेह, श्रीनगरमार्गे तुर्कस्तान, युरोपपर्यंत मोठा व्यापार चालत असे. नुब्राचं सुयोग्य हवामान म्हणून ते आणि लेह ही या मार्गावरची दोन महत्त्वाची ठिकाणं होती, भरभराटीला आलेली व्यापारी ठाणी होती. प्राचीन काळी हा मार्ग 'सिल्क रूट' म्हणून ओळखला जात असे. लडाखमधील 'पश्मिना' मेंढीची लोकर श्रीनगरला जात असे व तेथे कारागीर त्याच्या शाली विणून अन्य ठिकाणी विक्रीसाठी जात असत. आजही पश्मिना शाली बहुतांशी श्रीनगरमध्ये विणल्या जातात. प्राचीन काळी भारतात येऊन गेलेले चिनी प्रवासी त्याच मार्गाने भारतात येत असत. इथे येणाऱ्या व्यापाऱ्यांबरोबर मालाच्या वाहतुकीसाठी बॅक्ट्रियन उंट प्रथम भारतात आले असावेत, असे मानले जाते. आता मात्र प्रदेश तोच आहे; पण पाकिस्तान, भारत व चीनच्या आंतरराष्ट्रीय सीमांमुळे हा मार्ग बंद झाला आहे.



वाणी रसाळ, प्रासादिक आणि चिंतनशील साहित्यिक, सरस्वतीचे सुपुत्र
कै. राम शेवाळकर व कै. शिवाजीराव भोसले यांना विनम्र अभिवादन
प्रायोजक - सौ. माधुरी वि. बनसोड, पुणे

लडाखला तिबेटची प्रतिकृती (Little Tibet) म्हणतात. लोक बौद्ध धर्मीय व मुस्लिम आहेत. बौद्ध धर्मीय लोक दलाई लामांचे भक्त आहेत. मुल्बेक गोंपानंतर अनेक गोंपा मठ दिसतात. दिस्कितमधील गोंपा ही सर्वात जुनी आणि मोठी गोंपा मानली जाते. लेहजवळील हेमिस गोंपा, थिक्से गोंपा, स्पितुक गोंपा प्रेक्षणीय आहेत. ठिकठिकाणी प्रार्थना चक्र आणि प्रार्थना पताका दिसतात. शिक्षणाच्या बाबतीत लोक जागरूक आहेत. लडाखी लोकांची स्वत:ची एक विकसित अशी वैद्यक प्रणाली आहे, आणि ती औषधे शहरात, खेड्यात उपलब्ध असतात. शेती करणे, लोकर काढणे, लाकूड-फाटा गोळा करणे, अगदी रस्तादुरुस्तीच्या कामातही पुरुषांपेक्षा स्त्रियांचाच सहभाग जास्त दिसतो. जीवन अत्यंत हालाखीचे आहे. जून ते ऑक्टोबर दरम्यान चालणाऱ्या पर्यटन व्यवसायात, सर्व ऋतुमानांत थोड्या फार प्रमाणात चालणाऱ्या ट्रेकिंगसाठी पोर्टर, गाईड, अशी कामे करणे, घोडे, उंट पुरविणे, हॉटेल्स् चालविणे इ. कामांत अनेकजण गुंतले आहेत. त्या काळात होणाऱ्या कमाईवर त्यांना वर्ष काढावे लागते. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी हॉटेल चालविणे हेच मोठे आव्हान आहे, तरीही सर्व सुविधांनी सज्ज हॉटेल्स् मोठ्या प्रमाणावर आहेत.



दोन मदारी असलेले उंट

लेहचा विमानतळ हा धोकादायक विमानतळांपैकी एक आहे. इथला रन् वे फक्त अडीच किलोमीटर आहे. 'टेक ऑफ' आणि 'लँडिंग' एकाच दिशेकडून होते. विमानाच्या इवल्याशा खिडकीतून जेव्हा शुभ्र हिमाच्छादित शिखरं दिसतात, तेव्हा दोन्ही डोळ्यांचं सार्थक झाल्यासारखं वाटतं.

लष्करी जवानांच्या हिमालयाएवढ्या उत्तुंग मनोधैर्याचं कौतुक वाटतं. त्यांच्या निगराणीमुळे या परिसरात आपण निश्चिंत मनाने पर्यटनाचा आस्वाद घेऊ शकतो.


**- अमृता जोगळेकर**
१३११, 'आराम', तळमजला,
शिवाजीनगर, पुणे 411005
amruta_kj@yahoo.com


# नुकसान किती ?

सायकलींच्या दुकानात एक माणूस गेला. त्याने एक ६०० रुपयांची सायकल घेतली. खिशातून १००० रु. ची एक नोट काढून दुकानदाराला दिली. ४०० रु. परत घेतले आणि शीळ वाजवत तो सायकलवरून निघून गेला. दुकानदाराची सगळी मोड संपली म्हणून ती १००० रुपयाची नोट घेऊन तो शेजारच्या वाण्याच्या दुकानात गेला आणि सुट्टे पैसे घेऊन आला. थोड्या वेळाने वाण्याच्या ध्यानात आले की ती १००० रुपयांची नोट खोटी आहे. साहजिकच तो ती नोट घेऊन गेला आणि दुकानदाराकडून १००० रु. परत मागितले. तोवर दुकानदाराचे ३०० रु. इतरत्र खर्च झाले होते, सायकलवाल्याचा पत्ता तर माहीतच नव्हता, म्हणून त्याने दुसऱ्या मित्राकडून ५०० रु. उसने घेतले आणि वाण्याला १००० रु. परत केले. तसे पाहिले तर दुकानदाराने उत्पादकाकडून ती सायकल फक्त ४५० रुपयात घेतली होती. आता या व्यवहारात दुकानदाराचे नक्की नुकसान किती झाले?

**(संकलित)**


तसा कुणी जो आहे अंधारात ।
आपणही द्यावा त्याला प्रकाशाचा हात ।।

**प्रायोजक - सौ. भक्ती अजेय राजंदेकर, पुणे**

सर्वाधिक व्याज देणारी...
...विश्वसनीय बँक

ज्येष्ठ नागरिकांना अधिक व्याज

सुखाचे आणि समाधानाचे आयुष्य...
आनंदाने उपभोगण्यासाठी...
बँकेच्या विविध ठेव योजनांचा लाभ घ्या.

स्नेह... सौख्य... साफल्याचे प्रतीक...

दि पेण को-ऑपरेटिव्ह
अर्बन बँक लिमिटेड

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा !

पुरुषोत्तम वसंत जोशी (मुख्य कार्यकारी अधिकारी)
अशोक लक्ष्मण झिंजे (उपाध्यक्ष)
शिशिर प्रभाकर धारकर (अध्यक्ष)

मुख्य कार्यालय : शिवाजी चौक, पेण, जिल्हा – रायगड (४०२ १०७)
☎ (०२१४३) २५२१३९,२५२७०६,२५४५३०,फॅक्स : (०२१४३)२५३३१५
ई–मेल : pcubpen@sancharnet.in




आज प्रकाशातून चालता मुक्तपणे यात्रिका।
स्मरशील का त्या तिमिरामधल्या शतावधी तारका?

संग्रही ठेवा - '**मृदुभाव जागे होता**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ३०/-

# गावा, मातीच्या संस्कारानं घडवलं

मा. गृहमंत्री, आर. आर. पाटील

*रावसाहेब रामराव पाटील म्हणजेच मा. आर. आर. पाटील हे आपल्या सर्वांना राजकीय क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. तासगाव तालुक्यातील अंजनी गावच्या सामान्य शेतकरी कुटुंबातला हा मुलगा आज महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्रिपद भूषवीत आहे. बालपणापासून शिक्षण प्राप्त करण्यासाठी केलेले परिश्रम, आईने मुलाला शिकवण्यासाठी केलेली तपश्चर्या, आयुष्यात प्रथमच जिंकलेली जिल्हा परिषदेची निवडणूक, उपमुख्यमंत्रिपद, गृहमंत्रिपद समर्थपणे पेलण्याची प्राप्त केलेली ताकद हा सारा प्रवासच विस्मयकारक आहे.*



सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात अंजनी नावाचं एक लहानसं गाव आहे. महाराष्ट्रातलं कुठलंही सर्वसाधारण गाव असावं तसं. १९५८ साली याच गावात माझा जन्म झाला. तेव्हा हे गाव दोनेकशे उंबऱ्याचं आणि हजारभर लोकवस्तीचं होतं.

तासगाव तालुका तसा खडकाळ माळरानाचा आणि दुष्काळी समजला जाणारा; त्यामुळे इथल्या माणसांना जगण्यासाठी काबाडकष्ट करण्याशिवाय पर्याय नव्हता. तासगावची सर्कस पूर्वी जगप्रसिद्ध होती. सर्कशीत काम करणं म्हणजे जीव धोक्यात घालणं. पण, इथल्या माणसांना त्याशिवाय पर्याय नव्हता. सतत राबत राहणं, काबाडकष्ट करत राहणं हा इथल्या माणसांचा स्वभावच बनला आहे. अशाच कष्टाळू माणसांनी मेहनत करून इथं द्राक्षाच्या बागा फुलवल्या. इथली द्राक्षंही पुढं जगप्रसिद्ध झाली. माझ्या लहानपणी अंजनीत अशी सतत शेतात राबणारी माणसं मी पाहात होतो. माझ्या घरातली माणसंही अशीच राबत होती. असे सतत राबण्याचे आणि कष्टाचे संस्कार इथल्या मातीनंच माझ्यावर केलेले आहेत.



वडिलांचा सहवास मला फारसा लाभला नाही. माझ्या लहानपणीच त्यांचं निधन झालं. पण त्यांचा जेवढा सहवास मला लाभला त्याचेही संस्कार झाले असणारच. सामान्य माणसाविषयी त्यांच्या मनात आपुलकी होती. आमच्याकडं गावातलं स्वस्त धान्याचं दुकान होतं. तिथं येणाऱ्या गरीब माणसाकडं पैसे नसतील तर त्यांनी त्याचं रेशन कधीच अडवलं नाही. एरवीही ते सतत लोकांना मदत करीत असत. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या दुकानाची अवस्था तुकाराम महाराजांच्या दुकानासारखी झाली. त्याचे कुटुंबावर विपरीत परिणाम झाले, तरी लोक मात्र त्यांचं नाव घेत असत.

माझं अंजनी गाव लहान असलं तरी इथल्या मातीत देशभक्तीची परंपरा फार जुनी आहे. शिवकाळात स्वराज्याच्या लढाईत एखादा मोहरा कामी आला तर त्या गावात त्याचा वीरगळ स्थापन करण्यात येत असे. वीरगळ म्हणजे त्या हुतात्म्याची स्मृतिशिला. असे पाच वीरगळ अजूनही आमच्या गावच्या मारुती मंदिरासमोर पाहावयास मिळतात. म्हणजे तेव्हापासून आमच्या गावाच्या माणसांच्या रक्तामध्ये देशभक्तीचा गुण होता. ती परंपरा आजही सुरू

सण तेजाचा, मांगल्याचा अन् समृद्धीचा।
मनोमनी उजळे प्रकाश, सण सुमंगल दीपोत्सवाचा ।।

प्रायोजक - डॉ. नितीन खेडकर, पुणे

आहे. माझ्या लहानशा गावातून शेकडो तरुण सैन्यात भरती झालेले आहेत. या मातीतला हा देशभक्तीचा गुण मला अजूनही भारावून टाकतो. स्वातंत्र्य संग्रामात इंग्रजांच्या विरोधात लढणारे अनेकजण सांगली परिसरातले होते.

मी शाळेत कधीही अनुपस्थित राहात नसे. शेतातल्या कामामुळं कधी शाळेत जाता नाही आलं तर मला फार वाईट वाटत असे. मी माझ्या वर्गातल्या मुलांना भेटून अनुपस्थितीत झालेला अभ्यास समजून घेत असे. गरज पडली तर गुरुजींनाही भेटून विचारत असे. माझ्या या स्वभावामुळे गुरुजीही मला जीव लावीत असत. अभ्यासाशिवाय शाळेच्या इतर उपक्रमांतही मी उत्साहाने भाग घेत असे. शेतातली, घरातली कामं करत आणि शाळेच्या इतर उपक्रमांत सहभागी होऊन देखील मी माझा पहिला क्रमांक कधीही जाऊ दिला नाही. मी वर्गात सतत पहिलाच येत असे.

मला आठवतं, सगळ्यांच्या घरासारखंच या छोट्याशा खेड्यातलं छोटंसं घर होतं आमचं. मोठ्या घरात माणसं एकमेकांपासून दूर गेलेली असतात; परंतु छोट्या घरात माणसं अधिकच जवळ आलेली असतात. मी माझ्या घरातला सर्वात मोठा मुलगा. गरिबीला तोंड देणारं खेड्यातलं साधारण कुटुंब, दोन भाऊ, दोन बहिणी आणि मी. आई काही शिकलेली नव्हती. वडिलांच्या निधनानंतर सगळी जबाबदारी तिच्यावरच येऊन पडली. चौथीपर्यंत मला नियमित नवी पुस्तकं आणि बरे म्हणण्याइतपत १-२ कपडे असत. पण नंतर दुःख आणि संकटं एकामागोमाग कोसळायला लागली आणि परिस्थिती बिघडत गेली. इतर मुलांसारखे आपल्या मुलांचे लाड-कोड पुरवता येत नाहीत, याचं आईला फार वाईट वाटत असे.

अशाही परिस्थितीत आई आमच्या भल्यासाठी जी धडपड करीत असे त्याला तोड नाही. गावात आणि आसपासच्या जत्रा सुरू झाल्या की आपल्याही हातात चार पैसे असावेत आणि आपणही जत्रेत जाऊन चुरमुरे फुटाणे खावेत, असं वाटायचं. अशावेळी आई कोंबडीची अंडी आणि दूध विकून जमवलेली पै-पै आमच्या हातावर ठेवत असे. चार-आठ आणे मुलांच्या हातावर ठेवताना आईलाही वेगळं समाधान लाभायचं आणि आई आपणाला फार काही देते, असं आम्हालाही वाटायचं; कारण खऱ्या प्रेमाची प्रचीती गरिबीतच येते.

जगातल्या कुठल्याही विषयावर बोलणं सोपं, पण आईविषयी बोलणं अवघड. या विषयावर बोलणं दुरून वाटतं तितकं सोपं नाही, इतका हा विषय आपल्या जवळचा, काळजातला असतो. ज्या मुलांना बापामाघारी आई वाढवते त्यांच्यासाठी त्यांच्या आयुष्यातलं सर्वस्व आईच असते. माझ्यासाठी माझ्या आयुष्यातलं सर्वस्व माझी आईच आहे.


वडील होते, तेव्हाही मी वडिलांजवळ फारसा जात नसे. मी सुरुवातीपासून आईच्याच आसपास होतो; त्यामुळे प्रत्येक गोष्ट, प्रत्येक हट्ट मला आईकडेच करावा लागत असे. तिची प्रत्येक कृती त्याही काळात मला काहीतरी शिकवून गेलेली आहे. कुटुंबावर कितीतरी संकटं आली पण त्या संकटांनी आई कधीच दबून गेली नाही. शेवटच्या आजारात वडील मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये दाखल होते, तेव्हा आईने त्यांना वाचवण्यासाठी अंगावरचे सगळे दागिने विकले होते. अगदी घरदार विकायचीही तिची तयारी होती; पण आम्ही वडिलांना वाचवू शकलो नाही. वडिलांनंतर तर आईच आमच्यासाठी सगळं काही होती.

पुढं घरची परिस्थिती लक्षात घेऊन मी छोटीमोठी नोकरी करण्याचा विचार करू लागलो. त्यासाठी शिक्षण सोडावं लागणार होतं. तेव्हा आई म्हणाली, ‘‘दिवस काही राहायला येत नाहीत. आला दिवस जातच असतो; हेही दिवस जातील. पण तू मध्येच शिक्षण सोडून दिलंस तर आयुष्यभर तुला अशीच छोटी-मोठी कामं करत जगावं लागेल. मी काहीही करीन पण तुला शिकवीन, तू शिक. आणखी चार


पाहा... कांसा - (पद्मदुर्ग) जि. रायगड
वैशिष्ट्यपूर्ण दुर्ग बांधणी, जवळचे ठिकाण मुरुड
प्लॅस्टोटेक इंजिनियर्स, ☎ २५४६६८६६ प्रायोजक - श्री. मिलिंद वैद्य, पुणे

वर्षं हलाखीत काढावी लागली तर काही हरकत नाही, काढू.''

मी सांगलीच्या 'शांतिनिकेतन महाविद्यालया'ची 'कमवा आणि शिका' योजनेची जाहिरात पाहिली आणि तिथे प्रवेश घेतला. आई गावाकडून रोज जेवणाचा डबा पाठवायची. पण तेव्हा आतासारखी गावाहून नियमित येणारी वाहनं किंवा एसटी नसायची. बहिणी सांगायच्या, एखाद्या दिवशी आई डबा पाठवू शकली नाही तर ती स्वत: दिवसभर जेवत नसे. तिला वाटायचे पैसे नसल्यामुळे आणि डबा न गेल्याने आपला मुलगा काय खात असेल? कुठं जेवत असेल? वडिलांच्या मृत्यूनंतर आईनं रात्रंदिवस कष्ट करून शेती पिकवली. आई शेती करायची परंतु आमच्या पिकांसारखी पिकं आसपासच्या शेतात नसायची. चार म्हशी, तीन एकर शेती आणि आम्हा पाच मुलांचं संगोपन एकटी आई करायची.



मी कधी कॉलेजमधून सुट्टीत गावी आलो, तर सहा वाजेपर्यंत आई घरी यायची नाही. येताना तिच्या डोक्यावर कधी जळणाचा तर कधी गवताचा भारा असायचा. 'मी घेतो भारा, माझ्या डोक्यावर दे,' म्हटलं तर नको म्हणायची, 'तुझी मान दुखेल,' म्हणायची. मला आपलं काहीतरी चुकतं आहे, असं वाटायचं. आईच्या डोक्यावर भारा आणि आपण रिकामंच घराकडं जातोय. कधी छोटा भारा असला अन् हट्टानं मी घेतला तर शेजाऱ्यापाजाऱ्याला सांगायची, 'नको नको म्हटलं तरी यानं ओझं घेतलं स्वत:च्या डोक्यावर.'

एक स्त्री आपली मुलं जगवण्यासाठी अहोरात्र किती कष्ट करू शकते, हे मी माझ्या आईने केलेले कष्ट पाहून समजलो. त्याचे मला कदापिही विस्मरण होणे शक्य नाही. आजही ज्या ज्या वेळी आईची भेट होते, तेव्हा मी नतमस्तक झाल्याशिवाय राहात नाही. फार मोठं तत्त्वज्ञान तिनं कधी सांगितलं नाही; पण चांगलं वागा हा सल्ला देणं तिनं अजूनही थांबवलं नाही. तिच्या मनात जातिभेद नव्हता. आईच्या मनात असलेल्या निर्मळपणाचे, तिच्या सहवासात आमच्यावर झालेले संस्कार, ही परमेश्वराने आम्हाला दिलेली एक चांगली गोष्ट आहे. आजही आम्ही भावंडांनी एकत्रित राहावं, प्रत्येकानं आपापल्या क्षेत्रात चांगलं काम करावं इतका तिचा साधा सल्ला आणि साधा उपदेश असतो.

मी विद्यार्थी असताना पहिल्यांदा जिल्हा परिषदेला निवडून आलो. स्वत:ला वेगळं समजत होतो. तेव्हा आई म्हशी राखायची. एकदा तिला काहीतरी अडचण आली तेव्हा मला म्हणाली, ''तू जा म्हैस राखायला.''

मी म्हणालो, ''मी आता जिल्हा परिषदेवर निवडून आलो, म्हशी राखायला गेलो तर लोक मला नावं ठेवतील.''

तेव्हा आई म्हणाली, ''तू जिल्हा परिषदेचा सदस्य आहेस तर तुला जेवायची पण गरज नसेल, तू आता उपाशीच राहा.''

रोजच्या प्रेमळ आईचं हे रूप पाहताना मी काय ते समजलो आणि सरळ गेलो म्हशी राखायला. संध्याकाळी परत आलो तर प्रत्येकाला सांगत होती, आज यानं म्हशी राखल्या म्हणून. हे सांगताना तिला अभिमान आणि आनंद वाटत होता. कुठल्याही कामाला कमी लेखू नये, वाट्याला आलेलं प्रत्येक काम जीव ओतून करावं, इतक्या साध्या साध्या गोष्टीतून शिकवण देणारी, धीर देणारी, प्रेमाचं व मांगल्याचं प्रतीक म्हणजे माझी आई.

आता भोवती थोडासा अंधार जरी असेल ।
या अंधारातही कुठंतरी दिवा दिसेल ।।

प्रायोजक - कॅ. सुहास फाटक, पुणे

**PAN INDIA - FULL SERVICE - GLOBAL LOGISTICS**

**A.T.C. (CLEARING & SHIPPING) PVT. LTD.**

**Corporate Office :** 901 Peninsula Towers, Ganpatrao Kadam Marg,
Lower Parel (West), Mumbai-400 013. India,
Tel : 91-22-6651 3000 (1000 Lines) Fax : 91-22-6654 1556 / 57,
Email:atc@atc.co.in/www.atc.co.in



# A.T.C. GROUP AT A GLANCE

**20 Offices In 15 Indian Cities**
**One Overseas Office - Dallas, U.S.A.**
**Group Staff Strength : 300 + Employees**
**Established : 1957**

## SALIENT FEATURES

- Licensed Custom House Agent
- IATA Air Cargo Agent
- ICEGATE Registered
- FMC (USA) Registered NVOCC & OTI
- On the Approved List of Leading Banks
- Licensed Multimodal Transport Operator
- Custom Approved Air & Ocean Consolidator
- Advance Manifest Filing
- Joint Stock Company With All Working Directors
- Illustratious Clientele

## REPERTOIRE OF SERVICES

- Custom House Agent
- International Freight Forwarder
- NVOCC : Service Contracts - Rate Agreements
- Over Dimension Cargo
- Road Transport / Own Trucks
- Forklift & Crane Hire
- Air Cargo Agent
- Groupage / Consolidation : Air - Sea
- MTO : DDP / DDU
- Warehousing & Distribution
- Packing & Palletisation
- FCL Consolidation For Single Supplier

## Branch Offices

**Pune I - City, Pune II - Pimpri, Panvel, Nashik, Aurangabad, Ahmedabad, New Delhi, Chennai, Kolkata, Bengaluru, Indore, Tuticorin & Gandhidham**

AGL ACL ACS

# GLOBAL LOGISTICS SOLUTIONS



शब्दकळांनी व्हावे गंधित, कविता नवी स्फुरावी ।
दीप उजळता अवघ्या सदनी, प्रकाशगाणी गावी ।।

संग्रही ठेवा - '**छंद आकाशदर्शनाचा**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

कधी आयुष्यात नाउमेद होण्याचा प्रसंग आला तर आईच खंबीरपणे पाठीशी उभी राहिली आणि तिने मला धीर दिला. आतापर्यंतच्या वाटचालीत जो काही चांगुलपणा आम्ही भावंडांनी मिळवला तो आईच्या शिकवणुकीचाच परिणाम आहे. वडील लवकर गेल्यामुळे त्यांच्या प्रेमाला आम्ही मुकलो. पण आई आणि वडिलांची भूमिका एकट्या आईनेच समर्थपणे पार पाडून दाखवली.

सांगलीच्या 'शांतिनिकेतन महाविद्यालयात' मी प्रवेश घेतला तो 'कमवा आणि शिका' या योजनेमुळे. घरून खर्च करून शिकण्यासारखी परिस्थिती नव्हती. योजनेत काम केलं तर आठ रुपये हजेरी मिळत असे. मी खुशीत होतो. न चुकता कामाला जात होतो. एके दिवशी लेबर स्कीमच्या पुढनं जात असताना बनियन, चड्डीवर काम करताना मला प्राचार्यांनी बघितलं. मोठ्या मुलांनी उचललेल्या पाट्या डोक्यावर घेत असताना मान कापत होती, त्रासल्यासारखं होत होतं. त्यांनी बोलावून घेऊन विचारलं, ''तू इतकी चांगली भाषणं करतोस, वक्तृत्व स्पर्धेत भाग का घेत नाहीस?'' मी म्हटलं, ''सर काम चुकवलं तर जेवणसुद्धा चुकतं, कॉलेजसुद्धा चुकतं आणि इतक्या लांब स्पर्धांना जाण्यासाठी माझ्याकडे पैसेही नसतात.'' त्यांनी सांगितले, ''खर्च सगळा कॉलेज करील आणि जे बक्षीस मिळेल ते तुझं असेल आणि स्पर्धेचा दिवस आणि तयारीसाठी दोन दिवस इथल्या कामावर तुझी हजेरी लिहिली जाईल.'' मला आनंद वाटला. आवडीचं काम करायला मिळणार, हजेरीही लागणार आणि वर बक्षीसही मिळणार!



पहिल्याच स्पर्धेला खूप तयारी करून गेलो. स्पर्धा कोल्हापूर जिल्ह्यामधील हुपरीला होती. सगळी कॉलेजची हिप्पीवाली फॅशनेबल मुलं. पण मी पैसे जास्त जाऊ नयेत आणि पुन्हा लवकर कटिंग करावी लागू नये म्हणून बारीक केस कापत असे. एक साधी विजार आणि एक साधा शर्ट माझ्या अंगावर होता. इतर मुलांच्या तुलनेत माझं दिसणं म्हणजे एक ध्यानच होतं. मी बोलायला स्टेजवर गेलो आणि बावळट मुलगा समजून जो हशा पिकला, तो माझ्या आयुष्यातल्या पहिल्या भाषणाचा पहिला प्रतिसाद होता. पण त्यामुळे मी आणखी धीट झालो. एक-दोन मिनिटांतच हसणाऱ्या या मुलांनी मला टाळ्या वाजवून प्रतिसाद द्यायला सुरुवात केली. स्पर्धेचा निकाल लागला आणि पहिल्या बक्षिसासाठी माझं नाव पुकारलं गेलं. त्यावेळी सन्मान होतो आहे यापेक्षा शंभर रुपये मिळताहेत याचं मला जास्त महत्त्व होतं. ढाल प्राचार्यांच्या हातात दिली आणि शंभर रुपये खिशात ठेवले. ते म्हणाले, 'स्पर्धा कुठेही असू दे, तू चांगली तयारी कर आणि स्पर्धेत भाग घे.'

स्पर्धेला जायचं म्हटलं की, वाचलं पाहिजे. स्पर्धा जिंकण्यासाठी मी इतका वाचत सुटलो की मला तयारीमुळे हमखास बक्षिसं मिळू लागली. या बक्षिसांवरच मी माझं आणि बहिणीचं कॉलेजचं शिक्षण पूर्ण करून दाखवलं.

त्याच काळात सांगलीला आकाशवाणी केंद्र निघालं होतं आणि त्यांना वक्त्याची आवश्यकता होती. प्रत्येक महापुरुषाच्या जयंती किंवा पुण्यतिथीला मला भाषणासाठी आकाशवाणीवर बोलावू लागले. त्या निमित्तानं मी सगळे महापुरुष त्या काळात वाचून काढले. कॉलेजच्या जीवनात सर्वात आधी मी काय केलं असेल, तर जितकं वाचता येईल तितकं वाचत गेलो. अनेक साहित्यिकांच्या अगदी सुरुवातीच्या साहित्यापासून शेवटच्या

घर सजवून तोरण बांधून साद ऐकूया दिवाळीची।
प्रकाशाची पूजा मांडून कास धरूया मांगल्याची॥

प्रायोजक - सौ. मंजिरी प्रशांत भागवत, पुणे




हजार दिव्यांचा सोनवर्खी प्रकाश ।
सनईच्या स्वरांनी मंजूळले आकाश ।।

संग्रही ठेवा - **'स्वीकारशील स्वदेशी'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

साहित्यकृतीपर्यंत त्यांचं समग्र लेखन वाचून काढलं. वाचनानं मनाला प्रगल्भता येत होती. चांगले संस्कार घडत होते.

१९७८ साली तासगावात विधानसभेच्या निवडणुका होत्या. दिनकर आबा म्हणून आमचे सभापती होते. त्यांनी त्यांच्या एका प्रचारसभेसाठी बोलावलं. त्या सभेत दिनकर आण्णांचं काम अत्यंत प्रभावीपणे मांडलं. नंतर प्रत्येक गावातून प्रचारसभांसाठी मलाच मागणी यायला लागली. कल्पना करा, गरीब कुटुंबातून आलेला, कॉलेजात शिकणारा एक विद्यार्थी आणि आमदारकीचा एक उमेदवार त्याला घ्यायला रोज आपली जीप वसतिगृहावर पाठवतो. त्या जीपमध्ये बसून जाताना जीप आपलीच वाटायची.

या प्रचारसभांच्या निमित्ताने मी जिल्हाभर फिरत होतो. जिल्ह्यातील प्रश्न कळत होते, शेतकऱ्यांच्या व्यथा समजत होत्या. ग्रामीण भागातली दुखणी समजत होती. ज्यांच्या सभा घेतल्या, ते अनेकजण यशस्वी झाले आणि मग राहून राहून असं वाटायला लागलं की, आपण ज्यांच्यासाठी सभा घेतल्या ते नेते होतात, ते जिंकतात; तर राजकारणासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात आपण आपलं नशीब का आजमावायचं नाही? आणि मी राजकारणात उतरण्याचा, निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.

पक्षानं मला जिल्हा परिषदेचं तिकीट दिलं. रात्री उशिरा आईला हे कळलं. मीही रात्री उशिरा घरी आलो. आई मला काही म्हणाली नाही. घरात जागा नव्हती म्हणून मी माळ्यावर जाऊन झोपलो होतो. आई सकाळीच येऊन माझ्या उशाशी बसली. मी डोळे उघडले तर समोर आई. माझी आई शब्दानं माझ्याशी खूप कमी वेळा बोलली, डोळ्यांनी ती जास्त बोलायची. मी पाहिलं तर आईच्या डोळ्यांत पाणी होतं. मी काय झालं म्हणून विचारलं. तर म्हणाली, 'राजकारणात असं काय पडलं आहे, तुझी भावंडं आणि तूही शिकताहात, शिक्षणाचं काय होईल?'

अशा अनेक शंका तिनं उपस्थित केल्या. मी तिला सांगितलं, आता सगळं नक्की झालं आहे. निर्णय बदलता येणार नाही. सगळं नीट होईल. तू काळजी करू नकोस. काल अर्ज भरू नको म्हणणाऱ्या माझ्या आईनं दुसऱ्या दिवशी सकाळी मी अर्ज भरायला निघालो, तेव्हा माझ्या हातावर दही-साखर घातली आणि काही न बोलताच मला शुभेच्छा दिल्या.

मी ही निवडणूक जिंकली. मी निवडून येईन, असं आईलाही वाटलं नव्हतं आणि मलाही. पण मी विक्रमी मतानं निवडून आलो, तेव्हा तिने छातीशी कवटाळून व्यक्त केलेला आनंद माझ्या आयुष्यातला सगळ्यात मोठा आनंद होता.

**मा. गृहमंत्री आर. आर. पाटील**
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०००३२
**शब्दांकन : इंद्रजित भालेराव**

## शिकण्याची तळमळ

एका मुलाला शिकण्याची खूप इच्छा होती. परंतु घरची गरिबी असल्यामुळे त्याला आई-वडील शाळेत घालू शकत नव्हते.

अशा स्थितीत तो सरळ एका शाळेत मुख्याध्यापकांना भेटावयास गेला. त्यानं आपली घरची परिस्थिती सांगितली आणि शिकण्याची इच्छा प्रगट केली. ''साहेब, मला शाळेत यायचं आहे. खूप शिकायचं आहे, मला द्या ना प्रवेश.''

मुख्याध्यापक म्हणाले, ''जर मी काहीही फी न घेता तुला शिक्षण देण्याचं ठरवलं तर त्या बदल्यात तू शाळेला काय देशील?''

''सर, मी रोज सकाळ, संध्याकाळ शाळेची सफाई करीन.'' त्याने लगेच उत्तर दिलं.

दुसरे दिवशीच तो शाळेत दाखल झाला, त्याचं शिक्षण सुरू झालं अन् सफाईचं कामही!

हा मुलगा म्हणजे **जॉर्ज वॉशिंग्टन**, जो अमेरिकेचा पहिला अध्यक्ष झाला.

**संकलन - केशव फडणीस**

*अव्हेरीत अंधाराला, करू तेजाचे पूजन ।*
*दीपमाला हृदयाची, पोहोचवू घरादारात ।।*

**प्रायोजक - सौ. ज्योती अंबरीश पाठक, पुणे**

# विठाबाई

झोपडपट्टीत राहणारी - घरअंगण झाडणारी
गरीब मुलगी विठाबाई - सदा हसतमुख राही
तिला गरीब कसे म्हणू? अडाणी तरी कसे म्हणू?
तिच्यामध्ये फूलपाकळी उमलतेय हळूहळू जणू

माझ्या वाढदिवशी फोन येत होते सारखे
शुभेच्छांचे गुच्छ घेऊन मित्र भरतीसारखे
अवतीभवती कोणी नाही याची तिने चाहूल घेतली
बागेतल्या सुवासिक फुलांनी माझी ओंजळ तुडुंब भरली
आणि म्हणाली, ''पंच्याहत्तरीतही आज तरुण दिसता''
तेव्हा तिच्या भाबड्या चेहऱ्यावर सूर्य उगवला होता.



नागपंचमीच्या दिवशी झुल्यावर आली झुलून
गाणं म्हणत तंद्रीमध्ये अंगण घर स्वच्छ करून
लगबगीनं उल्हासानं सुनेपुढं उभी राहिली
''छान ग विठाबाई'' या कौतुकानं लाजली
तेव्हा तिचा चेहरा कसा गोड चंद्रमा झाला होता

चालता चालता घराजवळ ठेच लागून नात पडली
तेव्हा केवढ्या काळजीनं विठाबाई तिथं धावली
रडू लागली तीसुद्धा नातीबरोबर हमसून हमसून
आवारातला दगडी पाला चोळला तिनं चुरगाळून
रक्ताळलेल्या पायावरती जेव्हा तिने लेप लावला
करुणाशील बुद्ध मला तिच्या चेहऱ्यावर दिसला

कालच्या पंधरा ऑगस्टला उगवत्या सकाळी
विठाबाई काढीत होती मन लावून रांगोळी
ती नव्हती पारंपरिक रोजच्या ठिपक्या ठिपक्यांची
दिसत होती मला तिच्या तन्मयता बोटांची
तिच्या सावळ्या बोटांतून - रांगोळीच्या रेषांतून
साकारत होता ताठ तिरंगा ध्वज उभा डौलातून
कोणीही न सांगता कसं आलं हे शहाणपण?
पोरवयातल्या या मुलीला कसं आलं गंभीरपण?
विठाबाईचा भाव निरागस किती देखणा दिसत होता!
तिच्या उजळ चेहऱ्यावरती स्वातंत्र्याचा उजेड होता

*चित्रकार - अभय पुरंदरे*



अभिमानास्पद... आदर्श कार्यकर्ता पुरस्कार
समाजसेविका नसिमा हुरजूक - (अपंगांसाठी केलेल्या कार्याबद्दल)
**प्रायोजक - सौ. उमा अजित बापट, पुणे**

शिकल्या सवरल्या लोकांपेक्षा उंच वाटली विठाबाई
झोपडीत असून कुटुंबातलीच वाटली मला विठाबाई
ती तर सगळ्यांपेक्षा खरी शहाणी असं वाटलं
गरीब असून गुणश्रीमंत रूप तिच्यामध्ये भेटलं
वाटलं, शुभंकर वारा आता वाहतो आहे
स्वयंनिर्भरतेची पहाट हळूहळू उगवत आहे.

**दत्ता हलसगीकर**
२० अ, जवाननगर, विजापूर रस्ता, सोलापूर 413 004

# समुद्र




समुद्र दिसतो खिडकीमधून
सतत येत राहातो लाटांचा आवाज
समुद्रगाज आदळत राहाते खिडकीच्या काचांवर
लाटांवरून तरंगत येते बिनधास्त हवा
शिरते घरभर
जागवते सर्वांगाला
फुलवते मनाला
खेचून नेते समुद्रापर्यंत.
समुद्राचं पहिलं दर्शन,
दूरवर पाणीच पाणी...
पायांना वेटाळणाऱ्या लाटांपासून
सरळ रेषेत दिसणाऱ्या समुद्राच्या टोकापर्यंत.
आपण किती लहान
तो विशाल. बिनधास्त. आपल्याच मस्तीत
मुक्त. खोडकर. खेळकर
खळखळत येते लाट पायापर्यंत.
कधी उसळलेली. सर्वांगावर आदळणारी. ओलांडून जाणारी
पायाखालून चुरचुरीत वाळू सरकणारी.
घरंगळत लाटेच्या अंगावरून धावणारा फेस...
लाट येते, जाते परत; होते समुद्राच्या आधीन
काठावर रेंगाळलेला, फेस मात्र दिशाहीन.
पाहता पाहता आपले मन जाते लाटेमागे
आणि आपण काठावर फेसामध्ये उभे...!

– **रेणू पाचपोर**, पाकळ्या, रचनानगर, परभणी


Bharat Petroleum

**सिद्धी गॅस एजन्सी**

**शुभ दीपावली**



**'भारत गॅस'चे पिंपरी परिसरासाठी वितरक**

**पत्ता:** प्लॉट नं. एच्-पी-१, एच् ब्लॉक, एम्.आय.डी.सी.,
पिंपरी, पुणे-४११ ०१८. ☎ : ०२०- २७४८५९६०

अन्याय भ्रष्टतेला अमुच्या जमी न थारा
जे जे अनाथ त्यांना पंखात ह्या निवारा
जाणून मंत्र घेऊ द्रष्ट्या ऋषीवरांचा
देवत्व त्यात पाहू जो दीन गांजलेला ।।



दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा

# किरण एजन्सीज


प्रकाश येतो जवळ, तसे खुलत जाते भान ।
नवेपणाने हरखून मीही, सुरात मांडतो प्रभातगान ।।

संग्रही ठेवा - **'हट्टी व्हा हट्टी'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ५०/-



# भूक

जयश्री कार्टीकर

“सर्जा वो ऽ ऽ ऽ...” हणम्यानं मारलेल्या या दणदणीत हाकेसरशी गुडघ्याभोवती हाताची गुंडाळी करून भिंतीला टेकून बसलेलं सर्जाचं मुटकळं शब्दश: कोलमडलं.


“वो सर्जाऽ ऽ ऽ...” परत एक दमदार हाक सर्जाच्या कानात घुसली. तसा सर्जा जरा जरा जागा होऊ लागला. आपण कोण, कुठे आहोत, काय करतो आहोत याचं भान त्याला येऊ लागलं. काल संध्याकाळपासून घडलेले प्रसंग एकामागोमाग आता पुन्हा आठवू लागले... कपाळावरची शीर तटतटू लागली... कानशिलं गरम होऊ लागली... हाताच्या मुठी वळू लागल्या... श्वासोच्छ्वास जोरजोरात होऊ लागला... झालेला अपमान, आपल्यावर दाखवला गेलेला अविश्वास, परिस्थितीनं लादलेली अगतिकता.. सगळं, सगळं ठसठसू लागलं.

“अरे ओ ऽ ऽ ....” पुढची हाक सर्जानं ऐकलीच नाही... जाणूनबुजून... *‘या हणम्याच्या ना... साला.., कशापायी आलाया इथं? काल सांच्याचा तमाशा पुरं झाला न्हाय क काय त्येला? मोक्याच्या वक्ताला झाला की पसार... आपणच येडचाप... गावलो त्या लोकानूच्या तावडीत... आता एखाद्या टायमाला चूक काय व्हत न्हाय क काय कुनाच्या हातून? तशी झाली आसल ना चूक माझ्याबी कडून. पन त्येची सिक्षा किती देणार? उगं मरेस्तोवर मारावं क काय कुनाला बी? त्या लोकानचं काय माझ्या मनाला फार लागूनशान राह्यलं नाय. किती बी झालं तरी ते परके-लांबचे, पन माय? ती तर सगी ना? आसं वागावं का मंग माझ्यासंगट? ती घरला आसल म्हनूनशान तर धूमशान पळत येऊन बिलगलोतो न्हवं का मायला. वाटलं व्हतं, आता काय बी काळजीचं कारान न्हाय. आता मला कोन काय बी करनार न्हाय. माझी माय आता मला पदराखाली घील पन् कसचं काय?... पर म्या म्हनतो माय अशी वागलीच कशी माझ्यासंगट?’*

“राजाऽ ऽ सर्जाऽऽ...” या मंजुळ हाकेसरशी चमकून सर्जानं खोपटाच्या दाराकडं पाह्यलं. डोक्यावर दोन अन् कंबरेवर एक अशा तीन, पाण्यानं शिगोशिग भरलेल्या कळशा घेऊन सर्जाची माय खोपटाच्या दारात उभी होती. एरवीचा सर्जा असता तर चटकन् उठून मायच्या कळशा तो उतरवू लागला असता.

पण आज असं काहीसुद्धा घडलं नाही. उलट सर्जानं जरा घुश्शातच मायकडं पाह्यलं फक्त. माय काहीच बोलली नाही. सर्जाशिवाय कळशा उतरवणं तिला थोडं जड गेलं; पण जमलं. नंतर स्टोव्ह पुढ्यात ओढत ती चहा टाकायला बसली; पण कालच्या झाल्या प्रकारानं तीही अस्वस्थ होती. बेचैन होती. आपल्या एकुलत्या एका पोरावर तिचा किती जीव होता! काल सर्जाला अशा अवतारात आलेलं पाहून तर तिच्या पायाखालची जमीनच सरकली. ‘काय रे’, ‘काय झालं रे’ म्हणेपर्यंत ४-६ जणांचं टोळकं चाल करून यावं तसं आलं की खोपटासमोर. चोरी? अन् ती बी सर्जानं केली? तिला हे सहनच झालं नसावं. कोपऱ्यातली काठी उचलून तिनं बदड बदड बदडलं होतं सर्जाला.

इंद्रधनुच्या रंगाने सजविते अंगणी रांगोळी ।
ठेवूनी त्यामध्ये पणती प्रकाशाच्या अनेक ज्योती ।।
प्रायोजक - श्री. सुरेंद्र सदाशिव ढमढेरे, शिरूर, जि. पुणे



‘‘कांते, कांते गंऽऽ...’’

किती वेळ झाला काय माहीत? या हाकेसरशी दोघंही एकदम भानावर आली.

‘‘बरं न्हाय क काय आज कांते? येतीस न्हवं कामाला? कालच्या मलमाचा उपेग झाला ना गं? चल की मग, आटीप की भरभर.’’

नाईलाजानं माय उठली. सर्जा अजूनही घुश्शातच होता. मायनंबी मग काही न बोलता घराचा उंबरा ओलांडला. सर्जाचा जीव कासावीस झाला. *‘आसं कायबी न बोलताच कसं काय गेली माय? आसं कसं विपरीत घडून शान राह्यलंय? म्या जवा घुश्श्यात असतो तवा माय माजी समजूत घालती, मला जवळ घिती. आन् अशी का वागाय लागलीय परक्यावानी आज? म्या काय इतका वंगाळ वागलोय का? आजपतूर ती*

***शहरांची झपाट्यानं होणारी वाढ आणि त्या अनुषंगाने वाढत जाणाऱ्या झोपडपट्ट्या, फूटपाथवर वाढत जाणारे जीव आपले नित्याच्याच पाहाण्यातले; पण का येत असतील लोक इथे असे फूटपाथवर राहायला? काय भावविश्व असेल इथल्या मुलांचं-लोकांचं? कधीतरी असाही विचार मनात यायला काय हरकत आहे? ‘सर्जा’ हा साधारण तुमच्याएवढाच मुलगा. साधा, सरळ स्वभावाचा. कारणच असं घडलं की त्याला नाईलाजाने शहरात येऊन राहायला लागलं...***




देवाचे गुणगान करणाऱ्या ओठांपेक्षा
उपेक्षितांची सेवा करणारे हात नेहमीच श्रेष्ठ ठरतील.

**प्रायोजक - श्री. रमाकांत शिवनारायण भुतडा, पुणे**



*कधी तर न्हाय ना अशी वागलेली. बापू असतानाबी न्हाय अन् तो अचानक् कुठं गायब झाल्यानंतर बी नाय...*

*बापू कुठं हायस रं? जिता तरी हायस न्हवं? तुला येतच न्हाय का रं याद आमची? मी अन् माय तर आज सा मह्यने झालं तुझ्या वाटेकडंच डोळं लावून की रं बसलो... त्या दिवशी तू शेरात (शहरात) दिसलास म्हनं की रं परम्याकाकाला...आन् म्हनून तर म्या अन् माय तुला शोधालाच तर आलो न्हवं का इतक्या इतक्यात इथं शेरात... तू येनार आन् आमाला पुन्हांदा गावाकडं घिऊनशान जानार असं मायनंच तर सांगितलं न मला. खरं सांगू का बापू, माझं मन काय बी केल्या लागत न्हाय बग शेरात. रातच्याला आपन कसं अंगनात बाजेवर पडूनशान अस्मान बघू बघू झोपी जायचो. काय लुक लुक चांदण्या दिसायच्या ना रं तवा? इथं शेरात आल्यापास्नं की न्हाय बापू म्या चांदणीच देखली न्हाय बघ अजूनशान... रातच्याला इथं सगळी बापेमानसं बाटली काढू काढू बसतात बघ इथं खोपटासमोरच. मग माय दार लावूनशानच घिती. मग कसल्या लुक लुक चांदण्या आन् कसचं काय? झोप बी कुटं येतीया धड? सारखे आपले रस्त्यावरचे मोटारींचे आन् कसकसले आवाज येऊनशान ऱ्हातात. हणम्या मला बलावतो तिकडं रस्त्याकडंच्या सिमेंटावर झोपायला. पर माय न्हाय सोडत... बापू मला अजाबातच न्हाय की रं करमत बापूऽ...'*

धडधड, धडधड, धडधड... रस्त्यावरच्या मशिनीचा आवाज आता घुमू लागला होता. कानठळ्या बसवणारा रोड रोलरचा धडधड आवाज, मुरुम-खडी-डांबर यांच्यावरून मागेपुढे होणारी त्या रोडरोलरची अवाढव्य लोखंडी चाकं... कळकट्टं पिपात काळंकुट्ट डांबर घालून ते उकळण्यासाठी खाली केलेला मोठा जाळ... त्या जाळातून वातावरणभर पसरत जाणारा काळामाळा धूर... सूर्य जसजसा वर येईल तसतशी या सगळ्याला घेऊन पार अस्मानापर्यंत वाढत वाढत जाणारी धग... सर्जाचा तर जीवच घाबराघुबरा होई...

आपलं ठणकणारं अंग सांभाळत, सांभाळत सर्जाचं काळं-हडकुळं ध्यान खोपटाच्या दारापाशी आलं. *'मायच्या अंगात येवढं बळ आलं तरी कुठून पन?'* त्याच्या मनात आलं. *'इथं या शेरात दुसरं कुनीबी तर न्हाय न्हवं माझ्या संगतीला. आन् म्या काय फकस्त या खोपटातच बसूनशान जनम् काढावा क काय मंग?*

*हणम्या पन् लई शाना हाय. माय दुपारच्या टायमाला पल्याडच्या पुलाच्या कामावर गेली का न्हाय हणम्या आलाच घरात. तोपतूर मात्र गडी आडून आडून हाका देत राहातो*


**सौख्य समृद्धी घेऊनी आली उंबरठ्यावरती प्रकाश पणती।**
**अन् दीपावलीची शुभःप्रभा भरून राहिली अवतीभवती।।**

पहिलेच पाऊल योग्य उचला, **प्रायोजक - श्री. चंद्रशेखर चितळे, पुणे**

*फकस्त. हणम्या मला काय बाय सांगत बसतूया... वंगाळ वंगाळ काय पन. एखादया टायमाला बलावलं तर जावं बी लागतंया कुटं कुटं त्याच्यासंगट... दर टायमाला 'न्हाय' तरी कसं म्हनावं? काल पन् न्हवं का आसंच गेलोतो त्याच्यासंगट वरच्या मंडईकडं...*

*आमी असंच पुढं पुढं जात व्हतो तर यकदम एक केळं दिलं नव्हं का काढूनशान हवेतूनच. आ? हणम्याला जादू-टोना बी येतूया क काय? म्या तर बघतच ऱ्हायलो. तसं त्यानं मला बी हा जादू-टोना शिकवला. मग म्या पन् एका ढकलगाडीवरचं केळं पटकन् तोडूनशान घेतलं अन् चट्दिशी चड्डीच्या खिशात कोंबलं. कुनाला कायबी पत्ताच लागला न्हाय. 'भले शाब्बास !' हणम्या म्हनला. मग मलाबी लईच भारी वाटाया लागलं. म्हनलं असंच थोडं कांदं-बटाटंबी घ्यावं की. तेव्हडंच मायलाबी उपयोगी पडल. नुसतीच भाकर तोडण्यापरीस हे बेस. म्हनलं मायबी खुश अन् आपुनबी खुश ! १-१, २-२ करून चांगलं ढीगभर जमवलं की कांदं-बटाटं ४-६ गाड्यांवरून. पन् कसं काय झालं कुनाला ठावं? २-४ वांगी घिऊनशान कांदं-बटाट्याच्या ढिगाऱ्याशी आलो तर माझं मानगुटच पकडलं न्हवं का कुनीतरी ! पार कळवळलो म्या 'माय गंऽऽ' करून. थाड थाड थपडा बसत व्हत्या थोबाडावर. सटपटलोच म्या एकदम. हा हणम्याबी कुटं दिसेनासा झाला. मी एकटाच गावलो न्हवं का यांच्या तावडीत. 'द्या रे याला पोलिसांच्या ताब्यात', 'दिसतंय तर किती साधं; पण आहे पक्कं बेरकी' असं काय काय आयकू येत व्हतं. गरदी वाढतच व्हती. 'नाय वो, मी नाय वो', 'पुन्हांदा नाय वो' असं काय बाय म्या सांगत व्हतो. माझी तर बोबडीच वळली. चड्डी गिल्ली व्हायचीच काय ती बाकी व्हती. म्या त्येंच्या तावडीतनं कसाबसा सटकलो ते थेट घर गाठलं. माझा हा असा अवतार पाहून मायबी परेशान झाली. म्या काही सांगावं म्हनलं तर मागाहून आलेच की समदे. मायला कायबाय सांगू लागले. मायनं एकवार माझ्याकडं नजर केली. न् मंग कोपऱ्यातली काठी उचलूनशान मला पुरतं बुकलून काढलं की रं बापू. कुठं हायस रं बापू? मला न्हाय ना ऱ्हायाचं या शेरात...'*

''काय सर्जेराव ठीक हायस ना रं?'' दारात हणम्याला पाहून माय पल्याड गेल्याचं सर्जाला कळालं. सर्जाचं काळं-निळं झालेलं अंग, सुजलेलं गाल, आत गेलेले डोळे... हणम्या तर फिदी फिदी हसूच लागला. काळ्या-निळ्या डागांवर पांढरं पांढरं मलम लावल्यानं भुतासारखंच दिसत होतं ध्यान.

''लेका तुझं बरंय. मायनं मारलं तरी मलमबी तर लावलंया. आमच्याकडं तवडं बी सूख नाय लेका. भाग्यवान हायेस. अन् ह्ह्ह्ह मार खायला घरला यायचंयच कशाला म्हनतो मी? दुसरीकडं कुठं लपता येत नव्हतं व्हय रं लेका.''

*'मायनं लावलं मलम? अन् त्ये कवा? आपून उगाच घुश्शात ऱ्हायलो मायसंगट.'* त्याला वाईट वाटू लागलं. *'रातच्याला माय जवळ बसून काय-बाय बडबडत व्हती अन् आपन?'* त्याला धड काही आठवेना. *'सकाळच्याला कमल मावशी मलमाबद्दल बलत व्हती नव्हं का?'* त्याचं तोंड एवढुसं झालं.

''लेका सर्जा, तुज्या मायनंबी आज काईच पकवलेलं दिसेना की रं गड्या. सपाटून भूक लागलीय बघ.'' स्टोव्हपाशी जाऊन २-४ भांडी वरखाली धुंडाळत हणम्या पुढं म्हणाला, ''येथला तमाशा देखला मी दिन्याच्या खोपटाआडून. घरी गेलो तर तिथं दुसराच तमाशा चाललेला बघ. माझा बाप बाटली

ऐका... राग हंसध्वनी - 'जयोस्तुते श्री महन्मंगले'
(गायक-लता मंगेशकर व सर्व मंगेशकर भावंडे)

**प्रायोजक - श्री. श्रीकांत सदाशिव जोशी, पुणे**

लावूनशान आलेला कालच्याला बी. आधी त्येनं मायच्या मुस्काटात मारली. मग मायनं बापाला बदडायला सुरुवात केली. झटापटीत बाप पडला की रं... खाली. अन् खोकच पडली मग त्याच्या डोस्क्याला. हाय का आता... लेका तू भाग्यवान रं; आयला तुज्या बापावानी माझा बापही उलथायला पायजे व्हता कुठंतरी.''

''हणम्याऽऽ...'' सर्जा जीव खाऊन ओरडला.

आवाजानं हणम्या चमकला. म्हणला, ''राह्यलं. बरं चल आता जाऊ मंडईकडंच... असा बघतूयास काय मारकुट्या म्हशीवानी? इथं बसूनशान काय हे दु:ख कमी व्हनार हाय व्हय तुझ्या अंगावरचं? उलट अजून वाढतच जाईल बघ. चल की जरा बाहर...''

*'आपण बाहेर गेल्याचं कळल्यावर मायला काय वाटंल?'*

''आरं चल की आता. का जास्त भाव खाऊनशान राह्यलास? आरं आज शनिवार हाये. मंडई तर कवाच संपूनशान गेली आसल. कालचे बी लोक आता या वक्ताला तिथे असणार न्हाईत. मंग चल तर खरा. आज प्वाट भरायची मस्तपैकी दुसरीच आयडिया देतो तुला, चल...''

जराशा नाखुषीनंच सर्जा खोपटाबाहेर पडला. बाहेर येताच हणम्यानं ठेवणीतला आवाज दिला. त्यासरशी दिन्या, मन्याही येऊन मिळाले. त्यांची पलटण धीमे धीमे मंडईच्या दिशेने सरकू लागली. हणम्या बोलत होता ते बरोबर होतं. मंडईत तशी सामसूम होती. तुरळक कुणी दिसत होते. मंडईत पोचल्या-पोचल्या हणम्या, दिन्या वगैरे मंडळी खाली वाकून काही-बाही उचलायला लागली होती. सर्जा नीट वाकू वाकू बघू लागला. भाजीविक्यांनी जाताना बाजूला टाकून दिलेले, सडलेले कांदे-बटाटे, भोकं पडलेली वांगी, जून झालेल्या, किडलेल्या शेंगा, काळा-पिवळा पडलेला फ्लॉवर आणि असंच काय-काय... सर्जाला कसंसंच झालं एकदम...

*'बापू, काय जिंदगानी आणून ठिवलीस रं आमच्या वाटंला? काय मिळवलंस रे दूर जाऊनशान आमच्यापास्नं?'* सर्जाला त्याच्या बापूची जास्तजास्तच याद येऊ लागली. *'तिकडं गावाकडं पाटलाच्या मळ्यातनं येताना बापू ताजी भाजी घेऊनशान यायचा. माय मग त्याचं कालवण करायची. गरम गरम भाकर करूनशान जेवाय वाढायची. मला वांग्याचं कालवण तर लईच आवडायचं. यकदा मी अशीच वांगी घेऊनशान आलोतो न्हवं का येताना मळ्यातून... कुणालाबी न इचारता. तवा मायनं मला वापस धाडलं व्हतं. पाटलाला विचारून घेऊनशान यायला सांगितली व्हती वांगी. दुसऱ्याला न इचारता काई घितलं की ती चोरीच की ! काल माज्या हे ध्यानातूनच गेलं न्हवं का. आन् म्या उगाच घुश्शात ऱ्हायलो कालधरनं.'*

भाजी मंडई संपून फळांची मंडई लागली आता. फळांचा एकत्रित, जोरकस वास एकदम सर्जाच्या नाकात गेला. तसा सर्जाच्या पोटात मोठ्ठा खड्डा पडला. कालपासनं त्याच्याही पोटात काहीसुद्धा नव्हतं. पोटाची मागणी वाढू लागली... नको असलेल्या फळं-भाज्यांच्या ढिगाऱ्याला तोंड लावणाऱ्या गाईला 'हुक हुक' करून हाकलून लावत हणम्या-दिन्याचं 'वेचणं अन् भरणं' सुरूच होतं. सर्जाकडं कुणाचंच लक्ष नव्हतं. त्या 'जास्त' झालेल्या फळांमध्ये काय करावं ते नकळून तो नुसताच उभा होता...

*'काय हुईल एखादं उचललं म्हणून? पन् आसं कसं उचलनार? का न्हाई उचलायचं पन? कुनी पाह्यलं तर काय म्हनंल? इथं कोन भेटनार*

झळाळती लक्ष ज्योती, घरीदारी अंगणात।
सारे न्हाऊन निघते, सोनियाच्या सागरात ।।
'नातू प्रतिष्ठानतर्फे दिवाळीनिमित्त शुभेच्छा !' **प्रायोजक - नातू प्रतिष्ठान, पुणे**

*आपल्या वळखीचं? आन् जरी कोन भेटलंच वळखीचं तरी पन् काय झालं? मायला काय वाटल पन? काय वाटायचंय त्यात आनि? चोरी तर करत न्हाय न्हवं? कालच्याला न इचारता घेतलं कांदं-बटाटं - ती चोरी. चुकीच झाली. मान्य हायेच न्हवं का मला आता ते. पन् ही चोरी कुटाय? न्हायतरी हे टाकूनशानच तर दिलंय न्हवं का त्येंनी? त्यांना नकोच हाये ना हे. मग म्या उचललं त्यातलं एखादं तर काय चूक हाये का त्यात? पैका न्हाय म्हनूनशान इकत घेता येत नाय अन् न इचारता घितलं तर ती चोरी व्हतीय. मग घ्येवं कसं म्या? काय करावं तरी काय म्या? उपाशी मरावं की उचलावं एखादं?'*

सर्जाच्या मनाची पुरती उलघाल चालली होती. एकीकडे पोटात उठलेला शूळ त्याला अस्वस्थ करत होता. तर दुसरीकडे नीती-अनीती, चूक-बरोबरच्या हिंदोळ्यावर तो हेलकावे खात होता. आशाळभूतपणे त्या ढिगाऱ्याकडे पाहात होता. दोनदा पुढं गेलेला हात त्यानं बळबळं मागे घेतला होता.

''काय रं लेकरा? असा काहून पाहून राह्यला या ढिगाऱ्याकडं?'' नेहमी त्या फूटपाथवर बसणारे रणूजी बाबा सर्जाला विचारत होते.

''न्हाय, काय न्हाय,'' म्हणत सर्जा तिथेच उभारला.

''आरं राजा. त्या लोकान्ले नको व्हतं म्हणूनशान तर टाकून गेले न्हवं का हे दानं इथं. तुला पायंजे आसल तर घे बाबा. ही काई चोरी न्हवं. 'त्योच' तर ठिवतो न्हवं का हे दानं आपल्यासाठी.''



सर्जानं चमकून पाहिलं, *'म्हणजे रणूजीबाबा बी व्हते की काय कालच्याला इथं?'* पण त्याचबरोबर आपण यातलं काही उचललं तर ती चोरी नाही; हा विश्वास सर्जाला मिळाला. त्याच्या मनाची मगापासून चाललेली उलघाल संपली. त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला.

रणूजीबाबांकडं बघत त्यातल्या त्यात कमी काळी झालेली २ केळी खाली वाकून उचलून पटकन त्यानं चड्डीच्या खिशात कोंबली. मग थोड्या वेळानं पुढं जाता-जाता त्यातलं एक केळं त्यानं हळूच बाहेर काढलं. केळ्यावरचं काळं आतल्या काळपट गराला चिकटलेलं साल बाजूला करण्याचे प्रयत्न तो करू लागला. 'खावं की खाऊ नये' या प्रश्नानं डोकं वर काढलंच. पण पोटातली 'काव काव' जास्तच वाढली. साल बाजूला करून तो केळं खाणार एवढ्यात त्याला त्याच्या मायची याद आली. तो कासावीस झाला. *'आज मला उपास घडला. मला भूक लागली. तसं मायला बी तर प्वाट हाये. माझ्या परमानं तिला सुदिक भूक लागली असनारच न्हवं का? आन् मला दिल्याबिगर ती काय सुदिक खानार न्हाय. माय तर अजूनशान उपाशी बसून माझी वाट पाहात आसल न्हवं का?'* या विचारासरशी सर्जानं पटकन् ते केळं खिशात रेटलं अन् मागे वळून तो घरचा रस्ता पळू लागला.

❖❖❖

**जयश्री काटीकर**
बी-८, शिवामृत सहकारी गृहरचना,
आनंदनगर, सिंहगड रस्ता,
पुणे 411 051
jayakatikar@rediffmail.com

***चित्रकार - गिरीश सहस्रबुद्धे***



अभिमानास्पद... सेरा ॲवार्ड
प्रसिद्ध उद्योजिका आणि समाजसेविका लीला पूनावाला
**प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, पुणे. ☎ ९४२२०७१४९०**

# ऐका माझा विनोद....

**वकील** – (टेलिफोनवर) तुम्ही जे सांगता त्यासाठी ते तुम्हाला जेलमध्ये टाकूच शकत नाहीत.
**पक्षकार** – मग मी तुम्हाला आत्ता कुठून बोलतो आहे असं वाटतं? वाचनालयातून?





''तू किती दिवसांपासून जेलमध्ये आहेस?''
''दहा दिवसांपासून.'' ''काय चार्ज आहे?''
''चार्ज काही नाही. इथं सगळं फ्री आहे.''
''तसं नव्हे. तुझा गुन्हा काय?''
''मी बायकोला ठार मारलं.''
''काय? बायकोला ठार मारलं आणि फक्त दहा दिवसच तुरुंगवास?''
''हो. दहा दिवसांनी फाशी देणार म्हणतात.''

एक मुलगा मैदानात सायकल चालवत होता. त्याची आई त्याच्याकडे अभिमानाने बघत होती.
पहिली चक्कर मारून होताच तो आईला म्हणाला, 'बघ आई... हाताशिवाय...'
दुसरी चक्कर मारून होताच तो म्हणाला, 'बघ आई !.... पायाशिवाय...'
तिसरी चक्कर होताच ओरडला, 'आई, दातांशिवाय.'





एका कवी संमेलनाला अफाट गर्दी पाहून एक कवी आयोजकांना म्हणाला, ''वा !... तुमच्या गावात कवितेवर प्रेम करणारे बरेच रसिक श्रोते दिसताहेत.'' ''ते श्रोते नाहीत.'' आयोजक म्हणाले, ''ते सर्व कवी आहेत. स्टेजवर बसायला जागा नाही म्हणून ते सर्व खाली बसले आहेत.''

*चित्रकार – सौरभ उपळेकर*

स्वप्न पाहणारे डोळे आणि साकारणारे हात दे ।
माझ्या सुंदर ध्येयाला माझ्या माणसांची साथ दे ।।
Hydrolinks

(पान क्र. ७८ वरून पुढे चालू)

# तन्मयीची सुट्टी

दिवसाचा निरोप घ्यायला तिथे कोणाला वेळच नाही. येथे तर संध्याकाळ सर्व रंगरूप वासाबरोबर मावळत आहे. या संध्याकाळला कुशीकाकीच्या मिठीची मार्दवता आहे.

पिवळ्या ठिपक्याच्या फुलांचा सुगंध आहे. तन्मयी उठून कुशीकाकीकडे धावली. स्वयंपाकघरात पोळ्या करत असलेली कुशीकाकी आता कुसुमा दोडवाड झाली होती. युनिफॉर्म घालून स्काऊटला जात होती. गावातील रस्त्यावर वाहनांना आदेश देत होती. वेगाने धावून चारशे मीटर अंतर पार करत होती. प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटामध्ये लकलकणारे शील्ड स्वीकारत होती. परंतु त्याच युनिफॉर्ममध्ये, त्याच वेगात धावत, लग्नमंडपात शिरल्या क्षणी साऱ्या टाळ्या बंद झाल्यासारखे वाटून ती दचकली. तन्मयी काकीला चिकटून उभी राहिली. ती हुबेहूब छोट्या कुसुमासारखी दिसली. तिच्या हातात लाटणे होते. आवेशाने काकीने ते हिसकावून घेतले. तिला बाजूला सारून, ''तू करू नकोस. बाहेर जा,'' म्हणाली.

रात्री तन्मयीच्या स्वप्नात परत तेच मोठे परीक्षा केंद्र... 'तुझा पेपर आजच आहे माहीत नाही का?' असे दरडावणारे... मोठी पट्टी, टेप धरून काहीतरी मोजणारे... परीक्षा केंद्रात तिला तिची सीटच सापडत नाही... मिळाली तर खिशात हॉल तिकीट नाही... हजारो मुलींमध्ये एकही मैत्रीण नाही... घामाघूम होऊन तन्मयी उठली. तेवढ्यात छातीला नेम धरून गोळी लागल्यासारखा घड्याळाचा कर्कश गजर झाला. पाठोपाठ ''ऊठ रे... ऊठ रे'' असा काकांचा अभ्यासासाठी मंजूला उठवण्याचा आवाज.

'कित्तूर चेन्नम्मा' बागेत दर रविवारी सिनेमातील गाणे वाजवणाऱ्या पोलीस बँडमध्ये तल्लीन होणारा मंजू... लहान असताना 'मी मोठा झाल्यावर ड्रम वाजवणारा होईन', असे म्हणायचा. बँडच्या लोकांचे बाबा त्यांना इतके सतावत नाहीत, असे त्याला वाटत असावे. आता तन्मयीच्या स्वप्नात मंजू अंगभर जरीचा अंगरखा घालून ड्रम वाजवत खुशीत चालला होता. ''ऊठ रे... ऊठ रे...'' काकाचा आवाज आता अगदी तारस्वरात पोचला. तन्मयी पण उठून बसली. आपल्यालाच उठवायला काका इतका ओरडतोय की काय? तन्मयीच्या पोटात पुन्हा कालवाकालव होऊ लागली. 'काका काकीशी का हळुवारपणे बोलत नाही? जेवायला बसलेला असतानाही न बोलता भराभर जेवतो. काकीच्या चेहऱ्याकडे पाहातच नाही. काकी का गुपचुपपणे रडत असते? 'तुला ज्यात आनंद वाटतो तेच तू कर' असे मला का उत्तेजन देते?... ॲडमिशन्‌च्या वाटा धावण्याच्या वाटा... मोजमापाच्या वाटेच्या कडेला एक काका असतो का पोळपाट लाटणं असतं? कुशीकाकीने लिहिलेल्या कविता कुठे गेल्या?' स्वप्नासारखी कुशीकाकी तन्मयीच्या शेजारी येऊन बसली. तिचे गाल ओले वाटले.

आज काका कुठेच गेले नाहीत. पहारा करण्यासाठी घरातच होते.

दुपारी जेवण झाल्याबरोबर काका मोठा आवाज करत कुठेतरी निघून गेला. आजी-आजोबा झोपले होते. जुने वर्तमानपत्र चाळत बसलेल्या तन्मयीला कंटाळा आल्याने ती कुशीकाकीकडे आत गेली. ती तिथे दिसली नाही. मागचा दरवाजा उघडून पाहाते तर काय... विश्वास न बसणारे दृश्य दिसत होते. मागच्या छोट्या आवारात साडी कमरेला खोचून घामाघूम होत काकी हातात सायकल धरून सीटवर



अभिमानास्पद... ग्रुपकॅप्टन मानदपत्र बहाल-ज्येष्ठ क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर
(क्रिकेटमधील देदीप्ययमान कामगिरीबद्दल)
**प्रायोजक - श्री. रवींद्र महाजन, पुणे**

चढायचा प्रयत्न करत होती. रिमझिम पावसाबरोबर ऊनही पडल्याचे विलक्षण वातावरण होते. तन्मयी न बोलता लपून पाहू लागली. कुशीकाकीने धावतच पॅडलवर चढून सरळ उभं राहात सीटवर चढावे तेवढ्यात आवारच संपत होते. यावेळी ती पॅडलवर चढून सीटवर बसलीच... ओहो! तिच्या चेहऱ्यावर केवढा आनंद ओसंडत होता! तेवढ्यात खोचलेली साडी अडचण वाटून ती खाली उतरली. आता तन्मयी न राहवून तिकडे धावली. ''कुठं विसरलं की काय... तुला शिकवायला मला नीट यायला हवी ना सायकल...'' कुशीकाकी म्हणाली... ''अगं एक मिनिट धर ना,'' म्हणत सायकल तन्मयीच्या हातात दिली व वाकून साडीचा कासोटा घातला. तन्मयीने मागून सायकल धरली असतानाच कुशीकाकी झुमदिशीने सीटवर चढून बसली व तोल सांभाळल्याच्या खुशीत एक चक्कर मारली. ''काकी, आयडिया! तू माझं एखादं सलवार-कमीझ घाल ना...'' तन्मयी म्हणाली. कुशीकाकी छोट्या मुलीसारखी आनंदली. खुशीत आत धावत येत तन्मयीचे पिवळे सलवार-कमीझ घातले. आरशात पुन:पुन्हा पाहून घेतले. तन्मयीला कुशीकाकी आपल्या मैत्रिणीइतकी छोटी वाटली. दोघींनी घाईघाईत आवाज न करता सायकल बाहेर काढली. कुशीकाकीची मंजूवरची माया दाटून आली. ''तू ही चल रे... आकाशवाणीच्या रस्त्याला जाऊया. तन्मयीला सायकल शिकवू या,'' म्हणाली. अगदी पहिल्यांदा आपल्या आईला या नवीन पोशाखात पाहून मंजू गडबडला. घाबरून ''नाही'' म्हणाला. शिवाय आपण गेलो तर इतकी मोठी चहाडी करायला कोणी राहाणार नाही, असाही विचार त्याने केला.

दुपारची शांत वेळ. ओल्या गरम रस्त्यावर रिमझिम पावसात पळतपळत कुशीकाकी सायकलवर चढली. तन्मयी मागून गार्ड धरून धावली. काकीच्या नजरेसमोर मातीचा रस्ताच दिसत होता. कितीतरी वर्षांनंतर सायकलवर चढलेली... तन्मयीचे कपडे घातलेली कुशीकाकी मधूनच धडपडायची. आकाशवाणीच्या रस्त्यावर पोचल्यावर तिथल्या गारव्यात विलक्षण शांतता होती. मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रकचे आवाज अगदी दुरून ऐकू येत होते. ओली झुडुपे आपल्या ठिपक्यांच्या पिवळ्या केशरी फुलांचा सुगंध वाऱ्यात मिसळत होती. विचित्र भीतीचे जग कुठेतरी लांब सोडून आल्यासारखा दोघींना उत्साह वाटत होता.

बऱ्याच वेळानंतर काका घरी आला. आल्या आल्या मंजूने आपले तोंड फुटेल अशा आवेशाने सर्व काही सांगितले. 'कुठं आहेत दाखव' असे ओरडतच काका बाहेर पडला. मंजू धावत पुढे... काका मागून भराभरा चालत आकाशवाणीच्या रस्त्यावर आले. ''कुठं आहेत रे?'' असे काका गरजला. मंजू ''ते बघा तिकडे'' म्हणत दाखवत होता. त्या हिरव्याच्या दाटीत निसर्ग हसत होता. दूरच्या उतारावर सायकलवर बसलेली तन्मयी की कुशीकाकी हे समजत नव्हते. एकीने गार्ड धरले होते व एक सायकल चालवत होती. एकाच प्रकारच्या कपड्यातल्या दोघी सारख्याच दिसायच्या. आश्चर्याने आ वासून उभ्या असलेल्या काकाला सोडून मंजू हे हे म्हणत त्यांच्याकडे धावला. तो रस्ता एकीकडे जरा चढावरून जात होता. दोन्हीकडे उभे असलेले मोठे वृक्ष. रंगीत चित्रातल्या वेगवेगळ्या दृश्यांचे रंग एकमेकांत मिसळल्यासारखा पाऊस पडतच होता. चढाच्या वळणावर केशरी व पिवळ्या फुलांच्या ठिपक्याप्रमाणे तन्मयी व काकी दिसेनाशा झाल्या.

मूळ कन्नड लेखक :
**जयंत कयकिणी**
**मराठी अनुवाद : मीना वांगीकर**
सरस्वती, २०४/२८, डेक्कन जिमखाना, पुणे 411004
*चित्रकार - पुंडलिक वझे*

प्रकाश भरू दे आसमंती, अंधाराचे नाव नको ।
सुख समृद्धी दारी यावी, अज्ञानाला वाव नको ।।

**प्रायोजक - श्री. योगेश केतकर, पुणे**

# घरीच बनवा उठावदार फ्रेम

आज आपण कागदापासून उठावदार फ्रेम कशी तयार करायची हे पाहाणार आहोत. अतिशय कमी खर्चात तयार होणारी ही फ्रेम घरात लावताना घरातल्या सर्वांनाच आनंद होईल याची मला खात्री आहे. काम जरा अवघड आहे, पण एकदा फ्रेम तयार झाली की आतील फुले-पाने लावणे अगदीच सोपे आहे. बघा करून!

**साहित्य :** १ टिंटेड पेपर, २/३ रंगांचे वेलव्हेट पेपर, १ डुप्लेक्स बोर्ड, फेविकॉल, कंपास पेटी, पट्टी, माऊंट कटर, कात्री, रिकामी रिफील इ.

**कृती :** १) प्रथम ७५ सेंमी. × ५७ सेंमी. आकाराचा टिंटेड पेपर घ्या. कागदाच्या कडेपासून चारी बाजूने ३-३ सेंमी. वर खुणा करा (३ बिंदू काढा). समोरासमोरचे बिंदू तुटक रेषांनी जोडा. (आकृती १)

२) आकृतीत दाखवलेला कापावयाचा भाग कापून टाका.

३) आता या तुटक रेषांवर दुमडून आपल्याला आपली फ्रेम करायची आहे. आता आकृतीत दाखविल्याप्रमाणे पहिल्या दोन घड्या बाहेरच्या बाजूला दुमडायच्या आहेत तर आतली (छोट्या चौकोनाची) घडी ही आतील बाजूला दुमडायची आहे.

४) तुटक रेषांवर दुमडण्याआधी त्यावर रिकामी रिफील फिरवून घ्या म्हणजे दुमड पटकन घातली जाईल. (पण पहिल्या दोन घड्या बाहेरच्या बाजूला दुमडायच्या असल्याने रिफिल फिरवण्यासाठी कागद उलटा करायला विसरू नका हं!)

५) मध्ये खोलगट भाग आणि ४ ही बाजूंनी उंच कड हा तुमचा फ्रेमचा ढाचा आता तयार झाला. चौकोनाची कड तीन बाजूंनी दुमडलेली तर खालची बाजू उघडीच दिसेल.

६) आता आकृतीत दाखवलेला सगळ्यात खालच्या बाजूचा ABCD हा भाग (चिकटपट्टी म्हणून) त्याच्या डावीकडच्या $A_1B_1C_1D_1$ भागावर आपल्याला चिकटवायचा आहे. तर PQRS हा वरच्या घडीवरचा चौकोन त्याच्या उजवीकडच्या पट्टीवर ($P_1Q_1R_1S_1$) चिकटवायचा आहे. (वाचताना हा भाग थोडा अवघड वाटत असेल; पण हे वाचता वाचताच प्रत्यक्ष कागद कापून, घडी घालून आता पाहिलेत तर मी काय सांगतो हे तुमच्या चटकन लक्षात येईल.) कागदाचा भाग कापून टाकून आकृती २ प्रमाणे फ्रेमच्या चारही बाजूंना बरोबर काटकोन होईल.

७) चिकटपट्टी चिकटवताना फेविकॉल कमी लावा, लावताना कागद खराब होणार नाही याची काळजी घ्या.

८) फ्रेम तयार झाल्यानंतर टिंटेड पेपरच्या मापापेक्षा ६ सेंमी. कमी लांबी-रुंदीचा डुप्लेक्स बोर्ड घ्या. त्याच्या चारी बाजूने ३-३ सेंमी. अंतर घ्या. समोरासमोरचे बिंदू तुटक रेषेने जोडून त्याला आतील बाजूने घड्या घाला. म्हणजे तुमचा बॉक्सचा आकार तयार होईल.

९) आता या बॉक्समध्ये तुमची फ्रेम बसवून बघा. खालच्या बॉक्सची दुमडून वर आलेली बाजू फ्रेमच्या बॉर्डरला आतील बाजूने चिकटवून घ्यायची आहे. फ्रेमच्या खालच्या बाजूच्या उघड्या राहिलेल्या बाजूवर हा खालचा चौकोन आल्यामुळे आता फ्रेमची कड चारही बाजूंनी झाकलेली दिसेल व ती आतमध्ये पोकळ असेल. यामुळे फ्रेमची जाडी वेडीवाकडी होणार नाही व फ्रेम भिंतीवर लावण्यायोग्य वजनदार होईल. (आ. २)

१०) एकदा ही फ्रेम तयार झाली की पृष्ठभागावर पाने-फुले तयार करण्यासाठी तांबडा, केशरी, हिरवा पेपर (वेलव्हेट पेपर) घ्या. एका पोस्टकार्डवर पाकळ्यांसाठी, पानांसाठी टेन्सिल तयार करा. (आ.३)

११) मोठ्या फुलासाठी १२ सेंमी. × ५ सेंमी. व लहान फुलासाठी १० सेंमी. × ३ सेंमी आकाराच्या पाकळ्या वापरा. (आ. ४) पाकळ्या फ्रेमवर चिकटवताना पूर्ण पाकळीला फेविकॉल लावून




९ ते १५ ऑक्टोबर - भारतीय टपाल सप्ताह
(आप्तजनांना हाताने लिहून पत्र पाठवा.)
**प्रायोजक - सौ. सरोज प्रमोद पेठे, पुणे**



आ. ३




आ. २



आ. ४

(फ्रेमच्या रंगीत प्रकशचित्रासाठी पृष्ठ क्रमांक १२५ पाहा.)

आ. १




चिकटवू नका. पाकळीचा मधील भाग ≃ याप्रमाणे वर उचलून पाकळीच्या टोकाच्या अलीकडे चिकटवा. त्यामुळे फुलांनाही फुगीरपणा येईल.

१३) अशी २-३ फुले आणि २ पाकळ्या वापरून अशीच फुगीर कळीही तयार करा.

१४) हिरव्या पेपरची गुंडाळी करून फुलांचे देठ चिकटवून घ्या.

१५) हिरव्या वेलव्हेट पेपरची पाने (सरळ आणि वळणदार) कापा. पानांची लांबी १० ते १२ सेंमी. आणि रुंदी ३ सेंमी. घ्या. वक्राकार पाने १८ × ४ सेंमी. असावीत. ही पानेही मध्ये घडी घालून फुगवा. त्याच्या फक्त कडांनाच फेविकॉल लावून चिकटवा म्हणजे मधला भाग थोडा वर उचलल्यासारखा दिसेल.

१६) सर्व काम झाल्यावर फुलांचे पराग चिकटवा की झाली तुमची फ्रेम तयार.

फ्रेम भिंतीवर लावण्यासाठी मागे चिकटपट्ट्या लावून मजबूत दोरा बांधा. (टिकाऊपणासाठी वरून प्लॅस्टिक पेपर लावा.)

**टीप :** मापे बदलून लहान आकाराच्या फ्रेम आपण तयार करू शकाल. फुलांचे आकार, रचनाही बदलता येईल.


**चंद्रशेखर हडप**

एस. २५, आनंदवन फेज- २, ६/३, व्यंकटपुरा, सातारा


इंद्रधनुच्या रंगाने सजविते अंगणी रांगोळी ।
ठेवूनी त्यामध्ये पणती प्रकाशाच्या अनेक ज्योती ।।


**प्रायोजक - सौ. स्मिता चावरे, डोंबिवली**

मन विशाल समृद्ध करावे
मन प्रफुल्ल सदाचि हसावे
मन विवेकबळे उमलावे
मन त्वरे जनपदी रमवावे ।।

श्री. मिलिंद कुलकर्णी आणि श्री. अनित गाजरे
यांजकडून दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

ओमकार बिल्डर्स
ॲन्ड डेव्हलपर्स

पहिला माळा, विश्वनाथ प्लाझा,
दातार ब्लॉकसमोर,
आग्रा मार्ग, कल्याण (पश्चिम) ठाणे
(०२५०-२२०७८५५)

झळाळती लक्ष ज्योती, घरीदारी अंगणात ।
सारे न्हाऊन निघते, सोनियाच्या सागरात ।।



संग्रही ठेवा -निवडक कवितासंग्रह **'कवितेच्या गावा'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ३०/-

# ... कल्पकतेतून नवनिर्मितीकडे ...



कृती पान क्र. ६४



कृती पान क्र. १५२




कृती पान क्र. १५१



कृती पान क्र. १६



कृती पान क्र. ४१




कृती पान क्र. ३९



कृती पान क्र. १२२


युटिलिटी बिल्सच्या भरण्याविषयी निश्चिंत रहा.
ऑनलाइन युटिलिटी बिल पेमेंटची सुविधा
BARODA next
STATE-OF-THE-ART. STRAIGHT FROM THE HEART.
www.bankofbaroda.com
बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
India's International Bank


सोन्याच्या क्षणात उजळू दे मन,
सुखाने सजूदे दिव्यांचा सण !
शुभ
दीपावली
PNG
Jewellers Since 1832
पुणे
लक्ष्मी रोड
पौड रोड
चिंचवड
कँप
नाशिक
अमेरिका
pngadgil.com








राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रशासकीय सेवेत कार्यक्षम,
समाजाभिमुख व शुद्ध आचाराच्या व्यक्ती जाव्यात यासाठीचे प्रशिक्षण केंद्र
**स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

(पान क्र. ७१ वरून  पुढे चालू)




पुढच्या काही तासांत, एक छोटे अवकाश यान श्रीभद्रला जोडले गेले होते. त्या छोट्याशा यानातून केवळ एक प्रवासी बाहेर पडला आणि श्रीभद्रमधील त्या तिन्ही युवकांना भेटला.

''माझं नाव नैगमेश,'' त्या शास्त्रज्ञाने आपली ओळख त्या तिघांना करून दिली.

जरा कमी उंचीच्या, पण बलदंड शरीराच्या नैगमेशाला त्या तिघांनीही अभिवादन केले.

''सेंद्रकाने खास कामगिरीवर, मला पाठवले आहे! मी फक्त न्यूक्लिअर फिजिसिस्ट म्हणून इथं आलेलो नाही. कृष्णविवर आणि सूक्ष्मविवर हाही माझ्या अभ्यासाचा विषय आहे...''

''का? श्रीभद्रवर सूक्ष्मविवरे आदळण्याची शक्यता आहे?'' झांझने त्याला मध्येच तोडून विचारले.

''संख्याशास्त्राच्या दृष्टीने कुठलीच शक्यता कधीच नाकारता येत नाही आणि सूक्ष्मविवर श्रीभद्रवर आदळू शकते; तसेच श्रीभद्र यान आपली दिशा बदलून सूक्ष्मविवरावरही आदळू शकते.''

आता मात्र मध्यमसेनाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. तशी त्याने बोलून दाखवली. मध्यमसेनाची शंका बरोबर होती. दुसऱ्याच दिवशी, बरोबर वीस तासांनी, श्रीभद्र सूक्ष्मविवरासमोर येणार होते. आणि त्याच सूक्ष्मविवराची माहिती देण्यासाठी नैगमेशाला सेंद्रकाने बोलावले होते.

''हेच सूक्ष्मविवर तुमच्या सुटकेचा एकमेव मार्ग आहे. तुम्ही यात शिरताक्षणी स्थलकालाच्या एका बोगद्यात शिराल आणि बाहेर पडाल तेव्हा वितस्ता दीर्घिकेच्या दुसऱ्या टोकाला जाऊ शकाल. तिथे मान साम्राज्याची सीमा संपलेली असेल. कारण या सूक्ष्मविवराचं एक टोक हे श्रीभद्रला चिकटून असेल तर दुसरं टोक हे दीर्घिकेसाठी उघडलं जाईल.''

''पण यातून जाताना काही अपाय होण्याची शक्यता?'' शार्दूलने विचारले.

''नाही. श्रीभद्रच्या पोटात आणखी एक यान आहे. त्यात तुम्ही बसायचं. ते यान तुम्हाला अतिशय वेगाने स्थलकालाच्या प्रवासाला घेऊन जाईल. पण त्यात काहीही धोका नाही. त्या यानाचा प्रोग्रॅमच असा केला आहे.'' नैगमेश माहिती देत होता, ''श्रीभद्र यान हे कितीही सुरक्षित असले असे वाटले तरी वस्तुस्थिती तशी नाही. ते धोकादायक आहे, कारण...'' नैगमेश थांबला.

''कारण अविधेयाने, तुम्हाला धोका देण्याच्या हेतूनेच ते बनवले आहे. यानाची आतील बाजू ही अत्यंत ज्वालाग्राही पदार्थांनी बनवली आहे. हा सुंदर रंग! यावर एक छोटीशी ठिणगीसुद्धा फार मोठ्या प्रमाणावर आग पसरवू शकते.'' आणि बोलता बोलता नैगमेशाने त्यांना इंधन टाक्यांच्या जागेजवळ नेले. तेथे रोबोट त्यांच्या कामात मग्न होते. नैगमेशाने खुणेनेच त्यांच्याकडे बोट दाखवले आणि मध्यमसेनाकडे पाहिले.

''आग ही फायर ट्रँगलच्या तीन घटकांमुळे लागू शकते आणि रोबोटमधील चुकांमुळेही, बरोबर?'' मध्यमसेनाने

सौख्य समृद्धी घेऊनी आली उंबरठ्यावरती प्रकाश पणती ।
अन् दीपावलीची शुभःप्रभा भरून राहिली अवतीभवती ।।

प्रायोजक - सौ. सोनल जांभेकर, मुलुंड

नैगमेशाला विचारले आणि त्याने होकारार्थी मान डोलावण्यापूर्वीच शार्दूल संभाषणामध्ये पडला.

''रोबोट कधीही चुका करत नाहीत. पण त्यांना दिलेले चुकीचे प्रोग्रॅम ते अचूकतेने पार पाडतात, बरोबर?''

नैगमेशाने नुसतीच मान डोलावली आणि त्यांना सांगितले की, अविधेयाने रोबोटतर्फे श्रीभद्र यान पेटवण्याची योजना आखली होती. आणि आपल्या हातातील केसर पॉईंटर हा, त्याने भिंतीवर धरला, जिथे तो भाग त्या किरणांच्या खाली आला, तिथे रंग वितळू लागला. नैगमेशाने पॉईंटर बंद केला. ''मला सेंद्रकांनी निरोप दिला आहे की, तुम्हाला सूक्ष्मविवरातील प्रवेशाकरता माहिति द्यायची.'' नैगमेशाने सांगण्यास सुरुवात केली.

''पण आपले सर्व संभाषण अविधेयापर्यंत पोहोचत असेल तर?'' झांझने शंका उपस्थित केली.

''नाही. मी इथे आल्या-आल्याच श्रीभद्र यानाची, राजधानीशी असलेली सर्व संपर्क व्यवस्था बंद केली आहे. आणि आता मला माझे काम करू द्या. सांख्यिकी शास्त्रानुसार जवळजवळ बारा हजार पाचशे ऐंशी इतक्या सूक्ष्म विवरातून वीस तासांनी नेमके कुठले सूक्ष्मविवर, यानापाशी येणार आहे, ते मला शोधायचे आहे.'' आपली करडी नजर त्या तिघांवरून फिरवून नैगमेश आपल्या कामाला लागला.

आता त्या केबिनमध्ये ते तिघेच बसले होते. अत्यंत गंभीर स्वरात बोलणाऱ्या मध्यमसेनाचा आवाज चौफेर घुमत होता. ''अविधेयाने फार विचारपूर्वक डाव टाकला आहे. आपण यातून सहीसलामत सुटू नये इतका बंदोबस्तही करून ठेवला आहे. तेव्हा आपणही इथून शिताफीनेच निसटले पाहिजे.''

''रोबोटनी या यानाला आग


ARV Infotech

Happy Diwali

Off. : 1200, Sadashiv Peth, Limaye Wadi
Pune 411030
Res. : 'Meghana', Sunita Society,
Erandawane, Pune 411004
Ph. : (0)020-24479171, (R)020-25435612
E-mail : pranku@vsnl.com

Happy Diwali

Premier Seals (India) Pvt. Ltd.

Reedvalves, Oil Seals &
Metal to Rubber Bonded Items

Works & Office
17/8, D-1 Block, M.I.D.C., Chinchwad, Pune - 411019.
Ph. (020) 27458848/4111951/2/3/27441329/30960072
#Fax : 27477408, E-mail : pseals@vsnl.net
visit us at: www.premiersealsindia.com





Happy Diwali

Akash Traders





शोधा... @ www.ethnicpaintings.com
(जगप्रसिद्ध पेंटिंग्जबद्दल जाणून घ्या)
संग्रही ठेवा - **'प्रबोधन गीते'** - छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत : रु.२०/-(ध्वनिफित - रु.४०/)

लावण्याअगोदर आपणच इथून बाहेर पडायचं आणि त्यापूर्वी श्रीभद्र यानाला आग लावून बाहेर पडायचं. सेंद्रकाचा इशारा हाच होता.'' मध्यमसेन फार विचारपूर्वक बोलत होता.

''झांझ, नैगमेश सूक्ष्मविवर शोधेल, तेव्हा त्यातून बाहेर पडण्यापूर्वी श्रीभद्र पेटवून द्यायचे.''

''पण आपण त्या विवरातून गेल्यावर पुढे काय?'' शार्दूलने विचारले.

''पुढे आपण वितस्तेच्या टोकावर जाऊ, अशी माहिती अविधेयाला मिळणं महत्त्वाचं आहे.''

...नैगमेशाने सारी बुद्धी पणाला लावून सूक्ष्मविवर शोधून काढले होते. पुढच्या काही क्षणांत ते श्रीभद्रच्या जवळ येणार होते.

श्रीभद्रमधून त्या सूक्ष्म-विवरात जाण्यासाठी एक छोटेसे यानही, नैगमेशाने सज्ज करून ठेवले आणि तो चटकन् मध्यमसेनाचा निरोप घेऊन स्वत:च्या यानातून निघून गेला.

पुढची सारी जबाबदारी आता त्या तिघांवर होती. ते छोटे यान सूक्ष्मविवराचे गुरुत्वीय बल सहन करण्याइतके दणकट आहे, याची खात्री नैगमेशानेच केली होती. झांझ आणि शार्दूलने त्या यानाची आतून पाहणी केली. केवळ तिघांना बसता येईल, इतकीच जागा त्या यानात होती.

प्रकाशाच्या वेगाने निसटू पाहणारे ते सूक्ष्मविवर काही क्षणांच्या अवधीत वितस्ताच्या टोकाला पोहोचणार होते.

ते सूक्ष्मविवर यान त्यात जाईपर्यंत, स्थिर राहावे म्हणून श्रीभद्रच्या पुढच्या Extender मधून प्रचंड शक्तिशाली; पण आकाराने अतिशय लहान असे पंप्स लावले होते. त्यांच्या मदतीने, त्या सूक्ष्मविवरातील, शक्तीची घनताही कमी करण्यात येणार होती; कारण त्याशिवाय ते स्थिर राहूच शकणार नव्हते.

तिघांनीही आपले अँटी ग्रॅव्हिटी व निगेटिव्ह घनतेचे सूट अंगात घातले. झांझने, यानाच्या इंधनाच्या टाकीच्या खोलीची संपूर्ण व्यवस्था पाहिली आणि संगणकाला न्यूक्लिअर रिॲक्टरचा स्फोट घडवून आणण्याचा प्रोग्रॅम देऊन तो कोड लिहून ठेवला.

आणि ते तिघेही त्या छोट्याशा यानाकडे वळले. यानाचा काऊंट डाऊन सुरू झाला होता... ८, ७, ६, ५... आणि त्या सूक्ष्मविवरात जाण्यासाठी त्या तिघांनी त्या छोट्याशा यानात प्रवेश केला. सर्वप्रथम शार्दूल आत आला. त्याने मध्यमसेनाला हाताला धरून आत बसवले आणि शेवटी झांझ आत आला आणि यानाचा दरवाजा बंद झाला.

श्रीभद्रचे Extender आता आतल्या बाजूला श्रीभद्रच्या पोटात गेले. आणि एक जबरदस्त धक्का लहर निर्माण करून त्या छोट्याशा यानाने श्रीभद्रच्या पोटातून स्वत:ला लोटून दिले. पुढच्याच क्षणी श्रीभद्रच्या बाहेर भिरभिरत येणाऱ्या सूक्ष्मविवरांत त्या यानाने प्रवेश केला.

पुढच्याच क्षणी श्रीभद्रच्या इंधनाच्या टाकीने पेट घेतला. श्रीभद्रचा एकच भडका उडून ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या.

***

... मान साम्राज्यामध्ये दु:खाची अवकळा पसरली होती. भावी सम्राट मध्यमसेन; त्यांचे दोन्ही भाऊ झांझ आणि शार्दूल एकाच वेळी स्फोटात नष्ट झाले होते. सम्राट मानांकांनी संपूर्ण मान साम्राज्यभर शोक जाहीर केला. अविधेय आणि देवराज मात्र मनोमन प्रसन्न होते. मान साम्राज्याच्या सम्राटपदाचा मुकुट आता अविधेयाला मिळणार होता.

इकडे त्या छोट्या यानाने आपले काम चोख बजावले. ते यान सूक्ष्मविवराच्या एका बाजूने खेचले गेले. दुसऱ्या भागात त्याने प्रवेश केला. यान सूक्ष्म-विवराच्या पलीकडील भागातून

झळाळती लक्ष ज्योती, घरीदारी अंगणात ।
सारे न्हाऊन निघते, सोनियाच्या सागरात ।।

प्रायोजक - श्री. योगेश कुलकर्णी, सांगली


बाहेर पडण्याच्या वेळी झांझने यानाची गती व दिशेच्या नियंत्रणाचा ताबा घेतला. सूक्ष्मविवरातील शक्ती यानाने ओढून घ्यावी म्हणून झांझने यानातील पंप चालू केले...

***

काही दिवसांनी, योजनाबद्ध कट करूनही हे तिघे भाऊ सहीसलामत परत आलेले पाहून देवराज आणि अविधेय कमालीचे आश्चर्यचकित आणि नाराजही झाले.

अजूनही झांझचे स्वर अविधेयाच्या कानात घुमत होते. ‘‘सूक्ष्मविवरातून विश्वाच्या दुसऱ्या टोकालाच जाता येते, हा समज आम्ही चुकीचा ठरवला, अविधेया’’ झांझ सांगत होता. ‘‘त्या प्रवासावर आम्ही पूर्ण ताबा ठेवला होता. सातत्याने आम्ही ग्रॅव्हिटी कमी करत गेलो आणि मग, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आल्यानंतर आम्ही ती वाढवली; इतकी की त्यातून निर्माण झालेल्या शक्तीमुळे आम्ही त्या सूक्ष्म विवरांतून बाहेर पडलो. तेही दिशा बदलून ! आम्ही केवळ यानाचीच दिशा नियंत्रित केली नाही तर, सूक्ष्मविवराचीही दिशा बदलली आणि मग आम्ही पुन्हा वितस्तेच्या दुसऱ्या टोकाला न जाता, मान साम्राज्यातच दाखल झालो.’’

‘‘आणि आता, सर्व वितस्ता दीर्घिकेतील नागरिकांच्या उपस्थितीमध्ये, मध्यमसेन सम्राटपदाची धुरा सांभाळणार आहेत. त्या राज्याभिषेक सोहळ्याकरता तुला आमंत्रण देण्यासाठी आम्ही आलो आहोत.’’ शार्दूलने मध्यमसेनाचा निरोप देवराजला सांगितला. ‘‘आणि अविधेया, श्रीभद्रमध्येच आमचा नाश करण्याच्या तुझ्या डावामुळे खरं तर आम्हाला फायदाच झाला आहे... सूक्ष्म-विवरातील प्रवासामुळे आमचा काळ मंदावला, आम्ही तरुणच राहिलो. पण तू आणि तुझ्याबरोबरचे सगळेच वृद्ध झालात.’’

**हार्दिक शुभेच्छा !**

शास्त्रोक्त पद्धतीने ड्रायव्हिंग शिकविणारी
८८ वर्षांची परंपरा असलेली
पुण्यातील ए ग्रेडची विश्वसनीय संस्था

**आपटे मोटार स्कूल**

अलका टॉकीज समोर, पुणे - ४११ ०३०.फोन - २४४७८६१०, २४४९२७७२
शाखा - कर्वे रोड, ५ प्रसाद चेंबर, जयश्री एक्झिक्युटिव्हसमोर,
पुणे - ४ फोन - २५४४८३२३

**With Best Compliments From....**

**Vishal Engineers Pvt. Ltd.**

**Manufacturers of Specified Turned Components**

**Regd. Office :** A/15, Amar Ashiyana, Behind Tatya Tope Hsg. Society, Wanwari, Pune 13
**Works & Admn. Office :** S.No. 19, Gondhale Nagar, Pune Saswad Road, Pune 28
**Ph. :** 91-20-26990426 **Telefax :** 91-20-2699 2751 **e-mail :** vishafenggpitd@vsnl.net

**Happy Diwali !**

**Smash Electronics**

Sunil Pathak 9422031205
Milind Gurjar 9823121521

103, Shaniwar Peth, Kamal Bldg.,
Pune - 411 030.
Ph.: 24487525/ 24487526,
Tel Fax : 24487526
Email: smashelectronics@sify.com

**Wholesale Dealer of CFR, MFR, MOR Wire wound Resistors APR Make & Breaking Resistors & Other Electronics Items**


पाहा... विजयदुर्ग - जि. सिंधुदुर्ग - बेलांग व बुलंद जलदुर्ग, आनंदराव धुळूपांचा वाडा, व वाघोटन खाडीतील आरमारी गोदी प्रसिद्ध

**प्रायोजक - श्री. भि. स. पऱ्हाड, डोंबिवली**

अविधेयाच्या कानात हे सूर घुमत होते. समोर गलितगात्र झालेला देवराज होता.

सम्राट मानांकानंतर, त्याच्या पुत्राऐवजी सुयोग्य ठरलेला युवराज मध्यमसेन हा मान साम्राज्याचा सम्राट झाला होता. सम्राट मध्यमसेनाने, आपल्या भावांबरोबर सेंद्रकाची प्रत्यक्ष भेट घेतली आणि अभिवादन केले.

सेंद्रकाच्या निष्णात हेर खात्यामुळे तर अविधेयाचे कारस्थान उघडकीला आले होते. सम्राट मध्यमसेनांनी सेंद्रकांच्या नावाने वितस्ता दीर्घिकेत सूक्ष्मविवरांच्या अभ्यासाकरता एका संशोधन संस्थेची निर्मिती केली. कारण सूक्ष्मविवरे ही केवळ दुसऱ्या विश्वात नेणारी टनेल्स् नव्हती तर त्याच्यावर नियंत्रण ठेवून त्या त्या ठिकाणी, अत्यंत कमी वेळात जाता येणे शक्य होते हे मध्यमसेन, झांझ आणि शार्दूलने दाखवून दिले होते.

...काही वर्षांनंतर...

वितस्ता दीर्घिकेतील लोक आता नेहमीच तरुण राहातात. तारुण्य संपण्याच्या आतच ते सूक्ष्मविवरातून प्रवास करतात. इच्छित ठिकाणी जातात; पण प्रवासामुळे त्यांचा काळ मंदावतो आणि ते बाहेर पडतात, तेव्हा बाहेरील विश्वाचा काळ पुढे सरकलेला असतो; पण आतील लोक मात्र तरुण असतात.

**सौ. सुधा रिसबुड**
१२, आशुतोष, डहाणूकर कॉलनी,
गल्ली क्र. ६, कोथरूड,
पुणे 411 029

*चित्रकार : मुकुंद भालेराव*

---

**तळटीपा – १) B.A.M.** (ब्रॉड अॅरे मॉडेल) : संपूर्णपणे या विज्ञानकथेकरता वापरलेली कल्पना. काल्पनिक भाषा. माणसाच्या मेंदूतील पेशी जशा जाळे निर्माण करून एकमेकांशी संपर्क साधतात त्याप्रमाणे, हे संगणक या विशिष्ट भाषेद्वारे एकमेकांशी संपर्क साधतात.

**२) आइनस्टाइनचा सिद्धांत :** आपण ज्या पृथ्वीवर आणि विश्वात राहातो तिथे लांबी, रुंदी, उंची अशा तीन मिती (Dimensions) असतात. आईनस्टाइनने Time म्हणजे काळ ही चौथी मिती आहे असे मानले. उदाहरणार्थ एखाद्या कापडाला किंवा रुमालाला दोन्हीकडून ताणले आणि मग त्यावर एखादी गोटी टाकली तर ती गोटी त्या रुमालात एक खड्डा निर्माण करील आणि तिथे गोल गोल फिरेल. आता कल्पना करा की, तो रुमाल म्हणजे आपले विश्व आहे आणि मग त्यावर राहाणाऱ्या लोकांना ती गोटी कुठे गेल्यासारखी वाटेल? सूक्ष्मविवराची कल्पना अशीच आहे.

**३) फायर ट्रॅंगल :** ऑक्सिजन, उष्णता व इंधन या तीन घटकांमुळे कुठेही आग लागते. ती आटोक्यात आणण्यासाठी यातील १ किंवा २ किंवा तिन्ही घटक बाजूला काढून मग ती आग आटोक्यात आणली जाते. पाण्याच्या माऱ्यामुळे तापमान कमी होते, ऑक्सिजन मिळणे बंद होते व आग विझते.

**४) प्रत्यक्ष सूक्ष्मविवरातील प्रवास :** अंतराळात असलेली कृष्णविवरे सर्वच गोष्टी ओढून घेतात. पण त्यातून बाहेर पडणे शक्य नसते. कृष्णविवरांचा उपयोग माणसाला करून घेता आला नाही. पण सूक्ष्मविवरे माणसाला उपयोगात आणता येतात. ती अंतराळातील प्रवासाकरता अत्यंत वेगवान साधन म्हणून वापरता येतात. दोन नरसाळी दांड्यांकडून एकमेकांवर उलटी ठेवल्यास जसा आकार होईल त्याप्रमाणे त्यांचा आकार असतो. एका बाजूने त्यात प्रवेश केल्यावर दुसऱ्या बाजूने बाहेर पडता येते. पण ते विश्वाचे दुसरे टोक असते. संपूर्णपणे वैज्ञानिक कल्पना –आइनस्टाइनच्या सिद्धांतानुसार प्रकाशाच्या वेगाने किंवा जवळ जवळ त्याच्या इतक्याच वेगाने सूक्ष्मविवरातून प्रवास करणारी याने निर्माण केली तर यानातील प्रवाशांची घड्याळे मंदावतात, त्यांचा काळ (Time) मंदावतो. त्यांचे तारुण्य जास्त काळ राहाते. म्हातारपण उशिरा येते.

**सूर्यास हाती घेऊनी, परतायचे आहे मला ।**
**गाणे प्रकाशाचे जगाला द्यायचे आहे मला ।।**

**प्रायोजक - श्री. संजय रत्नाकर चावरे, डोंबिवली**



**Happy Diwali...**

*You will be what*
*you will to be !*
*your attitude*
*determines your altitude !!!*
*What matters most is how you see yourself !*

***With Best Compliments From...***

**NIKHIL OLTIKAR**
**Managing Director**

## AKHIL WIRES PVT. LTD

**Paper Insulated Copper Conductors Round, Rectangular, Connection Leads**

**G - 3/9, MIDC, Tarapur Ind. Area,**
**Boisar, Thane - 401 506.**
**Telefax - 91 22 6645 9687, email - info@akhilwires.in**





पाहा... तिबेट हाऊस, दिल्ली
(तिबेटचा इतिहास, संस्कृती, चलन यावर प्रकाश टाकणारा संग्रह)
संग्रही ठेवा - '**स्वीकारशील स्वदेशी**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ५०/-

# 'अभ्यास देशस्थितीचा' समतोल चालो...

- विवेक कुलकर्णी



'देशभक्ती'या भावनेची स्वाभाविक व नैसर्गिक ओढ आपल्या सर्वांनाच विद्यार्थिदशेत असते; पण देशभक्ती करण्यासाठी सैन्यात किंवा प्रशासनातच जावे लागते किंवा स्वयंसेवी संस्थेतच काम केले पाहिजे असे नाही. तर आपण जे करिअर निवडू त्यासाठी जे शिक्षण घेऊ त्यातूनच देशभक्तीची कृती करता येऊ शकते. मात्र त्यासाठी 'अभ्यास देशस्थितीचा' समतोल म्हणजेच सर्व बाजूंनी पुरेसा झाला पाहिजे. 'ज्ञान प्रबोधिनी'च्या प्रार्थनेतील या ओळी म्हणताना आणि आता लेखाचे शीर्षक म्हणून वाचताना अनेक छात्रांच्या मनात येईल की, मग आमच्या शाळेच्या अभ्यासाचं काय?

मला वाटतं शाळेच्या अभ्यासातही आपण देशस्थितीचा अभ्यासच करत असतो. भाषा आणि सामाजिक शास्त्रे या विषयात तर थेट देशस्थितीवरचा पाठ्यक्रम असतो. बऱ्याच विद्यार्थ्यांना दहावीनंतर या विषयाशी संबंध राहणार नसल्याने त्यात फारसा रस नसतो. काही विद्यार्थ्यांना भाषा, समाजशास्त्रे आवडतात, त्यात गती व कल असतो; पण तरीही करिअरच्या दृष्टीने कमी महत्त्वाचे म्हणून हे विषय दुर्लक्षिले जातात. पण खरंतर विज्ञान, गणित हे करिअर ठरविण्यात उपयोगी असले तर भाषा, समाजशास्त्रे ही आयुष्याला अर्थ देण्यासाठी उपयोगी ठरू शकतात. त्यामुळे पहिला सोपा सल्ला व मार्ग म्हणजे शालेय पुस्तकांचाच अभ्यास देशस्थितीचा म्हणून करण्याचा प्रयत्न करणे. एकदम त्या मधील आनंद वाढेल, देशातील विविध घडामोडींची समज वाढेल आणि एकूण व्यक्तिमत्त्वात मूलभूत बदल घडताना जाणवतील.

मित्रांचा कंपू जमवून कट्ट्यावर, सुट्टीमध्ये वर्गात, घरासमोर अशा गप्पा मारणे सगळ्याच छात्रांना आवडते. काय विषय असतात आपल्या गप्पांचे? क्रिकेट (आणि कदाचित काही अन्य नशीबवान खेळ), सिनेमा, वर्तमानपत्रातील एखादी भडक बातमी, पाकिस्तान – फार तर फार काश्मीर. आता या गप्पाही खूपदा उथळ, भावनिक आणि लंब्याचौड्या बाता मारणाऱ्या असतात. अभिनिवेश, वादावादी जास्त असते. त्यापेक्षा या गप्पांमध्येही काहीसे हटके विषय आणले–शेतकरी आत्महत्या, बिहार निवडणुका, इ. वर्तमानपत्रातील एखादे विशेष लेख, स्तंभ, चर्चासत्र असे वाचून–ऐकून मगच बोलायचे. वादविवाद करायचा; पण तर्कशुद्ध व मुद्देसूद पद्धतीने. बघा तुमच्या चहा–कॉफी–रसाची किंवा वडा–भजी–कच्छी यांची चव अजून रंगतदार होईल. तुमच्या श्रवण–संभाषण–वाचन–लेखन आणि मुख्यत: आकलन व विचारक्षमता यामध्ये एक आकर्षक व परिणामकारक भारदस्तपणा येईल. अशा गप्पांचा एक औपचारिक 'प्रबोधक मंडळ' नावाचा कट्टा किंवा व्यासपीठही करता येईल.

भेटू देत, पेटू देत रोज नवे दिवे ।
हृदयामध्ये कायमसाठी लावून घ्यावे दिवे ।।

प्रायोजक - डॉ. नितिन व डॉ. सौ. सोनाली भट, डोंबिवली

क्विज सारख्या सामान्य ज्ञान (जनरल नॉलेज) स्पर्धांमध्ये आपण बरेचदा भाग घेतो; पण या स्पर्धा खूपदा माहितीच्या पातळीवर असतात. या पलीकडे सद्य घटना-घडामोडी-प्रश्न या विश्लेषणाच्या प्रांतातही आपल्याला प्रवेश व वाटचाल करता आली पाहिजे. प्रसारमाध्यमांचे वाढते आकर्षण आणि इंटरनेटवर मुलांचा वाढता ऑनलाईन वेळ याची बऱ्याच पालकांनाही धास्ती वाटते. प्रसारमाध्यमे तर सतत 'ब्रेकिंग न्यूज' च्या शोधात असतात. २४ तास बातम्यांच्या वाहिन्यासुद्धा अन्य सिनेमा-खेळ-मालिका यांच्या वाहिन्यांशी स्पर्धा करण्याच्या नादात 'बातमीमूल्य' कमी करून 'करमणूक' वाढविण्यावर भर देतात. भडक दाखविण्याचा प्रयत्न करतात. इंटरनेटवर तर अफाट वैविध्य व सागरासारखी अथांगता आहे. त्यात आकर्षक पण घाणेरड्या जागांचीही भरपूर संख्या आहे व चलती आहे. आपल्या सगळ्या छात्रांनी या माहितीस्फोटाच्या गदारोळात खूप काळजीपूर्वक ज्ञानाचा शोध घेतला पाहिजे. त्यासाठी खरंतर विद्यार्थ्यांनी विशेष तांत्रिक व मानसिक प्रशिक्षण घेण्याची गरजही मला जाणवते.

'समतोल अभ्यास' हा पूर्ण व्यक्तिमत्त्वाच्याच विकासाचा एक मार्ग आहे. बहुश्रुत असणाऱ्याचे पूर्वी महत्त्व होते. तेव्हा सगळ्यांना वाचता यायचे नाही किंवा वाचनसाहित्यही फारसे उपलब्ध नव्हते. पण आता अथक आणि अफाट वाचन पाहिजेच. वाचनाच्या जोडीने चर्चा, वादविवाद आणि मनन, चिंतन यातून आपली घटनांचा अर्थ लावण्याची समज व विचारशक्ती वाढते. मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या जोडीने प्रत्यक्ष अनुभवातून अभ्यास केल्याशिवाय तो समतोल होणार नाही. म्हणून शक्य तितका प्रवास करणे, नवीन नवीन अनुभव घेणे, अभ्याससहली-भेटी-दौरे-शिबिरे यांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

आपल्या गावातील एखाद्या कार्यक्रमात प्रसिद्ध अभ्यासकांचे व्याख्यान ऐकणे, त्यांना गटाने भेटून त्यांची मुलाखत घेणे, जवळच्या एखाद्या ठिकाणाला भेट देऊन त्याची माहिती घेणे, आपल्या सुट्टीतल्या सहली, किल्ले/ऐतिहासिक स्थळे यांच्याबरोबरच एखाद्या सामाजिक काम करणाऱ्या संस्थेमध्ये काढणे अशा अनेक प्रकारांनी 'समतोल'अभ्यासाला आवश्यक असणारी प्रत्यक्ष अनुभवाची भेट देता येईल. शेतकरी, बाल कामगार, उद्योजक, व्यापारी अशा आपल्या परिचित व्यक्तींकडूनही त्या त्या क्षेत्रातील देशप्रश्नांची थेट माहिती व अनुभव मिळविता येतील.

पण फक्त देशस्थितीचाच अभ्यास आता पुरेसा नाही. माहिती व संपर्क तंत्रज्ञानाने जग इतके जवळ आले आहे की, अनेक देशांच्या अर्थकारणाचा व राजकारणाचा प्रभाव आपल्या भारतावर पडतो आहे. त्या त्या देशातील सामाजिक बदलही आपल्यावर परिणाम करतात. तसेच हवामान बदल, दहशतवाद, आर्थिक मंदी, युद्धे व व्यापार अशा अनेक घटना या देशाच्या सीमा मोडून जागतिक पातळीवर घडतात. त्यामुळे देशस्थितीचा अभ्यास 'समतोल'होण्यासाठी अन्य देशातील स्थितीचा व जागतिक घटनांचा अभ्यासही तितकाच आवश्यक आहे.

आपल्याला सगळ्यांनाच जाणवतंय की जग फार वेगाने बदलते आहे. जणू काही हे बदल आपल्यावर येऊन आदळत आहेत. त्यातील अनेक बदल हे न समजणारे आणि नको असणारे असतात. यामध्येही एक साखळी आहे. सर्वात वेगाने तंत्रज्ञान बदलते आहे. त्याचा परिणाम म्हणून अर्थकारण बदलते. मग कमी वेगाने राजकीय बदल होतात व सामाजिक बदल अत्यंत सावकाश, समूहांच्या मानसिकतेबरोबर होतात. म्हणून मानव चंद्रावर पोचला तरी गुप्तधनासाठी मानवी बळी देण्याची घटना आपल्याकडे घडू शकते. या बदलांचा वेध घेणे हे फार महत्त्वाचे असते. सध्याच्या 'वैश्विक खेडे' या संकल्पनेत सर्व जग जवळ येण्याची प्रक्रिया वेगाने घडते आहे. त्यामुळे जगात कुठेही होणारा एखादा बदल हा आपल्या घरापर्यंत नक्की पोचू शकतो. आपल्या आयुष्यात ढवळाढवळ करू शकतो.



पाहा... किल्ले नळदुर्ग - जि. धाराशीव, सोलापूरजवळ
(पाणी महाल असणारा दगडी बंधारा सर्वात प्रेक्षणीय)
प्रायोजक - सौ. सरिता श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

म्हणूनसुद्धा आपली देशस्थितीची आणि जागतिक समज वाढविणे उपयोगाचे आहे.

अभिषेक हा 'राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती' मिळविलेला माझा विद्यार्थी. आय. आय. टी सारख्या नामवंत संस्थेतून इंजिनिअर होऊन अमेरिकेत मोठ्या पगाराची नोकरी. घरात प्रचंड कौतुक; पण सुरुवातीच्या काही आव्हानात्मक कामानंतर अभिषेकला त्याच्या सर्व आयुष्याचा आणि बाकी जगाचा संदर्भच कळेना. आपण आणि आपले कुटुंब, ५ दिवस काम + २ दिवस चैन असे विचार-कालक्रम करून झाले. पण निरर्थक वाटणे थांबले नाही. आर्थिक मंदी, अमेरिकेचे नवीन धोरण यात आपली नोकरी जाईल, अशा वाढत्या भीतीने तो तणावग्रस्त झाला. डॉक्टरांची औषधे व काऊन्सलिंग यावर अवलंबून राहणे वाढले.

माझ्या मते हा सर्व संकुचित पुस्तकी दृष्टिकोणाचा परिणाम आहे. 'मानव'म्हणून असणाऱ्या आपल्या अफाट क्षमता 'एक्सप्लोअर' न करता बुद्धिमत्ता, कष्ट, धडाडी, पाठींबा (सपोर्ट), नशीब अशा काही गुणांवर लौकिक यश मिळविण्याच्या नादात 'समतोल'अभ्यास राहून जातो. एकांगी आयुष्य किंवा आपल्या कोषात जगणे या नव्या जगात शक्य नाही. नोकऱ्या बदललेल्या असणे हे आता गुणवत्तेचे लक्षण आहे. आणि तशा वाढत्या संधीही विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध आहेत; पण या नवीन जगावर स्वार होण्यासाठी 'समतोल' अभ्यासाची सवय पाहिजे.

एखाद्या देशस्थितीच्या सद्य घडामोडीचा समतोल अभ्यास म्हणजे त्यातील Who, When, Where, What असा माहितीचा भाग वाचतानाच विश्लेषणात्मक अभ्यास करणे, म्हणजे How असा प्रक्रियेचा आणि Why असा कारणमीमांसेचा विचार करणे, हे पाच W आणि एक H असे देशस्थितीच्या समतोल अभ्यासाचे सोपे तंत्र आहे. या जोडीने अजून एक तंत्र म्हणजे या घडोमोडीशी संबंधित तंत्रज्ञान, अर्थकारण, राजकारण व समाजकारण समजून घेणे. या क्षेत्रातील अन्य घटनांशी संबंध शोधण्याचा प्रयत्न करणे. अगदी अयोध्या प्रश्न, नक्षलवाद, लेह ढगफुटी, अन्नसुरक्षा, शेअर बाजार, अवकाश संशोधन अशा वरवर बघता विशिष्ट क्षेत्रातील वाटणाऱ्या घटनांचासुद्धा कारण किंवा परिणाम म्हणून वरील चार क्षेत्रांशी संबंध येतो. या चार क्षेत्रांशिवाय एखाद्या घटनेमागची मानसिकता व नैतिकता यांचाही विचार समतोल अभ्यासात येतो.

'देशस्थिती'चा अभ्यास शेवटी फक्त जाण, आकलन वाढण्यासाठी नाही तर कृती करता येण्यासाठी. माझे काही मित्र अजूनही स्वत:ला व कुटुंबाला सुरक्षित ठेवण्याच्या प्रयत्नात आपल्या बिळात आत आत अंग चोरून राहण्याचा प्रयत्न करतात. किंवा जगाबद्दल आत्यंतिक निराशा व्यक्त करतात. हा सीनीसिझम किंवा स्केप्टीसिझम मला पळवाट वाटते. नुसती टीका करून आपली व्यक्तिगत आयुष्ये समृद्ध होत नाहीत. म्हणून देशस्थितीवर परिणाम घडविण्याच्या छोट्या छोट्या कृतींना सुरुवात केली पाहिजे. 'मी कॉपी करणार नाही, शक्य झाल्यास इतरांना करू देणार नाही' किंवा 'मराठीतून सही' या छोट्या दिसणाऱ्या कृतींचे फार मोठ्या देशप्रश्नांशी थेट नाते आहे. विद्यार्थिदशेत फक्त प्रतिकात्मक वाटणाऱ्या अशा कृतींमुळे अभ्यास समतोल होतोच पण आयुष्यालाच एक गतिमान 'समतोल'(डायनॅमिक बॅलन्स) प्राप्त होतो.

- **विवेक कुलकर्णी**
स्पर्धापरीक्षा केंद्र, ज्ञानप्रबोधिनी, पुणे 411030

*चित्रकार - अभय पुरंदरे*

**पान २७ वरील 'मैत्री भाषेशी'ची उत्तरं**


**पुस्तके :** विशाखा, बोक्या सातबंडे, मृत्युंजय, स्वामी, अपूर्वाई; **विशेषणे :** बंद, मळकट-मातकट, हिरवट-पोपटी, डाव्या, जाड्या-जुड्या, धडपडी, शुभ्र, उजव्या, जुनाट, वृद्ध, प्रसन्न

**समानार्थी शब्द :** १) आई, माता, जननी, माय
२) मित्र, सखा, दोस्त, सोबती, साथी, यार
३) अनिल, पवन, वात, वारा, वायू, समीर
४) भास्कर, रवी, भानू, मित्र, आदित्य, सविता

*असा कुणी जो आहे अंधारात।
आपणच द्यावा त्याला प्रकाशाचा हात।।*

**प्रायोजक - श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे**

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



॥ श्री चौंडेश्वरी प्रसन्न ॥

टेके ब्रदर्स

# विजय

इलेक्ट्रॉनिक्स अप्लायन्सेस

परीपूर्ण मल्टीब्रॅण्ड शोरूम

VIDEOCON · Haier Inspired Living · Godrej · ONIDA · TATA Sky · VIDEOCON d2h DIRECT HAI CORRECT HAI · SAMSUNG · SANSUI · JACK MARTIN · LG Life's Good · BIG TV DTH SERVICE

चौपाड विठ्ठल मंदिरासमोर,सोलापूर. ☎ : (0217)2721119, 3200670

Email: vijayelectronics1119@gmail.com

शुभ दीपावली

An ISO 9001-2000 Registered Company

# PRATIBHA ELECTRICALS

ELECTRICAL ENGINEERS, CONTRACTORS & SUPPLIERS

**REGISTERED OFFICE**

'SHIKHAR,' 23, SHUKRAWAR PETH,
OPP. TULSHIBAG, PUNE - 2. TEL : 020 - 24458830.

**CONTRACTS DIVISION**

PURUSHOTTAM BUILDING, PLOT NO. 528/7,
NEAR DANDEKAR BRIDGE,
OFF SINHAGAD ROAD, PUNE 411 030
TEL : 020 - 24333777. TELFAX : 020 - 24321343

शुभ दीपावली

# YOGA ENTERPRISES


Medical Equipments • Surgical Disposables

**Shop No. 3 & 4, 26/A,
Shamiyana Complex,
Somwar Peth, Pune - 411 001.
Tel. : (0) 26134111 Fax : 26139618**


शोधा... @ www.nature.org/animals/oceans/
(अफाट वैचित्र्यपूर्ण समुद्री जीवनाबद्दल माहिती मिळवा)
संग्रही ठेवा - **'तरंग मनाचे'**, छात्र प्रबोधनप्रकाशन, किंमत रु. ५०/-

# प्राचार्य शिवाजीराव आणि मी

डॉ. यू. म. पठाण



प्रा. शिवाजीराव भोसल्यांचा व माझा स्नेह अर्धशतकापेक्षा अधिक काळाचा. मी सातारला १९४५ मध्ये होतो, त्यावेळेपासूनचा. तासगावच्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य भगवान आबाजी बाबर यांचा नि शिवाजीरावांचा स्नेह. तो मलाही लाभला. मग आम्ही सातारच्या त्यांच्या कॅम्पातल्या बंगल्यावर जाऊन गप्पागोष्टी करीत असू, वाङ्मयीन चर्चाही करत असू. त्यावेळी शिवाजीराव वक्ते म्हणून नावारूपाला आलेले नव्हते. तत्त्वज्ञानाचे अभ्यासक म्हणून ते आम्हाला अधिक परिचित होते. या काळात शिवाजीराव वक्तृत्वाचे धडे गिरवीत असावेत. आपल्याला चांगलं बोलता आलं पाहिजे, यासाठी काय काय करायला हवं, याबद्दलही ते तळमळीनं बोलत. त्या काळात मलाही वक्तृत्वाचा फारसा सराव नव्हता. किंबहुना काहीशी भीतीच होती म्हणा ना! पण ही कला आपल्या व्यक्तित्वाला निश्चित फुलविणारी आहे, त्यासाठी शिवाजीराव करताहेत, तसे प्रयत्न आपणही करायला हवेत, अशी प्रेरणा मला निश्चित लाभे. ही वाट शिवाजीराव फार वेगानं चालत चालत शिखरापर्यंत पोचले; पण मी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत या वाटेवर फार अडखळत होतो. ठेचकाळत होतो. वाङ्मय मंडळाचा चिटणीस असताना कॉलेजच्या कार्यक्रमात मी वक्त्याला एकवेळ व्यासपीठावर जाऊन पुष्पगुच्छ दिला असता; पण 'हा पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करतो' हे धड वाक्यही व्यासपीठावर मी उच्चारू शकलो नसतो. शिवाजीराव भरपूर वाचन करीत. त्यातले उतारेच्या उतारे त्यांना तोंडपाठ असत; त्यामुळं त्यांच्या वक्तृत्वात 'उपस्थिती' हे लक्षणीय वैशिष्ट्य झिरपत झिरपत गेलं. त्यांचं अनुकरण करायला हवं व त्यांच्यासारखा आत्मविश्वास अंगी बाणवायला हवा, हे 'व्रत' मीही घेतलं. आपल्यात 'वक्तृत्वाचा अभाव' हा दोष राहू नये याची अत्यंत जिद्दीनं मी काळजी घेतली. पण शिवाजीरावांची झेप माझ्यापेक्षा कितीतरी मोठी, प्रचंड नि उत्तुंग होती. शब्दांवरील विलक्षण प्रभुत्व नि वाक्यावाक्यामागून वेगानं, श्वास न घेता, येणाऱ्या वाक्यांच्या तुषारांनी आपल्याला झाकून टाकणारा, पुलकित नि अवाक् करणारा धबधबा! – त्यांचं अनुकरण करणं अत्यंत अवघड नि दुरापास्त होतं. पण अनुकरणाचा प्रयत्न केल्यानं ते थोडंफार जमू लागलं. हे प्रयोग मी सोलापूरच्या 'दयानंद महाविद्यालया'तच केले नाहीत तर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा'च्या बहि:शाल व्याख्यानमालांतही केले. जसजसा लोकांचा प्रतिसाद वाढू लागला, तसतशी माझी व्याख्यानं अधिक सरस, प्रभावी, प्रगल्भ नि परिणामकारक करण्याची इर्ष्याही वाढू लागली. त्यासाठी अधिकाधिक परिश्रम, वाचन व व्यासंग करण्याचा जणू ध्यासच लागला.

शिवाजीरावांच्या गाठीभेटी होत; त्यावेळी ते या कलेतली काही मर्मस्थळं उलगडून दाखवीत. ते माझे जिव्हाळ्याचे स्नेही असले तरी एका अर्थानं या क्षेत्रातले माझे गुरूच होते.




कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ,
**प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**



त्यांच्यापेक्षा मी तीन वर्षांनी लहान आहे. थोरल्या भावाची माया त्यांनी मला दशकानुदशकं दिली. अनेक ठिकाणी माझं नाव सुचवून मला तिथं आग्रहानं व्याख्यानांसाठी जायला लावलं. मग त्यांच्याप्रमाणंच मी महाराष्ट्रभरच नव्हे तर बृहन्महाराष्ट्रात व्याख्यानांसाठी जाऊ लागलो. या भ्रमंतीत आम्हा दोघांचीही कधीकधी एकाच व्याख्यानमालेत पण वेगवेगळ्या दिवशी व्याख्यानं असायची; त्यामुळं गाठभेट न होता चुकामूक मात्र होई व शिवाजीरावांच्या लोभसवाण्या व्यक्तित्वाला आपण मुकलो, अशी खंत वाटे.

...पण कधीकधी शिवाजीरावच मोठ्या चतुराईनं माझी ही खंत दूर करीत. सिन्नरला एकदा असंच झालं. तिथल्या वाचनालयानं आम्हा दोघांची व्याख्यानं आयोजित केली. आधी त्यांचं व माझं दुसऱ्या दिवशी.

मी सिन्नरला दुपारी पोहोचलो आणि पाहतो तो शिवाजीराव समोर दत्त म्हणून उभे! त्यांना पाहून मी अवाक् तर झालोच पण हरखूनही गेलो. ''अजूनही 'गनिमी कावा' सुरूच आहे का, शिवाजीराव?'' असं मी म्हटल्यावर ते मनापासून हसले नि म्हणाले, ''तुमची भेट होत नाही म्हणून मुद्दाम इथं थांबलो. जाताना तुम्हाला माझी 'गादी' देऊन जाणार आहे!'' (ज्या गेस्ट हाऊसमध्ये ते राहिले, तिथंच मीही राहाणार होतो, ही शिवाजीरावांच्या बोलण्यातली मेख!)

पण मी लगेच उत्तरलो, ''शिवाजीराव, तुमची गादी कोण चालवणार? तुमच्या भाषणाला नि आयुर्विम्याला पर्याय नाही!'' आता तुम्ही हजरजबाबीपणात पटाईत झालात, पठाण. हा हजरजबाबीपणा नि हे सावधचित्त व्याख्यानात खूप उपयोगी पडतं बरं. बरं, एक बारीकशी सूचना देऊन ठेवतो - व्याख्यानापूर्वी बडीशेप खात जाऊ नका. घशात छोटीशी काडी अडकली तरी रंगात आलेल्या व्याख्यानाचा विरस करते. बरं, अशा वेळी समोरच्या तांब्या-भांड्यातलं पाणी प्यावं तर व्याख्यानाच्या ओघात खंड पडतोच. पण वक्त्याला व्याख्यान देताना धाप लागते; असा अकारण श्रोत्यांचा ग्रह निर्माण होतो!''

एवढं घाईघाईत सांगून शिवाजीराव हात दाखवीत गाडीत बसून निघूनदेखील गेले; पुढच्या गावाच्या व्याख्यानासाठी.

पुढं नियतीनं चांगला योग आणला. दोन विद्यापीठांच्या कुलगुरुपदासाठी आम्हा दोघांची नावं होती. पण मला दुसऱ्या विद्यापीठातलंच काय पण माझ्या विद्यापीठातलंही कुलगुरुपद नको होतं; त्यामुळं आपलं अध्ययन/अध्यापन/लेखन/संशोधन होणार नाही नि प्रशासनाच्या चक्रात आपण सापडू, अशी भीती मला वाटत होती. पण शिवाजीरावांनी मात्र आमच्या विद्यापीठाचं कुलगुरुपद स्वीकारलं. तेव्हा तीन वर्षे त्यांच्या सुखद सहवासात (त्यांचा 'व्याख्यान-काळ' वगळून) व्यतीत करण्याचा सुयोग लाभला. 'व्याख्यान हे एक सुंदर शिल्प असतं, आपण घडवू तसं ते घडतं,' हा वस्तुपाठ मी शिवाजीरावांपासून शिकलो.



पाहा... डेझर्ट कल्चरल सेंटर, जैसलमेर
(रजपूत काळची नाणी, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, आभूषणे वाळवंटातील प्राण्यांचे सांगाडे, अवशेष)
**प्रायोजक - सौ. अनिता शिरीष कौलगुड, ठाणे**

‘‘आता तुमच्या व्याख्यानात कुलगुरुपदामुळं खंड पडेल’’ या माझ्या प्रश्नाचं उत्तर देताना ते म्हणाले,

‘‘व्याख्यान हा माझा श्वास आहे. तो घेतल्याशिवाय मी जगू शकेन का, डॉ. पठाण?’’

मग मीही त्यांची फिरकी घेतली, ‘‘पण व्याख्यान देताना तर तुम्ही श्वासही घेत नाही. वाक्यांची फेक एकामागून एक अशी चाललेली असते की, श्रोत्यांना पुढचं वाक्य पेलता पेलता धावपळ होते. तुम्ही निवांतपणे श्वास घेऊन बोलावं, अशी त्यांची अपेक्षा असते.’’

‘‘आता वेग इतका वेगानं पुढं गेला आहे की, श्वास घ्यायलाही उसंत उरत नाही!’’ असं म्हणून शिवाजीराव नेहमीच्या मिश्किलपणानं हसले. ‘‘आणि सगळंच व्याख्यान श्रोत्यांना कळलं तरीही वक्त्याला धोका संभवतोच की नाही?’’ या आपल्या विनोदावरही ते मनापासून हसले.

तेव्हा मी म्हणालो, ‘‘शिवाजीराव आता तुम्ही इतकं छान हसलात. पण व्याख्यानात तुम्ही का हसत नाही, याचं रहस्य मला आता उलगडलं!’’

वयाची आठ दशकं उलटली तरी शिवाजीरावांमधला तजेला अजून गेला नव्हता. महाराष्ट्रात वक्त्यांची तशी फार ‘चणचण’; पण साऱ्याच व्याख्यानमालांना नि संस्थांना शिवाजीराव हा एकमेव आधार वाटे. खरं तर असं होतं की, व्याख्यानांनाही शिवाजीरावांचा आधार वाटे नि शिवाजीरावांनाही व्याख्यानांचा आधार वाटे. महाराष्ट्राच्या वक्तृत्वकलेला शिवाजीरावांच्या रूपानं केवढी मोठी देणगी मिळाली. ती कला लोकप्रिय झाली. तिनं लोकप्रबोधन केलं. अनेक सामाजिक/सांस्कृतिक/शैक्षणिक समस्यांचा उलगडा केला. समाजात उदात्त



जीवनादर्श रुजवून विविध स्तरांत सामंजस्य निर्मिलं; त्यामुळंच शिवाजीराव हे मराठी माणसाचं ‘संचित’ आहे, असं म्हटलं तर ते वावगं ठरेल का?


शिवाजीराव आज आपल्यात नाहीत, हे खरंच वाटत नाही!

**डॉ. यू. म. पठाण**
२, आनंदनगर, टाऊन हॉल, औरंगाबाद 431 001

*चित्रकार : दीपक संकपाळ*

**एक क्षण असा येतो साऱ्या क्षमता मापून जातो।**
**एक निर्णय असा असतो प्रकाशवाटा देऊन जातो ।।**

**प्रायोजक - श्री. माधव जोशी, डोंबिवली**




# Happy Diwali

*A House is built by hands,*
*but a Home is built by hearts!*
*You can live without something,*
*if you have someone to live for!*

***With Best Compliments from***

**Shankarrao A Borkar**

# Dhanashree Group of Companies




(पान ३३ वरून पुढे चालू)

# गोदावरीचा गाव



अनेक खेडी नाशकात आली. जमिनीला सोन्याचा भाव आला. नव्या कॉलनीज् आल्या. द्राक्षे, कांदा विदेशात गेला. ऑफिसेस वाढली. पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र नाशिकला झाले. आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशकात स्थापन झाले. विविध अभ्यासक्रम आले.

नाशिक नवे झाले. गोदावरीवर नवीन पूल आले. गोदावरीत बोटिंग सुरू झाले. गोदा पार्क तयार झाला. नाशिक महानगरपालिका झाली.

चारही बाजूंनी नाशिक पसरले.

गोदावरी काँक्रिटात बंदिवान झाली. धरणामुळे तिचा हास्यखळाळ बंद झाला.

नव्या नाशकात भारतीय सिनेमाचे आद्य जनक दादासाहेब फाळके यांचे भव्य स्मारक पांडव लेण्याच्या शेजारी निर्माण झाले. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज उद्यान गोदा काठावर उभारले. या उद्यानात कुसुमाग्रजांच्या कविता संगमरवरावर कोरल्या आहेत. सोमेश्वरजवळचा दूधस्थळी धबधबा पर्यटकांचे आवडते ठिकाण बनला आहे. डॉ. कुर्तकोटी न्यासातील बालाजी मंदिर प्रेक्षणीय आहे. नवनव्या नगरात नवनवी देवळे, मठ, ध्यानमंदिरे थाटात उभी आहेत.

नाशिकने कात टाकली हे खरे. आता नाशकात मैदानांवर खाद्योत्सव होतात. विविध हस्तकलांची, वस्त्रकलांची, विज्ञानाची, संगणकातली नवनवी भव्य प्रदर्शने आयोजित केली जातात. विदेशी तंत्रज्ञानाची प्रदर्शने भरतात. या साऱ्याला नाशिककरांचा भरघोस प्रतिसाद असतो. वेदापासून विज्ञान-तंत्रज्ञानापर्यंत नाशिक पसरले, वाढले. काही दिवसांनी ते सुजेलही.

नाशकातले वाडे नामशेष होताहेत. काही वाड्यांची अपार्टमेंट्स झाली. काही पार्कांमध्ये उभे राहायला जागा नाही. माणसाने तयार केलेले बकालपण पसरले. शांतता निघून गेली. भेळपुरी-पाणीपुरी, चाटमध्ये गोदावरी दिसतच नाही. मुख्य म्हणजे बेसुमार वृक्षतोड झाली; त्यामुळे सारे वैराण झाले. पक्षी निघून गेले. पांजरपोळातल्या गायींचा गोड हंबर संपला. चरवीतल्या दुधाच्या धारेतल्या पैंजणाचा नाद गेला. दुधाच्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या बद्द आवाजाने पहाट जड झाली. गोदाकाठी फिरायला येणारे पहाटेचे ऐकत नाहीत. आपलीच बडबड पहाटेला ऐकवतात. नि चहा-टोस्टात बुडतात. पहाटेचा वेदमंत्रांचा घोष गेला. मंदिरात कॅसेट्स घुसल्या. माणसांचा आवाजच गेला.

रात्री नवाला गुडुत् होणारे नाशिक आता रात्रपाळीत अडकले. वाहनांची मुजोरी वाढली. गोदाकाठचे सुंदर खडक गेले. सिमेंटने सपाटीकरण केले. मॉल, शॉप्स आले. बिगबझार आले.

अपार्टमेंटमध्ये क्वचित प्रार्थना ऐकू येतात. गोदावरी अशक्त झाली. ब्रह्मगिरी उभा आहे. अजूनही गोदेला वारा उभारी देतो. नव्या-जुन्याने गोदावरीला बाधा येऊ नये म्हणजे झाले. मुख्य म्हणजे गोदावरीला आपण स्वच्छ ठेवले तर आपण निरोगी राहू, हेच गोदावरी सांगते आहे.

**डॉ. यशवंत पाठक**
डॉ. आंबेडकर भवन,
गणेशखिंड, पुणे 411007

*चित्रकार : शिवाजी तुपे*

**दूर कुठेतरी पहाटतो सूर्य, काळोखाचे मन ढवळते।**
**घनदाट रानी चालल्या पावला, पावलापुरते प्रकाशते।।**

**प्रायोजक - डॉ. ऋता मराठे, डोंबिवली.**

(पान ३७ वरून पुढे चालू)



नाईलाजानं मी त्यांना ''अच्छा'' केले. वळून मी बंकरमध्ये परत आलो. थोड्या वेळापूर्वीचा बंकरमधला गजबजाट, पोराची कलकल आठवून मला प्रचंड एकटेपण आलं.

***

दहा-बारा दिवस मुलाचा काहीच पत्ता नव्हता. अव्याहत कामातून जेव्हा जेव्हा मला वेळ मिळे तेव्हा मला पोराची आठवण येत असे. एके दिवशी खंदकांची पाहणी करायला आलेला कांबळे मला भेटला - हेरखात्याचा महत्त्वाचा शिपाई. लेफ्टनंट कर्नलचा खास माणूस. त्या दिवशी गुलशनसाठी होडी घेऊन हाच थांबला होता हे मला आठवले. म्हणून त्याच्यापाशी मी पोराचा विषय काढला. त्यानं सांगितलं- ''छोटा गुलशन पूंछमधल्या एका खेड्यात आई-वडिलांबरोबर राहात होता. त्याचे वडील चांगले शिकलेले; व्यवसायानं विणकर होते. शाली आणि गालिचे विणणं हे त्यांचं काम. पाकिस्तानव्याप्त काश्मीरच्या सीमेवरचं गाव असल्यानं दहशतवाद्यांचा गावात सुळसुळाट होता. एके दिवशी शंका आली म्हणून लष्करानं गावाला घेरलं. तर गावात लपलेले अतिरेकी नेमके गुलशनच्याच घरात शिरले. त्याच्या घरच्यांना वेठीला धरून तीन दिवस अतिरेकी तिथेच थांबले. कोंबिंग ऑपरेशनमध्ये घरात शिरलेल्या लष्कराने अतिरेक्यांना पकडले. त्यावेळी झालेल्या चकमकीत दोन अतिरेकी ठार झाले आणि एक जिवंत पकडला गेला. भारतीय लष्कराला गुलशनच्या बापानं मदत केल्याचा अतिरेक्यांचा ग्रह झाला. आठवडाभरात गुलशनच्या घरातल्या सगळ्यांची कत्तल झाली. आईला मात्र मुजाहिदीनांनी उचलून नेले. तेव्हापासून हा पोरगा सुडानं पेटून उठला. आईला शोधत आणि मुजाहिदीनांच्या छावण्यांची माहिति काढत हा सतत पाकिस्तानव्याप्त काश्मीर भागात भिकाऱ्याचे सोंग घेऊन भटकत राहतो. मुजाहिदीनांचा विषय निघाला तरी संतापानं त्याचं अंग थरथरत राहातं. एखादं लहान मूल एवढा तिटकारा करू शकतं, असं मला कधीही वाटलं नव्हतं.'' कांबळे क्षणभर गप्प राहिला. गुलशनचे थरथरणारे ओठ आठवून कांबळेची मन:स्थिती बिघडली असावी.

तो पुढे म्हणाला. ''सेंट्रल स्कूलमध्ये प्रवेश घे म्हणून आम्ही त्याची मनधरणी करतो. आता ही शेवटची मोहीम करून नंतर शिकण्याचं त्यानं मान्य केलं आहे.

तो जे काम करतो ते मोठ्या माणसांना शक्य होत नाही. तुमची टेहळ्यांची अख्खी कंपनी जेवढं काम करते, तेवढं तो एकटा पार पाडतो. पाकिस्तानव्याप्त प्रदेशात आपले हेर जाऊ शकत नाहीत. त्यांच्या सैन्याच्या पिछाडीला जाऊन पाच-दहा दिवस तिथं मुक्काम करणं टेहळ्या गटाला शक्य नसतं. पण हे काम तो उत्तम प्रकारे करतो. कामाला अत्यंत आदर्श पोरगा... अजून



पाहा... आर्किऑलॉजिकल संग्रहालय, सारनाथ
(बौद्धकाळातील निरनिराळी शिल्पे)
**प्रायोजक - डॉ. नरेंद्र व सौ. अनिता देशमुख, पुणे**

काही महिन्यांत त्याच्या आईचा शोध लागला नाही तर लेफ्टनंट कर्नल करंदीकर त्याला दत्तक घेणार आहेत.'' करंदीकरांबद्दलचा माझा आदर शतपटीनं वाढला.

मुलाबाबतचे माझे सारे भ्रम, संशय दूर झाले. दूर असूनही मनानं मी युद्धात होरपळलेल्या त्या कोवळ्या जीवावर मनापासून प्रेम करायला लागलो. आणि काश्मीरच्या सुंदर भूमीचा सत्यानाश करणाऱ्या पलीकडच्या देशाला मनातल्या मनात लाखोली वाहायला लागलो. मी कांबळेचा निरोप घेतला. कुठल्यातरी गुप्त मोहिमेची तयारी तो करत असावा, असा मला संशय आलेला होता. एकदा त्यावरून त्याला छेडण्याचा प्रयत्नही मी केला. पण त्यानं ताकास तूर लागू दिला नाही. त्याच रात्री अचानक खांडेकर बंकरमध्ये आला. आज हा इथे येणार याची कुणकूण मला लागली होती. ती खरी ठरली. चेहऱ्यावरून तो भयंकर अस्वस्थ वाटत होता. आल्या आल्या हात चोळत मला म्हणाला,

''आज रात्री तू काय करतोय?''

''काही विशेष नाही. का?''

''माझ्याबरोबर चल जरा'' असं सांगून मला घेऊन खांडेकर खंदकांकडे निघाला. माझ्या कंपनीसाठी राखून ठेवलेल्या रबरी होड्या त्याला बघायच्या होत्या. काहीही न बोलता त्यानं एकेक होडी शांतपणे तपासली. खूप वेळानं त्यातली एक निश्चित केली. होडी पाण्यात टाकून तयार ठेवायच्या सूचना मी माझ्या सैनिकांना दिल्या. तो खंदकाकडे वळलादेखील नाही. सारख्या सिगारेटवर सिगारेट तो फुंकत होता. त्याच्या अस्वस्थपणाचे कारण मी त्याला विचारले. तो म्हणाला, ''विशेष काही नाही. गुलशन परत चाललाय.'' मी शहारलो. सहीसलामत आपल्या भूमीत सुरक्षित असलेला पोरगा मोहिमेसाठी परत त्या भयानक प्रदेशात चालला आहे? स्वत:चा जीव धोक्यात घालून?

आम्ही माझ्या बंकरमध्ये शिरलो तर आमच्याआधी तिथे येऊन बसलेला गुलशन ऊर्फ डड्डू आम्हाला दिसला. माझ्या रूमची त्यानं खेळातील युद्धभूमी करून टाकली होती. मुख्य म्हणजे या सगळ्यामध्ये माझा जीव की प्राण असलेला रॅम्बो सुरा तो हातात घेऊन बसला होता. एका मुलीने तो मला दिलेला होता. तो सुरा मी प्राणांच्या पलीकडे जपलेला होता. चुकूनसुद्धा कधी कुणासमोर मी तो बाहेरही काढत नसे. पेटीच्या तळाशी असलेला तो सुरा या मुलाने कसा कुणास ठाऊक शोधून काढला. सुऱ्याच्या चामडी म्यानात खुपसून तो पुन्हा उपसून उंचावर धरण्याचा बालसुलभ खेळ मुलगा करत होता. धावत जाऊन मी तो सुरा त्याच्या हातातून काढून घेतला. मुलगा दुखावला.

''मला देना रे तो,'' मुलगा अजिजीनं म्हणाला.

''कुणाचीतरी आठवण आहे ती. नाही देऊ शकत,'' म्हणत मी सुरा माझ्या पेटीच्या तळाशी कपड्यांखाली अलगद ठेवून दिला. हिरमुसला होऊन पोरगा टेबलावर जाऊन बसला. मी त्याच्याजवळ गेलो.

''रागावलास?'' मी म्हणालो.

''अहं. चालतं.... प्रत्येकाची जपलेली एकेक आठवण असते.'' धीरोदात्तपणे मुलगा म्हणाला. त्याचा चेहरा विचित्र झाला होता. अचानक तो म्हणाला, ''जळालेल्या माझ्या घरापाशी जाऊन मी स्वत: कित्येकदा अशा आठवणी शोधत असतो.''

मी पाहिलं, त्याचे डोळे आग ओकत होते आणि खालचा ओठ भयावह थरथरत होता. कांबळेनं सांगितला अगदी तसा. मला क्षणभर मुलाची भीती वाटली.

''डोकं शांत ठेव. निघायचं आहे आपल्याला.'' म्हणत खांडेकर जागेवरून उठला. मुलाचा विचित्र झालेला चेहरा झटक्यात नॉर्मल झाला. पेटलेले डोळे विझले. थरथरणाऱ्या ओठाची हालचाल थांबली. शांतपणे उठून त्यानं

सर-दर्द, अर्धशीशी, मानसिक तनाव, दिमागी थकान,
बदन दर्द व हाथ पैर के तलवों के जलन को शीघ्र दूर करता है

आयुर्वेदिक राजहंस
कायाकल्प तैल®

ठंडा है...
अच्छा है...



RAJHANS PRODUCTS Regd. Off. - 319, Rambhau Bhogle Marg, Mumbai - 400 010
Tel.: 022-66574719 email : rajhansherbal@gmail.com

॥ शुभ दीपावली ॥

**Introducing New Saving Bank Account**
**For Salaried And Students !!!**

**KBL - SALARY PRIVILEDGE**
- *Saving Account for salaried people*
- *No Minimum balance criteria*
- *Free international Visa Debit Card*

**KBL - KISHORE**
- *Account for Student with age between 12 years to below 18 years*
- *No minimum balance (Zero Balance)*

**KBL - TAX PLANNER DEPOSIT (Rebate Under 80 CCC of IT)**
- *Internet Banking facility*
- *Quick funds transfer through NEFT to anywhere in India (RTGS)*
- *100% CBS Branches (Anywhere Banking)*
- *Gold Loan available at attractive Rate of Interest*

*With Best Compliments From...*
**KARNATAKA BANK LTD.**
Bail Ves, Solapur, Phone : 2325230/2322681



शोधा... @ www. shantaramathavale.com
(रसिकांना भुरळ घालणाऱ्या अनेक गीतांचे गीतकार शांताराम आठवले यांची गाणी ऐका)
संग्रही ठेवा - कथासंग्रह-'**दरवळ**, '**मृद्‌गंध**', छात्र प्रबोधनप्रकाशन, किंमत रु. ४०/, ६०/

सगळ्यांसाठी प्लेट्स घेतल्या.

आम्ही जेवायला बसलो. एकदम मुलाला आठवण झाली, ''कांबळे कुठं आहे?''

''त्याला हेड ऑफिसरनी बोलावून घेतला श्रीनगरला. तो गेला.'' खांडेकरनं सांगितलं.

''काय? निघून गेला? मला न भेटता निघून गेला?'' मुलानं आपला चमचा काचेच्या बाऊलवर जोरात आपटला.

''त्याला इथं येणं शक्य झालं नाही. फार तातडीनं त्याला बोलावण्यात आलं.'' खांडेकर समजावत होता.

मीदेखील बुचकळ्यात पडलो. पाच वाजेपर्यंत मी आणि कांबळे एकत्र होतो. मुलाबद्दल गप्पा मारत होतो आणि अचानक श्रीनगर?

''तर मग आपण दोघांनीच जायचं?'' वळून मुलानं विचारलं.

''नाही तिघांनी. हा येईल ना आपल्याबरोबर.'' खांडेकरनं पटकन् माझ्याकडे मानेनं खूण केली.

''तू हसू नकोस. मी तुला अत्यंत गंभीरपणे सांगतो आहे,'' खांडेकर पुढे म्हणाला. त्याचा चेहरा केवळ गंभीरच नाहीतर चिंताक्रांत बनला होता. ''हेरगिरीसाठी मुख्य कंपनी कमांडर स्वत: कधीच जात नाही. काही बरं-वाईट झालं तर आमच्यावर तर शेकेलच पण तूसुद्धा गोत्यात येशील. नीट विचार करून निर्णय घे.''

मी प्रचंड उत्साहात त्याला 'हो' म्हणून टाकले. कागदी कामं आणि युद्धाची वाट बघत राहण्यानं मी आधीच वैतागलो होतो.

''वेल, पुढचं प्लॅनिंग करूया.'' म्हणून खांडेकरनं टेबलालवर नकाशा पसरला.

आम्ही तिघे पलीकडच्या किनाऱ्यावर, झुडुपांमध्ये होडी लपवणार होतो. वरच्या प्रवाहाकडे किनाऱ्यालगत चालत समोरच्या डोंगरावरच्या खिंडीपर्यंत सहाशे मीटरपर्यंत जाणार होतो. खांडेकरनं हा मार्ग नकाशावर दाखवला.

''थेट या ठिकाणापर्यंत होडीतून जाणं जास्त चांगलं झालं असतं; पण तिथं किनारा खूप बोडका आहे आणि होडी लावायला कुठंही जागा नाही...'' खूप वेळपर्यंत खांडेकर आम्हाला समजावत होता. मुलाला आमच्या काठावरून मशिनगन्स्चं संरक्षण कसं मिळणार आहे, पुढे खिंडीतून मुलगा कसा कुठे जाईल, आमचा परतीचा मार्ग कसा असणार आहे... असं बरंच काही त्यानं सविस्तर सांगितलं. गेल्या पंधरा दिवसांत त्यानं खूपच अभ्यास केलेला दिसत होता.

प्लॅन फुलप्रूफ होता. 'कांबळेनं आखला आहे,' असा ओझरता उल्लेख खांडेकरच्या बोलण्यात आला आणि बिछान्यात झोपलेला मुलगा उठून बसला. फोनकडे जात म्हणाला, ''कांबळे जिथं गेला आहे तिथला कोड सांग. मला त्याच्याशी बोलायचं आहे.'' जागेवरून उठत खांडेकरनं त्याच्या हातातला रिसिव्हर उचलून खाली ठेवला आणि सांगितलं- ''मुख्य कमांडरचा फोन असा कारणाशिवाय लावून चालत नाही. डड्डू, तू तयार हो. कांबळेनं तुला बेस्ट लक सांगितलं आहे. तेवढं पुरेसं नाही का?''

घड्याळात बघून कोरड्या आवाजात खांडेकर पुढे म्हणाला, ''वेळ झाली.''

मुलगा शहाण्यासारखा उठला आणि कोपऱ्यात जाऊन अंगावरचे कपडे काढायला लागला. खांडेकर सूचना देत होता, ''...खिंडीत अगदी कडेकडेनं जा. लक्षात ठेव; खाली सगळे सुरुंग पेरले आहेत... सतत कानोसा घे. अगदी स्तब्ध थांब आणि कानोसा घे. पाकिस्तानी खंदकावर सतत गस्त घालतात. तेव्हा हातावर सरपटत जा आणि वाट पाहा... गस्तवाले निघून गेले की, मग खंदक ओलांड आणि मग पुढे जा...''

डड्डू, अत्यंत दरिद्री, चिंध्या झालेले, गरीब मुलाचे कपडे घालणं सुरू झालं होतं. दोन-तीन हँडग्रेनड्स, दोन-चार रणगाडाविरोधी ग्रेनेड्स, भरलेली दोन पिस्तुलं, अंधारात चमकणाऱ्या तबकडीची घड्याळं असं सगळं मुलाच्या


स्वप्ने पेरून कणाकणांत, फुलवूया जगी ध्येयाचे मळे ।
स्वप्नाला आणून सत्यात, दूर करू अंधाराचे जाळे ।।

प्रायोजक - डॉ. कल्याणी नासेरी, पुणे

कंबरपट्ट्यात आणि अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी अडकवणं चाललं होतं. त्याच्या लोकरीच्या बाह्यांमध्ये कंपास आणि प्रकाशशलाका उडवणाऱ्या लहानशा टॉमीगन्स अडकवून खांडेकरनं मुलाला भरपूर उड्या मारायला लावल्या. धातूच्या वस्तूंचा कुठलाही आवाज होत नाही ना ते पाहिलं. हातमागावर विणलेल्या फडक्यात डड्डूचे खाण्याचे पदार्थ गुंडाळले. अत्यंत चौकसपणे मुलगा प्रत्येक गोष्टीची पाहणी करत होता. आता त्यांच्याबरोबर मलाही त्यांनी उड्या मारायला लावल्या. कारण माझ्यापण अंगावर अनेक ग्रेनेड्स आणि पिस्तुलांचा भार आलेला होता.

मुलाच्या चेहऱ्यावर परत अस्वाभाविक एकाग्रतेचा आणि अंतर्गत ताणाचा भाव उमटला होता. पंधरा दिवसांपूर्वी पहिल्यांदा माझ्या बंकरमध्ये तो आला, तेव्हा त्याचा असाच चेहरा मी पाहिला होता.

मोठ्या मेटॅडोअर टॉर्चचा उजेड आम्ही आमच्या डोळ्यांवर पाडून घेतला. अंधारात जास्त चांगले दिसण्यासाठी. बंकरबाहेर पडता पडता मुलाने खांडेकरला थांबवले आणि त्याला घट्ट मिठी मारली. क्षणभर तसाच थांबून खांडकरने डड्डूला खांद्यावर धरून त्याचा चेहरा आपल्यासमोर आणला आणि त्याच्या घोगऱ्या आवाजात म्हणाला– ‘‘जयहिंद.’’

मुलाचे डोळे पेटले, नाकपुड्या फुलारल्या आणि अस्फुट आवाजात खांडेकरच्या डोळ्यांत डोळे घालून तो म्हणाला– ‘‘जय... हिंद’’.

माझ्या अंगावर काटा आला. देशप्रेमाची जाज्वल्य ज्योत तेवती ठेवणाऱ्या या मंत्राचा उच्चार माझे रक्त पेटवून गेला. ताड्ताड् चालत बंकरमधून आम्ही बाहेर पडलो.

मी आमच्या खंदकात उतरलो. तसे सगळे सैनिक माझ्याभोवती गोळा झाले. गप्पा मारता मारता सिगारेट ओढायला म्हणून मी काडेपेटी






पाहा... पूर्णगड - जि. रत्नागिरी
(अप्रतिम, विलोभनीय असे सागराचे दर्शन) पावस.. पूर्णगड
संग्रही ठेवा-‘**गंध मोहवी काव्याचा, भाग १-२**’, छात्र प्रबोधनप्रकाशन, किं. प्रत्येकी रु. ५०

ओढली आणि मला दिसले की खंदकाच्या कोपऱ्यात गवताच्या ढिगावर कुणीतरी झोपला आहे. तो पाठीवर निजला होता आणि तोंड टोपीने झाकले होते. अजूनही काही उलगडा न झाल्यानं मी टोपी उचलली आणि हादरलोच. तोच तो सौम्य चेहरा, डाव्या डोळ्यावर गोळीने बारीक भोक पडलं होतं.

''फार मूर्खासारखं घडलं,'' खंडागळे नावाचा सैनिक हळू आवाजात पुटपुटला. ''होडी तयार केली आणि कांबळे माझ्यापाशी खंदकातच बसला होता गप्पा मारत. वर कॅप्टन खांडेकर आले. त्यांचा आवाज ऐकून हा खंदकाबाहेर पडून उभा राहिला न राहिला तोच तसाच सावकाश खाली घसरला. गोळीबाराचा आवाजसुद्धा आम्ही ऐकला नाही. कॅप्टन त्याच्यापाशी धावले. 'कांबळे, कांबळे' ओरडत राहिले. आम्ही पाहतो तर काय तो जागच्या जागी ठार झालेला होता. कुणालाही याबाबतीत सांगायचं नाही अशी ताकीद कॅप्टनने दिली आहे.''

मला सगळं समजलं. मुलगा कामगिरीवर निघाला होता आणि त्याची मन:स्थिती बिघडवून चालणार नव्हतं. त्याला काहीही कळून चालणार नव्हतं. मागच्या बाजूला टॉमीगन सज्ज करून बसलो. ''नीट बैस.'' म्हणून खांडेकरनं माझ्या खांद्यावर थोपटलं आणि घड्याळात पाहून शीळ घातली. मोहिमेच्या प्रारंभाचा तो इशारा होता. तात्काळ त्याला उत्तर मिळाले. उजव्या फळीवर आठव्या बटालियनच्या मशिनगन्स बसवलेल्या होत्या. तिथे आमची पाठराखण करायला सज्ज असलेल्या तुकड्यांचे कमांडर आणि तोफखान्याचे निरीक्षक बसले होते, तेथून अंधारात रायफल कडाडली. होडी वळवून खांडेकर वल्हवू लागला. अतिशय धीम्या गतीनं खांडेकर होडी चालवत होता. आम्ही अक्षरश: एक एक क्षण मोजत होतो.

नदीच्या मध्यभागी आम्ही आलो, तेव्हा समोर एक मशिनगन कडाडू लागली. आमच्या जवळून गोळ्या सू सू जात होत्या, पाण्यावर आपटून फुस्स आवाज करत होत्या.

''एके-छपन्न चायना मेड,'' मला बिलगत मुलगा अचूक पुटपुटला.

''घाबरलास?''

''थोडासा,'' अगदी मंद आवाजात तो म्हणाला ''अजून सवय होत नाही. काहीतरी भीती बसली आहे मनात... आणि भीक मागायचीसुद्धा सवय होत नाही. किळस येते.''

या स्वाभिमानी मुलाला भीक मागत फिरताना किती मानसिक यातना होत असतील याची मी सहज कल्पना करू शकत होतो.

आणखी काही क्षण उलटले आणि होडी वाळूवर खरचटली. खांडेकरनं वल्ही बाजूला ठेवली, तो पाण्यात उतरला आणि होडीची मागची बाजू धरून ती किनाऱ्याकडे ओढत नेली. ''मी आलोच.'' सांगून खांडेकर अंधारात नाहीसा झाला. पावसाची रिमझिम चालू झाली होती. मी मुलाच्या अंगावर माझा रेनकोट घालत त्याला म्हणालो, ''अंगावर घे. थंडी आहे.''

''आता काही फरक पडत नाही.'' किंचित ऐकू येईल अशा आवाजात मुलगा उद्गारला. मला जाणवलं की त्याची काळजी घेण्याची आमची डेडलाईन आता संपली होती. इथून पुढे पावसा-पाण्याला, भयाण निसर्गाला आणि त्याहून भयाण अशा माणसांना तोंड देत मुलगा एकटाच असणार आहे. अंगावर रेनकोट घालायला आता कुणीही त्याच्याबरोबर नसणार आहे. मला स्वत:लाच पोरकं वाटायला लागलं.

इतक्यात, खांडेकर परतला आणि मुलाला म्हणाला, ''काहीच धोका नाही. खिंड आपल्यासमोर आहे. तू सरळ चालत जाऊ शकतोस.''

घड्याळात बघत त्याने मुलाला विचारलं, ''आपल्यापाशी आणखी चार मिनिटं आहेत. तू

कसा प्रकाश पाझरे, कसा विरे हा अंधार।
क्षणात रंग बदलले, कोण आहे सूत्रधार ।।

प्रायोजक - सौ. राजश्री राजेश चावरे, डोंबिवली

कसा आहेस?''

''व्यवस्थित.''

काही काळपर्यंत आम्ही अंधारात कानोसा घेत बसून राहिलो. अचानक उठत मुलगा म्हणाला, ''आता मी चलतो.''

''मी तुला पोहोचवायला येतो.'' अचानक खांडेकर म्हणाला, ''खिंडीमधून थोडंसं अंतर.''

आमच्या योजनेत हे नव्हतं.

''नाही,'' मुलाने विरोध केला. ''एकटाच जातो. तू मोठा आहेस तुला ते नेमका टिपतील.''

त्याची छोटी, हडकुळी आकृती माझ्याशेजारी उभी होती आणि त्याच्या भिकाऱ्याच्या वेषात तो कुडकुडत होता, असं मला भासलं. कदाचित मला भास झाला असावा.

''सी यू,'' सावकाशपणे तो खांडेकरला म्हणाला.

''सी यू,'' मला जाणवले की त्यांनी एकमेकांना मिठी मारली आणि खांडेकरनं त्याचा पापा घेतला.

''सांभाळून राहा. स्वत:ला जप. आम्ही चढाई केली तर कुठल्यातरी गावात थांबून आमची वाट बघ.''

त्याचा पापा घ्यायचा माझा निर्णय होण्यापूर्वीच तो अंधारात नाहीसा झाला.

***

परत आल्यानंतर भट्टीनं गरम झालेल्या बंकरमध्ये बसून खांडेकरच्या सोबतीने वाफाळलेली कॉफी पिताना मला अपराधी वाटत होतं. माझा सुरा मुलाला द्यायला हवा होता. माझ्यापेक्षा त्याला त्याची जास्त गरज होती.

मूळ लेखक : ब्लादिमिर बोगोमोलोव

**रूपांतर : शंतनू पांडे**

बी-२/९, सुंदरनगरी, कोथरूड, पुणे 411 029

***चित्रकार : अनंत कुलकर्णी***

Nakhye Udyog Nakhye Udyog Nakhye Udyog Nakhye Udyog Nakhye Udyog Nakhye Udyog

लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह

# सुसज्ज हॉल



वातानुकुलित

## शुभमंगल कार्यालय

शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर, लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ९७०२६६६०००

Nakhye Udyog

अभिमानास्पद... जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धा - (ब्रिजटाऊन)- एम. सी. मेरीकोम (सलग पाचव्यांदा सुवर्णपदक)

संग्रही ठेवा - **'गीता गीताई'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. १०/-

# संगणकाच्या सीडींची लॅम्पशेड

निकामी झालेल्या सीडींचे वॉलपीस याआधी तुम्ही केले असेल. पण यावेळी सीडींच्या चकचकीत पृष्ठभागाचा वापर करून आपण लॅम्पशेड बनवूयात. या लॅम्पशेडमध्ये दिवा लावल्यानंतर सीडीच्या चकचकीत पृष्ठभागामुळे प्रकाश जास्त छान पडतोय; हे तुमच्या लगेच लक्षात येईल.

**साहित्य –** निकामी झालेल्या सीडी/डिव्हीडी – ५, कटर, चिकटविण्यासाठी फेविस्टिक/आरलडाईट आणि चिकटपट्टी, सीडी मार्कर, कोनमापक, वहीचा जाड पुठ्ठा, सुशोभनासाठी रंगीत कागद, आरसे, टिकल्या इ.

**कृती – १)** सुरुवातीला जाड कार्डशीटवर ७.३ सेंमी बाजू असलेला समभुज पंचकोन ABCDE काढा. हा पंचकोन कापून त्याचा स्टेन्सिलसारखा आपल्याला उपयोग करायचा आहे. (पंचकोनाचे सर्व कोन १०८° चे असतात. AB ही ७.३ सेंमीची रेषा काढून घ्या. B बिंदूवर कोनमापकाच्या साहाय्याने १०८° चा कोन काढा. ७.३ सेंमीवर C बिंदू काढा. C वर कोनमापक ठेवून हीच कृती परत करा.) (आ. १)


**२)** हा पंचकोन प्रत्येक सीडीच्या चकचकीत पृष्ठभागावर ठेवून पाचही सीडींवर मार्करच्या साहाय्याने पंचकोन ABCDE काढून घ्या. (आ. २)

**३)** आकृती २ मध्ये दाखवल्याप्रमाणे AB रेषेवरचा भाग कटरच्या साहाय्याने कापून टाका. त्यासाठी AB रेषेवरून ८-१० वेळा दाबून कटर फिरवा. नंतर AB रेषेवर विरुद्ध बाजूने सीडी दुमडल्यावर लगेचच सीडीचा तुकडा पडेल. अशा पाचही सीडी कापून घ्या. (आ. ३)


**४)** आता या पाचही सीडी आपल्याला एकमेकींना जोडायच्या आहेत. सीडीच्या DE बाजूवर दुसऱ्या सीडीची कापलेली AB बाजू ठेवा. AB आणि DE रेषा एकमेकींशी तंतोतंत जुळतायतना याची काळजी घ्या. थोडा जरी कोन बदलला तर नंतर तयार होणाऱ्या लॅम्पशेडचा आकार वेडावाकडा होऊ शकतो. या रेषा एकमेकींना जुळवून चिकटपट्टीच्या साहाय्याने या २ सीडी एकमेकींना जोडून घ्या. आता हीच कृती वापरून पाचही सीडी एकमेकींना जोडून घ्या. (आ. ४)

**५)** आता पहिली आणि पाचवी सीडी कशी जोडायची ते पाहूया.


- ❋ या पाचही सीडी उभ्या करून पहिली आणि पाचवी सीडी जोडा.
- ❋ पहिल्या सीडीची DE बाजू आणि पाचव्या सीडीची AB बाजू एकमेकींना जुळवून घ्या.
- ❋ या सीडींच्या दोन्ही बाजू तंतोतंत जुळल्या की आतून चिकटपट्टी लावून त्या चिकटवून घ्या.




(आ. १)



(आ. २)



(आ. ३)




(आ. ४)


मंगल ज्योती नील अंगणी, स्नेहातुनी विलसते चांदणे ।
रुमझुम वैभव अवतरते, नव दीपावली झगमगते ।।

प्रायोजक - श्री. सागर सुभाष सुराणा, चिंचवड, पुणे

(आ. ५)



(आ. ६)



* हा तुमच्या लॅम्पशेडचा तयार झालेला आकार वर निमुळता होत जाणारा आहे ना याची खात्री करा. (आ. ५)
* आता या सांगाड्याची जोडणी पक्की होण्यासाठी प्रत्येक दोन सीडींच्या सांध्यावर फेविक्विक किंवा आरलडाईट लावा.

६) आता वहीच्या जाड पुठ्ठ्यावरही ABCDE हा पंचकोन काढून कापून घ्या. या पंचकोनाच्या मध्यावर वायर जाईल इतकं छिद्र पाडून घ्या.

७) हा पंचकोन सांगाड्याच्या निमुळत्या होत जाणाऱ्या बाजूकडे आपल्याला चिकटवायचा आहे. त्यासाठी पंचकोनाच्या पाचही बाजूंना फेविक्विक लावून निमुळत्या बाजूकडे सरकवत न्या. पंचकोन निमुळत्या बाजूकडून वर जाणार नाही. तो मध्येच योग्य रितीने जोडला जाईल.

८) आता या लॅम्पशेडवर बाहेरच्या बाजूने रंगीत कागद चिकटवून घ्या. त्यावर आरसे, टिकल्या, कागद इ. च्या साहाय्याने सुशोभन करा.

९) वरच्या बाजूच्या छिद्रातून आत वायर सोडून त्याला होल्डर लावून तुम्ही ही लॅम्पशेड टांगून ठेवू शकता.

**- शिवांगी मांडके**
१०, सई गार्डन, पर्वती पायथा, पुणे 411009

**(रंगीत प्रकाशचित्र पान क्र. १२५ वर पाहा.)**

# स्टीलची फुलदाणी

बऱ्याचदा स्टीलच्या वस्तू न वापरताच त्यांना गंज चढतो किंवा वापरातील वस्तूंचा आपल्याला कंटाळा येतो. तेव्हा अशा वस्तूही तुम्ही कल्पकता लढवून तुमच्या कामासाठी वापरू शकता. खाली तेलाच्या भांड्याचे उदाहरण दिले आहे.




**साहित्य –** तेलाचे भांडे, ॲक्रिलिक रंग, ब्रश, कागद, पेन्सिल, कटर, फुलं बनवण्यासाठी वेगवेगळ्या रंगांचे कागद, गोंद, चिकटपट्टी इ.

**कृती –** प्रथम भांड्याच्या आकाराप्रमाणे स्टेन्सिल बनवण्यासाठी कागद घ्या. त्यावर हवे ते आकार काढून कटरच्या साहाय्याने अलगद कापून घ्या. भांड्यावर बाहेरील बाजूने कागद गुंडाळा. सेलोटेपच्या साहाय्याने कागद चिकटवून घ्या. कागद घट्ट चिकटवल्यावर त्यावर ॲक्रिलिक रंग लावा. रंग लावल्यावर सेलोटेप अलगद काढा व कागद काढून घ्या. भांडे पूर्णपणे सुकू द्या. भांडे सुकेपर्यंत चित्रात दिसताहेत तशी फुलं करून घ्या. फुलांचा आकार कागदातून कापून घ्या. त्यावर मध्ये छिद्र पाडून खराट्याच्या काडीवर ती अडकवा व या फुलदाणीत मांडा.

**- संपदा साळवी**
sampadasalvi@gmail.com

पाहा... ज्यूट संग्रहालय, कोलकता
(ज्यूटपासून तयार केलेल्या वस्तूंचा कृतीसहित संग्रह)
संग्रही ठेवा - '**कल्पक बनूया**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-




(नेदरलॅण्ड,थायलंड, इ. देशांमध्ये भव्य-दिव्य मिरवणुकीतून साजरा होणारा Fruit Corso Festival. काही क्षणचित्रे)

आम्ही मूर्तरूप होऊ, सळसळत्या चैतन्याचे
रंगात रंगुनी स्वप्न पाहू, उज्ज्वल भवितव्याचे


**शिवशक्ती पेंट्स- रंग उत्पादने**


(आय.एस.ओ. ९००१-२००८ मान्यताप्राप्त उद्योग)

**यंत्र प्रज्ञा - यंत्र उत्पादन**

फोन :०२०-२५२३०२५०/८९० www.shivshaktipaints.com
yantrapradnya @ vsnl.net, info@shivshaktipaints.com

**भांबुरकर परिवारातर्फे दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !**


काळाबरोबर वाटचाल करा. काम सहजपणे करा.
युनियन बँकेची टेक्नॉलॉजी बँकिंग सोल्यूशन्स.
कर भरण्यासाठी धावाधाव कशाला?
सोप्पं आहे! युनियन बँकेच्या इंटरनेट बँकिंगच्या साहाय्याने करांचा ऑनलाईन भरणा करा.
वेळखाऊ प्रक्रियांचा काळ केव्हाच मागे पडला आहे. तसेच रांगेत ताटकळत उभे राहण्याचा आणि कागदपत्रे दाखल करण्याचा देखील. आता युनियन बँकेच्या जलद आणि सुलभ इंटरनेट सोल्यूशन्स द्वारा प्रत्येक गोष्ट मिळवा तुमच्या डेस्कटॉपवर.
• बँकेतील अन्य खात्यांमध्ये निधी अंतरण • ऑनलाइन NEFT, ऑनलाइन RTGS • बिलांचा भरणा
• करांचा भरणा • तिकिटांचे बुकिंग • अकाउंट स्टेटमेंट आणि आणखीही बरंच काही
फोन बँकिंग | मोबाइल बँकिंग
इंटरनेट बँकिंग | एटीएम | ब्रँच बँकिंग
www.unionbankofindia.co.in
टोल फ्री नं. 1800 22 2244
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक



**।। धार्मिक प्रकाशन संस्था ।।**

**सम्राट प्रकाशन** **आशा पब्लिकेशन्स**

मुंबई - १७३, एफ गायवाडीसमोर, गिरगाव रोड, मुंबई - ४
दूरध्वनी : (का) २३८६ ६१५१, (नि.) २६८२ ३४९९,
मोबाईल : सम्राट - ९८७७३७२०१, रवींद्र पेठे - ९८७७३७२०५
पुणे - तळमजला, आदिगंगा को. ऑप. हौ. सोसा., ८६९ सदाशिव पेठ, पुणे - ३०
शशिकांत ढेपे - ९९८७७३७२०३

**संपूर्ण चातुर्मास संपादक : काशिनाथ अनंत जोशी**

*१९५६ सालापासून प्रकाशित होणारा, गेली पंचावन्न वर्षे, महाराष्ट्रातील घराघरात पूजला जाणारा, लाखोंच्या संख्येने विक्रीचा उच्चांक गाठणारा, सर्व कुटुंबाचा धार्मिक मार्गदर्शक*

---

**दि बारामती सहकारी बँक मर्यादित**

मुख्य कार्यालय : भिगवण चौक, बारामती, जि. पुणे ४१३ १०२.

**दसरा व दीपावली निमित्त जाहिर करीत आहोत ठेवींवर भरघोस व्याजदर**

२५ महिने ते ३६ महिने मुदतीच्या ठेवीवर
सर्वसाधारण ठेवीदारांसाठी द.सा.द.शे. **८.००** टक्के व्याजदर
ज्येष्ठ नागरिकांच्या ठेवीसाठी द.सा.द.शे. **८.५०** टक्के व्याजदर
अन्य कालावधीसाठी देखील आकर्षित व्याजदराचे विविध पर्याय आपणांसाठी उपलब्ध
आमचे असंख्य सभासद, ठेवीदार, खातेदार व शुभचिंतक यांना
दसरा व शुभ दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

| प्र.ह. शर्मा | श्रीकांत सिकची | अविनाश भापकर |
|---|---|---|
| कार्यकारी संचालक | अध्यक्ष | उपाध्यक्ष |

---

# छात्र प्रबोधनतर्फे

लेखक
चित्रकार
जाहिरातदार
प्रायोजक
हितचिंतक
गावोगावचे
कार्यकर्ते
सर्वांना
**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**

---

**शुभ दीपावली** Everything in Real Estate

# परांजपे इस्टेट्स

**फ्लॅट नं-८, प्लॉट नं.१५,**
**युनायटेड वेस्टर्न को. ऑप. सोसा.,**
**कर्वेनगर, पुणे- ४११ ०५२.**
**फोन : २५४५२२६१, मोबाईल : ९८२२४४२१८१**



---

# पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस

DOT PEST CONTROL

**'येथे सर्व प्रकारची पेस्ट कंट्रोलची कामे स्वीकारण्यात येतील'**

**महेंद्र कटके**
**'आपला विश्वास - आमची सेवा'**

Member


एफ-२, राजहंस सीएचएस, गोविंदाश्रम हॉटेलमागे,
चार रस्ता, डोंबिवली (पू)-४२१२०१.
फोन : ०२५१-६४५११११/६४५२२२२/६/६४५७७७३
मोबा : ९८१९८११११३
इ-मेल : admin@dotpestcontrol.com
वेबसाईट : www.dotpestcontrol.com

---

आकाशीच्या चांदण्यांनी सप्तसूर छेडले।
दीपावलीच्या या दिवशी प्रकाशवैभव भूवर अवतरले ।।

**प्रायोजक - श्री. विद्याधर केळकर, चेंबूर**

शिक्षणाची उंच भरारी
'रत्नाकर' करेल स्वप्नं पुरी




1) Loan available for higher Education Studies in India and Abroad.
2) Maximum up Rs. 10.00 Lakhs for studies in India.
3) Maximum up to Rs. 20 Lakhs for studies abroad.
4) No margin for loans up to Rs. 4 Lakhs.
5) No Security up to Rs. 4 Lakhs.
6) Repayment 5 to 7 years after commencement of repayment.
7) No processing charges.

**दि रत्नाकर बँक लि.**

(शेड्यूल्ड कमर्शियल बँक) Visit us:www.theratnakarbank.com

प्रशासकीय कार्यालय : महावीर, श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर फोन क्र. २६५०९८१ ते ८४



## HAPPY DIWALI



# Anupam Enterprises

Manufacturers of
VSAT Antenna Mounts, Transformer/Machinery Spares, Fabrications

Office and Works
B-25, Salim Compound, Marol Naka, Andheri (East),
Mumbai - 400 059. Mobile No. 9820104492
Email : anuengine@rediffmail.com




अभिमानास्पद... ऑफिसीए दला लिजिआँ दॉवर - लता मंगेशकर
(फ्रान्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार)
**प्रायोजक - सौ. स्मिता हेमंत धर्माधिकारी, मुलुंड**

*What happens to good people,*
*When bad things happen to them?*
*They become*
*Better People !*
*So be Good & Better People !!*




# SAHAKAR

***GLOBAL* Pvt. Ltd.**

**C r e a t i n g   L a n d m a r k**

**Registered Office :** 8/8, Dahyabhai Compound
S.V. Road Malad (West),
Mumbai - 400 064.

**Corporate Office :** Plot No. 16, Mira Co-op. Industrial Estate,
Opp. Hotel Amar Palace, West Express Highway,
Mira Road, District : Thane - 401104.

**Website :** www.sahakarglobal.com

**E-mail :** admin@sahakarglobal.com

**Telephone No. :** +91 22 2845358 / 6359

**Fax :** +91 22 28455362


जुनेपुराणे सोडून द्यावे, औदासिन्य विसरून जावे।
नव्या उर्मिने फुलून यावे, नव्या दिशांचे गाणे गावे।।

**प्रायोजक - श्री. राजू आंबेकर, नवी मुंबई**

शुभदिपावली

# MD INSTRUMENTS

- Manufacturer and supplier of
  **COSMETOLOGY & DERMATOSURGERY EQUIPMENTS**
- IPL System - For Hair removal , Pigmentation , Skin Rejuvenation
- Ultrasound + RF - Fat Loss / Inch Loss , Face Lifting for immediate and long lasting results
- Q switched Nd- Yag laser - Tattoo , Birthmark, Nevus of Ota Removal
- RF surgical Unit + Face Lifting -
- CRYOJET - Liquid Nitrogen Delivery System
- UV units -- For Vitiligo and Psoriasis treatments
- Wood's Lamp - Skin diagnosis
- Skin Cautery
- Dermasilk - Skin polishing , Wrinkle Removal , Pigmentation reduction etc.
- Diamond Polishing Kit - Skin Polishing
- Hair and Skin Analyser -- Imaging System
- Tattooing machine
- Skin Punches ( Disposable )
- Our Range in Health and Hygiene Products of Export Quality
- Stericlean - Disinfectant hand Rub
- Sanitol -- Instant hand Sanitizer
- Clenzol - - Disinfectant Floor Cleaner ( Hospital Grade )
- Sanmed - Ultrasound Gel / ECG Gel
- EasyPunch - Disposable Skin Punches

**Contact - Mr.Hemant - 09869400985 / 9224690704 ,**

**Email - mdinstruments@yahoo.co.in**



ऐका... राग भीमपलास - 'तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे'
(गायक - सुधीर फडके)

संग्रही ठेवा - '**व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत**', छात्र प्रबोधनप्रकाशन, किंमत रु. ७०/-




# CONVENTUS TECHNOLOGIES PVT. LTD.

A-304,305,306 Sagar Tech Plaza,
Andheri-Kurla Road,
Sakinaka Junction, Andheri (E)
Mumbai 400 072.

## With Best Compliments From

| | | |
|---|---|---|
| Tel | : | +91-22-28503232/3434 |
| Fax | : | +91-22-28503636 |
| E-mail | : | ganesh.mestry@conventus.in |
| Website | : | www.conventus.in |


कोवळे किरण, माथ्यात खोवून, निघालो प्रवासा अनंताच्या ।
वेल्हाळ आकाश, वत्सल प्रकाश, सदासोबतीला आयुष्याच्या ।।

संग्रही ठेवा - '**प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ५०/-





आदरांजली... प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ होमी नुसरवानजी सेठना
(६ सप्टेंबर २०१०)

संग्रही ठेवा - **'आश्वासक पालकत्व'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ८०/-

# *BOOST YOUR PROFITS*

*Do Not Panic in this world of* **GLOBALISED ECONOMY**

*Fight the onslaught of low priced goods using*
**'PRABODH'** ***brand*** **SPECIAL PURPOSE MACHINES**



*These machines are designed & built to give you*
**Quality goods at high productivity : eliminating the need of skilled operator and supervision.**

*We design and supply tailor - made machines of following categories*

Automation for **MASS PRODUCTION** of components

Automation for high speed **ASSEMBLY OF COMPONENTS**

Electro-Mechanical **COMPONENT ELEVATORS & CONVEYORS**

On line and Centrifugal **INDUSTRIAL WASHING MACHINES**

**TEST RIGS** for Assemblies and products

Ergonomic **WORK STATIONS** for manual assembly of parts

Conveyorised **AUTOMATION SCHEMES** for components & assembly.

*For further details please Contact*

## PRABODH NIRMAN

A-79, First Floor, Pawana Industrial Premises Co-op Society Ltd.
T-204, M.I.D.C. Bhosari, Pune-411026.
Phone No. - 020 - 27111788, 27111450
Telefax - 020-66111928
E - mail : prabodhnirman@vsnl.com
Visit our site at - www.prabodhnirman.com

दिवे घेऊन येतात संदेश सौख्य आणि समृद्धीचा।
दिवे देऊन जातात आशीर्वाद धनधान्य वृद्धीचा।।

संग्रही ठेवा - **'त्रिमितीची किमया'**, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किंमत रु. ७५/-

# छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण स्पर्धा

## ✻ 'सृजनाला पंख नवे' ✻ 'तुम्हीच संपादक व्हा!' ✻

### १. सृजनाला पंख नवे - सादरीकरणाची स्पर्धा

**स्पर्धेचे नियम –** ✻ सादरीकरणात इयत्ता पाचवी ते दहावीमधील १० ते २० विद्यार्थ्यांच्या गटाचा सहभाग असावा. ✻ कार्यक्रमातील पार्श्वगायन, गायन, वादन मुलांचेच असावे. ✻ साहित्याची निवड, नाट्यरूपांतर, दिग्दर्शन, नेपथ्य, सजावट यात मोठ्यांचे मार्गदर्शन चालेल. ✻ सादरीकरणासाठी 'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकांमधूनच (आत्ताच्या व यापूर्वीच्या) साहित्याची निवड करावी. सादरीकरणासाठी प्रत्येक गटासाठी ३० मिनिटांचा कालावधी आहे. ✻ स्पर्धेचे परीक्षण आपल्या शाळेत वा जवळपासच्या गावात केले जाईल.

**सहभागाच्या निश्चितीसाठी –** ✻ स्पर्धेसाठी शुल्क नाही. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी एका गटाला नोंदणी अनामत शुल्क रु.१००/– असेल. परीक्षणाच्या वेळी प्रत्यक्ष सादरीकरण केल्यावर अनामत शुल्क परत केले जाईल. ✻ ३० डिसेंबर २०१० पर्यंत अनामत शुल्क रोख/मनिऑर्डर/डिमांड ड्राफ्टने (ज्ञान प्रबोधिनी या नावाने) पाठवावे. सोबत मार्गदर्शकांचे नाव, पत्ता, दूरभाष क्रमांक लिहिलेले पत्र असावे.

**(स्पर्धेचा कालावधी दि. १५ ते ३० जानेवारी २०११)**

**बक्षिसे : प्रथम क्रमांक: रु. ७००/– द्वितीय क्रमांक – रु. ५००/– तृतीय क्रमांक – रु. ४००/–**
शिवाय शाळेला/गटाला प्रमाणपत्र व सहभागी विद्यार्थ्यांना 'छात्र प्रबोधन'चा अंक भेट म्हणून दिला जाईल.

### २. तुम्हीच संपादक व्हा - हस्तलिखित स्पर्धा

**खास तुम्हा मुलांच्या आग्रहावरून ही स्पर्धा यावर्षीही पुन्हा आयोजित करत आहोत.**

५ ते १० जणांच्या गटाने ५० पृष्ठसंख्येचे हस्तलिखित तयार करावे. किमान ४० पानांमधील साहित्य विद्यार्थ्यांचे स्वतःचे असावे. साहित्य फक्त मराठीतूनच असावे. हस्तलिखिताला विषयाचे बंधन नाही.

**स्पर्धा २ गटांमध्ये होईल. गटानुसार विशेष सूचना खालीलप्रमाणे**

१. **किशोर गट** (इयत्ता ५ वी ते ८वी)– हस्तलिखितामध्ये कथा, कविता, प्रवासवर्णन, पुस्तक परिचय, माहितीपर व कला कौशल्याचे कृतिपर लेख असायला हवेत. संकलित साहित्याबाबत (१० पानांपेक्षा अधिक नको) संदर्भ देणे आवश्यक.

२. **कुमार गट** (इयत्ता ९ वी ते १२ वी)– हस्तलिखितामध्ये वरील प्रकारच्या साहित्यप्रकारांशिवाय संस्था–प्रकल्प परिचय, व्यक्ती–मुलाखत यांचाही समावेश असावा.

हस्तलिखित पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ जानेवारी २०१०

**प्रत्येक गटात बक्षिसे – प्रथम क्रमांक रु. ७००, द्वितीय क्रमांक रु. ५००, तृतीय क्रमांक रु. ४००**

विविध साहित्यप्रकार, मुखपृष्ठ, सजावट, आतील चित्रे यांतील सर्वोत्कृष्ट कलाकृतींना प्रत्येकी रु. १००/– चे बक्षीस. (सर्व बक्षिसे पुस्तकरूपाने दिली जातील.)

**विशेष गुणवत्तेच्यावर असलेल्या सर्व गटांना 'छात्र प्रबोधन'चे अंक वर्षभर पाठविले जातील.**

विविध कलागुणांना वाव देणाऱ्या या नावीन्यपूर्ण स्पर्धांत आवर्जून सहभागी व्हा!
३० डिसेंबर २०१० पूर्वी नोंदणी करून स्पर्धांमधील सहभाग निश्चित करा.
स्पर्धांच्या अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क करा/माहितीपत्रक मागवा.



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १ कार्तिक शके १९३२, २३ ऑक्टोबर, २०१० या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे- २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे–३० येथून प्रसिद्ध केले.

DB®




शाश्वत विकासासाठी अन् पर्यावरण संरक्षणासाठी कायम प्रयत्नशील राहाणे, ही आजच्या काळाची गरज आहे. पुढच्या पिढ्यांसाठी निसर्गाचा सुंदर ठेवा हस्तांतरीत करण्याचे व्रत घेऊन गेली तीन दशके आमची वाटचाल सुरू आहे. उत्तम तंत्रज्ञानाच्या आविष्कारातून साकारलेली उच्चतम कार्यक्षमतेची उत्पादने, अपारंपरिक ऊर्जास्रोताच्या वापरासाठी आणि उर्जा बचतीची उद्दिष्टे साधण्यासाठीची यंत्रणा निर्माण करणे, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो.

स्वत: पासून सुरू होणाऱ्या या छोट्या ऊर्जा बचतीच्या व ऊर्जा वापरण्याच्या सवयींमध्येच भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याचे सामर्थ्य आहे, आणि म्हणूनच याचा जास्तीत जास्त प्रसार करण्याचे कंकण आम्ही बांधले आहे.

**दीपावली निमित्त सुंदर पर्यावरणासाठी अनेक शुभेच्छा !**

• Green Power Quality Solutions (UPSs) • Active Harmonic Filters • Grid Connect Inverters
• Energy Efficient Solar Inverters / PCUs • Customized UPS Systems • Static Transfer Switches
• Battery Monitoring Solutions • Remote Monitoring & Connectivity Solutions • Energy Optimization System

**डीबी पॉवर इलेक्ट्रॉनिक्स् (प्रा) लि.**
१२०/३७, रामटेकडी इंडस्ट्रिअल एरिया, हडपसर, पुणे – ४११ ०१३.
दूरध्वनी : +९१ २० ३०४६९२०० फॅक्स : +९१ २० ३०४६९२००
ईमेल : sales@dbups.com

Core Competence in Power Electronics

THINK GREEN

www.dbups.com

atulrk@gmail.com

सौर कार्तिक, शके १९३२/नोव्हेंबर २०१०, पंजीकृत नियतकालिक (RNI NO.) MAHMAR /2000/5636
घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001) तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक (LWP No. L-172)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : L-2/RNP/PNW/M/94/2009-2011




Pumps | Valves | Motors | Hydro Turbines | Turnkey Projects

Enriching Lives

**KIRLOSKAR BROTHERS LIMITED**
'Yamuna', S. No. 98 (3-7), Baner, Pune - 411 045. INDIA.
Tel. : +91 20 2721 4444 Fax : +91 20 2721 1117 www.kbl.co.in

सर्व देणगीदार, जाहिरातदार, प्रायोजक यांना मनापासून धन्यवाद ! त्यांच्या अर्थसाहाय्यामुळे, हजारो विद्यार्थ्यांना हा अंक ४० रुपयांमध्ये देता आला.

मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411 030. दूरभाष क्र.: (०२०)२४२०७१७४/१७९
ई-मेल-jpchhatra@rediffmail.com संकेत-स्थळ-www.chhatraprabodhan.org
प्रकाशन दिनांक: राष्ट्रीय सौर १ कार्तिक, शके १९३२ (२३ ऑक्टोबर २०१०) मासिकाची वार्षिक वर्गणी : ₹ १८०, या अंकाची किंमत : ₹ ६०